Impact Factor
5.604
www.sjifactor.com

p-ISSN 2454-7409
e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष सहावे अंक पहिला जानेवारी २०२१
Vol. 6 Issue 1
Jan. 2021
Regular Issue

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## MPSP

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

Peer Reviewed Annual National Indexed Research Journal
in Marathi
Published as per UGC (India) Guidelines

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Impact Factor 5.604 p-ISSN 2454-7409 e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 6 ISSUE 1 January 2021
वर्ष सहावे, अंक पहिला, जानेवारी २०२१
URL https://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=602

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब
**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

**संपादक मंडळ Editorial Board**
डॉ. राजू आदे, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे
**1. Dr. R.T. Ade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rajuade2512@gmail.com Mobile No.: +91-9422608715
**2. Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: +91-9422153353
**3. Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: +91-9765034097
**4. Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
**5. Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479

## Invited Editors

**1. Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
**2. Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**3. Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
**4. Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

1. **Mrs. Sonali Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
2. **Dr. J. Prabhash**, Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
3. **Dr. Ramesh Mangal**, NAAC Assessor, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
4. **Dr. Anil Gajbhiye**, Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
5. **Dr. Shashikant Sawant**, Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
6. **Prof. Dineshkumar Joshi**, Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
7. **Dr. Santoh Thakre**, Ex. Dean, Faculty of Social Science, S.G.B. Amravati Uni., Amravati
8. **Dr. P.W. Kale**, Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
9. **Dr. R.A. Mishra**, Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
10. **Dr. U.V. Navalekar**, Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
11. **Dr. J.M. Chatur**, Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
12. **Dr. Dhanaji Gurav**, Principal, Dr.Babasaheb Ambedkar College, Mahad, Dist. Raigarh,
13. **Dr. Leela More**, Ex-Professor, Government College, Indore, M.P.
14. **Dr. Sindhu Mandavkar**, Ex-Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra
15. **Dr. Kisan Patil**, M.J. College, Jalgaon, Khandesh, Maharashtra

**मुद्रक :** सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक :** डॉ. पवन मांडवकर

## Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobil No.: +91-9422867658, +91-9403014885
**Website:** 1) www.researchjournal.net.in 2) www.indiramahavidyalaya.com

**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-**
by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001

(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | उत्तर आधुनिकता आणि स्त्रीवादी मराठी कथा | दहिफळे संगिता बबन<br>मार्गदर्शक: डॉ. संजय नगरकर | ५–१० |
| २ | ना.घ. देशपांडे यांच्या प्रेमकविता: एक आस्वाद | प्रा. डॉ. विनोद उत्तमराव भालेराव | ११–१५ |
| ३ | काव्यात्म दुर्बोधता आणि मर्ढेकर व ग्रेस यांची कविता | प्रा. डॉ. विजय रैवतकर | १६–१९ |
| ४ | दया पवारांच्या कवितेतील वेदना | प्रा. डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव बागडे | २०–२३ |
| ५ | पत्रप्राजक्त : विचारसौंदर्याचे अद्भुत लेणे | प्रा. डॉ. स्मिता शेंडे | २४–२८ |
| ६ | रानमनाच्या जखमांच्या अजिंठा म्हणजे उरस्कल | प्रा. डॉ. सुधीर भगत | २९–३२ |
| ७ | नामदेव ढसाळांच्या कवितेतील व्यक्तिनिष्ठ आशय | डॉ. जगदिश्वर मेश्राम | ३३–३७ |
| ८ | पर्यावरण समतोल–जीवन अनमोल (जलसंवर्धन) | प्रा. डॉ. रामलाल चौधरी | ३८–४१ |
| ९ | 'धग' : कौतिकच्या संघर्षाची जीवनगाथा | डॉ. अविनाश श. धोबे | ४२–४५ |
| १० | झुंज आत्मकथनातील व्यक्तिरेखा : एक अभ्यास | प्रा. लालबा चां. दुमटकर | ४६–४७ |
| ११ | वसंत आबाजी डहाके ह्यांच्या ललित साहित्यातील विचार: एक आकलन | श्री. शिंदे सदाशिव<br>(संशोधक विद्यार्थी)<br>डॉ. राजेंद्र ठाकरे<br>(सहयोगी प्राध्यापक) | ४८–५२ |
| १२ | मराठीतील प्रवासवर्णनपर लेखनात स्त्रियांचे योगदान | मनिषा दादाभाऊ औटी | ५३–५६ |
| १३ | आदिवासी कवितेतील लोकजीवन | प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे | ५७–६१ |
| १४ | भटक्या विमुक्तांचे साहित्य स्वरूप व भूमिका | प्रा. मिथुन सदाशिव शेळके | ६२–६५ |
| १५ | आदिवासी गोंडी बोलीतील नामविचार<br>(कोया लम्‌जाता परोय) | डॉ. हरिचंद नांगसू नरेटी | ६६–७० |
| १६ | मराठी भाषेची कवितेतून मांडलेली थोरवी | डॉ. अर्चना काटकर –सोनवणे | ७१–७४ |
| १७ | दलित नाटक आणि सद्य:स्थिती | प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर | ७५–७८ |
| १८ | ग्रामीण काव्यातील शब्दछटा | प्रा. रविंद्र डाखोरे | ७९–८१ |
| १९ | पर्यावरणीय जीवन जाणीवा व्यक्त करणारी चाळेगत | प्रोफेसर डॉ. रमेश पां. पोळ | ८२–८४ |

# संपादकीय

'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'चा हा सहाव्या वर्षीचा पहिला अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संशोधकांनी विविध विषयांवरील उत्तमोत्तम शोधनिबंध प्रकाशनार्थ पाठविले व पीअर रिव्ह्यू समितीकडून झालेल्या छाननीतून प्रकाशनयोग्य अशा निबंधांना हिरवी झेंडी मिळाल्यावर हा अंक तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय नियमावलीनुसार शोधनिबंध प्रकाशित करण्यासंदर्भात सर्व संशोधक, अभ्यासक लेखकांना आम्ही सतत आवाहन करतो आणि त्याला शोधनिबंधलेखकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो. यूजीसीचा नियतकालिकांसदर्भात जी नियमावली आहे, तिचे तंतोतंत पालन 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' करते. हे नियतकालिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या मार्गदर्शनात प्रकाशित होते. पी–आयएसएसएन व इ–आयएसएसएन प्राप्त या नियतकालिकाचा इम्पॅक्ट फॅक्टरही पाचच्या वर आहे.

शोधनिबंध लेखकांनी शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळावा, ही आमची अपेक्षा असते. त्यात गोषवारा अथवा सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष किंवा समारोप, संदर्भ यांचा समावेश अनिवार्यपणे करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात. शोधनिबंध पूर्णत: तपासूनच पाठवावा. जर्नल हे गूगल, एसएसआरएन, रिसर्च गेट यांच्याशी लिंक केले असल्याने आपल्या निबंधाचे शीर्षक, लेखकाचे नाव व गोषवारा युनिकोड फॉन्टमध्ये मराठीत व त्याखाली इंग्रजीत अनुवाद टाईम्स न्यू रोमन मध्ये पाठविल्यास त्याचा आपल्याला फार मोठा फायदा होतो.

हे जर्नल गूग ल कनेक्ट असलेल्या www.researchjournal.net.in या व इंदिरा महाविद्यालयाच्या www.indiramahavidyalaya.com या वेबसाईटवर Research Journal या हेडमध्येही ठेवले जाते. त्यामुळे आपल्या निबंधाचे शीर्षक, विषय किंवा लेखकाचे नाव गूगलवर सर्च करताच आपल्यापुढे आपला निबंध किंवा त्यासंदर्भातील माहिती निबंध प्रकाशित झाल्यावर ओपन होते. गुगल स्कॉलर, रिसर्च गेट, एसएसआरएनवर आपण असल्यास, आपला शोधनिबंध दर्जेदार असल्यास, सायटेशन मिळाल्यास आपोआप तिथे नोंद होते. 'नॅक'मध्ये हे शोधनिबंध दाखवता येतात. आपल्याला दिलेली लिंक आपण नॅक SSR मध्ये, आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील आपल्या रिसर्च पेपर्समध्ये तसेच आपल्या बायोडाटातील रिसर्च पेपर्ससह विविध ठिकाणी नमूद करू शकता. Peer Reviewed जर्नल असल्याने यातील शोधनिबंध विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विविध प्राधिकरणांवरील नॉमिनेशन/को ऑपसाठी ग्राह्य धरले जातात. तसेच एपीआयसाठी Peer Reviewed जर्नलमधील शोधनिबंधांचे गुण ग्राह्य धरता येतात. हे १८ जुलै २०१८ रोजी यूजीसीच्या नियुक्ती व पदोन्नतीसंदर्भात प्रकाशित 'द गॅझेट ऑफ इंडिया' मधील गाइडलाइन्समध्ये पृ. क्र. १०५ वर टेबल क्र. २ मध्ये पहिल्याच क्रमांकावर आहे. हे बघण्यासाठी त्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.
https://www.ugc.ac.in/pdfnews/4033931_UGC-Regulation_min_Qualification_Jul2018.pdf

यूजीसीच्या नोटिफाईड जर्नल्स यादीत येण्यासाठी विहित मार्गाने नियतकालिकाने अर्ज दाखल केलेला आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने अधिकाधिक दर्जेदार शोधनिबंध ऑनलाईन व ऑफलाईन प्रकाशित करण्याची संधी 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'ला मिळत राहील, हीच अपेक्षा!

— डॉ. पवन मांडवकर
व संपादक मंडळ

# उत्तर आधुनिकता आणि स्त्रीवादी मराठी कथा

मार्गदर्शक : प्रा. डॉ. संजय नगरकर

दहिफळे संगिता बबन
सर्व्हे. नं. ५५/२, तुळजाभवानीनगर,
गंगाई निवास, खराडी, पुणे ४११०१४, महाराष्ट्र (India)
इ मेल dahiphale.sangita1676@gmail.com भ्रमणध्वनी ९८२२१७८१९६

## गोषवारा (Abstract):—

युगप्रवर्तनानुसार साहित्याच्या क्षेत्रात प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन, आधुनिक, उत्तर आधुनिक किंवा आधुनिकोत्तर असे वेगवेगळे कालखंड मानले गेले आहेत. त्यातील आधुनिक किंवा उत्तर आधुनिक (Modern and Post-Modern) हे दोन कालखंड स्त्रीवादी कथेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यातील १९८० पूर्वीची कथा ही आधुनिकतेचा आविष्कार करणारी आहे. ज्यातून स्त्रीला आलेले जगण्याचे भान, स्त्री–पुरुष नात्यातील दाहक वास्तव, बंडखोरी या जाणिवांचा आविष्कार स्त्रिया करू लागल्या तर 'उत्तर आधुनिक' काळातील स्त्री ही मुक्ताविष्कार करणारी असल्याचे दिसते.

## बीजशब्द :—

आधुनिकता आणि उत्तर आधुनिकता, स्त्रीवाद, महानगरीय संवेदन, खाउजा, स्त्रीवादी कथा

## १. कथा: पूर्वपरंपरा :—

कथा ही मानवावर अगदी बालपणापासून संस्कार करीत आलेली आहे. आजीने, आईने सांगितलेल्या चिऊकाऊच्या, राजाराणीच्या, पऱ्यांच्या कथांमधून मानवाचे कल्पनाविश्व, भावविश्व वृद्धिंगत होत गेले. कथा सांगणे, ऐकणे हे मानवाला उपजतच आवडते. आपल्याकडे पंचतंत्र, विक्रमवेताळ, दशावतार इ. अनेक प्रकारच्या गोष्टी सांगितल्या व ऐकल्या जातात. जगातील प्रत्येक भाषेतील साहित्याच्या क्षेत्रात 'कथा' हा साहित्यप्रकार प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला दिसतो. कहाणी, गोष्ट, हकिगत, कथा (Fiction) अशा वेगवेगळ्या नावांनी कथा लिहिली गेलेली दिसते. आधुनिक काळात 'लघुकथा' या नावाने ती स्थिर झाली. तिच्या घटक वैशिष्ट्यांना समोर ठेवून सर्वच अभ्यासकांनी कथेच्या लांबी–रुंदीचा विचार केलेला दिसतो. भालचंद्र नेमाडे यांनी, "लघुकथा हा कमी लांबीचा, मर्यादित भाषिक अवकाश पुरविणारा; एकसूत्रीय आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदन देणारा प्रकार आहे."[१] असे म्हटले आहे. मराठी कथेला प्राचीन परंपरा असली तरी ती काळानुरूप बदललेली दिसते. आज ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी असे काही प्रवाह सांगता येतील. या प्रवाहातील 'स्त्रीवादी कथा' कालखंडानुसार बदलताना दिसते.

एका ओळीच्या कथेपासून चाळीस ते पन्नास पानांपर्यंत कथा लिहिली गेलेली आहे. मराठी कथेचा परामर्श घेत असताना, काळ आणि अवकाशाच्या पार्श्वभूमीवर तिचे रूप बदलत गेलेले दिसते. खरे तर आईने सांगितलेल्या चिऊ–काऊच्या गोष्टींपासून आपला कथेशी संबंध येतो. प्राचीन काळातील विविध प्रकारच्या गोष्टी, व्रतवैकल्यांच्या कहाण्या या स्त्रीनिर्मितच आहेत. आधुनिक काळात देखील स्त्रियांनी मराठी कथेचे दालन समृद्ध केलेले दिसते. अर्थात स्त्रीवादी दृष्टिकोनातून कथा लिहिली जाऊ लागली ती १९६० नंतर. त्यापूर्वी विभावरी शिरूरकर यांच्या 'कळ्यांचे निःश्वास'सारख्या कथासंग्रहांनी स्त्रीजीवनाचा व स्त्रीमनाचा हुंकार आपल्या कथांमधून व्यक्त केला. साठोत्तरी मराठी कथाविश्वात विजया राजाध्यक्ष, उर्मिला पवार, नीरजा, सानिया, प्रिया तेंडूलकर अशा सकस आणि सशक्तपणे स्त्रीवादी जाणिवांचा आविष्कार करणाऱ्या कथालेखिका पुढे आल्या.

## २. स्त्रीवाद :—

'स्त्रीवाद' ही एक समाजपरिवर्तन घडवून आणणारी सामाजिक, राजकीय जाणीव आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाची जडण–घडण कशी झाली? याचा शोध घेणे म्हणजे खरा 'स्त्रीवाद' होय. साधारणपणे १९६० नंतर

स्त्रीवादी चळवळीने जोर धरला असला, तरी मराठी कथेच्या प्रातांत मात्र स्त्रीवादाची चाहूल लागली ती १९३३ मध्येच; कारण विभावरी शिरुरकरांनी त्या काळामध्ये स्त्रियांच्या संदर्भातील जे अनुभव कथासाहित्यातून मांडले ते उल्लेखनीय आहेत. स्त्रियांच्या जीवनातील व्यक्तिस्वातंत्र्य व तत्कालीन वास्तववाद याचे दर्शन त्यांनी त्यांच्या 'कळ्यांचे निःश्वास' (१९३३) या कथासंग्रहातून घडविलेले आहे. हा कथासंग्रह कुमारिकांचे प्रश्न मांडून त्यांच्या भाव–भावनांना वाट करून देणारा होता. यानंतर कितीतरी मराठी लेखिकांनी मराठी साहित्यातील कथेच्या क्षेत्रामध्ये लेखन केले; परंतु ते स्त्रीवादी होतेच असे नाही. कारण केवळ स्त्री आहे म्हणून तिने लिहिलेले साहित्य हे स्त्रीवादी ठरत नाही. स्त्रीवादी कथासाहित्य म्हणजे, 'पुरूषप्रधान संस्कृतीला आव्हान देणारे कथासाहित्य होय' स्त्रीवादी कथासाहित्यात स्त्रीच्या व्यथा, वेदना, श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी–परंपरा, तिचे हक्क या सर्वांतून तिला होणारी 'जाणीव–जागृती' महत्त्वाची आहे. एकंदरीत या शोधनिबंधामध्ये मराठी साहित्यातील स्त्रीवाद समजून घेताना उत्तरआधुनिक काळातील काही निवडक स्त्रीवादी कथांचा परामर्श घेणार आहे.

## ३. स्त्रीवादी कथा पूर्वपीठिका :–

स्त्रीवादी लेखिका म्हणून कथालेखन करणारी उल्लेखनीय नावे म्हणजे विभावरी शिरूरकर, कमलाबाई टिळक, कुसुमावती देशपांडे, इंदिरा दीक्षित या होय. कमलाबाई टिळक यांची 'बाहुल्या' ही कथा स्त्रीच्या मनाची झालेली कुचंबना, तिच्या भावनेच्या तरल आंदोलनाचे चित्रण करते, तर 'शांती' ही त्यांची कथाही स्त्रीजीवनातील व्यक्तिगत प्रश्नांची चर्चा करते. जन्म दिलेला मुलगा मोठा झाल्यावर तो आईपेक्षा वडिलांनाच जवळ करतो याचे दुःख त्या मातेला होते. कमलाबाई टिळक यांच्या कथांबद्दल के. ज. पुरोहित म्हणतात की, "पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीची जी कुंचबना होते त्याचे सूक्ष्म चित्रण कमलाबाई टिळक यांनी केले."[२] पुरोहित यांच्या म्हणण्यानुसार कमलाबाई टिळक यांच्या 'हृदयशारदा', 'कोकणी वहाणा', 'बाहुल्या', 'शांती' या कथांमध्ये स्त्रीजीवनाचे वास्तव चित्रण रेखाटलेले दिसते.

इंदिरा दीक्षित यांनीही आपल्या कथांमधून स्त्रीजीवनातील संसाराचे महत्त्व त्यातील लहान–सहान गोष्टी टिपताना 'पाखरांचा संसार' यासारखी रूपककथा लिहिली आहे. संसार म्हटले की प्रेम, आपलेपण, भांडणे, विरह, संघर्ष हे सर्व स्त्रीच्या वाट्याला नेहमीच येते. या सर्व भावांचे, तिच्या मनातील आंदोलनाचे चित्रण करताना स्त्रीत्व हे संकटाच्यावेळी कसे आधार शोधते हे शोधणारे कथेचे तत्त्व आहे.

कुसुमावती देशपांडे यांची 'सीता' ही कथा वाचनीय आहे. पतीच्या निधनानंतर महादबाशी अनैतिक संबंध ठेवून जन्माला येणाऱ्या बाळाला जीवन देण्याचे ती ठरविते. तिचे हे 'आईपण जपणे' या कथेच्या कथानकाला उंची प्राप्त करून देते. त्यांच्या कथांमध्ये स्त्रीच्या जीवनातील वेगवेगळ्या समस्यांचे चित्रण केलेले दिसते. कुसुमावती देशपांडे यांच्या कथालेखनाबद्दल म. ना. अदवंत म्हणतात की, "बाह्यघटनेपेक्षा व्यक्तीमनात त्यांची प्रतिमा अधिक रमते आणि व्यक्तीच्या जीवनात घडणाऱ्या क्षुल्लक प्रसंगातून ती मानवी जीवनातील गुंतागुंत, त्यातील भावनांची आंदोलने, त्यामधील विसंगती या सर्वांचे चित्रण अतिशय नाजूकपणे व अतिशय सहानुभूतीपूर्वक रीतीने करते."[३] म. ना. अदवंत यांच्या म्हणण्यानुसार कुसुमावती देशपांडे यांच्या कथा मानवी मनाचे भावविश्व हळुवारपणे रेखाटताना दिसते. 'पिठोरी अमावस्या' ही कथा आई आणि मुलगा यांच्या व्यक्तिमनातील आंदोलनाचे नाजूक चित्रण आहे. तसेच त्यांची 'दमडी' ही कथा एका लहान मुलीचे भावविश्व रेखाटणारी शब्दचित्रात्मक कथा आहे.

## ४. साठोत्तरी स्त्रीवादी कथा :–

१९५० ते १९७५ नंतर स्त्रीवादी कथा साहित्यात फार बदल झालेला दिसतो. विशेषत: १९७५ नंतर बदलेल्या वातावरणात स्त्रीवादाची वेगवेगळी रूपे गौरी देशपांडे, सानिया, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, आशा बगे यासारख्या लेखिकांनी आपल्या कथांतून दर्शविली आहेत. गौरी देशपांडे यांची 'आता कुठं जाशील टोळभंटा?' (आहे हे असं आहे, मौज प्रकाशन, १९८६) ही कथा अभ्यासण्यासारखी आहे. त्यांच्या कथेतील नायिका समाजमान्य रीती सांभाळणारी आहे. केवळ नवऱ्याचे स्वयंपाकपाणी सांभाळण्यासाठी ही नायिका नवऱ्याबरोबर जाते. अशा समाजमान्य रीतीची गौरी देशपांडे टिंगल करतात. कालबाह्य भारतीय संस्कृतीवर टीका करतात. या कथेबद्दल डॉ. अंजली सोमन म्हणतात की, "या कथेतील उपरोध समजून घेतला तरच त्यातील स्त्रीवादी विचार लक्षात येऊ शकतो. त्यांच्या 'आहे हे असं आहे' या कथासंग्रहातील 'पाऊस आला मोठा' ही कथा विशेष लक्षणीय अशी आहे. या कथेतील नायिकेचे सावत्र आईमधील गुंतणे शोधताना वाचक म्हणून आपणही कथेत गुंतत

जातो. सख्ख्या आईच्या, वडिलांच्या व सावत्र आईच्या मृत्यूची मालिका ही नायिका अनुभवते."[४]

## ५. उत्तरआधुनिकता व स्त्रीवादी मराठी कथा :—

युगप्रवर्तनानुसार साहित्याच्या क्षेत्रात 'प्राचीन', 'मध्ययुगीन', 'अर्वाचीन', 'आधुनिक', 'उत्तरआधुनिक किंवा आधुनिकोत्तर' असे वेगवेगळे कालखंड मानले गेलेले दिसतात. त्यातील 'आधुनिक' आणि 'उत्तरआधुनिक' (Modern and Post-Modern) हे दोन कालखंड स्त्रीवादी कथेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यातील १९८० पूर्वीची कथा ही आधुनिकतेचा आविष्कार करणारी आहे. ज्यातून स्त्रीला आलेले जगण्याचे भान, स्त्री—पुरूष नात्यातील दाहक वास्तव, बंडखोरी या जाणीवांचा आविष्कार स्त्रिया करू लागल्या. तर उत्तरआधुनिक काळातील स्त्री ही मुक्ताविष्कार करणारी असल्याचे दिसते. त्यासाठी 'उत्तरआधुनिकता म्हणजे काय?' हे आपणास पहावे लागते.

आधुनिक युगामध्ये साहित्यातील नैतिकतेचा सौंदर्यतत्त्वांशी काय संबंध आहे? असा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला. या सर्व प्रक्रियेत हळूहळू स्त्रीदेखील केंद्रस्थानी येऊ लागली. 'संज्ञाप्रवाह' साहित्यातून आविष्कृत होऊ लागला. आधुनिकतावादाची ही लक्षणे ज्या इंग्रजी साहित्यातून व्यक्त झाली. त्यासंदर्भात अविनाश सप्रे असे म्हणतात की, "आधुनिक युगामध्ये साहित्यातील नैतिकतेचा शोध घेण्यापेक्षा सौंदर्यतत्त्वांचा शोध घेणारे सौंदर्यशास्त्र निर्माण झाले. स्त्री—पुरुष संबंधांचा धीट आविष्कार होऊ लागला. 'स्ट्रीम ऑफ कॉन्शसनेस' सारखे सर्वस्वी नवे आविष्करण साहित्यातून होऊ लागले. इंग्रजी वाङ्मयापुरतेच बोलायचे तर टी. एस. एलीयटच्या 'वेस्टलँड' मधून, एझरा पाऊँडच्या 'ह्युग सेलवीन मॉबर्ली' मधून, जेम्स जॉन्सच्या 'युलीसिस'मधून डी.एच. लॉरेन्सच्या 'वूमन इन लव्ह' मधून आणि व्हर्जिनिया वूल्फच्या 'टू द लाईट हाऊस' मधून हे नवे युगभान सृजनरूपात प्रकट झालेले दिसते. हे युगभान म्हणजेच 'आधुनिकता' होय."[५]

१९३० नंतर हळूहळू आधुनिकतावादाचा प्रभाव ओसरू लागला. दुसऱ्या महायुद्धाने अनेक मानवी मूल्ये उद्ध्वस्त केली. वैफल्यग्रस्तता, यंत्रशरणता, अमानवता, माणसाचे जगणे किडामुंगीसारखे होणे. यासारख्या गोष्टींमुळे युरोपमध्ये सांस्कृतिक उदध्वस्तता निर्माण झाली. पुढे उदयाला आलेल्या 'उत्तरआधुनिकते'ची ही सुरूवात होती. 'नित्शे आणि हायडेगर' यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानात 'उत्तरआधुनिकते'चे मूळ स्पष्ट करताना निशिकांत ठकार असे म्हणतात की, "उत्तरआधुनिकतेच्या मुळाशी 'नीत्शे आणि हाइडेगर यांचे तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानातूनच नाझीवादाचे भूत उभे राहिले होते. आता उत्तरआधुनिकतावादाचा महासमंध उठला आहे. फ्रान्समधील ल्योतार, मिशेल फुको, रोला बार्थ, बेद्रिला आणि देरिदा यांच्या विचारविमर्शातून तो अमेरिकन विद्यापीठात आणि अकादमीत शिरला. तेथे त्याच्या आणखी व्याख्या झाल्या आणि आता भारतात आपण त्याच्या सावल्यातून संगती शोधतो आहोत."[६]

साहित्याचा अभ्यास करीत असतांना काळानुरूप त्यात झालेले बदल समजून घ्यावे लागतात. भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक पर्यावरणाचा साहित्यावर परिणाम होत असतो. जसे की युरोपियन देशांमध्ये रेनसांस नावाची चळवळ आली आणि सर्व क्षेत्रामध्ये एक प्रकारची मुक्तता, आधुनिकता येऊ लागली. धर्मसत्तेच्या जोखडातून साहित्य देखील मुक्त होऊ लागले. तसेच औद्योगिक क्रांती झाल्यामुळे माणसाचे जगणे सुसह्य व्हायला लागले. तो वैज्ञानिक दृष्टीनेही विचार करू लागला. या सर्वांचे पडसाद साहित्यात उमटू लागले. त्यातून साहित्य अभ्यासाच्या क्षेत्रामध्ये काही नवविचार, नवसिद्धांत आणि नव्या संकल्पना मांडल्या जाऊ लागल्या. 'आधुनिकता (Modern) व उत्तरआधुनिकता (Post-Modern) यापरस्पर संवादी संकल्पना देखील त्यापैकीच आहेत. कलेच्या क्षेत्रात आधुनिकतेचा संबंध हा बंडखोरीशी, प्रयोगशीलतेशी जोडला गेला. पूर्वी सामाजिक परिक्षेत्रावर धर्माचे अधीराज्य होते. आता ते साहित्यिक, विचारवंताचे असावेत असे मानले जाऊ लागले. साहित्याला विचारांचे अधिष्ठान असायला हवे ही भूमिकाही मांडली जाऊ लागली.

'आधुनिकता' आणि 'उत्तरआधुनिकता' या दोन्ही संज्ञा कालवाचक आहेत. आधुनिकतेच्या उत्तरकाळातील तो उत्तरआधुनिकतावाद की, आधुनिकतेच्या विरोधातील प्रतिक्रिया म्हणजे उत्तरआधुनिकतावाद? असा एक प्रश्न पुढे येतो. या संज्ञा कालवाचक की प्रवृत्तीवाचक असाही प्रश्न पुढे येतो. या दोन्ही संज्ञातील फरक स्पष्ट करताना जेन्सकन म्हणतो की, "आधुनिक संस्कृती ही उच्चभ्रूंची दुर्लभ संस्कृती आहे तर उत्तरआधुनिक संस्कृती ही लोकप्रधान व सुलभ संस्कृती आहे."[७] आपली भारतीय संस्कृती ही दुसऱ्या प्रकारची असल्यामुळे आपल्याला उत्तरआधुनिकतेत नवे असे काहीच नाही.

## ५.१ उत्तरआधुनिकतेची वैशिष्ट्ये :–

'उत्तरआधुनिकता व स्त्रीवादी मराठी कथांचा' परस्पर संबंध पाहताना १९९० नंतर आलेले जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण व त्याचा एकूणच सर्व समाजावर झालेला परिणाम आणि विशेषतः महानगरीय वातावरणावर पडलेला प्रभाव यांचे व स्त्रीवादी कथेचे एक वेगळे नाते आहे.

I. उत्तरआधुनिक काळात समाजाचे वस्तुकरण झाले. व्यवहारवाद महत्त्वाचा मानला जाऊ लागला. मानवतेपेक्षा माणसांमध्ये बाजारीकरणाला महत्त्व प्राप्त झाले.
II. मॉल संस्कृतीचे आगमन, चंगळवाद, कौटुंबिक नात्याची मोडतोड झाली.
III. राजकारण व समाजकारण यामध्ये दडपशाही, मुस्कटदाबी केली जाऊ लागली. त्याची तीव्र प्रतिक्रिया म्हणून 'रस्त्यावरील लढाई' हे चित्र दिसू लागले.
IV. स्त्रीला विहार करण्यासाठी मोकळे आकाश प्राप्त झाले. प्रचंड वेगाने विस्तारणारे औद्योगिक, व्यवसायिक क्षेत्र तिला खुणावू लागले व ती अधिक आत्मनिर्भर, स्वावलंबी, बनू लागली. परंतु कौटुंबिक ताणेबाणे निर्माण होऊ लागले.
V. महानगरांमध्ये एक अती उच्चभ्रूवर्ग, नव्याने निर्माण झालेला उच्चमध्यमवर्ग या दोन्ही वर्गांच्या सेवेसाठी तत्पर असलेला अकुशल कामगार वर्ग हे वर्गभेद निर्माण झाले.
VI. प्रसारमाध्यमांची रेलचेल झाल्यामुळे गुप्त अशी कोणतीच गोष्ट राहिली नाही. सामान्यातल्या सामान्य माणसाच्या हातात मोबाईलसारखे यंत्र आले.
VII. या काळातील मानवी मूल्यांनी आपली कुस बदललेली दिसते. जग हेच एक महानगरे होऊन गेले. मोठी शहरे, म्हणजे विकसित आणि गावे म्हणजे अविकसित शहरे असे परिवर्तन झालेले दिसते. ग्रामीण भागातील मूल्ये देखील बदलू लागली. शहरी व्यवहारवाद, ग्रामीण भागाकडे सरकू लागला.
VIII. माहिती आणि तंत्रज्ञानाचा झालेला विस्फोट, अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे झालेले आगमन, त्यामुळे निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधी आणि दुसरीकडे वाट्याला आलेले सामाजिक, आर्थिक, मानसिक विस्थापन अशी विसंगत परिस्थिती निर्माण झालेली दिसते.
IX. जीवघेणी स्पर्धा, पैसा हेच सर्वस्व, नवे रूप घेऊ लागलेला जातीयवाद, धर्मवाद व राष्ट्रवाद यामुळे एकूण सारा देशच ज्वालामुखीच्या तोंडावर येऊन ठेपलेला दिसतो.
X. साठनंतर जागृत झालेली स्त्री, वास्तवाचे भान आलेली स्त्री पुन्हा शोभेची बाहुली बनलेली दिसते. विश्वसुंदरी स्पर्धा, सौंदर्यप्रसाधनाच्या जाहिराती, अगदी खेड्यातील झोपडीपर्यंत पोहोचवणारी त्यांची उत्पादने यातून स्त्री पुन्हा बाजारातील एक वस्तू म्हणून उभी केलेली दिसते. त्यास छेद देणाऱ्या स्त्रीला, बंडखोरी करणाऱ्या स्त्रीला समाज आजही स्वीकारावयास तयार नाही.

## ५.२ उत्तरआधुनिक काळातील मराठी स्त्रीवादी कथा :–

उत्तरआधुनिक काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मराठी कथा येणाऱ्या आव्हानांना सामोरी गेलेली दिसते. १९९० नंतरची स्त्रीवादी मराठी कथा व्यामिश्र आहे. काळानुरूप बदलत आहे. जागतिकीकरणाने स्त्रीसमोर उभे केलेले प्रश्न, तिचा होणारा कोंडमारा, तिची हतबलता, लैंगिकता, कौटुंबिक समस्या अशा अनेक आशयविषयांच्या बंधनातून ती मुक्त झाल्याचे दिसते. तिने फडके–खांडेकर साच्याला पूर्णपणे नाकारलेले दिसते. ती बदलत्या काळात तिच्यासमोर उभ्या असणाऱ्या प्रश्नांचा वेध घेऊन त्यांच्याशी संघर्ष करीत आपले भावविश्व रेखाटण्याचा प्रयत्न करताना दिसते. एवढेच नव्हे तर चूल आणि मूल या सीमित विश्वाच्या बाहेर स्वत्व शोधताना प्रचंड संघर्ष करताना दिसते.

या कालखंडात सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक पातळीवर प्रचंड बदल घडून आले. या कालखंडातील लेखिकांनी ग्रामीण, दलित, महानगरीय, कामगार, शेतकरी, आदिवासी या सर्वच स्त्रियांच्या बदलेल्या जाणिवांचे चित्रण केलेले आहे. यामध्ये मेघना पेठे, नीरजा, प्रज्ञा पवार, उर्मिला पवार, माधुरी शानबाग, रेखा बैजल, प्रतिमा इंगोले, प्रतिमा जोशी, सानिया, मोनिका गजेंद्र गडकर, सुप्रिया अय्यर, शिल्पा कांबळे, इंद्रायणी सावकार, मनस्विनी लता रविंद्र इ. स्त्रियांच्या अनेक कथांमधून दलित, कामगार, शहरी, ग्रामीण, अल्पशिक्षित, उच्चशिक्षित स्त्रियांच्या भावविश्वात घडलेले बदल रेखाटले आहेत. त्याचबरोबर सुबोध जावडेकरांसारखा एखादा पुरूषही स्त्रीजाणिवांनी प्रेरित होऊन समर्थपणे स्त्रीजीवनाचे चित्रण 'आकाश भाकिते' या विज्ञान कथासंग्रहातून करताना

दिसतो.

प्रतिमा जोशी यांचा 'जहन्नुम' हा कथासंग्रह. त्यांनी वेश्यावस्ती, झोपडपट्टी आणि निम्न वर्गातील स्त्रियांच्या संदर्भात कथालेखन केले आहे. स्त्रियांच्या असाह्यतेचा, हतबलतेचा, गरिबीचा आणि स्त्री असण्याचा गैरफायदा घेणाऱ्या समाजातील राजकीय क्षेत्रात, प्रशासकीय आणि सार्वजनिक क्षेत्रात वावरणाऱ्या खोट्या मुखवट्याखालील पुरूष वर्गाचे दर्शन घडविलेले आहे.

ग्रामीण जीवनावर कथालेखन करणाऱ्या सक्षम लेखिका म्हणजेच प्रतिमा इंगोले होते. यांच्या 'अकसदीने दाने' 'अमंगलयुग', 'सुगरीनीचा खोपा', 'उलटे झाले पाय' या कथासंग्रहातून ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. स्त्री–पुरुष नातेसंबंध, त्यांचे भावजीवन, उत्कटता, हळुवारता, नात्यातील घट्टवीण ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये. नव्वदोत्तर बदलेल्या जातवादाचा, धर्मवादाचा प्रभाव सामान्य हिंदू आणि मुस्लीम कुटुंबावर कितपत पडला? याचाही शोध त्या 'श्रद्धा' या कथेतून घेताना दिसतात.

'जे दर्पणी बिंबले', 'ओल हरवलेली माती', 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' या कथासंग्रहातून नीरजा ही लेखिका स्त्रीविश्वात घडत असलेले बदल रेखाटतात. केवळ समाजातच नाही तर घरात होणारे स्त्रीचे शोषण, अत्याचार नीरजा प्रखरपणे मांडतात. उदा. 'ओल हरवलेली माती' या कथेतील 'फातिमा' ही स्त्री वेगळी आहे. ती दु:खी आहे. तिचे दु:ख कुणालाही कळत नाही. कारण तिला तिच्याच जावयाबाबत शरीर आकर्षण मनात दाटून येते. पण जावई तिच्या मोहात अडकत नाही. म्हणून फातिमा मुलीचा आणि जावयाचा द्वेष करीत राहते. ही कथा वाचकाला अस्वस्थ करते.

सानिया यांच्या कथेचे वैशिष्ट्ये म्हणजे 'स्त्री केंद्र!' जागतिकीकरणानंतर मध्यमवर्गीय स्त्रिया मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या करू लागल्या, कुटुंबाला आधार नव्हे तर स्वत:चे अस्तित्व निर्माण करावे या सुप्त हेतूने. सानियांची नायिका निराशेतून बाहेर पडून आपली नवी वाट शोधण्याचा प्रयत्न करणारी आहे. उषा किरण आत्राम व नजुबाई गावित या आदिवासी स्त्री कथाकार त्यांचे 'अहेर' व 'नवसा भिलणीचा एल्गार' हे कथासंग्रह. 'अहेर' या कथेत पेशवेकालीन समाजव्यवस्थेत जमीनदार, सावकार, वतनदारांनी आदिवासी नववधूंचे लैंगिक शोषण करण्याच्या 'अहेर' या प्रथेविरुद्ध सोमा आणि रमी या नव दांपत्याने केलेला संघर्ष आहे. रमी सावकाराचा खून करून येते, तेव्हा गावातील सर्व स्त्रीया जोरजोराने घोषणा देतात. अहेराचा बदला या संघर्षातून स्त्रियांमध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याचा आलेला विश्वास लेखिकेने मोठ्या ताकदीने मांडला आहे.

एकूणच वरील स्त्रीवादी कथेचा विचार करता आजच्या मराठी स्त्रीवादी कथेचे चित्र अजिबात निराशाजनक नाही. ती प्रयोगशील आहे. आजच्या मराठी कथेच्या ऐरणीवर नवे विषय आणले जात आहेत. आजच्या स्त्रीवादी मराठी कथेत धीट मांडणी आणि थेट अभिव्यक्तीचा प्रत्यय येतो.

उत्तरआधुनिकतेची वैशिष्ट्ये पाहिल्यानंतर स्त्रीवादी कथांवर त्याचा कोणता परिणाम झालेला आहे हे पाहता येईल. या काळातील स्त्रीवादी कथांच्या केंद्रस्थानी मेघना पेठे, मनस्विनी लता रविंद्र, प्रज्ञा दया पवार, नीरजा अशा काही लेखिकांच्या कथांचा विचार आपणास करावा लागतो. मेघना पेठे या कथा, कादंबरीकार त्यांच्या 'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गाई' या दोन कथासंग्रहांमधून महानगरीय जीवन, तेथील ताणतणाव, बदललेले सांस्कृतिक विश्व, स्त्रीची मानसिक कोंडी, स्त्री–पुरूष नात्यातील शारीरिक आकर्षण व अनुभव व या सर्वात तिची होणारी दमछाक यांचे थेट चित्रण आलेले दिसते.

या काळातील महानगरीय जीवनशैलीचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून वेध घेणारे दुसरे एक नाव म्हणजे प्रज्ञा दया पवार होय. 'अफवा खरी ठरावी' या कथासंग्रहामधून प्रज्ञा पवार यांनी नव्या दृष्टीने स्त्री प्रतिमांचा वापर केलेला दिसतो.

या काळातील आणखी एक सशक्त स्त्रीवादी कथालेखिका म्हणजे नीरजा होत. नीरजा यांच्या कथांमधून स्त्री–पुरूष नातेसंबंधाबरोबरच स्त्रीच्या मनोव्यापाराचे, तिच्या मानसिक वादळाचे चित्रण नीरजा यांनी केलेले आहे.

शिल्पा कांबळे या अलीकडच्या काळातील कथालेखिका. आंबेडकरी विचारांच्या दृष्टिकोनातून त्यांनी स्त्रीच्या वेदनेला कथेतून मुखर केलेले आहे. प्रज्ञा पवारांच्या कथेशी त्यांच्या कथेचे एक नाते आहे.

मनस्विनी लता रविंद्र यांच्या 'ब्लॉकच्या आरशापलीकडे' या कथासंग्रहांमधून महानगरीय मुक्तजीवनाचा अनुभव घेणाऱ्या व समाजाच्या तिरस्काराचा सामना करणाऱ्या, तुटलेपणाचे दु:ख भोगणाऱ्या मुलींचे भावविश्व मांडलेले आहे.

## ६. समारोप :—

उत्तरआधुनिक काळातील काही मोजक्या स्त्रीवादी कथांचा व कथा लेखिकांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. खरे तर उत्तरआधुनिक काळातील महानगरीय जीवन हे बहुस्तरीय, बहुकेंद्रीय व बहुमुखी आहे. त्यातील स्त्रीमनाची घुसमट व तिचे भावविश्व मांडणाऱ्या मोजक्याच लेखिका कथालेखन करताना दिसतात. त्यात नीरजा, प्रज्ञा पवार, मेघना पेठे, शिल्पा कांबळे, मनस्विनी, लता रविंद्र यांचा प्रामुख्याने विचार करता येतो.

## संदर्भ :—

१. नेमाडे भालचंद्र, (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवोदितांसाठी ऑनलाईन कथालेखन कार्यशाळा) दि. १ नोव्हेंबर २०२०, डॉ. सुहासिनी किर्तीकर यांच्या विवेचनातून.
२. के. ज. पुरोहित समा. 'मराठी कथा : विसावे शतक', संपा. के. ज. पुरोहित, सुधा जोशी, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००४, पृ.१३.
३. म. ना. अदवंत, समा. 'मराठी लघुकथेचा इतिहास', नीहारा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९३, पृ.६७
४. डॉ. अंजली सोमण, 'मराठी कथेची स्थितिगती', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९, पृ.१९८.
५. अविनाश सप्रे, समा. 'समीक्षेतील नव्या संकल्पना', संपा. मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. मार्च २००१, पृ.२६,
६. निशिकांत ठकार, तत्रैव, पृ.३५
७. तत्रैव, पृ.३५

❖❖❖

# ना.घ. देशपांडे यांच्या प्रेमकविता: एक आस्वाद

प्रा. डॉ. विनोद उत्तमराव भालेराव
सहायक प्राध्यापक (मराठी विभाग)
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
ता. कळमेश्वर, जि. नागपूर ४४१५०२, महाराष्ट्र (India)
इ मेल profvinodbhalerao@gmail.com भ्रमणध्वनी ९७६७६५७६६०

## गोषवारा (Abstract):

ना.घ. देशपांडे यांच्या प्रेमकवितेत भावविवशता आहे. आनंद आणि समाधानाचे क्षण आहेत. सौंदर्य ही ना.घं.ची जीवननिष्ठा आहे. ना.घं.ची प्रेमकविता वाचकांना भावविश्वात घेऊन जाते. अनुभूती हे ना.घं.च्या कवितेचे आणखी एक वैशिष्टय आहे. त्यांच्या काव्यातील जिवंतपणा हा महत्त्वाचा आहे. ना.घं.च्या काही कविता ह्या बोरकरांच्या पठडीतील आहेत. प्रेमाचे नाजुकपणही त्यांची कविता सांभाळते. त्यांच्या प्रेमकवितेतही चिंतनगर्भता, दृश्यात्मकता, परिणामाची जाणीव आणि निष्ठा प्रगल्भ होत गेलेली दिसते. ना.घ. निसर्गाच्या अनेक रंगछटांत प्रेयसीचे रूप पाहतात. निसर्गाचे त्यांना वेड आहे. प्रेम हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा पैलू आहे आणि म्हणून प्रेमातली विविधता त्यांच्या काव्यात प्रगट झाली आहे. त्यामुळे त्यांची प्रेमकविताही अजून ताजी टवटवीत आहे. स्वत:चे वेगळेपण कायम राखणारी त्यांची कविता आहे. स्वत:ची शैली घेऊन त्यांची प्रेम कविता फुलत आली आहे, नांदत आली आहे.

## बीजशब्द:

प्रेमकविता, ना.घ., खूणगाठी, प्रेमभावना, उत्कटता

## प्रस्तावना:

ना.घ. देशपांडे हे विदर्भातील श्रेष्ठ कवी म्हणून ख्याती होती. 'खूणगाठी' या त्यांच्या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला आहे. प्रेमकविता हा विषय अनेक कवींनी हाताळला आहे. परंतु ना.घ. म्हटले की, त्यांची प्रेमकविता डोळ्यासमोर दिसू लागते. भा.रा. तांबे यांची प्रेमकविता जशी नाजूक, तशीच ना.घं. ची देखील आहे.

ना.घं.ना तांब्याप्रमाणे प्रेमसंतृप्त जीवन लाभले. त्यामुळे प्रेमाचा धिक्कार. प्रेयसीला शिव्याशाप, जळजळाट संताप ना.घं.च्या कवितेत दिसत नाही. प्रेम ही विश्वव्यापी भावना आहे. प्रेमाची भावना मूलभूत स्वरूपाची असल्यामुळे स्थळकाळविरोधी असते. जगातील सर्व भागात आणि सर्व काळात प्रेमाचे अस्तित्व होते आणि राहणार असे निर्भिडपणे सांगता येते. कोणत्याही भाषेतील श्रेष्ठ वाङ्मय अशा मूलभूत स्वरूपाच्या स्थलकालनिरपेक्ष भावनांचा आविष्कार करणारे असते व हे वाङ्मय संपूर्ण जगात सर्वच काळी लोकांना आस्वाद देत असते. प्रेमाच्या मूलभूत भावनेच्या आविष्काराला सर्व भाषांमधील वाङ्मयात प्राधान्य मिळालेले दिसते. याला मराठी कवितासुद्धा अपवाद नाही. आधुनिक मराठी कवितेचा अर्धा अधिक भाग प्रेमाच्या आविष्काराने व्यापलेला आहे. प्रेम हा भाव मानवी जीवनातील एक प्रमुख भाग आहे. केशवसुत, गोंविदाग्रज, माधव ज्युलियन, रेंदाळकर, बी, मर्ढेकर, बापट, ग्रेस या सर्व कवींच्या प्रेमकविता वेगवेगळ्या स्वरूपाच्या होत्या. पण या सर्व कवींपेक्षा ना.घं.ची कविता भिन्न स्वरूपाची आहे. ना.घं.ची कविता कल्पना वादात रंगत नाही. ग्रामीण प्रेमाचे विशुद्ध चित्रण त्यांच्या काव्यात आढळते. ना.घं.च्या कवितेतून सौंदर्याचा आविष्कार होतो. हा आविष्कार त्यांना निसर्गातून होतो. प्रेम आणि निसर्ग यांच्या संमिश्रणातून ना.घं.ची कविता फुलली आहे. त्यामुळे त्यांची कविता त्यांच्याच आवडत्या जाई, जुईच्या फुलासारखी टवटवीत झाली आहे. कवी ना.घ. हे निसर्गातील प्रत्येक घटकामध्ये प्रेयसीचे वर्णन करून जातात.

ना.घं.च्या सर्व कवितात प्रेमभावना ठळकपणे दिसून येते. संख्येने सर्वाधिक त्यांनी प्रेमकविता लिहिल्या. 'खूणगाठी' या शीर्षकाचा अर्थ प्रेमाच्या खूणगाठी असाच होतो. 'निनावी' या पहिल्याच प्रेमकवितेतल्या ओळी वाचकांना आकर्षित करतात.

''कधी दुपार उदासी, कधी चांदण्यांचे भाळे
कधी सागर गंभीर,कधी सांजरंगी डोळे
तुझा माझा हा जिव्हाळा तुझ्या माझ्याच पोटात
तुझे माझे हे गुपित तुझ्या माझ्याच ओठात''[१]

अगदी साध्या शब्दातूनही प्रेमभावना हळुवारपणे व्यक्त करण्याची कवीची हातोटी विलक्षण आहे. ना.घं. च्या प्रेमकवितात कुसुमाग्रजांची विशालता, उत्तुंग कल्पनांनाही गोविंदाग्रजाची प्रीती नैराशाच्या पोटी जन्माला आली आहे. ती ना.घं.च्या कवितेत नाही. ना.घं.च्या प्रेमकवितेत अगदी साधेपणा, हळुवारपणा, जिवंतपणाचा ओलावा दिसून येतो. 'ओले वासनांचे रंग'या कवितेत कवी म्हणतात,

''साडीचा हिरव्या खांद्यावर डाव्या लोंबलेला पदर
अंबाडा गोल, झंपराचा अर्धगोल, निमगोरी मान''[२]

या अगदी सहज केलेल्या ओळी आहेत.साध्या वर्णनातूनही योग्य तो परिणाम ना.घं.च्या प्रेमकाव्यात साधलेला. जखमी रक्तबंबाळ झालेल्या प्रियकराची ही कथा आहे. शेवटी तो म्हणतो,

''तिचं मन वळविण्यासाठी मी जळून झालो धुप
दिसत असतं तरी पण
कळत नाही काही केल्या तिचं नाव तिचं रूप''[३]

अशी ही निरपेक्ष, निर्व्याज भावना यातून व्यक्त होते. 'मी जळून झालो धूप' यातील त्याग आणि पावित्र्याचा संदर्भ हा लक्षणीय आहे. प्रियकराला प्रेयशीचे रूप, नाव कळत नाही, आठवत नाही. हा प्रियकराचा मूक आक्रोश आहे.

'आठवण' ही अतिशय उत्कट अशी प्रेमकविता आहे. या कवितेत हळुवार प्रसंग आणि नाजुक शब्दांची गुंफण अतिशय काव्यमय आहे. प्रणयभावना व्यक्त करताना कवी अतिरेक करीत नाही. या भावना मृद मुलायम. त्या भावनांना धक्का पोचणार नाही, याची काळजी घेतात. वर्णनातील शब्दमयता आणि नादमयता सतत जाणवत राहते.

''निळ्या अंधारी रंगाात मुके चिंतन चंदेरी होती चितारत रात
होते हातांत माझ्या या मृदू सावळे पिवळे तुझे हळदीचे हात''[४]

प्रेम आणि निसर्ग यांचे मिश्रण इतके एकजीव झाले आहे की, त्यांना अलग करता येत नाही.

''या वळणच्या रस्त्यावर तु ढग माथ्यावर तु ढग माथ्यावर गडगडला ग
या केळीचा पदर मुलायम या वाऱ्यावर
फडफडला ग''[५]

अतिशय नादमय अशी कविता आहे.

'पुढे केव्हातरी'या कवितेत प्रेयसी प्रियकराला भेटण्यासाठी येण्याचे निमंत्रण देते. तिच्या मनाची दोलायमान स्थिती कशी झाली आहे, याचे वेधक चित्रण या कवितेत आढळते. 'अफवा' हीदेखील अगदी साधी कविता आहे. ग्रामीण भागात प्रियकर—प्रेयसीची कुठे क्षणभर भेट झाली तरी त्याची गावात अफवा पसरते. त्यामुळे त्यांच्या प्रेमाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त होते आणि त्यांच्या प्रेमाचा खेळ संपतो.ते विभक्त होतात. तरीही प्रियकर प्रेयसीला म्हणतो,

''मी नाही चोर
पण तूं आहेस
गणेशचतुर्थीची चंद्राची कोर''[६]

'चाहूल' ही प्रेमकविता शृंगारसूचक कविता आहे. अल्पाक्षरता हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. 'लय उठते' ही एक उत्तम कविता आहे. प्रियकर—प्रेयसीच्या मिलनाची रुखरुख या ठिकाणी व्यक्त झाली आहे. त्यांच्याकडून झालेल्या चुकीमुळे अबलेली लय उठते आणि डोक्यावर मुखमौन उमटून दिसते. एक वेगळी जाणीव या कवितेत आहे. ना.घं.च्या प्रेमकवितेचे हे एक वेगळेपण आहे की, त्यांच्या प्रेमकवितेतल्या जाणिवादेखील भिन्न—भिन्न आहे. कधी प्रियकराच्या तोंडून, कधी प्रेयसीच्या तोंडून वर्णने आली आहेत. निसर्ग आणि प्रेम यांचा अन्योन्यसंबंध ना.घं. च्या कवितेत दिसतो.

''स्मित किंचित अधरांवर

अभिमंत्रित चोरीचे
ढग सारत निघणाऱ्या
चंद्राच्या कोरीचे''[७]

ना.घ. प्रेमकविता लिहिताना प्रियकर किंवा प्रेयसीच्या अंतरंगात रममानद होताना दिसतात. या प्रेमकवितेत प्रियकराचा राग व्यक्त झाला आहे. तो प्रेयसीबद्दल चीड व्यक्त करतो, तो तिला विळखा मारणाऱ्या सापाची मोहाच्या दारूची उपमा देतो. 'फलश्रृती' या कवितेमध्ये प्रेयसी म्हणतात,

''जाई आहे, जुई आहे
बहार मात्र येत नाही
इथे आहेस, तिथे आहेस
कुणीच लक्ष देत नाही''[८]

या शेवटच्या कडव्यातील पहिल्या दोन ओळी अतिशय काव्यमय व अर्थपूर्ण आहेत. जाई आहे पण फुलत नाही. त्या प्रियकराची परिस्थिती उघडया डोळ्यांनी पाहणारी प्रेयसी अस्तित्वात आहे; परंतु करपलेल्या प्रेमांकुराला पालवी आता फुटत नाही. या तरुणाची अवस्था वाईट झाली आहे. तो इकडे तिकडे भटकत आहे; पण त्यांच्याकडे कुणी लक्ष देत नाही. ही शोकांतिकाच त्याच्या जीवनाची फलश्रृती आहे. घड्याळ, कोळीष्टक, तापलेले वाळवंट, मृगजळ, बहर न येणारी जाई या अर्थपूर्ण प्रतिमा आहेत. 'कदाचित' ही एक सुंदर कविता आहे. ना.घ. यांच्या उत्कृष्ट प्रेमकाव्यांपैकी ही एक कविता आहे. स्त्री मनाचा वेध अतिशय सुंदररीत्या कवीने घेतला आहे.

या कवितेतील प्रेयसीला बरे नसते. त्यामुळे ती प्रियकराला भेटायला येण्याचा निरोप पाठविते; परंतु हा प्रियकर भेटायला येत नाही. ती मात्र भेटायला आतुर झालेली असते. अंधारात दूर कुठेतरी आपला प्रियकर येत असल्याचा तिला भास होतो. आपला प्रियकर नक्की भेटायला येईल, असे तिला मनोमन वाटते. त्याच्या आठवणीतच ती असते. आपला प्रियकर कोणत्याही वेळी येऊ शकतो, ही तिला आशा असते.

''अर्धीच राहिल कदाचित्
दाराशी रांगोळी
हाळदकुंकाविणा:
रात्र असेल तर आभाळांत
हिरमुसतील चांदण्या''[९]

अगदी साध्या शब्दांना, साध्या भावनांना ना.घं.नी.काव्यात्मक रूप दिले आहे. ना.घं.ची प्रेमकविता अनेकदा भावनांचे सूक्ष्म चित्रण करते. 'मनातल्या मनात' ही प्रियकराच्या मनातली भावना व्यक्त करणारी कविता आहे. याचे कदाचित प्रमाणे इथे हळवेपण नाही. तरीही प्रियकराचे निळे स्वप्न भंगल्यामुळे तो आपले प्रेम मनातल्या मनात दाबून टाकतो.

'नजरांचे आभास' ही देखील एक सुंदर अशी प्रेमकविता आहे. प्रियकराला प्रेयसीकडे बघावे असे वाटत राहते. ती जेव्हा प्रियकराकडून माघारी वळते तेव्हाही त्याच्या मनात एक लाट उंचबळून येते. तिचा लाडिवाळपणा, अवखळपणा, तिच्या सावरणाऱ्या पदरावरून त्याला जाणवतो. रात्रदिवस तिच्या नजरांचे त्याला आभास होतात. प्रेयसीबद्यल त्याच्या अंत:करणात फार मोठे स्थान आहे. तो म्हणतो,

''माझ्या खडतर जीवनपथांत तूंच आहेस
उन्हांत सावली,अंधारात प्रकाश''[१०]

असे असतानादेखील त्याला स्वत:बद्दल शंका आहे. तिच्या मोघम बोलण्याचा अन्वयार्थ त्याला समजत नाही.

'आज श्रावण उदासीन' यात निसर्ग आणि प्रेम याचा सुंदर समन्वय या कवितेत आला आहे. 'एक दुपार'या कवितेतील शेवटच्या ओळी लक्षणीय आहेत.

''माझे डोळ्यातले तुझ्या तुझे डोळयातले माझ्या
बिंब पाहता पाहता दोघे हारवलो राजा''[११]

अशा प्रकारे प्रियकर–प्रेयसी एकमेकांकडे पाहत स्व:च हरवून जातात. 'झोपताना', 'ठळक चांदणीसारखी' यादेखील प्रेमकविता उत्कट आहेत. 'ठळक चांदणीसारखी' या कवितेत प्रियकर म्हणतो,

''प्रीत केली एकदा तर करू नये पारखी
हळू ये, हळू ये

निरामय निळ्या आकाशामधल्या शुक्राच्या ठळक
चांदणीसारखी''[१२]

हे प्रियकराचे प्रेयसीला समजावणे आहे.

ना.घ. देशपांडे आणि प्रेमकविता हे समीकरण झाले आहे. त्यांच्या कवितेत प्रेमाची विशुद्ध भावना आणि तरलता यांचा मनोज्ञ संगम झालेला आढळतो. नादमाधुर्यता हा त्यांच्या काव्याचा विशेष आहे. मराठी प्रेमकवितेला एक वेगळ्या वळणावर नेण्याचे श्रेय ना.घं.ना आहे. ना.घं.ची कविता ही रसपूर्ण आहे. ते सौंदर्याचे पूजक आहेत. निसर्ग त्यांना मनापासून आवडतो. त्यांच्या अनेक प्रेमकाव्यात तांब्याच्या प्रेमकवितेतील उत्कटता दिसते. बालकवींच्या कवितेतला निसर्ग दिसतो. प्रेम आणि निसर्ग यांचे संमिश्रण त्यांच्या काव्यात आले आहे. ना.घं.च्या कवितेत गेयता आहे. तरलता आहे. तांब्यासारखे प्रेमसंतृप्त जीवन त्यांना लाभले. १९६३ ते १९८३ या कालावधीतल्या या प्रेमकविता आहेत. ना.घ. हे कविता जगले आहेत. त्यांची कविता अनुभवातून समृद्ध झाली आहे. आयुष्यभर ते कवितेशी नाळ जोडून होते आणि म्हणून 'खूणगाठी' त्यांनी हृदयात जपून ठेवल्या होत्या. त्या मनातून, हृदयातून बाहेर पडल्या व मराठी रसिकापर्यत पोहचल्या. ना.घं.च्या कवितेला महाराष्ट्रातील रसिकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले. ना.घं.च्या प्रेमकवितेचे विश्लेषण करताना त्यांच्या काव्यलेखन शैलीचा परिचय होतो. साधारणत: प्रियकराच्या मनातले भाव ना.घं.नी व्यक्त केले आहेत. कधी ना.घ. स्वत:च अलिप्तपणे प्रेमचित्रण करून जातात. आणखी एक विशेष म्हणजे प्रेम आणि निसर्ग अगदी एकरूप झालेली त्यांची कविता आहे. प्रेमकवितेतील प्रतिमादेखील साध्या आणि काव्यमय आहे. कवींचा जाई जुईच्या फुलांवर अधिक जीव जडला आहे.चांदणे, आभाळ, दुपार, नदीकाठ, बाभळी, वीज, वारा, पाऊस, रात्र, पुनवेची रात्र, चंद्राची कोर, ऊन इ. प्रतिमा वारंवार येतात. वाऱ्यांची घरघर, झुडुपांची फुंकर, अतिदाहक दुपार, टिचलेले कंकण, हृदयात हरलेले वादळ, वाऱ्यांची बसलेली दातखिळी, मूर्च्छित होणारे नभ इत्यादी प्रतिमा वाचकांचे लक्ष आकर्षित करतात.

ना.घं.च्या प्रेमकवितेत शृंगारही व्यक्त झालेला दिसतो. तो शृंगार भडक नाही. संयत आहे. प्रेमकवितेत हुरहुर, आतुरता, उत्कटता, मिलनाची आस, संकोच भिती, लटका राग अशा विविध जाणिवा आढळून येतात. अशी प्रेमाची विविधता, त्यांचे सुक्ष्म बारकावे ना.घं.च्या प्रेमकवितेत आहेत. ना.घं.च्या प्रेमकविता ह्या रसिकांना प्रेमरसात बुडवून टाकणाऱ्या आहेत, याचा प्रत्यय वरील विवेचनावरून येईल.

ना.घं.च्या प्रेमकवितेत प्रेमसंतृप्त जाणिवा आहेत;परंतु एकूण ३३ प्रेमकवितांत एकच कविता अशी आहे की, प्रियकराचा राग व्यक्त झाला आहे; परंतु तो रागही भडक स्वरूपाचा नाही. प्रेमाच्या नाजुक भावनांचे चित्रण ना.घं.नी अगदी हळुवारपणे केले आहे. प्रेमकवितांचे शीर्षक त्यातील प्रतिमा, निसर्ग वर्णने, कल्पना विलास, चटका लावणारा प्रसंग, हुरहुर यामुळे ना.घं.ची कविता ही इतर मराठी कवितेपेक्षा भिन्न आहे.

ना.घं.च्या प्रेमकवितेत कुसुमाग्रजांसारखी किंवा गोविंदाग्रजासारखी विशालता, कल्पनेची भव्यता नाही. अगदी साधी मराठमोळी कविता लिहिताना ग्रामीण जनजीवनाचे, शेतीचे पाखराचे, फुलांचे संदर्भ हे अगदी वास्तव वाटतात. ना.घं.ची प्रेमकविता ही विविध कल्पनेने नटलेली असल्यामुळे ती एकसुरी वाटत नाही. त्यांची प्रेम कविता ही आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने भिन्न आहे. रचनाशैलीत अनेक प्रयोग त्यांनी केले आणि म्हणून त्यांची प्रेमकविता ही मराठी प्रेमकवितेतील महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रेमकवितेतून निसर्ग त्यांनी उभा केला आहे. सौंदर्यपूर्ण आविष्कार त्यांच्या प्रेमकवितेतून झाला आहे.

अशा प्रकारे ना.घ. देशपांडे यांच्या 'खूणगाठी' या काव्यसंग्रहातून प्रेमाचे बदलते स्वरूप आपण एक वाचक अभ्यासक म्हणून आस्वादता येतील.

## संदर्भ

(१) देशपांडे ना.घ.: 'खूणगाठी', दुसरी आ., मौज प्रकाशन, मुंबई, २००२, पृ.क्र. १
(२) तत्रैव.पृ. क्र. ८
(३) तत्रैव.पृ. क्र. २०
(४) तत्रैव.पृ. क्र. २२
(५)तत्रैव.पृ. क्र. २३
(६) तत्रैव.पृ. क्र. ३३

(७) तत्रैव.पृ. क्र. ४५
(८) तत्रैव.पृ. क्र. ९४
(९) तत्रैव.पृ. क्र. ९७
(१०) तत्रैव.पृ क्र. १००
(११) तत्रैव.पृ. क्र. १०३
(१२) तत्रैव.पृ. क्र. १०७

## संदर्भ ग्रंथ

(१३) काळे अक्षयकुमार : 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', प्रथमावृत्ती, पा.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९
(१४) पाटणकर रा.भा.: 'साहित्यशास्त्र स्वरूप आणि समस्या', प्रथमावृत्ती, पद्यमगंधा प्रकाशन, पुणे, २००६
(१५) व्यवहारे शरद :'लोकवाङ्‌मयरूप आणि –स्वरूप'प्रथमावृत्ती, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९१
(१६) सावदेकर आशा: 'कविता विदर्भाची', प्रथमावृत्ती, वि.सा.संघ, नागपूर, १९९९
(१७) संत इंदिरा : 'शेला', दुसरी आवृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, १९६६
(१८) स्वान शा वा.: 'काव्यशिल्प'प्रथमावृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९९२
(१९) पंडित भ.श्री.: 'समग्र केशवसुत', आवृत्ती दुसरी, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७०
(२०) गिरिश : 'आंबराई', प्रथमावृत्ती, आर्य संस्कृती मुद्रणालय, पुणे, १९२८

❖❖❖

# काव्यात्म दुर्बोधता आणि मर्ढेकर व ग्रेस यांची कविता

प्रा. डॉ. विजय रैवतकर
महात्मा गांधी महाविद्यालय
आरमोरी, जि. गडचिरोली ४४१२०८, महाराष्ट्र (India)
इ मेल viju.raiwatkar@gmail.com भ्रमणध्वनी ९८२३८७९२०६

## गोषवारा (Abstract)

एखाद्या साहित्यकृतीचे वाचकाला किंवा आस्वादकाला आकलन न होणे म्हणजे ती साहित्यकृती दुर्बोध ठरत असते. साहित्यकलाकृतीचे आकलन झाल्याशिवाय त्या साहित्यकलाकृतीचा आस्वाद घेणे अवघड होऊन बसते. साहित्यकलाकृतीचे आस्वादन होत नसल्यास कलाकृती दुर्बोध ठरत असते. काव्यात येणाऱ्या दुर्बोधततेचा विचार केल्यास दुर्बोधता हे काव्याचे विशेष होत नाही किंवा काव्यदोष ठरत नाही कारण काळानुसार कवितेला सुबोधता प्राप्त होत असते. निर्लेप एकाग्र मनाने केलेल्या वाचनात त्या कवितेचा अर्थ उलगडण्याची शक्यता वाढते कोणत्याही काव्यरसिकाने एखाद्या कवितेला दुर्बोध म्हणून कायमची बाद न करता तिच्याशी अखंडपणे मानसिक संवाद चालू ठेवायला पहिजे. एखादी कविता पुन्हा पुन्हा वाचने हे कवितेच्या आकलनास साह्यभूत होत असते. एखादी दुर्बोध कविता सुटेपणाने न वाचता ती कवीच्या संपूर्ण अनुभवाचा भाग मानून त्या संपूर्ण अनुभवाची ओळख करून घेण्याच्या दृष्टीने वाचल्यास कविता दुर्बोध राहत नसून तिचा सुबोधतेकडील प्रवास सुरू होतो अर्थात त्या विशिष्ट कवितेचे आकलन होत असते.

## बीजशब्द (Keywords)

दुर्बोध, सुबोध, अन्वयार्थ, गुढार्थ, वाचक, रसिक, आस्वाद्यता, काव्यार्थ, व्यंगार्थ

## प्रस्तावना (Introduction)

दुर्बोधता म्हणजे एक प्रकारे आस्वादकाला प्रतीत होणारी अपरिचितता किंवा क्लिष्टता होय. काही शब्द अपरिचित वाटत असल्याने ते दुर्बोध वाटतात. शब्दांच्या कलाउपयोजनामध्ये क्लिष्टता, विसंयोग, दुरान्वय, विक्षिप्त कल्पना इत्यादी गोष्टी ज्यावेळी घडतात तेव्हा दुर्बोधता निर्माण होत असते. मराठी साहित्यप्रातांत कविता, कथा, नाटक, कादंबरी, ललितनिबंध आदी साहित्यप्रकारात दुर्बोधता आढळल्याची विविध उदाहरणे आहेत. बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, कवी ग्रेस, अरुण कोलटकर, आरती प्रभू, पु. भा. भावे, जी. ए. कुलकर्णी, चि. त्र्यं. खानोलकर, श्याम मनोहर, विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार इत्यादी लेखकांच्या संदर्भात दुर्बोधतेचा मुद्दा विशेषत्वाने पुढे आला.

मराठी साहित्यात काव्याच्या क्षेत्रात दुर्बोधता अधिक आढळून येते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने काव्यातील दुर्बोधता समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. या विषयाच्या अनुषंगाने दुर्बोधता म्हणजे काय? काव्यात दुर्बोधता कशी येते? दुर्बोधतेचे स्वरूप, काव्यात निर्माण होणारी दुर्बोधता हे काव्याचे विशेष मानावे काय? काव्याची दुर्बोधता कविसापेक्ष आहे की वाचकसापेक्ष? इत्यादी प्रश्न समजून घेऊया. तसेच काव्यात्म दुर्बोधता कायम टिकून असणारी असते की तिच्या अर्थच्छटेपर्यंत पोहचता येणे शक्य असते, हे देखील समजून घेऊया.

आस्वाद्य न होणाऱ्या कवितेवर दुर्बोधतेचा आक्षेप घेतला जातो. या आक्षेपाच्या रूपाने कवितेच्या आविष्काराचा विचार करणे अपरिहार्य ठरते. बरेचदा कवीजवळ आशय समर्थपणे व्यक्त करण्याइतका विपुल, अनुरूप शब्दसाठा नसल्याने कवितेचा आविष्कार क्लिष्ट किंवा शिथिल होतो आणि वाचकाला त्या आशयाशी संवाद साधणे कठीण होते तेव्हा दुर्बोधता जन्मास येते. तसेच वाचकाची भाषेची जाण अपुरी असल्याने वचकास एखादी कविता दुर्बोध ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. खरेतर आस्वादप्रक्रिया ही काव्यात प्रतीत शब्दांतील विविध अर्थच्छटा समजून घेण्यातच व त्यातील आशय समजून घेण्याच्या क्षमतेतून पूर्ण होत असते. वाचकाच्या दृष्टीने या क्षमतांचा अभाव असेल तर काव्य दुर्बोध ठरत असते. खूपदा वाचकाचे कवितेविषयीच्या भाषेसंबंधीचे पूर्वग्रहही त्याच्या आकलनाच्या आड येतात व त्याच्या चौकटीत एखादी कविता बसत नसेल तर ती दुर्बोध असल्याचा आरोप करून वाचक वा रसिक मोकळा होत असतो. कवी तसेच वाचकांच्या संदर्भात काव्यत्म दुर्बोधता

निर्माण होत असते. शब्दांना निरनिराळ्या छटा असतात. या विविधतेचा सूक्ष्म उपयोग करून घेण्यासाठी कवी समर्थ असावा लागतो आणि त्याचा मागोवा घेण्यासाठी वाचकही आपल्या परीने समर्थ असावा लागतो. शब्द नेहमीच सुटे स्वयंपूर्ण नसतात. कधी त्याचे पुढच्या मागच्या शब्दांशी नाते असते. त्यामुळे त्यातील अर्थाचा ताण बदलतो. कधी शब्दांना लाभलेल्या विशिष्ट संदर्भामुळे अर्थ समृद्ध होतो. कधी प्रकट वा अप्रकट मनातील सहचर्यामुळे अर्थाला अनपेक्षित दिशा लाभते. कवी हे जाणीवपूर्वक करीत नसतो. कधी कधी त्यालाही या घडामोडी अबोध वाटतात. तेव्हा कवीलाही त्याची निर्मिती दुर्बोध वाटू लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कविमनातील प्रत्येक तरल भाव किंवा प्रतिमा नेमकेपणाने व्यक्त करू शकणारे शब्द भाषेत तयार नसतात. अतिरिक्त उपयोगामुळे अनेक शब्दाचे अर्थ फिके मोघम होऊन बसतात; त्यांची धार उतरते अशा अनेक कारणांमुळे कवीला संपूर्ण आविष्कारसिद्धीसाठी स्वातंत्र्य घेणे क्रमप्राप्त ठरते ते स्वातंत्र्य घेण्याच्या प्रक्रियेत शब्दांची मोडतोड, जोडशब्दांची घडण, जुन्या शब्दांवर नव्या अर्थाचे पदर चढवणे, व्यवहारमान्य वाक्यरचनेत फिरवाफिरव करणे अशा गोष्टी त्यात समाविष्ट असतात. प्रत्येक चांगला कवी भाषेला नवे रूप देतो, नवी भाषा घडवतो ते याच अर्थाने व्यवहारात नव्हे तर प्रचलित रूढ असलेल्या भाषेचीच ज्याला सवय असते असा वाचक आणि भाषेबाबत स्वातंत्र्य घेणारा, जागरुक मनस्वी असणारा कवी यांचा संवाद जुळत नाही आणि जुळलाच तर तो अपुरा असतो. दोघांतील अंतर संपूर्णपणे नाहीसे होत नाही हे अंतर वाचकाच्या श्रेणीप्रमाणे कमी अधिक राहते. वरच्याश्रेणीच्या वाचकांनाही ते अंतर पूर्णपणे ओलांडणे शक्य होत नाही त्यामुळे त्यातील अर्थ दुर्बोध राहतो. त्यातून काव्यात्म दुर्बोधता जाणवते. कवी किंवा रसिक यांच्या ज्ञान—अज्ञानातून दुर्बोधता निर्माण होत असते. कवीला आलेली अनुभूती किंवा त्यांच्या अंतस्फुर्त भावनेचे प्रकटीकरण त्याला योग्य शब्दाद्वारे अभिव्यक्त करता न आल्याने काव्यात दुर्बोधता निर्माण होते किंवा वाचकाच्या अपूर्ण शब्दज्ञानाच्या, भाषाज्ञानाच्या अभावी काव्यात दुर्बोधता येऊ शकते हे नाकारता येंत नाही.

गो. वि. करंदीकरांनी मात्र कवी व रसिक यांच्या भाषिक अज्ञानातून दुर्बोधता निर्माण होत नसल्याचे म्हटले आहे. ते म्हणतात, ''कवीचा भाषेवरील आधिकार अपुरा पडला तर जी दुर्बोधता निर्माण होते ती काव्यात्म दुर्बोधता नाही. रसिकाजवळ असलेले भाषेचे ज्ञान अपुरे पडले त्यातून जी दुर्बोधता जाणवते ती देखील काव्यात्म दुर्बोधता नाही. कवीची भाषिक असमर्थता किंवा रसिकाचे अज्ञान हे काव्यात्म दुर्बोधततेचे खरे कारण नव्हे. कवीचे सामर्थ्य आणि रसिकाचे ज्ञान गृहीत धरून जी दुर्बोधता काव्यात प्रकट होते त्या दुर्बोधतेचा विचार करायला पाहिजे ती खरी काव्यात्म दुर्बोधता ठरेल.'' [१] अर्थाचे अधिकाधिक एकात्मीकरण साधण्याच्या प्रयत्नातून काव्य अधिकाधिक दुर्बोध बनत जाते असे करंदीकर स्पष्ट करतात.

मराठी कवितेत काव्यात्म दुर्बोधता प्रमुख्याने बा. सी. मर्ढेकर, कवी ग्रेस, विंदा करंदीकर, आरती प्रभू, दि. पु. चित्रे, अरुण कोलटकर इ. कवींच्या संदर्भात जाणवते. बा. सी. मर्ढेकरांच्या कविता दुर्बोध असल्याचा आरोप प्रामुख्याने त्यांच्या 'काही कविता' या संग्रहाच्या संदर्भात घेण्यात आला. 'काही कविता' या संग्रहातील युद्धकालीन अभंग प्रसिद्ध झाले ते वाचकांना दुर्बोध वाटू लागले. तसेच या संग्रहातील 'पिपात मेले ओल्या उंदीर' ही कविता,

'पिपात मेले ओल्या उंदीर
माना पडल्या मुरगळल्याविन
ओठावरती ओठ मिळाले
माना पडल्या मुरगळल्याविन' (काही कविता)

या कवितेविषयी बहुतेकांनी प्रतिकुल सूर काढला. ह्या कवितेत प्रतिकुल भाष्य केले गेले व ही कविता दुर्बोध ठरविली गेली. मर्ढेकरांना आलेला असंबद्धतेचा अनुभव त्यांनी 'त्रूटीत जीवनी'सारख्या कवितेतून व्यक्त केला. ज्ञानाची अपूर्णता सांगणाऱ्या किंवा परमेश्वर शक्तीशी संवाद करणारी ही कविता आहे. मानवी जीवन, ज्ञान, परमेश्वर यांच्याविषयी सांकेतिक कल्पना बाळगणारा वाचक या कवितेतील विचार संमजू शकला नाही. मर्ढेकरांची कविता गुंतागुंतीच्या आशयाशी, गुतागुंतीच्या तुटक अभिव्यक्तीशी निगडित आहे. प्रतिमा व भाषा हे तिचे महत्त्वाचे घटक आधुनिक जीवनाची गती व असंबद्धता प्रतिबिंबित करण्यासाठी नावीन्यपूर्ण प्रतिमा आवश्यक असतात. त्या प्रतिमांचा मर्ढेकरांनी त्यांच्या काव्यात वापर केल्याने त्यांच्या कवितांचा आशय सहजासहजी उलगडत नाही. त्यांच्या कविता आशयदृष्ट्या गुंतागुंतीच्या होत जातात, उदा.

'पंक्चरली जरी रात्र दिव्यांनी
तरी पंपतो कुणी काळोख;

हसण्याचे जरी वेड लागले
भुकताना तरी अश्रू चोख' (काही कविता)

या कवितेतील ''रात्र', 'कुत्री' या प्रतिमांचे स्वरूप कळल्याशिवाय कवितेचा अर्थ कळणे, कविता आकलन होणे कठीण होऊन बसते. मर्ढेकरांच्या काव्यात अनेक पदर येतात आणि ते अर्थाचे अनेक पदर वाचकांना दुर्बोधतेचा प्रत्यय देऊन जातात. मर्ढेकरांनी त्यांच्या कवितेतून केलेले कल्पनांचे उड्डान आणि संज्ञाप्रवाही आवेगात केलेले काव्यलेखन ह्यामुळे दुर्बोधता निर्माण होते. मनातली सुप्त पातळी, मनातल्या बाह्यप्रतिक्रिया, दिवास्वप्नांची तंद्री, मनातील अनिर्बंध कल्पनांचा स्वैर संचार, तत्त्वचिंतन इत्यादी पातळ्यांवर संज्ञाप्रवाही लेखन केले जाते. उदा.

'कणा मोडला निश्चलतेचा
त्या पालीच्या आवाजाने
धम्मं सरणम कुणी बोलले
पाषाणातील बुद्ध मिषाणे'

काव्यात्म दुर्बोधतेच्या संदर्भात कवी ग्रेस ह्यांच्या कवितांचाही प्रामुख्याने विचार करावा लागतो. कवी ग्रेसांच्या काव्यातील व्यक्तिगत संदर्भ दुर्बोधतेचा प्रत्यय देत राहतात. पौराणिक संदर्भ हे आपल्या लोकजीवनातील अविभाज्य भाग असतात. भूतकाळापासून चालत आलेल्या परंपरांनी त्या संदर्भात विशिष्ट अर्थ प्राप्त करून दिलेला असतो त्यामुळे कोणत्याही कवितेत असा संदर्भ आला की लोकजीवनात त्या संदर्भाला जो विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला असतो तोच लक्षात घेऊन आपण कवितेच्या आशयाची संगती लावण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु जनमानसात स्थिर झालेल्या अर्थाच्या आधारे ही संगती लागत नाही त्यावेळी दुर्बोधतेचे अस्तर निर्माण होत असतात. विशेषत: कवी ग्रेसांच्या अधिकांश कविता या दृष्टीने दुर्बोध ठरतात. उदा.

'दुरान्त माझी ढळे कृष्ण छाया
जसा कर्ण कुंतीत सामावला' (संध्याकाळच्या कविता)

या कवितेतील व्यक्तिगत जाणीव आणि पौराणिक संदर्भ यांचा अर्थ न लागत असल्याने दुर्बोधतेचा प्रत्यय येतो. कोणतीही विशिष्ट सैद्धांतिक भूमिका घेऊन दुर्बोधतेचा खडक फोडता येत नाही. ग्रेसांच्या 'आई', 'पांढरे हत्ती', 'साजन' अशा अनेकविध कवितांतून काव्यात्म दुर्बोधता जाणवते.

कवी ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेचा विचार करताना अक्षयकुमार काळे म्हणतात, ''ग्रेसांच्या कवितेतील अनुभवाचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकतर काव्यविषय होऊ पाहणारी लक्षणीय अनुभूती त्यांच्यापर्यंत अत्यंत गूढ आणि संमिश्र स्वरूपात पोचते. तिचे प्रकटीकरण असेच संमिश्र असणे स्वाभाविक आहे. अनुभवाचे सुलभीकरण करणे त्यांना मानवत नाही. दुर्बोधतेचे हे एक कारण असू शकते. याशिवाय विविध अनुभूतीच्या संश्लेषणामुळे या कवितेच्या नेमक्या आशयाबद्दल कुणालाही सांगणे कठीण वाटेल जणू काही निश्चितपणे सांगणे म्हणजे निसरड्यावर पाऊल ठेवण्यासारखेच एकतर ग्रेस जाणिवांच्या सूक्ष्मतर पातळ्यांवर शोध घेताना दिसतात अशा शोधात दुर्बोधता येणे अपरिहार्य आहे; कारण सूक्ष्मतर पातळ्यांवर विच्छेदनाची प्रक्रिया कविमनात चाललेली असताना अनुभूती गुढ असण्याची शक्यता आहे. त्या सूक्ष्मतर पातळ्यांचा वेध रसिक पातळीवर घेतला गेल्यास कविता सुबोध जरी झाली नाही तरी किमान प्रत्येयाच्या पातळीवर निश्चितपणे येऊ शकेल.''[२] कवी ग्रेस दुर्बोधतेविषयी म्हणतात, ''साहित्यामध्ये कवीला, कथाकाराला, ललितलेख लिहिणाऱ्या लेखकाला अद्भुताचे जबरदस्त आकर्षण असते त्यामुळे त्यांच्या धाटणीच्या पातळीवर दुर्बोधता प्रकटत असते''[३] कवी ग्रेसांच्या अनुभूतीविश्वाकडे अत्यंत सहानुभूतीने हळूहळू सरकले, त्यांच्या अनुभूतीविश्वाचा वेध घेतला गेला तरच त्या विश्वातील समृद्ध करणारे कवडसे आपल्या अनुभूतीचा विषय होऊ लागतात. त्यांचे काव्य समजू लागते.

अक्षयकुमार काळे ग्रेस ह्यांच्या कवितेतील दुर्बोधता स्पष्ट करताना म्हणतात, ''ग्रेसचे विलक्षण अनुभवविश्व मूलत: त्यांच्या स्वायत्त कल्पनाविश्वातून जन्माला आल्या आहेत. त्या कल्पनाविश्वातील घटक अद्भूत नेणीवप्रधान, तर्कातीत आणि गूढ स्वरूपाचे आहेत. त्या घटकांचा विस्तार वाढत गेला आहे. या कल्पनाविश्वाचे रहस्य आकळता येणे जवळजवळ अशक्य आहे कारण खुद्द कवीही त्याचे आकलन तर्काच्या सहाय्याने करून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. कुठल्याही वास्तवाला सरळ भिडणे आणि मिळणारी अनुभूती वास्तव स्वरूपात प्रकट करणे ही ग्रेसांची निर्मितिप्रक्रियाच नाही.''[४] ग्रेसांच्या दुर्बोध काव्याचा अन्वयार्थ लावण्याच्या, आस्वादाच्या, आकलनाच्या संदर्भात पुढे अक्षयकुमार काळे म्हणतात, ''...समान्य रसिकांनी कवितेचा अन्वय लावण्याची व कविता उपभोगण्याची पारंपरिक पद्धत या कवितेच्या संदर्भात पडू शकत नाही. निदान या दृष्टीने

मराठीत ही कविता आस्वादप्रक्रियेला आव्हान देणारी आहे. तिच्यावर अस्तित्ववादी प्रभाव असण्याची शक्यता आहे. वास्तवाला जपताना संवेदनाचे विघटन होऊन त्याची तीव्रता कमी होते. त्या बोथट होतात परिणामी वास्तवाला अवकळा येते. संवेदनांची क्रयशक्ती नष्ट होते. म्हणून वास्तवाच्या मूलस्रोताशी जाण्याची गरज निर्माण होते. संवेदनांची नष्ट झालेली क्रयशक्ती प्रतिभावंताला अस्तित्ववादाच्या प्रदेशात गोळा करावी लागते, असे ग्रेस यांना वाटते...आदिम, प्राचीन, मध्ययुगीन कालखंडातील सांस्कृतिक संचितात त्यांची प्रतिभा लिलया संचार करते. निर्मितीसाठी आवश्यक असणारी तेथील सामग्री गोळा करून समकालीन अनुभूतीशी तिचा सांधा जुळविते व एक नवाच आशयबंध निर्माण करते. ज्या त्या वेगाने आणि रीतीने ग्रेसची प्रतिभा ही निर्मिती करते. त्या वेगाने आणि त्या रीतीने वाचक या कवितेला सामोरे जाऊ शकत नाही. परिणामी कविता दुर्बोध वाटते परंतु याचा अर्थ अर्थभ्रमात्मक आहे असा नाही''[५] कवी ग्रेसांची कविता ज्या वेगाने प्रवास करते त्यांची प्रतिभा गतिशील आहे. त्याप्रमाणे गतिशील झाल्याशिवाय त्यांच्या कवितांचे आकलन होणार नाही.

काव्यात येणाऱ्या दुर्बोधततेचा विचार केल्यास दुर्बोधता हे काव्याचे विशेष होत नाही किंवा काव्यदोष ठरत नाही कारण काळानुसार कवितेला सुबोधता प्राप्त होत असते. विजया राजाध्यक्ष या संदभात म्हणतात, ''विशिष्ट कवितेने पहिल्या वाचनात दिलेल्या धक्याची तीव्रता कालांतराने कमी होते, तिच्या संबंधीचे पूर्वग्रह निवळतात, आवश्यक तो दूरक्षेप साधता येतो. अशा निर्लेप एकाग्र मनाने केलेल्या वाचनात त्या कवितेचा अर्थ उलगडण्याची शक्यता वाढते...कोणत्याही वाचकाने एखाद्या कवितेला दुर्बोध म्हणून कायमची बाद न करता तिच्याशी अखंडपणे मानसिक संवाद चालू ठेवणे इष्ट असते.''[६] कविता अर्थाच्या अनुषंगाने उकल होत जाते, त्यात बदल होत जातात त्याचा अर्थ कळत जातो या अनुषंगाने विजया राजाध्यक्ष म्हणतात, ''एखादी दुर्बोध कविता पुन्हा पुन्हा वाचने फलदायी ठरते त्यामुळे कविच्या अनुभव घेण्याच्या शैलीशी अधिक ओळख होते व ती कवितेच्या आकलनास साह्यभूत होत ठरते. एखादी दुर्बोध कविता सुटेपणाने न वाचता ती कवीच्या संपूर्ण अनुभवाचा भाग मानून त्या संपूर्ण अनुभवाची ओळख करून घेण्याच्या दृष्टीने वाचली पाहीजे...''[७] एखाद्या वाचकाने कवीच्या इतर साहित्यलेखनाचा अभ्यास केल्यास विशिष्ट साहित्यकलाकृतीच्या संदर्भाने कवितेचे आकलन होण्यास मदत होत असते. उदा. मर्ढेकरांच्या कवितांचे संदर्भ त्यांच्या 'रात्रीचा दिवस' या कादंबरीत आढळल्याचे दिसतात. तसेच ग्रेसांच्या कवितांचे संदर्भ त्यांच्या ललितबंधात सापडतात. त्यामुळेच काव्यात्म दुर्बोधततेला सुबोधतेकडे वळविता येते व कवितेचा आस्वाद घेता येते. एकूणच काव्यात निर्माण होणारी दुर्बोधता अंतिम राहत नसून काळाच्या प्रवाहात ती सुबोध होते अर्थात ती कविता मनात घोळवल्याशिवाय वारंवार तिच्याशी संवाद साधल्याशिवाय ती सुबोध होत नाही; ती आस्वाद्य होत नाही.

## निष्कर्ष (Conclusions)

१. दुर्बोधता म्हणजे एक प्रकारे आस्वादकाला प्रतीत होणारी अपरिचितता किंवा क्लिष्टता होय.

२. दुर्बोधता हे काव्याचे विशेष होत नाही किंवा काव्यदोष ठरत नाही कारण काळानुसार कवितेला सुबोधता प्राप्त होत असते.

३. एखाद्या वाचकाने कवीच्या इतर साहित्यलेखनाचा अभ्यास केल्यास विशिष्ट साहित्यकलाकृतीच्या संदर्भाने कवितेचे आकलन होण्यास मदत होत असते.

४. कवितेला दुर्बोध म्हणून कायमची बाद न करता तिच्याशी अखंडपणे मानसिक संवाद चालू ठेवल्याने कवितेचे आकलन होत असते.

## संदर्भ (References)

१. वा. ल. कुलकर्णी, 'काव्यात्म दुर्बोधता' (संपादित), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६, पृ. ४

२. अक्षयकुमार काळे, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. ५८४

३. जयंत परांजपे, 'ग्रेस आणि दुर्बोधता', ', बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ४९

४. अक्षयकुमार काळे, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', उ. नि., पृ. ५८४

५. तत्रैव, पृ. ५८५

६. विजया राजाध्यक्ष, 'मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ', मौज प्रकाशन, मुंबई, १९९१ पृ. १८०

७. तत्रैव, पृ. १८०

❖❖❖

# दया पवारांच्या कवितेतील वेदना

प्रा. डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव बागडे
कार्यकारी प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख
इंदिरा गांधी कला–वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, महाराष्ट्र (India)
इ मेल hemantkumarbagde@gmail.com भ्रमणध्वनी ८७९३२२१४७६

## प्रास्ताविक :

दया पवारांचा 'कोंडवाडा' हा काव्यसंग्रह १९७४ मध्ये प्रकाशित झाला. आतापर्यंत त्याच्या चार आवृत्त्या निघाल्या आहेत. पवारांचा दुसरा काव्यसंग्रह 'पाणी कुठंवर आलं गं बाई' हा १९९८ साली त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कन्या प्रा. प्रज्ञा पवार यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध केला. दया पवारांचे दोनच कवितासंग्रह प्रकाशित झाले असले, तरी त्यांचे खरे अनुभवविश्व प्रकट झाले ते 'कोंडवाडा' या त्यांच्या काव्यसंग्रहात. त्यांच्या कवितेमागे त्यांनी भोगलेले जीवन आहे. हे भोग पुढे 'बलुतं' या त्यांच्या आत्मकथनाच्या रूपाने जगापुढे आले. 'कोंडवाडा' लिहून झाला नसता तर 'बलुतं' लिहून झाल असतं की नाही, अशी श्शंका पवार 'बलुतं'च्या प्रस्तावनेत व्यक्त करतात, ते यामुळेच.

दया पवारांची कविता ही जीवनापासून पळून न जाता प्रत्यक्ष कठोर अनुभवाचे घोट पीत जीवनाशीच संघर्षरत होते. हे त्यांच्या कवितेचे वेगळेपणच नाही तर मोठे श्रेष्ठत्त्वही ठरते. या संदर्भात जमेची बाजू मांडताना ''सूक्ष्म संवेदनशीलता आणि व्यापक चिंतनशीलता यांचा प्राय: त्यांच्या कवितेत प्रभावच असला तरी आपल्या संयत आणि विशाल व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श त्यांनी कवितेला दिलेला असल्यामुळे अनाठायी आक्रस्ताळेपणा यापासून आपली कविता त्यांना अलिप्त राखता आली''[१] हे डॉ. अक्षयकुमार काळेंचे विधान महत्त्वपूर्ण ठरते. कारण ती जितकी संयत आहे तितकीच विचारपूर्णही आहे. अनुभवांचे असंख्य पदर स्वाभाविकरित्या मांडते. या अनुभवांचा एक पदर आणि त्यावरून निर्माण झालेली वेदना व दया पवारांची कविता यांची सांगड आपल्याला 'बलुत्या'तील प्रस्तुत उताऱ्यावरून देता येईल. ''मेलेल्या ढोराला खांदा देणं हे काम म्हणजे आईचं दूध आठवणारं. प्रचंड मोठं लोढणं दोन माणसांनी खांद्यावरून वाहून आणायचं. जनावरांचे चारही पाय करकचून बांधणे आणि त्यातून सुई ओवतात तसे लाकडी गुळगुळीत दंडाळ आखार ओवणे. एखादी पालखी घेऊन जावी तसं ते दृश्य दिसायचं. गाय असेल तर, तिचे केविलवाणे डोळे आकाशाकडे लागलेले बघताना पोटात कालवाकालव व्हायची. आजही ते डोळे आठवतात.

आईच्या आणि गायीच्या डोळयात मला कमालीचं साम्य दिसायचं. आमच्या घरावर पाळी आली, म्हणजे ढोर वाहण्याचं काम आईवर यायचं. आईची ती दमछाक पाहावयाची नाही. वाटायचं आपण थोड मोठं असतो तर किती बरं झालं असतं. आईचा भार खांद्यावर झेलला असता.''[२] स्वाभाविकच आईचे कष्टमय जीवन पाहून दगडूच्या मनात कळवळा येतो. आईच्या सर्वांगिण वेदना आपण झेलाव्या असेही त्याला वाटते. परंतु नाइलाज असलेल्या पोरक्या वयालाही तो नाकारू शकत नाही. हेच तिचे कष्टमय जगणे

> ''येथेही अक्करमाशी आई भेटते
> डोळे व्याकुळलेले गाईच्या डोळयासारखे
> तिच्या डोळयात मला माझी आईच दिसते.''
>
> (साता समुद्रापल्याड, पाणी कुठंवर ..., पृ. २१)

या शब्दात 'पाणी कुठंवर आलं ग बाई' मधून दया पवारांनी आईचे दु:ख मांडलेले दिसते. तर 'कोंडवाडया'तील ''पाण्याला जाता येता महार बायकांची सावली मारूतीवर पडते, देव विटाळतो. म्हणून एकदा गावगडयांनी वाट बंद केली. विहिरीवर दुसऱ्या मार्गाने जायचं म्हणजे तळयाच्या काठानं चिखलातून वाट तुडवायला लागायची आणि तोही मैलभर लांबीची. महारांनी ही वाट खुली करावी म्हणून गावाशी झुंज दिली''[३] ह्या प्रसंगाचे वर्णन —

> ''गंगा–सिंधूच्या प्रकाशात
> वेद–उपनिषदांची हवा भरून
> तुझ्या संस्कृतीचे शीड

चातुवर्ण्याच्या पाणवठयावर स्थिर झाले.''

(ये हेमांगी, कोंडवाडा, पृ. ७)

अशा शब्दांत दया पवार काव्यात आपल्या मनातील वेदना अभिव्यक्त करताना दिसतात. दगडू नावाचे दु:खाने गदगदलेले झाड पहिल्यांदा स्वानुभवाचे दु:खद चित्रण व्यक्त करीत असले तरी तेच दु:ख पुढे समाजमनाचे बनते. प्रस्तुत कवितेतील पाणवठा गावकऱ्यांनी घातलेल्या चातुवर्ण्य समाजव्यवस्थेचे प्रतीक होऊन येते.

समाजव्यवस्थेने आपल्या वाटयाला जे दु:ख घातले त्या दु:खाची प्रत अमानवतावादी समाजव्यवस्थेसारखी असल्याचे दया पवारांना वाटते. म्हणूनच या दु:खाचे व वेदनांचे दर्शन प्रामुख्याने 'कोंडवाडा'तील हिरोशीमा, मरण, क्रूस, पाय, पावसा पावसा तू आलास, काळ आणि झाड सारख्या सात कवितांमधून जीवनाच्या दु:खाचा आणि वेदनांचा एकेक पदर उलगडीत पुढे येताना दिसते. तर 'पाणी कुठंवर आलं गं बाई' या काव्यसंग्रहातील बऱ्याच कविता स्त्रीविषयक मनाची, तिच्या सामाजिक दु:खाची, स्वत:च्या दु:खाची साक्ष देणाऱ्या आहेत. अर्थात या काव्यसंग्रहात येणारी 'पाण्या'ची प्रतिमा दु:खाचे प्रतीक बनून आलेली दिसते. हे दु:ख, ही वेदना परंपरेने वाटयाला घातलेली आहे. भोगलेल्या यातनांसह जीवनाला पूर्णत्त्वाकडे नेण्याची एक सकस चाहूल त्यात आहे. त्यामुळेच दया पवार दु:खाच्या लाटेतूनच आयुष्याचा सागर अनुभवांना उलगडीत सहजरित्या चितारतात.

आठवणींच्या एकेक दाहक थेंबानिशी सुळक्या–सुळक्याने चालणारे आणि सागरातही हिमखंड पुरून उरावा असे हे जीवनसंघर्षातील कटू अनुभवांना थाप मारून मरणकळा सोसणारे दु:ख आहे. या दु:खाची प्रत आजपर्यंतच्या भूतकाळातील जगण्याची आहे. याची वास्तवदर्शी कणखर प्रचिती

''सागरात हिमखंड पुरून उरावा
तसे हे दु:ख
सुळक्या सुळक्याने चालून येतात
आठवणींचे दाहक थेंब ... थेंब''

(क्रूस, कोंडवाडा, पृ. ३०)

अशा खांद्यावर आयुष्याचा क्रूस घेऊन चालणाऱ्या येशूसम बनली आहे. भूतकाळात जगलेल्या एकेका आठवणींच्या थेंबांची आठवण झाली की, अंगावर तेजाब शिडकावा त्याप्रमाणे शरीराचा थरकाप होऊन जाळ झाल्यागत वाटते.

अपार वेदना भोगूनही आयुष्यभर न संपणारे दु:ख येथील समाजव्यवस्थेने दिल्यामुळे लाचारीच्या आयुष्याचे दर्शन आपल्या वाटयाला आले. हे जीवनाच्या संघर्षाचे दर्शन किती भयावह होते हे पटविण्यासाठी एक संपूर्ण आयुष्याचा आलेख कवी आपल्या नजरेसमोर ठेवतात. हिरोशिमा–नागासाकीसारखी लोकांची आयुष्ये बर्बाद व्हावी तशी आपल्या आयुष्याची गत इथल्या व्यवस्थेने केली. हिरोशिमासारख्या आयुष्याच्या उडालेल्या चिंधडयांचे वर्णन करताना कवी

''गळयात घुसमटणारा श्वास
पिंजऱ्यात करतो धडपड
विजलोळाने प्रपात व्हावे
बांधावी अस्तित्त्वाची तिरडी
अन् व्हावे बेचिराख
हिरोशिमासारखे.''

(हिरोशिमा, कोंडवाडा, पृ. ९)

अशा शब्दांत आयुष्याच्या गळयात मरणासन्न परिस्थितीत घुसमटणाऱ्या श्वासाचे पिंजऱ्यातील धडपडणे क्षणोक्षणी अभिव्यक्त करतात. जणू आपल्या अस्तित्त्वाची तिरडी बांधून हिरोशिमासारख्या बेचिराख झालेल्या माणसांच्या व्यथा–वेदनांशी एकरूप होऊन अंतरंग दाखवितात.

दया पवारांच्या कवितेत विविध अंगाने दु:खाचे, विषादाचे, वेदनांचे दर्शन घडते. हे दर्शन समाजव्यवस्थेने वाटयाला घातलेले असल्यामुळे 'मरण'सारखी कविता सोलापूरच्या एका अस्पृश्य मुलीवर झालेल्या बलात्कारातून आकारास येते. आपल्या अब्रूचे धिंडवडे निघाल्यानंतर येथील समाजव्यवस्थेत मरणाप्रमाणे यातना एकटयानेच भोगाव्या लागणार आहेत, याची कवीमनाला जाणीव आहे. कवीच्या दु:खाचीही कहाणी यापेक्षा वेगळी नाही हे समजावून सांगताना आपल्या आयुष्यातील खंत व्यक्त करतात.

''धारदार सुळयाच्या दरवाजाला
हत्ती जसे चिपा होतात.
तसं आपण हसत मरावं.''

(मरण, कोंडवाडा, पृ. १९)

अशी एकाकी संघर्षाची कथा उदास अंत:करणानिशी व्यथित होऊन मांडतात.

नंदुरबार येथे ऑफीसच्या कामाकरिता कवी गेलेले असताना फलाटावर गाडीने एका मेहतर व्यक्तीचे पाय तुटतात. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर आलेली उपासमारी आणि त्याला झालेले दु:ख हे मरणासन्न यातना भोणारे आहे. या दु:खाशी कवीचे मन एकरूप झाल्यामुळे त्यातून आपल्या मनातील वेदना ते उजागर करतात. या त्याच्या वाटयाला आलेल्या आयुष्याचे वर्णन

''ज्या पायातून जन्म झाला ते कळयांसारखे खुडलेले पाय
सारेच म्हणतात, पिरॅमिड्स सलामत तर पाय पचास''

(पाय, कोंडवाडा, पृ. ३९)

अशा शब्दांत दया पवारांनी केले आहे. त्याच्या वाटयाला पुढे आलेला जीवनाचा संघर्ष आपण ज्या जातीव्यवस्थावादी संस्कृतीमध्ये जगतो आहोत त्यामुळेच आपल्या बापाच्या वाटयाला जे दु:खपूर्ण जिणे आले, जी हमालीची कामे केवळ आपल्याच नव्हे तर समाजव्यवस्थेच्याही वाटयाला आली. या गोष्टीचा त्यांना विषाद वाटतो. म्हणूनच बापाचेही असेच भारवाही जिणे –

''पाठीचे मणके सुटलेला, गोण्या वाहणारा बाप
रक्त गुळणी सावरीत, तीळ तीळ भुईत खचला जातो.''

(फाळ, कोंडवाडा, पृ. ५३)

म्हणत कवी नमूद करतात. एखाद्या वादळ–वाऱ्यासम हे मरणासन्न अवस्थेतील आयुष्याचे जगणे असल्यामुळे आपले जीवन मांडताना कवीला या संस्कृतीचा अन्यायकारी इतिहास आठवतो. हा इतिहास माणसामाणसात भेद निर्माण करणारा आहे. माणसाला माणुसकीपासून परावृत्त करणारा आहे.

दारिद्रयात जगणाऱ्या आपल्या समाजव्यवस्थेचे वर्णन पावसाच्या परिस्थितीतून आपल्यासमोर मांडलेले आहे. या सुजलाम सुफलाम देशातील लोकांच्या रिकाम्या कोठारांना धनधान्यानं भरण्यासाठी हा पाऊस येत असला तरी शेवटी मात्र साऱ्या गावाच्या वाटयाला दु:खाचाच उसासा घालतो. हा पाऊस बरेचदा असंख्य जीवांना हतबल, दु:खी करतो. पिढयान्‌पिढया वाटयाला आलेले हे जगणे साकारताना कवी पावसाला उद्देशून म्हणतात,

''पावसा पावसा, तुला म्हणून सांगतो:
पिढयान्‌पिढया हाताला घट्टे पडले
'रोजचं मढं त्याला कोण रडं'
असच कारे वाटलं साऱ्यांना?''

(पावसा पावसा तू आलास, कोंडवाडा, पृ. ४६)

हे खर तर जन्माच वाटयाला आलेलं जनसामानान्यांच जगणं आहे. हाताला फोड येईपर्यंत गुलाम होऊन जगणं ही माणुसकीला शोभणारी गोष्ट नव्हे याची पक्की जाणीव कवीला आहे. परंतु वास्तवरूपी जीवन संघर्षालाही ते ठामपणे नाकारू शकत नाही. आपल्या यातनेचा या संस्कृतीने वाटयाला घातलेला मरणासन्न इतिहास सर्वांच्या नजरेसमोर ठेवणे त्यांना अधिक गरजेचे वाटते.

या दृष्टिकोनातून 'पाणी कुठंवर आलं गं बाई'मधील पहिलीच 'सरवा' ही कविता आईच्या जीवनकष्टाचे चित्रण घेऊन येते. सुगी उलगली जाऊन पाखरांचे थवेही दूरदेशी निघून जातात. मात्र दारिद्रयाचे रणरणते ऊन अंगाची लाही लाही करीत जीवनभर सोबत असते. कष्ट करूनही कुटुंबाला पोटभर खायला मिळत नाही. ज्या पोरासाठी दिवसभर उन्हातान्हात राबून कष्ट घेतले त्या शेतातील पीक शेवटी मालक खळयावर येऊन घेऊन जातो. आणि आई पुन्हा कणसाच्या एकेका दाण्यासाठी लाचार होऊन शेतात, रानोमाळी हिंडताना दिसते. या एकेका दाण्यालाही हपापलेल्या तिच्या विदारक जगण्याचे चित्रण

''धन्याचा हा माल सारा
गेला गेला खळयावरी
कणसाच्या दाण्यासाठी

माय हिंडे रानोमाळी'' (सरवा, पाणी कुठंवर..., पृ. १)

अशा खेदपूर्ण शब्दांत दया पवारांनी केलेले आहे. तिच्या वाटयाला आलेले दु:ख हे केवळ तिचे वैयक्तिक राहत नाही तर ते समाजव्यवस्थेने तिच्या वाटयाला घातलेले दु:ख आहे. त्या दु:खाची गाठ कित्येक पिढयांनी तिच्या पाठीशी बांधलेली आहे.

दयेचा सागर असलेल्या येशूचा जन्मसुद्धा गावकुसाबाहेर असलेल्या जनावरांच्या गोठयात झाला. तरीसुद्धा आयुष्यभर मानवाच्या मुक्तीसाठी लढा देऊन दारिद्रयात जगणाऱ्या लोकांसाठी जगण्याची प्रेरणा देत राहिला. ही थोरवी गाताना कवी शेवटी येशूला उद्देशून म्हणतो,

''सत्तेचे जुलमी तक्त
सहजच उलथवलेस
रक्ताचा टिपूसही न सांडता
येशू
तू आमच्यासाठी हंबरलास''

(येशू, पाणी कुठंवर..., पृ. १३)

स्माजात चाललेली अराजकता सामान्य जनतेला येशूने पटवून दिली. सत्ताधारी लोकांनी, राज्यकर्त्यांनी मानवी गुलामगिरीचे, अन्यायाचे जे थैमान घातले होते ती त्यांची सत्ताच आपल्या विचारांनी उलथवून टाकली. स्वत:च्या शरीरातून रक्त गाळून दुसऱ्याला सुख दिले. त्यासाठी तू त्यांच्याशी युद्ध पुकारून, त्यांचे रक्त गाळून तू विजय मिळविला असेही नव्हे तर आपल्या विचारांनी तू जीवनभर आमच्यासाठी हंबरत राहिला.

कवीच्या मनात या संस्कृतीतील जातिव्यवस्थेविषयी अतिशय घृणा आहे. या देशाच्या संस्कृतीने बरेचदा खालच्या समाजातला मानून उपरे जीवन दिले. माणसाने माणूस बाटतो असे निरर्थक ज्ञान इथल्या पुजनीय धर्मग्रंथांनी दिले. त्यावेळी समाजव्यवस्थेची आठवण काढताना ते म्हणतात,

''साता समुद्रापल्याड
माझ्या मनात भळभळणारी येशूची जखम
महारोग्याची बोटे झडावीत
तशी गावकुसाबाहेरची वस्ती
हार्लेम—गोलपिठयाची आठवण देणारी.''

(साता समुद्रापल्याड, पाणी कुठंवर..., पृ. २०)

म्हणजेच गावकुसाबाहेर जन्म घेणारा एखादा येशू आणि माझे जीवन दोन्हीही सारखेच. खिळयांच्या जखमेतून वाहणाऱ्या येशूच्या शरीरावरील रक्ताच्या वेदना आणि या समाजव्यवस्थेने मला दिलेल्या जातिव्यवस्थेच्या वेदना सारख्याच आहेत. गोलपिठयातील स्त्रियांना नाइलाजाने पत्करावा लागणारा वेश्याव्यवसाय जसा आपल्या कानांना बधीर करतो तशीच व्यवस्था या संस्कृतीने आपली करून ठेवली आहे. याची विदारक खंत कवीच्या मनात जखमेसम भळभळताना दिसते. गोलपिठयातील वेश्यांच्या वाटयालाही बालपणापासूनच गावकुसाबाहेर वस्ती करून जगणाऱ्या माणसासारखेच जन्माचे दुखणे आलेले आहे असे पवारांना यातून सुचवावेसे वाटते.

अशाप्रकारे दया पवारांच्या वेदनामय काव्यात आयुष्याचा जगून भोगून आलेला संघर्ष चितारण्याची खऱ्या अर्थाने ताकद दिसते. ही ताकद त्यांना आयुष्याच्या संघर्षाने दिली. या दृष्टीनेही पवारांची कविता नजरेआड करणे म्हणजेच जीवनातील दु:खांना टाळून जगण्यासारखेच होईल असे म्हणावयास मुळीच हरकत नाही.

## संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. अक्षयकुमार काळे, 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', पा. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. ६३७.
२) दया पवार, 'बलुतं', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, स.आ. १९९५, पृ. ४४.
३) तत्रैव, पृ. ४२

## काव्यसंग्रह :

१) दया पवार, 'कोंडवाडा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, चौ.आ. २०००.
२) दया पवार, 'पाणी कुठवर आलं ग बाई', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.

❖❖❖

# पत्रप्राजक्त : विचारसौंदर्याचे अद्‌भुत लेणे

प्रा. डॉ. स्मिता शेंडे
(सहयोगी प्राध्यापक)
बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ, महाराष्ट्र (India)
इ मेल smita.shende33@gmail.com भ्रमणध्वनी ९४२०७७३१३४

## गोषवारा (Abstract) :—

प्रस्तुत संशोधनामध्ये लालित्यपूर्ण लेखन सुध्दा वैचारिक विचारमंथन समर्थपणे करू शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे यशवंत मनोहर यांचा 'पत्रप्राजक्त' हा पत्रसंग्रह होय. या पत्रलेखनामध्ये लेखकांच्या वैचारिक चळवळीचे वैविध्यपूर्ण विषयावर विचारमंथन झाले आहे. समाज जीवनामध्ये जीवन जगत असतांना माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करणाचा समूह मनाच्या विचाराचे दर्शन यामध्ये प्रकट होताना दिसून येते. विशेषत: यातील पत्रे औपचारिकतेच्या सीमारेषामध्ये बंदिस्त न होता गंभीर आणि जबाबदारपणे पत्रलेखन झालेले दिसून येते. परिवर्तनाच्या चळवळीचे विविध संदर्भ पत्रातून अधोरेखित झाले आहे. समाजातील सातत्याने घडत जाणाऱ्या चळवळीचे दर्शन समर्थपणे प्रकट झाले आहे. जसे मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर, ज्योतिषशास्त्र, आरक्षणाचा प्रश्न, ईश्वर या संकल्पनेवर भाष्य, विपश्यना, ध्यानधारणा यासारखे गंभीर प्रश्न तसेच वाङ्‌मयातील निर्माण झालेले विविध प्रश्न या विषयावर जबाबदारीने पत्रलेखन झालेले आहे. 'पत्रप्राजक्त' म्हणजे तत्कालिन, वाङ्‌मयीन, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनाशयाशी साधलेला संवाद आहे असे वाटते. जीवनाशी निगडीत असलेल्या महत्वपूर्ण प्रश्नांना साद घालून त्यावरचे वैचारिक चिंतन म्हणजे 'पत्रप्राजक्त' होय. यशवंत मनोहरांच्या जडवादी विचाराचा आणि बौध्दिक सामर्थ्याचा प्रपंच म्हणजेच हे विचारपत्रे होत.

बीजशब्द — नवविचाराच्या आशयसौंदर्याने नटलेल्या 'पत्रप्राजक्त' या ग्रंथाचे मूल्यमापन करणे.

## संशोधनाची उदि्दष्टे :—

- 'पत्रप्राजक्त' या कलाकृतीचे आशयसौंदर्य अधोरेखित करणे.
- या ललित कलाकृतीचे वेगळेपण निरीक्षण करून निश्चित करणे.
- या पुस्तकाचे विचार सौंदर्याचे आकलन करून निरीक्षण नोंदवणे.

## प्रस्तावना :—

यशवंत मनोहर यांनी मराठी साहित्यात आंबेडकरी विचारांचा चिंतनशील कवी, समीक्षक विचारवंत, ललित लेखक, कादंबरीकार, निबंधकार, साहित्यशास्त्र समिक्षक अशा वैविध्यपूर्ण साहित्य प्रकार हाताळून एक अमीट असा ठसा उमटविलेला आहे. कादंबरीकार म्हणूनही सांस्कृतिक महामाताचे दर्शन घडविले आहे. विद्रोही कवी म्हणून आपले स्थान अढळ केल आहे. समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र, आंबेडकरवाद या विषयांवर महत्वपूर्ण लेखन करून एकूणच मराठी वाङ्‌मयाला अचूक दिशा देण्याचे कार्य केले आहे. साठोत्तरी मराठी साहित्यातील आंबेडकरवादी साहित्याचा प्रवाह समृध्द करण्यामध्ये त्यांची महत्वाची भूमिका आहे. महाराष्ट्राच्या विद्यापिठीय क्षेत्रात मराठी भाषा आणि साहित्याचा समर्थ, सर्जनशील, बुध्दिवादी प्राध्यापक म्हणून मनोहरांची ख्याती आहे. कारण मनोहरांनी अध्यापन क्षेत्राला आवडते क्षेत्र मानले आहे. त्यांच्या अध्यापनातून वैचारिक नेतृत्व उभे करणे हा ध्यास त्यांनी घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या अध्यापनातून विचाराचा कस, बौध्दिक पिळ आणि अमोघ वक्तृत्वाचा धबधबा त्यांच्या वर्गात सतत कोसळत असायचा. जाणिवेच्या नव्या राज्यात विद्यार्थ्यांना घेऊन जाणे हे कौशल्य मनोहरात अजोड आहे. विद्यार्थी जीवनात चांगले शिकविणारे प्राध्यापक मिळाले की त्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर होत असतात, हा त्यांचा स्वानुभव होता. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांच्या अनेक पिढया संस्कारित केल्या आहेत.

यशवंत मनोहर शिक्षणाला पवित्र क्षेत्र मानतात. शिक्षण क्षेत्र हे पवित्र नैतिक क्षेत्र आहे तसेच ती एक विधायक चळवळ आहे. अज्ञानाच्या काळोखातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे असे त्या चळवळीचे स्वरूप आहे. ही चळवळ सक्षमी व परिणामी करण्याकरता प्राध्यापक बहुगुण संपन्न असावा लागतो. यशवंत मनोहर हे बहुगुण संपन्न प्राध्यापक आहेत. त्यांच्या वाणीला विद्रोहाचे काठ आहे. परंतु त्या कंठातून 'कारूण्य प्रवाहीत होत असते.' अशा या जीवनसत्याला आयुष्यभर जोपासून त्याचेच सिंचन मनोहरांनी अध्यापन लेखन, भाषण, समिक्षण यातून केले

आहे. अशा व्यक्तिमत्वाच्या सर्जनातून त्यांचे संपूर्ण लेखन साकारले आहे. त्यात एका बाजूला यूटोपिया आहे तर दुसऱ्या बाजूला वास्तवतेचे तीव्र भान आहे. एका बाजूला आक्रोश आहे तर दुसऱ्या बाजूला कारूण्याने परिपूर्ण वेदना टिपण्याची हळूवार वृत्ती आहे. एकीकडे भजन आहे तर दुसऱ्या बाजूला आश्वासन आहे. दोन परस्पर विरूध्द व्यक्तिमत्वात टोकं सामावले आहे. तरी सुध्दा या व्यक्तिमत्वात माणूसपणाचे शिल्प कोरले आहे. त्यांची वृत्ती स्वप्नदर्शी आहे पण सभोवतालचे दु:ख त्यांच्या दृष्टितून सूटत नाही. स्वत:च्या दु:खाच्या अनुभवानी त्यांच्या पुढयात विश्वाच्या दु:खाचे दरवाजे उघडले. अन्याय, उपेक्षा, गरिबी, अवमान, अस्पृश्यता अशा माणसाच्या वाटयाला येणाऱ्या दु:खांनी त्यांचे मन पेटत राहते. दु:खामुळेच मनोहरांचे नाते माणूसपणाशी अधिकच घट्ट झाले आहे. या दु:खाने त्यांना त्यांच्या भूमिकेशी अधिक तीव्रपणे जोडले आहे. यशवंत मनोहरांची उदात्त जीवनमुल्ये, तर्कनिष्ठ विचारघनता, जडवादी बुध्दिप्रामाण्यवादी या विशेष्यांनी त्यांचे प्रज्ञाशील व्यक्तिमत्व तटस्थपणे उभे आहे. याचा प्रत्यय त्यांच्या साहित्यावरून येतो. यशवंत मनोहर यांचे पत्रलेखन या वाड्मय प्रकारामध्ये त्यांची चार पुस्तके प्रकाशीत झाली आहेत. 'पत्रप्राजक्त', 'निळुभाऊ फुले', 'धम्मपत्रे : लक्ष्मण माने यांना', 'पत्रपौर्णिमा' या पत्रलेखनातून मनोहरांच्या जडवादी जाणिवेच्या व्यक्तिमत्वातून या पत्रलेखनाचा प्रवाह अधोरेखित केला आहे. मनोहरांच्या विविध साहित्य प्रवाहापैकी वैचारिक जाणिवेचे स्मरण करून देणारा त्यांचा 'पत्रप्राजक्त' या वैचारिक लालित्यपूर्ण सौंदर्याचे आकलनाचा प्रस्तुत लेखात परामर्श घ्यायचा आहे.

## पत्रप्राजक्त :— विषय मांडणी

यशवंत मनोहरांनी 'पत्रप्राजक्त' हा त्यांचा निवडक पंच्याहत्तर पत्रांचा संग्रह २००४ (१४ एप्रिल) प्रकाशित केला यामध्ये विविध प्रसंगावधाने लिहिली गेलेली पत्रे आहेत. पत्राद्वारे एका माणसाच्या मनातील विचार दुसऱ्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले जाते. पत्रलेखन करताना विविध कारणे असतात. प्रत्यक्ष भेटीगाठी होत नाही, म्हणूनही पत्रे लिहिली जातात. माणसाच्या मनात विचाराचे चाललेले वादळ व्यक्त करण्यासाठी पत्र लिहिली जातात. पत्रामध्ये फक्त खाजगीच पत्र असतात असे नव्हे. समाजाच्या हिताच्या, सुखाचा विचार असलेल्या पत्रांना पुढे वेगळे स्वरूप प्राप्त होते. मनोहरांचा 'पत्रप्राजक्त' हा सर्वांच्या हिताचा सुखाचा विचार करणाऱ्या पत्राचा संग्रह आहे. यामध्ये साहित्यिक वैचारिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचे वेळोवेळी पाठविलेल्या पत्रांचे हे संकलन आहे.

'पत्रप्राजक्त' या पत्रसंकलनातील पत्रे बाबुराव बागुल, पुरूषोत्तम पाटील, श्री.पु.भागवत, श्रीनिवास विनायक कुलकर्णी, डॉ.श्रीराम लागु, विक्रम गोखले, डॉ.निर्मलकुमार फडकुले, प्रा.सरदेशमुख, ना.शरद पवार, ना.रा. सु.गवई, खा.सुशिलकुमारजी शिंदे, ना.विलासराव देशमुख, डॉ.अरूण सस्तपुतळे, का.शरद पाटील, डॉ.रावसाहेब कसबे, पार्थ पोळके, डी.वाय.हाडेकर, डॉ.प्रकाश खरात, डॉ.शैलेंद्र लेंडे, डॉ.प्रभंजन चव्हाण, डॉ.अरूणा देशमुख, प्रा.अशोक कांबळे, प्रा.गजानन जाधव, प्रा.आनंद भगत, प्रा.दिलीप वळसे पाटील यासारख्या सर्वच क्षेत्रातील मान्यवरांना पाठविलेली पत्रे आहेत. तसेच राजेश+कविता, कविता+राजेश यांना पाठविलेली पत्रे आहेत. त्यासोबतच नवोदित कवी लेखकांची नावेही पत्राच्या यादीत सामावलेली आहेत. यावरून पत्रोत्तराचा आवाका लक्षात येतो. या पत्रांमध्ये वेगवेगळया विषयावरील मुद्दे उपस्थित केले आहे. मुद्दे उपस्थित करणे त्यावरील उपाय सांगितले आहे. पत्रातील त्यांचे विचार, सकारात्मक, नकारात्मक या पध्दतीने लेखकांनी लिहिले आहे. त्यामुळे त्याला वाङ्मयीन तसेच वैचारिक मूल्य प्राप्त झाले आहे. 'पत्रप्राजक्त' चे वाचन करताना एकत्रितपणे वेगवेगळे संदर्भ प्रत्ययाला येतात त्यामुळे वाचकांना, अभ्यासकांना त्यांच्या विचाराला चालना मिळण्यास मदत होते. या पत्रातील काही पत्रांचा विषय चळवळीचा आहे तर काहींचा परिवर्तनवादी आहे. विविध विषयामध्ये विपश्यना, ध्यानधारणा, आरक्षणाचा प्रश्न, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांकनाचा प्रश्न यांचा समावेश आहे. तसेच ज्योतिषशास्त्र शिकविणे चांगले की वाईट यावर प्रकाश टाकणारे समिक्षणात्मक विवेचनही आले आहे. काही पत्रांमधून मनाला प्रोत्साहित करणारे वडिलधाऱ्या व्यक्तिंकडून मिळालेले आशीर्वादही आहे.

## आशयसौंदर्य :—

या पुस्तकाचा प्रारंभ ''जगातील प्रिय पहिल्या पत्रात' ला उद्देशून केले आहे. मनोहर या पत्रात लिहितात ''प्रिय पत्रा, शब्दांच्या आधी अश्रू असतात. अश्रू आधी आग. आगीच्या आधी असते अनावर व्याकूळ आक्रंदन आणि त्याही आधी असते काळजाचे फुटणे त्याचे निरालंब रूदन.

कोणाच्या आणि कोणत्या तहानेने तू जगात आलास ?

कोणत्या स्वप्नाचे होतास तू स्वप्न वा दु:खप्न ?

पिसारलेल्या मनमोराची तरल गुणगुण तू,
की या पिसाऱ्याच्या राखेतील सुगंधाचा कण तू, माझेही पहिले पत्र मी अजूनपर्यंत कोणाला पाठवू शकलो नाही. या पहिल्या पत्रावर लिहायला हवा तो पत्ताच मला अजून मिळाला नाही.

संपूर्ण विश्वातील मानवाचे कल्याण होवो अशा विचाराचा प्रत्यय म्हणजे लेखकाच्या मनाचे स्वगत आहे. असेही म्हणावेसे वाटते. मनोहरांच्या लेखनात त्यांच्या संवाद साधण्याच्या शैलीचे वेगळेपण प्रत्ययास येते त्यातील गोडवा, विचाराची लय अशाप्रकारे सौंदर्याचे दर्शन घडते. लेखकाच्या मनातील सुंदर विचाराचे प्रतिबिंब पत्रातून प्रकट झाले आहे. या पुस्तकातील पत्रव्यवहार हा पारंपरिक नाही तर त्यापेक्षा वेगळया पध्दतीचा आहे. 'पत्र पाठविण्याचे कारण हे की'... आणि 'कळावे लोभ असावा' या ठराविक शैलीतील नाही. हे या लेखनाचे वेगळेपण नमूद करता येते. त्यांच्या पत्रातील संवाद, शब्दातून प्रत्यक्ष बोलत असल्याचा अनुभव वाचकाला येतो. भावनेच्या विविध स्पंदनाचा प्रत्यय सुध्दा वाचकांना येतो. बाबुराव बागुलांच्या पहिल्याच पत्रात याचा प्रत्यय येतो. लेखकाला आधारस्तंभ वाटणाऱ्या बागुलांबद्दल लिहिताना म्हणतात, ''आपण आम्हा सर्वांचे बुजुर्ग आमच्या मनाचे आधारस्तंभ. आपण नुसते पाठीशी उभे असला तरिही बाकी आम्ही पाहून घेतो. चिंता नसते. तुम्ही सोबतीला आहात या जाणिवेनेही आमची ताकद शतगुणित होते. आम्ही अधिक उत्कट होतो. अधिक आविष्कारातूर होतो. सर्जनाने श्रीमंत होतो. आमची प्रज्ञा फुलवंती होते. विचाराकल्पनांची भरती तिला येते.'' यातून ज्येष्ठ साहित्यिकांबद्दलचा आदरभाव ओघवत्या शैलीद्वारे प्रकट झाला आहे. वाक्यातून विचाराची मांडणी लयबध्दरित्या होताना दिसते. त्यांच्या लेखनशैलीतील वेगळेपण अनेक पत्राद्वारे निदर्शनास येते. पुरूषोत्तम पाटील यांना पाठविलेल्या पत्रात एकमेकांसमोर उभे राहून ख्यालीखुशाली विचारावी त्या पध्दतीने पत्रातून विचारतात 'तुम्हाला सांगू पाटील' अशाप्रकारे प्रत्यक्ष हृदयसंवादच साधताना दिसून येतात. ते स्वत:बद्दल सांगतात, ''मीही अश्रूचा प्राजक्तच आहे. आसवांची सदाफुली हेच माझ्या संवेदनशीलतेचे यथार्थ वर्णन आहे. मी एकाच वेळी टोकाचा Rational आहे आणि टोकाचा हळवा आणि अतिसंवेदनशीलही आहे. 'जे प्रेमानेही रडते, दु:खात कसे ते होई' अशी माझी प्रकृती आहे. चांगले पाहिल्याच्या खरे प्रेम पाहिल्याच्या, निष्ठा पाहिल्याच्या सुखानेही, अश्रूंनी डोळे भरतात. दु:खानेही डोळे भरतात. जीवनातील सौंदर्याने डोळे ओले होतात. कृतज्ञतेने डोळे पावसाळा होतात आणि जीवनातील कुरूपाने आयुष्य अंगार होते. मी अश्रू अन् अंगार या दोन फांद्याचे झाड आहे.'' यावरून प्रत्यक्ष हृदयसंवादाचे दर्शन होताना दिसते. मनोहरांच्या या लेखनशैलीमुळे त्यांचा पत्राचा संग्रह वाचनीय होतो. तसेच त्यांच्या जीवनातील तत्कालिन, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वाड्मयीन जीवनाशी झालेला त्यांचा संवाद पत्ररूपाने व्यक्त झाला आहे.

लेखकाला आपल्या विचाराची माणसे मिळाली की कमालीचा आनंद होतो. समविचारी लोकांना भेटतांना त्यांच्या भावना उचंबळून येतात. त्या लगेच पत्राद्वारे साकार होतात. डॉ.श्रीराम लागू यांच्या 'ईश्वराला रिटायर्ड करा' असा उल्लेख लोकसत्तेमधील 'बिकट भक्तीमार्ग' या लेखात वाचायला मिळाल्याबरोबरच त्यांना पत्र पाठवून आपल्या भावना अभिव्यक्त करताना लेखक तत्परता बाळगातात. डॉ.श्रीराम लागू यांचा लेख वाचून तात्काळ अभिनंदानाचे पत्र पाठविणे हे याचेच प्रतिक आहे. या पत्रात ते म्हणतात ''आपल्यासारखे कलदार नाणे दिसते तेव्हा मनाला हिंमत येते, बळ वाढते. आपण एकटे नाहीत या जाणिवेने हृदयातील उजेड वाढतो. चार पावले चालण्यासाठी शक्ति धावायला लागते.'' अशा पध्दतीने स्वत:च्या मनातील विचारांच्या स्पंदनांना वाट मोकळी करून देतात. आदरस्थानी असणाऱ्यांबद्दल लिहिताना ते म्हणतात, ''मला मराठी कविमधले माझ्या आदराच्या पहिल्या रांगेतले फक्त दोनच कवी आहेत एक केशवसुत आणि दुसरे कुसुमाग्रज. मी जेवढा निर्णायक निर्वाण मांडणारी, अंतर्बाहय हादरवून सोडणारी कविता मला हवी आहे. आपण केलेल्या लेखनासंबंधी त्यांना आजही पूर्णपणे समाधान झालेले नाही. आपल्यावर कोणत्या कविचा विशेष प्रभाव होतो याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. या पत्रोत्तराने मनोहरांच्या अंत:रंगातील विविध बंद कप्प्याचे दर्शन सहजपणे व्यक्त झालेले आहे.

## इहवादी विचार सौंदर्य :—

समकालीन संदर्भानिमित्ताने विशेष प्रसंगोपात्त लेखन करून लेखकाला काय वाटते याचे दर्शन या पत्ररूपाने करून दिले आहे. मराठवाडा विद्यापिठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे याकरिता मोठे आंदोलन करावे लागले होते. या विषयाचा काही राजकीय पक्षांनी स्वार्थाकरिता उपयोग करून घेतला होता. तेव्हा ना.शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री होते. यांनी तत्कालिन परिस्थितीत धैर्याने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला होता. १९९३ ला १२ सप्टेंबर रोजी नामांतराबाबत निर्णायक बैठक घेण्यात येणार होती. या संदर्भात मनोहरांनी त्वरित मा.

शरद पवार यांना अभिनंदनाचे पत्र पाठविले. बैठकीत नामांतराच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय न घेतल्यामुळे त्यांचा स्पष्ट रोष त्यातून व्यक्त करताना ते म्हणतात, ''या बैठकीतील सर्वच निर्णय नामांतराच्या तोंडाला पाने पुसणारे आहेत. मराठवाडयाच्या विकासाचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र बैठक आणि उपाययोजना करण्याची गरज आहे. त्याच्याशी नामांतराचा प्रश्न जोडणे यात कोणतीही तर्कसंगती नाही. हे नामांतर केवळ लांबवणीवर टाकणे नव्हे तर नामांतर टाळण्यासाठी सोय निर्माण करणे होय.'' मनोहरांनी केलेल्या पत्रलेखनातून तत्कालिन घडामोडीवरील त्यांचा रोषही व्यक्त केला आहे. चुका करणाऱ्याची चूक कशाचीही, कुणाचीही भीडमुवर्तत न ठेवता त्यांच्या लक्षात आणून देणे या प्रकारचे लेखन त्यांच्या ग्रंथातून झालेले आहे. लेखकाने सामाजिक बांधिलकी स्वीकारल्यामुळे निर्भिडपणे लेखनाचा प्रपंच सातत्याने सुरू ठेवलेला आहे. यातूनच अनेकांचा रोष स्वत:वर ओढवून घेतल्याचे दिसून येते.

ज्योतिषशास्त्र हा अभ्यासक्रम विद्यापिठात सुरू करावा असा विचार सुरू असतांना या अभ्यासक्रमाला नागपूर विद्यापिठाने सुरू करण्याकरिता मंजुरी दिली होती. या प्रसंगी यशवंत मनोहरांनी नागपूर विद्यापिठाचे कुलगुरू मा.डॉ.अरूण सातपुतळे यांना पत्र पाठवून अभ्यासक्रम योग्य ती अयोग्य या विषयी साधार विवेचन केले होते. एका जागरूक शिक्षकाची भूमिका येथे मनोहरांनी पार पाडलेली आहे. शिक्षक हा विज्ञाननिष्ठ असावा याचेच ते द्योतक आहे. या पत्रात ते म्हणतात, ''या विद्यापीठात आजवर उद्‌वेग आणणाऱ्या अनंत वाईट गोष्टी घडलेल्या आहेत. कर्मकांड आणि फलज्योतिष्य यांच्या अध्यापनाला मान्यता देऊन या वाईट गोष्टीमध्ये भर पडू नये याची आपण निर्धाराने काळजी घ्यावी.'' असे पत्र पाठविले होते. याकरिता खगोलशास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर, मुंबई विद्यापिठाचे कुलगुरू डॉ.भालचंद्र मुणनेगर, अमरावती विद्यापिठ तसेच रविंद्र विद्यापिठाच्या शुभंकर चक्रवर्तीने कर्मकांड शिकविणारे वैदिक फलज्योतिष नाकारले असे विवध उदाहरणे देऊन पत्रात कळविले होते. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे दाखले देऊन पंडित जवाहरलाल नेहरू यांचे विचार पत्रात कळविले होते. त्यांच्या पत्रातील भाषा लकबदार आहे. तसेच अनौपचारिक आहे. नागनाथ शिंदे यांना पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात, ''शब्दामध्ये जीव ओतला की, शब्द जीवंत होतात. सभोवतालच्या वातावरणाने ते खिन्न होतात. तरी सुध्दा जीवनात हार मानायची नाही. त्यावर मात करीत पुढील प्रवास करितच राहायचे यावर लेखकाचा ठाम विश्वास आहे. थकलेल्यसा मनांना स्फूर्ती देण्याचे कार्य लेखक सातत्याने करीत असतात. पाठीवर प्रेमाची थाप देताना म्हणतात, ''खूप लोक आपला छळवाद मांडत असतात. त्यात आपले शत्रू तर असतातच पण ज्यांना आपण आपले मानतो ते सर्वच आपले नसतात. अशावेळी आपण कोसळायचे नसते. दुटप्पी लोकांमुळे आपण विझून जायचे नसते. आघातांनी तुटून जायचे नसते. आपण मोडायला लागलो की, लोक आपल्या बरबादीबद्दल उत्सव साजरे करीत असतात. आपली ताकद आपणच वाढवायची असते.'' जगताना मनाला नैराश्य प्राप्त झाले की, औदासिन्य येते. अशावेळी मनोहरांचे विचार स्फूर्ती देऊन नव्याने उभारी निर्माण करण्यास प्रवृत्त करतात.

'पत्रप्राजक्त' मधील मनोहरांचे लेखन वैविध्यपूर्ण आहे. त्याला अनेक पदर आहे. कधी मार्गदर्शनाचे दर्शन घडते, तर कधी समाजचिंतकाचा प्रत्यय येतो. विद्यार्थ्यांनी लेखन कार्य सातत्याने करीत रहावे याविषयी योग्य मार्गदर्शन करतात. लेखनाचा स्तर कसा असावा याची जाणीव करून देतात. राजेंद्र सोनवणे या कविला मार्गदर्शन करताना ते म्हणतात, ''कविता मोजक्या शब्दात लिहिता आली पाहिजे. आशयाला दुखापत होऊ नये. वर्तमानपत्रातील संपादक बातमीचे संपादन करताना जी काळजी घेतो तशा प्रकारची काळजी घेताना लेखक दिसून येतात. अल्पाक्षरातून कविता लिहिता यावी असे काव्य लेखन करताना सांगतात. या पत्रांमध्ये सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक भाष्ये आलेली आहेत. जीवनाच्या विकासाकरिता उपयोगी असणाऱ्या विचाराबाबत लेखकाचे मन सतत जागरूक असते. याचा प्रत्यय त्यांच्या कलाकृतीद्वारे येतो. जीवनाच्या प्रारंभापासून येणाऱ्या प्रत्येक वळणावरील टप्प्याचे माणसाला सतत भान असावे. जीवनाच्या वाटेवरील प्रसंगाचे, घटनांचे सुक्ष्म निरीक्षण करीत त्यावरील सकारात्मक, नकारात्मक अभिप्राय व्यक्त करावे हे जीवंत माणसाच्या जागेपणाचे प्रतिक आहे. याचा प्रत्यय 'पत्रप्राजक्त' वाचताना येतो. विवाह यासंबंधीचे लेखकाचे विचार मननीय आहे. लग्नाच्या शुभेच्छा पाठविताना ते लिहितात, ''लग्न आपल्या प्रवासाला एक सोबत देत. या सोबतीने हा प्रवास गुदमरू नये ही अपेक्षा असते. या सोबतीने प्रवासाला अधिक उन्नत ध्यास द्यावेत. वर्तमानाने पावलापुढे अंथरलेले अडथळे ठोकरून लावण्याची कुवत असेल या सोबतीचे वर्णन करता यायला हवे. लग्न म्हणजे परस्परांना अर्थपूर्ण करण्याचा महोत्सव होय. विवाहानांतरच वैवाहिक जीवन कस असाव याविषयीचे अत्यंत मार्मीक असे मत स्पष्टपणे व्यक्त केले आहे.

साहित्यिकाशी संवाद साधताना तात्विक चिंतकाची बैठक असावी लागते. याचा प्रत्यय रावसाहेब कसबे यांना लिहिलेल्या पत्रातून येतो. मनोहरांनी या पत्रात चिकित्सक विचार मांडलेले आहेत. या पत्राचे स्वरूप म्हणजे तात्विक चिंतकाची चाललेली चर्चा होय असेच म्हणावे लागते. या पत्रात मनोहर लिहितात, ''या बाळबोध अभिरूचीने बाबासाहेबांना वा मनोहराला साहित्यिक म्हटल्याने त्यांनी आनंदी होण्याचे काहिही कारण नसते. व्यवस्थेतल्या हुशार माणसांना मात्र आपण जे करतो त्याची ताकद माहित असते. मग ही हुशार माणसे योजून आपल्याला टाकतही असतात. शिवाय अनेकांचे राग–लोभ असतातच. हिंमतीचा दाखला कुठेच नसतो. सगळयांचे सगळेच असतात. आपल्यासारख्यांचे कोणीही नसतात. सांस्कृतिक आणि राजकीय सत्तांचे पाठबळ अनेकांच्या पाठीशी असते. तुम्हा आम्हाला या सर्वच गोष्टीच्या अभावी सांस्कृतिक अनाथपण आलेले असते. अशावेळी जमेल तितके चांगले लिहीत राहणे याहून जगण्याला इतर कोणताच आधार नसतो.'' मनोहरांनी जीवनातील विविध घटनांच्या अनुषंगाने मराठी साहित्यातील वास्तवाचे दर्शन या पत्रामधून घडवले आहे. हे पत्र म्हणजे समाविचारी विचारवंतांमधील एक महत्वपूर्ण तात्विक चर्चा आहे असे वाटते.

## समारोप :–

यशवंत मनोहरांच्या 'पत्रप्राजक्त' या ग्रंथातील लेखनामुळे वाचक विचार करायला प्रवृत्त होतो हे त्यांच्या लेखनकृतीचे महत्वाचे वैशिष्टय आहे. लेखनाचा कोणताही साहित्यप्रकार असो तो वाचकांना उत्कट अनुभूतीचा प्रत्यय आणून देतो. या संग्रहात लेखकाच्या विविध आणि वेगवेगळया विषयावरील पत्रोत्तरामुळे हे पुस्तक वाचनीय वाटते. या कलाकृतीचे वेगळेपण त्यातील विचारसौंदर्यात आहे. तथागत गौतम बुध्द, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची आठवण प्रस्तुत कलाकृती वाचकांना करून देते. मनोहरांच्या या 'पत्रप्राजक्त' मधील विचार जीवंतपणाचा प्रत्यय देतात. विचारातील जीवंतपणा, गतिशीलता याचा उत्कट प्रत्यय येथे येतो. जीवनात आशावादी रहावे अशी जीवनप्रणाली लेखकाने त्यांच्या प्रेरणास्थानाकडून स्विकारली आहे. लेखकाच्या विचारातील भावतरंगाचे विविध रंग त्यातून उधळलेले दिसतात. यादृष्टीने या कलाकृतीचे महत्व अनन्यसाधारण आहे. ही कलाकृती म्हणजे बुध्दीप्रमाण्यवादी विचारवंताचे विचारपत्रे पत्रोत्तराच्या रूपातून व्यक्त करणारी अभिनव कलाकृती ठरते.

मराठी वाड्मयातील पत्रलेखनाच्या पारंपरिक पध्दतीला छेद देऊन नव्या पत्रलेखनाचा वाड्मय प्रकार मराठी साहित्याला देऊन महत्वाची भूमिका पार पाडली आहे. 'पत्रप्राजक्त' चे वेगळेपण नोंदवताना यशवंत मनोहरांची बुध्दिवादी विचाराची बैठक आणि त्यांचे प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व, भाषेवरील प्रभूत्व या वैशिष्टयातून मराठी साहित्याला एक अनमोल ठेवा 'पत्रप्राजक्त' च्या रूपाने प्रदान केला आहे. हेच या कलाकृतीचे वेगळेपण आहे.

## निष्कर्ष :–

- पत्रप्राजक्त' मधील लेखन समाज चिंतकाचा प्रत्यय देणारे आहे.
- नवोदित कवी लेखकांना मार्गदर्शन करून लेखनाला प्रवृत्त करणारे आहे.
- 'पत्रप्राजक्त' मधील विचार जीवंतपणा, गतिशीलता याचा उत्कट प्रत्यय देणारे आहे. तसेच महाराष्ट्राच्या जीवनातील अनेक प्रश्नाची मुलगामी चर्चा करण्याचा प्रत्यय येतो.
- या कलाकृतीचे वेगळेपण त्यातील विचार सौंदर्य आहे.
- 'पत्रप्राजक्त' हे ललित कलाकृतीतील विचारपत्राचे उत्कट लालित्याचे दर्शन घडविते.
- 'पत्रप्राजक्त'चा आलेख वैचारिक चिंतनाचा आहे.

## संदर्भ सूची :–

१. यशवंत मनोहर– 'पत्रप्राजक्त', अभिनव पब्लिकेशन, १४ एप्रिल २००४.
२. (संपादक) प्रा.सुधीर भगत– नवनिर्माणाची कार्यशाळा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २६ मार्च २००९.
३. सागर सम्दुर (संपादक)– इहवादी साहित्याचे महानायक डॉ.यशवंत मनोहर, प्रकाशक संघर्षमय भशा २०१५.
४. सुधीर भगत (संपादक)– नवनिर्माणची कार्यशाळा, गौरव ग्रंथ युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २६मार्च २००९.
५. शैलेंद्र लेंडे– मराठी साहित्यातील विवेकवाद, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, १४ एप्रिल २००४.
६. अनमोल शेंडे (संपादक)– वेध एका युगसाक्षी प्रतिभेचा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २६ मार्च २००७.

❖❖❖

# रानमनाच्या जखमांच्या अजिंठा म्हणजे उरस्कल

प्रा. डॉ. सुधीर भगत
सहयोगी प्राध्यापक
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय, एटापल्ली, जि. गडचिरोली, महाराष्ट्र (India)
इ मेल drsudhirbhagat@gmail.com भ्रमणध्वनी ७५८८९०३४३८

**गोषवारा (Abstract)**

आदिवासी कवितेमध्ये अनेक कवींनी अतिशय समर्थपणे कविता लिहिलेली आहे. या कवींचा प्रत्येक विषयाकडे पाहण्याचा सजग दृष्टिकोन आहे. कवी स्वतःचे अनुभव अतिशय तीव्रपणे व्यक्त करताना दिसतो. उरस्कल म्हणजे स्मारक ते तमाम आदिवासी कवींना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देतात. आदिवासी समाजाचे होणारे शोषण मध्यवर्ती विशय असून आदिवासींच्या आत्मसन्मानाची कफियतही कविता मांडते. व्यवस्थेबद्दलचा प्रचंड प्रक्षोभ प्रगट होताना दिसतो. त्यांच्या वेदनामय जगण्याला ते कवितेत शब्दबद्ध करतात. या शोषणाच्या विरोधात क्रांतीपरिवर्तनासाठी आदिवासी समाजाने सज्ज असले पाहिजे. परिवर्तन हे शिक्षणातून होईल. त्यामुळे आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचे शिक्षण हेच प्रभावी माध्यम आहे. समाजबांधव शिकूनसवरून प्रगत व्हावे व एक शैक्षणिक परिवर्तन आदिवासी समाजामध्ये व्हावे हे स्वप्न कवी मुळाशी बाळगतो आहे.

बीज शब्द — उरस्कल—स्मारक, उर—गाडणे, स्कल—दगड, पोलो—सण, सगे—आप्तेष्ठ

## विषय विवेचन

आदिवासी साहित्यामध्ये अनेक दमदार प्रतिभेचे कवी विविधांगी स्वरूपाची आदिवासी कविता अतिशय समर्थपणे लिहीतांना दिसत असून कवितेचे दालन त्यामुळे अतिशय समृध्द व संपन्न होताना दिसत आहे.आज आदिवासी कवींची नोंद मराठी कवितेमध्ये अतिशय गौरवपूर्ण केली जाते.

गेल्या वीस पंचवीस वर्षेपासून आदिवासी साहित्य चळवळी मधील एक सलग नाव म्हणजे पितांबर कोडापे. नौकरी,कुटुंब यांची कोणतीही तमा न बाळगता आपल्या चळवळीला महत्व देणारे व्यक्तीमत्व त्यामुळे प्रत्येक विषयाकडे त्यांचा पाहण्याचा सजग दृष्टीकोन आहे.

आदिवासी साहित्याचे शिल्पकार प्रा.डॉ. विनायक तुमराम या थोर प्रज्ञावंताच्या प्रयत्नाने आदिवासी समाजातील तरूणांची एक नवी वाङ्मय चळवळ उभी झाली.तो लिहु लागला ,बोलु लागला.अश्या नव्या आदिवासी वाङमयीन प्रवाहाची जडणघडण कवींनी जवळुन बघितली या धगधगत्या वाङ्मयीन संस्कृतीमध्ये कवीची जडणघडण झाली.या विचारांची,संस्कृतीची कवीला माणुस म्हणुन स्वाभिमानी जगण्याचे स्वप्न दिले. याच चळवळीमधून स्वत:जे भोगल ते दु:ख वाटयाला आल,अनुभव तेच अतिशय तीव्रपणे त्यांची मांडले आहे.ते म्हणतात माझ्या कविताच माझे मनोगत.या कविता नसुन यातनागीत आहेत. त्या एकटयाच्या नसून समस्त दीनदुबळया आदिवासीच्या आहेत.स्तबध्द करणारा मी एक या सर्वांचा केवळ प्रतिनीधी आहे.मनातल्या रानातला हा शाब्दीक रानमेवा आहे.

उरस्कल हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह उरस्कल हा माडिया बोलीभाषेतील शब्द आहे. त्याला कलबंडा असेही संबोधल्या जाते. आदिवासी माडिया मानसाच्या मृत्युनंतर त्यांच्या स्मृतीपित्यर्थ दगडाच्या रूपात “स्मारक” उभारले जाते. एक मोठा लांब दगड जमिनीत पूजा अर्चा करून पारंपरिक पध्दतीने उभारला जातो. 'उर' म्हणजे गाडणे,पुरणे, 'स्कल' म्हणजे दगड. जमिनीमध्ये ऐक उंच दगड गाडणे म्हणजे उरस्कल.

*“लाखोंचे धडगे बांधता*
*शक्तीस्थळ,स्मृतीस्थळ*
*समाधीचे गोंडस नाव*

*आमचे मात्र उरस्कल.*
*कलबंडाली नाव त्याला*
*गावकुसालगतते असताती.*
*स्मृती उर्जा मिळत राहो*
*सगे माथा टेकविती."*

हे उरस्कल म्हणजे स्मारक ते कवीला व तमाम आदिवासी समाजाला प्रेरणा देणार असते. आपली कविताही आदिवासींना प्रेरणा देणारी ठरावी. म्हणुन कवीने कवितासंग्रहाला "उरस्कल" हे नाव ठेवले ते मोठे अन्वर्थक आहे असे मला वाटते.

पितांबर कोडापे यांची कविता आदिवासी समाजाचे वेदनाविश्व व्यक्त करते. जंगलाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समाजाच्या वेदनेची धग कशी काळजाला चिरत जाते ते कविता वाचल्या नंतर जाणवते. कुवाकोडीने राष्ट्रध्वज पाहिलाच नाही. हे खरे वास्तव आहे.देशाला स्वातंत्र मिळून आज इतकी वर्षे झाली आहे. आदिवासी समाज विकासापासुन कोसोमैल दूर आहे. कुपोषण, बालमृत्यु, कुमारीमाता,व्यसन, अंधश्रध्दा,बेकारी,अज्ञान इ. अनेक गंभीर प्रश्न आहेत. आजही कंदमुळे खाउनच ती आपली उपजिवीका करतात. त्यामुळे ही समाजाची स्थिती,गती दुर्देशा बघितली की संवेदनशील कवीमन अस्वस्थ होते व आदिवासी समाजाच्या वेदनामय जगण्यालाच ते शब्दबध्द करतात.

*" मांडू कशा व्यथा या उध्वस्त रानमनाच्या*
*ठेवू कशा त्या असंख्य यातनांच्या.*
*रानोवनी जीणे हे अनवाणी पावलाचे*
*वितभर लंगोटीच्या अन फाटक्या तनाच्या.*
*नाही कुणास कीव ना कुणाच्याच संवेदना*
*करू कशा शब्दबध्द जखमा अबोल वेदनांच्या." ३५*

कवी हे मनाने अतिशय संवेदनशील आहेत. ते त्यांचे मनच त्यांना स्वस्थ बसु देत नाही. आदिवासी समाजाचे उदास भकास जीवन त्यांच्या व्यथा वेदना यातना यामुळे ते अस्वस्थ होतात. जणूकाही यातना म्हणजे आदिवासी समाज व आदिवासी समाज म्हणजे यातना असे सूत्रच झाले आहे.

आदिवासी समाज आज मागासलेला आहे त्याला शासना, अधिकारी जबाबदार आहे.त्यांनी आदिवासी समाजाच्या आशा आकांशाच्या हरताळ फासला आहे. स्वप्नांच्या गर्भपात झाला आहे.शासनाच्या कोणत्याच योजनेचा फायदा आदिवासी समाजाला होत नाही. त्याचे ऑपरेशनच कवीने केले आहे.

*"मासू भेटला ,*
*म्हणे फॉर्म भरला*
*अर्ज केला*
*प्रस्ताव गेला*
*पोराचा नातुही आला*
*जंगलात गेला*
*मासू सत्तरचा झाला*
*फॉर्म मात्र जशान तशाच नेला" ६८*

रैनुचा संघर्ष ही या कविता संग्रहातील एकमेव दिर्घकविता रैनुच्या संघर्षाचे चित्रण येथे केले आहे.रैनु हा नक्षलवादी कसा बनला यातुन एकुणच आदिवासी समाजातील तरून नक्षलवादी बनतात याच मार्मिक चित्रण केले आहे.

*"येक दिवस रैनु आला*
*लपन छपन रात्री*
*मायेने वळखलेस नाई*
*परिचय झाला*
*मायेचा भोंगा सुरू*
*थोडा वेळ थांबुन*
*रैनु पसार झाला." ५८*

एखाद्या काल्पनिक कथा चित्रपटातील हा प्रवास असावा असे रैनुचे जीवन प्रत्येक संवेदनशिल मनाला अंतमुख व मेंदुला सुन्न करणारे आहे.ही शासन व्यवस्था,प्रस्थापित व्यवस्था त्याला नक्षलवादी बनन्यास भाग पाडते असे. कवीला वाटते कवीला शोषणयंत्रणेच्या नवनव्या मुखवटयाचे भान आहे.

कमरे भोवती लंगोटी गुंडाळतो. पायात चप्पल नाही तसाच तो काटया गोटयाची परवा न करता जंगलात फिरतो. एकीकडे मारूती कारमध्ये फिरणारा समाज तर अदुरीकडे मारूतीची लंगोटीही नसलेला आदिवासी समाज.ही व्यथा वेदना पाहुन कोणाचेही मन दु:खी होऊ नये. माणुस हा संवेदनाहीनझाला आहे. माणुसकीला वणवा (वाळवी) लागला आहे.अश्या अबोलमनाच्या वेदना कवीने कवितेत शबबध्द केल्या आहेत.कारण आपले दु:ख हे आपल्यालाच मांडावे लागते असे कवीला वाटते.

*" पोलोच्याही दिवशी आम्ही*
*अर्धपोटी, उपाशीच असतो*
*चेहऱ्यावर आनंद, ओठावर स्मित ठेवून." ३८*

पोलो हा आदिवासी समाजाचा सण पण हा सण नवनवीन पंचपक्वान करून साजरा केला जात नाही.तर त्या दिवशी तो अर्धपोटी उपाशी असतो.

कवी हा केवळ शोषणाचेच चित्रण करतो असे नाही तर या शोषणाला सुरंग लावण्याचा निर्धार कवी व्यक्त करतो. 'बोंबलीवर पालव मांडुन झोपनारे आम्ही नाही' तर या शोषणच्या विरोधात क्रांती परिवर्तनासाठी आम्ही सज्ज आहोत.म्हणुन ते तमाम आदिवासी समाजाला आवाहन करतात.

*"चला उठा लढुया मुक्तीसंग्रामाचे लढे*
*घडवूया नवा आदिवासी भारत पुढे.*
*आता मुळनिवासीयांचे कुठेच काही अडे*
*शिक्षण,संघटन,संघर्ष यातही न कमी पडे."३६*

आता आपली क्रांती आपणच करावी लागेल नवा आदिवसी भारत घडविण्यासाठी मुक्तीसंग्राहासाठी सज्ज झाले पाहिजे.ही क्रांती मुक्ती कशी घडुन येईल.त्याचा मुलमंत्र कवी सांगतो त्यासाठी "शिका,संघटीत व्हा,संघर्ष करा." हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मुलमंत्र ते सांगतात.शिक्षणा शिवाय प्रगती आणि या दयनीय अवस्थेतुन मुक्ती होणार नाही.म्हणुन ते शिक्षणाला महत्व देतात.

*" मनामनात ज्योत चेतवूनी*
*का न गोंडवन पेटावे*
*पेटवल्याच का मशाली एकदा*
*पासंगाला न कुणी पुरावे " ४३*

एक एक कविता म्हणजे मिनूईल बनुन प्रस्थापित व्यवस्थेचा वेध घेताना दिसत आहे.प्रस्थापिताच्या अन्यायाला आम्ही भिंत घलणार नाही. "वाघाचे वंशज आम्ही अर्थात शेळीचे शेळपट जगणे आम्हाला आवडत नाही" अन्यायाच्या गाथा पुरे झाल्या आता संर्घषासाठी सज्ज व्हा. आता ठोस्यास ठोसा लावल्याशिवाय आम्ही राहणार नाही. अंगठा कापून देणाऱ्या एकलव्याचे मन फेकुन द्या गुलामगिरीच गुलामगीरीला नवा जन्म देते.म्हणुन या गुलामगिरीच्या विरोधात बंड करण्याचे आवाहन ते करतात. देशातील जातीयतेने कसे वाटोळे केले आहे त्याने समाजव्यवस्थेला लकवा झाला आहे.पण या व्यवस्थेच्या समोर कवी झुकत नाही तर तो प्रचंड संताप व्यक्त करतो. हे कवितेचे फार मोठे वैशिष्टय आहे.

आदिवासी समाजाचा इतिहास हा प्रेरणादायी आहे.अनेक पराक्रमी वीर होउन गेले त्यांनी क्रांतीची प्रेरणा दिली क्रांतीवीर बिरसामुंडा,वीर बाबुराव सडमेक,क्रांतीसिंह नारायणसिंह उईके, विरांगणा दुर्गावती,एकलव्य शंबुक,कर्ण हे कवींचे प्रेरणा उर्जास्त्रोत आहेत.त्यांच्याबद्दल एक कृतज्ञभाव कवी व्यक्त करतात.

कवितेत प्रतिमाची रेलचेल नसली तरी बऱ्या प्रमाणात नवनवी प्रतिमा आल्या आहेत.हिजडी संस्कृती,पोलादाचे प्रहार,उघडाबंब,काळयाकुट्ट अंगावर,दु:खाचा डोंगर,आसवांचा महापूर,वांझोटी कीव बोंबलीवर पालव मांडणे,बेगडी जिव्हा,परधान,वनशब्द,पोलो,ढोल तुडबुडी,रेला,चव,जागवू गोंडवन इत्यादी. कवितामधुन आदिवासीसमाजाचे धार्मिक,सांस्कृतीक मुल्य प्रगटांना दिसते. सुन्नवस्ती, विद्रोह, कुपोषण,पोटाची आग, आता, अंधार, इशारे, रानफुले, अखंड, आक्रोश, संस्कृती, आवाज या कवितेतुन स्वशोध घेताना कवी दिसतो. बीरसाची

माय, मासुचा फॉर्म, रैनुचा संघर्ष, विद्यापीठ, मुर्दाबाद, सहल, बोटु केसकर्तन या कवितेतुन एक भयानाक दिसुन येते.

अश्या अनेक प्रतिमाची पेरणी वेगवेगळया खुबीने कवीने केले आहे.आदिवासी साहित्याकडे एक उपेक्षेच्या दृष्टीने बघितले जात होते त्या आदिवासी साहित्याला एक नवी दिशा ,नवा आशय देणारे आदिवासी साहित्याचे कोलंबस डॉ.विनायक तुमराम यांची विव्दनाप्रचूर दोघे अशी प्रस्तावना या कवितासंग्रहालाअसल्यामुळे एक विशेष महत्व आले आहे ते म्हणतात, "पिंताबर कोडापे यांची कविता म्हणजे एक सत्‌शिल आणि निर्मळ मनाची उर्मी आहे.संस्कृतीच्या पंखांनी उड्डान भरणाऱ्या पहाडी पाखरांची किलबिल,व्यवस्थेच्या निर्दयी जाळयात अडकलेल्या अगतिकतेची गहराई,शकोटयांची उब पांघरून निद्राधीन झालेले रानगर्भ,दैन्य – दारिद्रियाची बेहिशेबी चुकाऱ्याने ओसरलेली पहाडांची निळाई हे सर्व या कवितेचे विषय आहेत.

स्नेहसमत्वभावास आचवलेल्यांच्या बाजुने लढण्यास सिध्द झालेली हा कविता आहे.या कवितेतील शब्द हे राना – डोंगरातील सावल्याच्या रक्षर्णाथ तैनात जागते तेजस्वी पहारेकरी आहेत.व्यवस्थेची पाठराखण करणारे मुजोर,पाखंड आणि मोकाट अनाचार ,यांचेशी बेडरपणे भिडण्याचा तिचा बेत आहे.विज्ञानाचे भरारीपंख लावून काळ विराट आंदोलनांना कवटाळत आहे. काळाच्या वेगवान धारेत टिकुन पैलतीर गाठण्याचे सामर्थ्य आणि कसब कवीजवळ निश्चितच आहे,हे मी जाणुन आहे.आदिवासीसंकट सर्व हीनबल आणि कुचाळकीचे बळी ठरलेले – एका उज्ज्वल भविष्याचे धनी आहेत,असा अभंग विश्वास कवीने या कवीतेतून व्यक्त केला आहे." एक चिंतनशिल अशी ही प्रस्तावना आहे.

या कवितासंग्रहात विविधता आहे.सामाजिक जाणीव हे त्यांच्या कवितेचे खरे बलस्थान आहे असे मला वाटते. कवीची ही समाजनिष्ठा प्रामाणिक आहे.दिशा ठरलेली आहे.स्वत:साठी ,कुटुंबासाठी फक्त जगायचे नाही तर समाजासाठी ,देशासाठी जगायचे. आदिवासी समाजाच्या वेदनेच्या जखमाच्या अजिंठा कवीच्या ह्दयात आहे.

आदिवासी कवितेतील एक सजग,सशस्त,मौलीक काव्यदृष्टी म्हणुन "उरस्कल" या कवितासंग्रहाचा व एकुणच आदिवासी जीवनाचे समग्रलक्ष्यी भान कवीतेत आहे. ही बाब मला विशेष महत्वाची वाटते.

या सर्व बाबीची कुठेतरी दखल घ्यावी असे कवीला वाटते. संवदेनशिल मन हे कधीच स्वस्थ बसून राहत नाही म्हणुन रानातल्या माणसाच्या वेदनामय जगण्याला कतिवतेच्या माध्यमातुन शब्दबध्द करण्याचे काम कवीने केले आहे. वेदनेचा जखमी अंजिठा डोळयात ठेवून नव्या निळया पहाटेचे स्वप्न पाहणारी ही कविता आहे.

## निष्कर्ष :—

१) आदिवासी मनाची स्फंदन टिपणारी कविता.
२) सभोवतालच्या अमानवीय व्यवस्थेशी निकराचा लढा देणारी कविता.
३) आदिवासी समाजाचे विदारक चित्र मांडणारी कविता.
४) आदिवासी रानमनाच्या उलगुलान.
५) परिवर्तनाचा ध्यास घेतलेली कविता.
६) समता,स्वातंत्र,बंधुता या मुल्याचा पुरस्कार करणारी.
७) नवा आशय अभिव्यक्ती.
८) साध्या,सोप्या प्रतिमा पण अर्थ मोठा.
९) प्रस्थापित व्यवस्थेची चिरफाड करण्याचे सामर्थ्य.
१०) आदिवासी समाजाच्या दु:खाचे विविध पदर घेउन ही कविता आविष्कृत होते.

## संदर्भ ग्रंथ :—

१) प्रा.डॉ. विनायक तुमराम (संपा.) – शतकातील आदिवासी कविता, मदन धनकर, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर २०१३.
२) डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर – आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद २०१२.
३) सुनिल कुमरे – जंगल जिव्हार, सुनिल वामन कुमरे, प्रकाशन चंद्रपूर २००९
४) प्रा.डॉ. विनायक तुमराम – आदिवासी और उनका निसर्ग धर्म, सुधीर प्रकाशन वर्धा २०१६.

❖❖❖

# नामदेव ढसाळांच्या कवितेतील व्यक्तिनिष्ठ आशय

डॉ. जगदिश्वर मेश्राम
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी, महाराष्ट्र (India)
इ मेल jagdishm.17@gmail.com भ्रमणध्वनी ९४०५५३३९७९

## गोषवारा (Abstract)

आंबेडकरवादी कवी नामदेव ढसाळ यांची कविता आशयाच्या अंगाने पुढे जाणारी कविता आहे. त्यांच्या कवितेतील व्यक्तिनिष्ठ जाणीव म्हणजे जीवना बरोबर विचलित होणारे 'मी' चे चित्र आहे. हे चित्र आखीव रेखीव नाही. तरीही त्या प्रतिबिंबाला अस्थिर का होईना पण एक चेहरा आहे. यात कवी आपल्या निर्मितीचे मूळ शोधतांना आत्मशोधाचा विचार करतो. कवीच्या दृष्टीने आत्मशोध हाच स्वत:चा जीवनशोध आहे.नामदेव ढसाळांच्या कवितेचा मागोवा घेतांना आपल्यापुढे नामदेव नावांच एक व्यक्तित्व उभे राहते. नामदेवाचे व्यक्तिमत्त्व एक खास वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वा सभोवती त्याचे काव्यविश्व फिरताना दिसते. ढसाळांच्या व्यक्तिमत्त्वाचे बीज कोणत्या समाजव्यवस्थेत वाढले फोफावले आणि घडले यांचा संपूर्ण तपशील त्याच्या कवितेतून वेगवेगळ्या पद्धतिने व वेगवेगळ्या पातळ्यांवर माडला गेला आहे. ढसाळांना आलेले प्रत्यक्षातील जीवनानुभव व जीवनानुभवांचे दाहकपण त्यांच्या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त होताना दिसते. या कवींचे अनुभवविश्व अतिशय समृध्द असल्यामुळे तसेच त्यांच्या अनुभवरूपांमध्ये फार मोठी वैविध्यपूर्णता असल्यामुळे त्यांची कविता आशयाच्या दृष्टीतून अर्थपूर्ण स्वरूपाची कविता ठरते.

## विषय विवेचन

नामदेव ढसाळ हे आंबेडकरवादी साहित्यातील एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांची कविता ही प्रस्थापित मूल्यांचा विध्वंस करणारी कविता आहे. त्यांच्या कवितेला शब्दांचा आणि भाषेचा कृतक नखरा मान्य नाही. आशय हेच तिचे बलस्थान आहे ती खोट्या कल्पनेच्या जगात विसावू शकत नाही. ''सर्वसामान्य माणसाला संत्तासंपत्तीप्रतिष्ठा यापासून वंचित ठेवणाऱ्या शोषणव्यवस्थेला सुरूंग लावणाऱ्या तमाम छोट्यामोठ्या चळवळींना, प्रवृत्तींना.''[१] ढसाळांनी आपली कविता अर्पण केली आहे. कारण वर्णव्यवस्थेमुळे भोगावे लागणार दु:ख त्यांच्या वाट्यास आले. त्यामुळे सभोवतालच्या परिस्थितीतील असहायता, भेदाभेद चांगल्या वाईटांचे भावनात्मक आकलंन त्यांच्या कवितेत प्रचंड प्रमाणांत दिसून येते. त्यांची कविता म्हणजे एका प्रतिभासंपन्न कवीचे आत्मनिवेदन आहे. पण त्यांचे हे आत्मनिवेदन व्यक्तिकेंद्री स्वरूपाचे नाही, तर ते समाजकेंद्री स्वरूपाचे आहे.

नामदेव ढसाळांचे 'गोलपिठा' (१९७२), 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले' (१९७५), 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र: प्रियदर्शिनी' (१९७६), 'तुही इयत्ता कंची इयत्ता कंची, (१९८१), 'खेळ' (१९८३), 'गांडू बगीचा' (१९८६) आणि 'या सत्तेत जीव रमत नाही' (१९९५) अशी एकापाठोपाठ एक अनेक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. या सर्व काव्यसंग्रहाच्या विचार केल्यास ढसाळ कधी 'आम्ही' कडून 'मी' कडे आणि 'मी' कडून 'आम्ही' कडे असे आत्मभानाकडे प्रवास करतांना दिसतात. ढसाळ ज्या ताकदीने आपल्या मुळाकडे प्रवास करतात, तेव्हा स्वत:च्या जगण्याला उत्त्कटपणे मिठी मारतात. स्वत:ला खोलवर तपासत जातात. ''प्रत्येक कलावंताला स्वत:चे एक वर्ग चरित्र आहे.''[२] असे त्यांच्या कवितासंबंधात म्हटले गेलेले आहे. हे एक त्यादृष्टीचे मत नाकारता येत नाही. कारण ''पाण्याने भरलेली बादली उचलताना जमीनीचा संमंध येतो तसा कविता लिहितांनासुद्धा जमिनीचा संमंध येतो. त्यामुळे माझ्या कवितेची जमीन ही सर्वहारावर्गाची आहे''[३] साहित्यामध्ये या प्रकारे वैयक्तिक आविकाराला महत्त्व असते. याचा अर्थ सामाजिकतेला महत्त्व नसते, असे नव्हे. उलट वैयक्तिकता आणि सामाजिकता या दोन्हीच्या आंतरसंबंधामधून उत्कट स्वरूपाची साहित्यनिर्मिती होत असते. त्यामुळे व्यक्तिनिष्ठ आशय आणि समाजनिष्ठ आशय हे दोन्ही प्रकारचे आशयरूप साहित्यामध्ये महत्त्वाचे ठरतात. नामदेव ढसाळ यांच्या कवितालेखनामधून या दोन्ही प्रकारच्या साहित्याचे मौलिकपणे प्रत्यंतर येते.

कवी हा समाजशील प्राणी आहे. त्याला आपल्या जगण्याची सार्थकता अनेक संबंधामधून अनुभवास येत असते. त्यांचे जगणे म्हणजे स्वत:मधील संभवय शक्यता प्रत्यक्षात आणणे. या प्रक्रियेमध्ये तो स्वत:च्या जीवनाचा शोध होत असतो. तो आपल्या कुटूंबाशी, सभोवतालच्या परिस्थितिशी आणि स्वत:शी काही नाते जोडून पाहत

असतो. या नात्यातील त्याचे अनुभवविश्व तो साकार करीत असतो. ''स्वजाणीव ही आंबेडकरी विचार प्रेरणेच्या कवीचे प्रबळ आशास्थान असून या जाणिवेतून ही कविता अधिक आत्मसन्मुख होताना आढळते.''[४] असे या कवितासंबंधात म्हटले गेले आहे. याचे प्रत्यंतर ढसाळांच्या काव्यलेखनातून उत्तम प्रकारे प्रत्ययास येते. नामदेव ढसाळ लिहितात,

''पाण्याच्या दर्पणात विचलित होणारे चित्र माझेच आहे
मीही कात टाकली सापासारखीहा थंडगार पाण्याचास्पर्श इच्छेचे दोर कापतो
नको फुंकर घालूस पाण्यावर माझ्या आत्मचरित्राचाचेहरा हरवून जाईल ''
( 'आत्मचरीत्र','या सत्तेत जीव रमत नाही', पृ. १३४)

ह्या कवितेतील व्यक्तिनिष्ठ जाणीव म्हणजे जीवना बरोबर विचलित होणारे 'मी' चे चित्र आहे. हे चित्र आखीव रेखीव नाही. तरीही त्या प्रतिबिंबाला अस्थिर का होईना पण एक चेहरा आहे. यात कवी आपल्या निर्मितीचे मूळ शोधतांना आत्मशोधाचा विचार करतो. कवीच्या दृष्टीने आत्मशोध हाच स्वत:चा जीवनशोध आहे. नामदेव ढसाळांची कविता ही एका अर्थाने आत्मचरित्रच लिहित राहते. ''किंबहूना संपूर्ण दलित साहित्याचा होणारा आविष्कार, दलित वर्गाचे युगायुगाचे आत्मचरित्रचा प्रकट करीत राहतो.''[५] असे या कवितेच्या संबंधात म्हटले गेले आहे.

नामदेव ढसाळांच्या कवितेचा मागोवा घेतांना आपल्यापुढे नामदेव नावांच एक व्यक्तित्व उभे राहते. नामदेवाचे व्यक्तिमत्त्व एक खास वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वा सभोवती त्याचे काव्यविश्व फिरताना दिसते. ढसाळांच्या व्यक्तिमत्त्वाचे बीज कोणत्या समाजव्यवस्थेत वाढले फोफावले आणि घडले यांचा संपूर्ण तपशील त्याच्या कवितेतून वेगवेगळ्या पद्धतीने व वेगवेगळ्या पातळ्यांवर माडला गेला आहे.

''लीक झालेला सूर्य
विझत गेला
रात्रीच्या मिठीत
तेव्हा जन्मलो मी
फूटपाथवर
चिलबटलेल्या चिरगुटात
आणि झालो अनाथ'' ('दरग्याच्या वटेवर', 'गोलपिठा', पृ. ३५)

या शब्दांमध्ये ते आपल्या जन्मापासूनची अभावग्रस्तता व्यक्त करतात. दलित वंचितांचे आणि सामाजिक पातळ्यांवरील जीवन हे अनाथ स्वरूपाचे नेहमीकरीता राहीले आहे, या संबंधीची भावना त्यांच्या या काव्यरूपातून पहावयास मिळते. वंचिताच्या अभावग्रस्थतेचा विचार करतांना तो केवळ समकाळाच्या संदर्भात करून चालत नाही तर तो तीन्ही काळाच्या संदर्भात करावा लागतो, ही गर्भित स्वरूपाची विचारदृटी येथे मूल्यात्मक पद्धतीन प्रकट झाली आहे. महानगरीय जीवनातील फूटपाथवरील वेदना स्वत:च्या वेदनेसोबत जोडून ढसाळ येथे अभिव्यक्त होताना दिसतात. महानगरीय वातावरणामुळे माणसांचे माणूसपण करपत चालल्याची जाणीव ते तीव्र श्शब्दात व्यक्त करतात. वंचितांच्या जीवनातील दु:खभाव व वेदनाभाव व्यक्त करण्यापासून स्वत:ला राखू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपातून दलित वंचितांच्या जीवनाला नवा अर्थ प्राप्त झाला. त्यामुळेच वंचितवर्गाला स्वत:ची नवी अस्मिता प्राप्त झाली. दलित वंचित व्यक्तिची आणि समाजाची दु:खयात्रा काही प्रमाणात हा होईना, कमी होऊ श्शकली.नाही. म्हणूनच नामदेव ढसाळ स्वत:ची व स्वसमाजाची अस्मितानिर्मिती व्यक्त करताना लिहितात,

''मी हे सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात जागे झालेत
हजारो वर्षे मी होतो खंगत
या गुहागुहातल्या प्रचंड अंधारात
कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावित जाणार आहे या पुढचा काळ''
(' बेंबीचा देठ ओला होणाया वयात' ,'गोलपिठा', पृ. ११)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होवून जागे झालेले हात क्रांतीची भाषा बोलू लागले आहेत.

पुढील क्रांतीचे नायक आपणच असल्याची भाषा व्यक्त करू लागलेला हा विचार मौलिक स्वरूपाचा ठरतो. ढसाळ विद्रोही जाणीव अधिक प्रखरतेने मांडतात व प्रस्थापित विचारसरणीचे ते प्रखर मूल्यांकन करतात.

''आई तो तुझा लाडका
इथल्या संस्कृतीच्या रूढीच्या परंपरेच्या विचारांच्या
व्यवस्थेच्या समर्थकांच्या विरूद्ध बंड करून उठलाय
अशा वेळेला तू गलितगात्र झाली आहेत
तुझा पोर हा पोर नाही
या युगातला तो क्रांतीपुत्र आहे.''

(' आईच्या समजुतीसाठी', 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले', पृ. १२ व १३)

यात ढसाळ आपण स्वत: क्रांतीपुत्र असल्याची भाषा व्यक्त करतात व आईला आपण बंड करून उठलो तरी तू गलितगात्र होऊ नकोस अशी ते आईला समज देतात. दलित वंचितांच्या लढ्याकरीता सिद्ध झालेला हा कवी स्वत:च्या वैयक्तिक कौटुंबिक कोशात अडकू इच्छित नाही. आपण क्रांतिपुत्र आहोत, याचे स्पष्ट भान कवीला असल्याचे दिसून येते. म्हणूनच तो आपल्या आईला गलितगात्र न होण्याबद्दल बोलतो आणि स्वत:ला व्यवस्थापरिवर्तनाच्या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे सर्व काही आलबेल होणे असे नसते. अशा चळवळीमध्ये व अशा प्रक्रियेमध्ये चढउताराचे, मान—अपमानाचे, घडण्या—माडण्याचे विविध प्रसंग असतात. म्हणूनच कवी म्हणतात,

''किती काळ मीही भटकतो आहे
माझ्या भणंग देशातून''
''म्हटल होतं प्रवाहाउलट पोहत जाईल
तर पाण्यानंच असा दगा दिला'' (स्वत:च्या बदल'या सत्तेत जीव समत नाही', पृ.१६)

अभंग देशातून भटकणारा हा कवी प्रवाहपातित होत नाही. प्रवाहाबरोबर वाहून जाता प्रवाहाविरूद्ध पोहने तो जाणीव पूर्वक पत्करतो.

ज्यांच्यासाठी क्रांती करण्याचे ठरविले त्यांनीच आपल्या निष्ठा कशाकशा बदलविल्या, याविषयीचे दु:ख कवी व्यक्त करतात. याचा अर्थ अन्य सर्वच दोषी आहेत आणि कवी तेवढा सद्‌गुणी आहे, असा नव्हे. आपल्या अवती—भवतीचे पर्यावरण हे कलुषित स्वरूपाचे असताना त्यांचे भले—बुरे संस्कार व्यक्तिमत्रांवर होणे स्वाभावीकच ठरते. ''माणसाचे प्रलोभनात अडकून छोटे छोटे होत जाणे ही ढसाळांची वेदना हे या काळातले वास्तव आहे''[६] असे मत प्रमोद कोपडे यांनी व्यक्त केले आहे. त्यांचे ह`मत यथार्थच आहे. ढसाळ स्वत:चा कवितेतून पंचनामा करताना म्हणतात,

''किती उंचावरून खाली ढकललेस मला तू
स्वत:च्याच नरजेतून इतका उतरलो की,
धड जगताही येत नाही नि मरताही'' (' शिक्षा ','या सत्तेत जीव रमत नाही', पृ. २८)

यात कवी स्वत:ला ओरबडतात. नामदेव ढसाळ यांच्या मनाची होत जाणारी घालमेल व त्यांच्या मनातील बळ येथे प्रत्ययकारी शब्दात व्यक्त झाली आहे. अवतीभवतीच्या, मूल्यऱ्हासाच्या व विचारऱ्हासाच्या कालखंडात स्वत:चे स्वप्न टिकवून ठेवणे कवीला अशक्यप्राय ठरते. म्हणूनच ते 'धड जगताही येत नाही नि मरताही' असे अस्वस्थ व अशांतपणाचे उद्‌गार काढतात. स्वत:कडे पारदर्शकतेने बघून ते सत्य शोधू पाहतात. स्वत:चीच उलटसुलट तपासणी करण्याची कवीची प्रवृत्ती लोकविलक्षण स्वरूपाची ठरते.

''कधी नव्हे ते आत्ता
आयुष्य मला आवडू लागलं आहे
प्रत्येकाच्याच हदयात मी कोरून ठेवली आहे
माझ्यासाठी जागा'' ('सत्ता','या सत्तेत जीव रमतन नाही', पृ. ३४)

ढसाळ यांनी जे जगणे वाटयाला आले, तेच त्यांनी आपल्या काव्यातून मांडलेले आहे. ''हे त्यांचे दर्शन वाचकाला आभाळात अचानक चमकून गडप झालेल्या विजेसारखे न वाटता खोलवर विचार करायला भाग पाडत हे सत्ये''[७] असे त्यांच्या कवितेच्या संबंधात अभ्यासकांनी म्हटले आहे.

नामदेव ढसाळ यांनी मेनबत्तीसारखी माणसे जळतांना पाहिली. ढसाळांना आई, बायको, प्रेयसी अशा त्यांच्या जीवनात असलेल्या व्यक्तीवर त्यांनी कविता लिहिल्या, परंतु त्यांच्या जीवनात आलेल्या ह्या व्यक्ती

पारंपारिक पध्दतीने ते कवितेत मांडत नाहीत. ज्यांनी ज्यांनी आपल्याला उभे केले, जगण्याचा अनुभव दिला, त्यांच्याविषयी ते पोटतिडिकेने बोलतात. राहीबाई, बायको, मावशी यांचे उत्कट भावचित्र ते आपल्या कवितांमधून रेखाटतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दादासाहेब गायकवाड अशा आयुष्याला अर्थ देणाऱ्या व जवळच्या वाटणाऱ्या माणसांबद्दल ते दिलदारपणे लिहित राहतात.

नामदेव ढसाळ यांनी माणसांशी गहिरे नाते जोडले आहे त्या नात्यातून त्यांना काय मिळाले? त्या अनुभवांचे काय झाले? याचाही ते गंभिरपणे विचार करतात. आई—वडील फार पूर्वीच गावातून विस्थापित होवून शहरात आले. परंतु त्यांचे दु:खी जीवन मात्र खूप काही बदलले नाही. बापाने शतकानुशतके महारांच्या वाटयाला आलेले गावगाड्यचे काम केले. प्रत्येक रात्री जनावरांचे सोललेले देह वाहून नेतांनी तो रक्तबंबळ व्हायचा. आईनेही खूप खस्ता खाल्या, शिळया भाकरीचे तुकडे मोडून आयुष्य रेटले. या संबंधीच्यो वेदना साकार करतांना कवी लिहितात,

''पैठणीचे रंग न्याहाळता —न्याहाळता,
जुनेराला धिगड लावतं
दोघांनीही दारिद्र्याचे पाय झाकले लक्ष्मी—पूजनाला दारिद्र्य पुजल''
('आई', 'या सत्तेत जीव रमतन नाही')

असे आयुष्य ढसाळांच्या आईबापाच्या वाट्याला आले ह्या दु:ख दारिद्र्याचे दर्शन ढसाळ प्रत्यकारीपणे करतात. कवितेमधून ते आपल्या जीवनाचा इतिहासच ते मांडतात. ''आत्मचरित्रच मी कवितेतून सांगतो. त्यामुळे मी स्पेशली त्यांच्यासाठी एक स्पेशल जाडजुड ग्रंथ तयार करावा ह्या मताचा अजिबात नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे आत्मचरित्र जेव्हा माणूस सांगतो तेव्हा त्याच्यातल्या सुष्ट आणि दुष्ट गोष्टी त्यानं सांगितल्या पाहिजे.''[८] असे मत आत्मचरित्राविषयी ढसाळ व्यक्त करतात. ढसाळ 'आई' विषयी बोलतांना म्हणतात की, अमानुष आयुष्य वाटयाला आले, तरी आईला हे जग म्हणजे नियत्याचाच खेळ वाटे गाव सोडतांना आईच्या गावगाडयातून बाहेर आली तरी ईश्वरशरण वृत्तीतून बाहेर पडू शकली नाही. मात्र असे असले तरी तिने जीवनाशी झुंज दिली. यासंबंधात नामदेव ढसाळ म्हणतात,

''आई शहरात आली देहांच झाडवान होऊन
कष्ट खस्ता उपसल्या भोगल्या
शिळ्या भाकरीचे तुकडे मोडून
तरीही तिचा अद्रभूताचा शोध चालूच होता
तिच्या देहातली वाद्य ही अशी झंकारतच रहायची ('आई','या सत्तेत जीव रमत नाही'')

या शब्दांमध्ये ते आईच्या जीवनप्रक्रियेचे व तिच्या जीवनातील संघर्षरूपाचे वर्णन करतात. अशा या आईला मुलगी झाल्यावर तिला वाईट वाटले नाही दारिद्रयाशी संघर्ष करीत तीने जगणे सुरूच ठेवले. ढसाळांची ही बहीण पुढे अधिक दिवस जगली नाही, तीचा विषमज्वराने मृत्यू झाला त्या बहिणीविषयी ढसाळ भावपूर्णपणे लिहितात,

महारवाड्याला लागून असलेलं चिंचेच झाड
रायरंदाचा उंट त्याचा पाला ओरबाडत चरू लागतो
चरताचरता तो दरीत कोसळून मोडून पडतो
विषमज्वराने आजारी असते बहीण तेव्हा
शेवटचा श्वास घेत असते. उंटाच्या किंकाळयासांबत
तीही मरून जाते.'' ('बहीण','या सत्तेत जीव रमत नाही'पृ.९६)

अशी आठवण ढसाळ 'बहीण' या कवितेतून व्यक्त करतात.

या कवितेत ते स्वत:चे एकटेपण व स्वत:चे असहायपणे व्यक्त करतात. आपला वैयक्तिक जीवनप्रवास हा कसा अनेक प्रकारच्या आघातांनी तुटुंब भरलेला आहे, याची जाणीव त्यांच्या विविध प्रकारच्या कवितांमधून पहावयास मिळते.

नात्याविना एकटया एकट्याने जीवन जगण्याचे अनेक आघात कसे सोसले याविषयी ढसाळ चिंतन मांडतात. मात्र या आघातातून निर्माण झालेली वेदना कशी भळभळत राहिली याची जाणीव कवी विषेशपणे व्यक्त करतात. नामदेव ढसाळ त्यांच्या कवितांमधून कौटुंबिक नात्यातील व्यक्तीचे चित्रण गहिऱ्या श्शब्दात व्यक्त झाले

आहे. त्यांच्या कवितेमधून प्रियतमेचे चित्र देखील चपखळ श्शब्दांमध्ये साकार होताना दिसते. प्रेयसीच्या संबंधातील भावविष्कार करताना ते लिहितात,

''आज तू माझी कोणी नाही
मीही तुझा कोणी नाही
आता जातीपातीचे अवडंबरही नाही
तरीही परस्परात गुंतलेल्या चक्रांची मालिका
मला अशी सोलून का काढते?
सजातीय स्वप्नाचा नवा संसार
मांडून परकी झालीय तू
तेव्हा ही माझी काही तक्रार नव्हती
खंत एवढीच होती
रूढीला बळी पडून तू मला शिक्षा दिलीस''

('विनंती जाधव','या सत्तेत जीव रमत नाही' पृ.१०२)

या ठिकाणी कवी प्रेयसीच्या संबंधातील आपली कैफियत मांडतांना, रूढीला बळी पडून प्रेयसीने कवीला ठोकरले, त्यातून त्यांना मिळालेले दु:ख व त्याची जाणीव प्रकर्षाने व्यक्त झालेली आहे. जात, धर्म रूढी, परंपरा, संस्कृती यांचा विखारी जाच अजूनही संपलेला नाही. आजही अस्पृश्यपणांचे सनातन लांछन धुतले जात नाही, याची खंत कवी व्यक्त करतात.

अशा असहायपणाच्या व एकाकीपणाच्या वेळी त्यांची बायको ही एकमेव आधार देणारी व समजून घेणारी वाटते, 'माझ्या अंतर्यामीच्या आकाशात उडणारी तू एकमेव चिवचिव चिमणी', त्या श्शब्दात ते आपल्या सहकारिणीच्या वर्णन करताना लिहितात,

''मी शोधत राहतो स्वत:ला ही तुझ्या सोबत
मी ही पवित्र होऊन फाडतो धर्मग्रंथाचे एकएक पान
आणि असे चिमटीत धरून वाऱ्यावर सोडून देतो.
किती ग सहजगत्या या पशूला तू माणसात आणलेस;''

याप्रकारे कवी आपल्या मनातील प्रेमभावाचे वर्णन करतात. नामदेव ढसाळ यांच्या कवितेमधून साकारलेले वैयक्तिक व कौटुंबिक आशयरूप असे भावसंपन्न स्वरूपाचे आहे. या वैयक्तिक स्वरूपाच्या भावविश्वामधून त्यांचे वेगळ्या पातळीवरील आत्मचरित्रच साकार होतांना दिसते. अर्थात हे काव्यरूपाच्या पातळीपरील आत्मचरित्र परिपूर्ण स्वरूपाचे नाही असे असले तरी त्यामधून नामदेव ढसाळ यांचे व्यक्तिनिष्ठ ठ व कौटुंबिक जीवन यथार्थपणे शब्दबद्ध होत जाते.

## संदर्भ ग्रंथसूची

१. नामदेव ढसाळ : अर्पणपत्रिका, गोलपिठा, प्रभात प्रकाशन मुंबई १९९९ पृष्ठ क्रमांक नाही.

२. नामदवे ढसाळ : प्रस्तावना, मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले, लोकवाड.मय गृह, मुंबई २००७, पृष्ठ क्रमांक नाही

३. तत्रैव, पृष्ठ क्रमांक नाही.

४. हरीश खंडेवार : प्रवर्तक काव्यमिमासा, व्रिदोह आणि प्रवर्तक कविता वाङमयीन मूल्यमापण पृ. ३३

५. प्र.श्री. नेरूरकर : फुले आंबेडकर : दलित साहित्य, सुगावा प्रकाशन पुणे, १९९६ पृ. २०३

६. प्रमोद कोपर्डे : अस्तित्वशोधाचा जीवघेणा प्रवास, अनुष्टुभ, नामदेव ढसाळ विशेषांक संपादक म.सु. पाटील, जुलै – आगस्ट १९९७ पृ. ९७

७. तत्रैव पृ. ९७

८. नामदेव ढसाळ : सतिश काळसेकर, प्रज्ञा लोखंडे, नामदेव ढसाळ यांच्याशी मुक्त संवाद अनुष्टुभ, उनि. पृ. ६७

❖❖❖

# पर्यावरण समतोल—जीवन अनमोल (जलसंवर्धन)

प्रा. डॉ. रामलाल चौधरी
मराठी विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय,
पेट्रोल पंप, जवाहर नगर, भंडारा, महाराष्ट्र (India)
इ मेल drramrupchaaudhari@gmail.com भ्रमणध्वनी ७०३८०४७९८६

## पर्यावरण वाचवा — जीवन वाचवा

पर्यावरण पर्यावरण हर कोई कहता।
पर पर्यावरण है क्या चीज।
बिना समझ पर्यावरण की लगाई चिख।
अरे मणूज पर्यावरण की भाषा सीख।
नही तो तुझे मांगणी पडेगी जीवन की भीख।

## पार्श्वभूमी :

पर्यावरण आणि जीवसृष्टी यांचा फार निकटचा संबंध आहे. जीवसृष्टीला आपले जीवनयापन सुदृढ व सुसमृध्द ठेवायचे असेल तर पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत निकडीचे ठरते. त्याशिवाय शक्यच होऊ शकणार नाही. पर्यावरण हा शब्द अनेकांच्या काना तोडावर लोळतांना दिसतो असे म्हणायला काही हरकत नाही असे मला वाटते. परतू मी सुरूवातीला नमूद केल्यानुसार पर्यावरणाचा खरा अर्थ अजून तरी बहुतांशांना योग्यपणे कळलेला नाही असे मला वाटते आहे आणि त्याचे कारणही तसेच आहे. पर्यावरणाचा नेमका आणि खरा अर्थ जर आज घडीला बहुतांशाला कळला असता तर ती मोहीम ठरली असती. वरील वाख्याला अधिक स्पष्ट करण्याच्या हेतुने मी या ठिकाणी एक उदाहरण देण्याचे धाडस करतो आहे. 'स्वच्छता' हा विषय आपल्या साठी नवीन नाही. या अगोदर सुध्दा याबदल अनेकांनी उद्‌गार काढलेले आहेत. परंतू त्यावर पाहिजे तसा जनतेकडून प्रतिसाद मिळालेला नव्हता, परंतू सध्या ती एक मोहीम ठरलेली आहे. त्याचे कारण स्वच्छते विषयी लोकांमध्ये जागृती झालेली आहे. ही जागृती येणे महत्वाचे असते. एखादया कार्याला जर का सार्वजनिक पातळीवर राबवायचे असेल तर त्याबदलची जागृती अगोदर आणावी लागते. ही जागृती येत असते, जेव्हा त्या बाबी बद्‌दलची योग्य जाणीव करून दिली जाते तेव्हा याचाच अर्थ असा की जेव्हा एखादया बाबतीत नवीन काही तरी घडवून आणायचे असेल तर सर्वप्रथम त्याबदलची जाणीव योग्यपणे सर्वाना करून देणे होय. ''पर्यावरणचे जतन व संरक्षण करण्याविषयी कुठेही दुमत नाही. पण ते करावे कसे याबद्‌ल विधायक मार्गदर्शन आवश्यक आहे, ते या अभ्यासात मिळेल इतकेच नव्हे तर पर्यावरण संधारण आणि विकास या परस्परविरोधी गोष्टींमध्ये समतोल कसा साधला पाहीजे यावर विचार करण्यास हा अभ्यास प्रवृत्त करेल. पर्यावरणाचा अभ्यास अत्यंत वस्तुनिष्ठ आहे.''[१]पर्यावरणाचे जतन आणि संरक्षण करण्याबद्‌ल एक मत आहे ही बाब निर्विवाद आहे. परंतु पर्यावरणाचे जतन आणि संरक्षण कसे करावे या विषयीची जागृती किती! व आहे तर कशाप्रकारे या गोष्टी समजल्याशिवाय खऱ्या अर्थाने आपण पर्यावरणाला संरक्षण देऊ शकत नाही.

## पर्यावरण म्हणजे काय?

पर्यावरण म्हणजे काय हे समजून घेण्याकरीता या ठिकाणी काही विचारवंतांचे मत बघणे गरजेचे आहे. ते खालीलप्रमाणे

१. पर्यावरण म्हणजे सजीवांचा किंवा जीवसमूहांच्या जीवन, वाढ, विकास व मृत्युदर इत्यादीवर परिणाम करणारी सर्व परिस्थिती तिची कारके व त्यांचा प्रभाव होय. विश्वकोश

२. प्राण्याच्या सभोवतालच्या निसर्गातील सर्व प्रकारच्या ज्या प्राकृतीक व जैविक बाहयशक्ती सजीवावर परिणाम करतात ते पर्यावरण होय. ब्रिटानीक विश्वकोश

३. पर्यावरणशास्त्र म्हणजे विविध परिसंस्था प्रणालीचे परस्पर संबंधातील संतुलनमुलक कर्तृत्वाचे शास्त्रीय अध्ययन होय. बर्नार्डनेबेल.

४. पर्यावरणशास्त्र म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास होय. जॉन्सन टर्क.

५. पर्यावरण म्हणजे सजीवाने अनुभवलेली एकूण प्राकृतिक, रासानिक व जैविक परिस्थिती होय. जॅकी स्मिथ

पर्यावरण म्हणजे जन्मापासून तर मृत्युपर्यंत परिणाम करणारे घटक तत्व होय. अशा घटकाला म्हणूनच योग्यपणे समजून घेणे गरजेचे आहे.

पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी पर्यावरणाच्या सर्वच घटकांचा समतोल राखवा लागतो. पर्यावरणाच्या एकूण घटाकांपैकी एखादया घटकावंर जरी विपरीत परिणाम झाला तर त्याचा परिणाम जाणवू शकतो व त्याचा दुष्प्रभाव जीवसृष्टीवर पडू शकतो आाणि पडतो आहे. पर्यावरणाच्या असमतोलतेमुळेच जीवसृष्टीतील काही जीव नष्ट झाले आहेत तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जर का मानव वेळीच सावध होऊन पर्यावरणाचे संवर्धन करणार नाही तर त्याला उद्‌भवणाऱ्या दुष्परिणामाला सामोरे जावेच लागेल यात दुमत नाही.

## संवर्धन म्हणजे काय?

'संवर्धन' या शब्दाचा अर्थ सरळ व सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास 'जतन' वा 'रक्षण' असेच सांगता येईल. 'संवर्धन म्हणजे जतन' मग जतन वा रक्षण करणे म्हणजे त्या घटकांचा उपयोग करणे नव्हे का? असाही एक प्रश्न सर्व सामान्य मनाला पडू शकतो आणि ते पडणे स्वाभाविक आहे तर याचे उत्तर नाही असेच दयावे लागेल. कारण सृष्टीतील सर्वच घटकांचा वापर व्हावा असेच सृष्टीला व मानवाला आणि मानवेत्तर प्राण्यांना देखील अभिप्रेत आहे. सर्वानी उपभोग घ्यावा परंतु सीमापार होता कामा नये याची सर्वांनी जाणीव ठेवायला हवी. परंतु तसे होतांना दिसून येत नाही. ''संवर्धनाचा अर्थ साधन संपत्तीच्या वापरावर पूर्ण निमंत्रण असा अभिप्रेत नाही. संपदा संवर्धन म्हणजे एखाद्या साधन संपत्तीचा उचित व काळजीपूर्वक वापर करून त्या संपदेचा अनावश्यक विनाश टाळणे होय. तसेच संपदा जास्तीत जास्त प्रकारे पुन: उपयोगात कशा आणता येतील यासंबंधी कृतिशील प्रयत्न करणे. उदाहरणार्थ, जंगल तोड केली तरी त्या प्रमाणात वृक्ष लागवड देखील होणे म्हणजे वनसंवर्धन होय''.[२]

''संवर्धनाचे आणखी एक महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे साधन संपत्तीची गुणवत्ता टिकवून ठेवणे. कोणत्याही प्रकारे संपदा दुषित होणार नाही याबद्दल खबरदारी घेणे म्हणजे साधन संपदेचे संवर्धन होय. हे साधण्यासाठी संपदाचे शास्त्रीय नियोजन करून त्या साधणसंपदाचे प्रस्तुत साठे व उपभोग लक्षात घेणे''.[३]

संवर्धन म्हणजे उपलब्ध साधन संपत्तीचा उचित व काळजीपूर्वक वापर करणे होय. तसेच अनावश्यक विनाश टाळणे होय. एखादया घटकाचा वापर करून जर तो पुन्हा उपयोगात आणल्या जाऊ शकत असेल तर त्याचा पुनर्‌उपयोग कशाप्रकारे करता येईल यासंबधीचा विचार अंमलात आणणे व तशी प्रत्यक्षात कृती करणे म्हणजे संवर्धन होय. 'संपदा संवर्धन योग्य व उचित स्वरूपात समजून घेण्यासाठी काही अभ्यासक विचारवंतांचे त्याविषयीचे मत लक्षात घेणे गरजेचे आहे, ते पुढील प्रमाणे :

१. '' भविष्यात उपयोगी पडावीत, त्यांचा वापर करता यावा यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीची बचत करणे म्हणजे संधारण होय'' जे पासमोअर

२. '' संवर्धन म्हणजे संपदांचे केवळ जतन नव्हे तर पर्यावरणातील इतर घटकांप्रमाणेच संपदाचा डोळसपणे केला जाणारा व्यवस्थित वापर होय'' ओडम

३ '' संधारण म्हणजे लोकसंख्या व साधनसंपत्ती यांचे पर्यावरणातील संतूलन राखण्यासाठी अनुकूल प्रयत्न करणे होय'' पीअरी उनसीरीया.

पर्यावरण शास्त्राचे गाढे अभ्यासक पीअरी उनसीरीया संवर्धनाच्या बाबतीत अतिशय संयुक्तीक व मार्मिक अशा शब्दात संवर्धनाचा अर्थ सांगतात. ते फारच सटीक वाटते, ते म्हणतात लोकसंख्या व साधनसंपत्ती यांचे पर्यावरणातील संतुलन हेच महत्वाचे आहे. आजही वाढती लोकसंख्या, ढासळते पर्यावरण हेच खरे चिंतेचे विषय ठरले आहेत. जागतिक पातळीवर वाढणारी लोकसंख्या, त्यासाठी जन्मास येणारी नवनवीन साधनसामुग्री,

साधनसामुग्रीचा वाटेल तसा वापर, निष्काळजीपणा, बेजाबदारपणा, नैसर्गिक घटकांबदद्लची बेफिकिरीपणा, मानव स्वभावातील स्वार्थी व आपमतलबीपणा या सगळया गोष्टी पर्यावरणाचा संतुलन राखण्यात कारणीभूत ठरत असतात. मानवाने आपल्या बुध्दिकौशल्याच्या बळावर निसर्गालाच आवाहन दिले आहे, असे म्हणायला काही हरकत नाही. त्याचाच परिणाम आज पर्यावरणाचे संतुलन, समतोल राहीलेले नाही.

## जलसंवर्धन:

या आपल्या विशालकाय सृष्टीत अनेक घटकाचा समूह आहे. प्रत्येक एक—एक घटक हा विस्तृत आहे. त्या त्या घटकाची व्याप्ती फार गहन व दीर्घ असीच आहे. या ठिकाणी फक्त 'जल' या घटकतत्वाचा संवर्धनाच्या दृष्टीने तो कशाप्रकारे घेता येईल त्या बाबींचा थोडक्यात आढावा वा शोध घेण्याचाच हा एक अल्पसा प्रयत्न आहे.

जल वा पाणी हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. पाण्याशिवाय जीवनाची कल्पनाच करता येत नाही. पृथ्वीवर पाणी असल्यामुळेच जीव सृष्टी आहे. निसर्गाने या करिताच पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण अधिक प्रमाणात उपलब्ध केलेला आहे. एकाहत्तर टक्के पाणी आणि उर्वरीत भाग म्हणजे मृदा होय. भृपृष्ठावर मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या पाण्याचे संरक्षण, संवर्धन व विकास करणे सोबतच त्याची उपयुक्तता वाढविणे यासर्व गोष्टी साठी नियोजन असायला पाहीजे. त्याशिवाय पाण्याचे संवर्धन करता येणार नाही. पाण्याचा वापर हा जवळ जवळ सर्वच क्षेत्रात, कामासाठी करावा लागतो. उदाहरणादाखल आपण नेहमीचाच एक छोटासा उदाहरण घेऊ या. जसे की पाऊस आल्यास जमीन ओली होऊन त्यावर आपण चाललो तर पायाला माती लागून पाय मळतील, परंतू या मळलेल्या पायाची पाणी मिश्रीत माती काढायला पाण्याचीच गरज भासते म्हणजे ते पाण्यानेच धुऊन काढावे लागते. या प्रकारच्या उदाहरणावरून आपल्याला हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, पाणी हा किती महत्वाचा घटक आहे, आणि त्याचा वापर कशाप्रकारे करायला पाहीजेत.

'पाणी' हे जीवन आहे. तसेच एक अनमोल असी साधन संपत्ती आहे. या साधन संपत्तीचा वापर प्रामुख्याने पिण्यासाठी, कृषी क्षेत्रासाठी, औद्योगीकरण, घरगुती वापर, इतर प्रकारची शेती, वीजनिर्मीती, जलवाहतूक रस्ते निर्मिती, या शिवाय आणखी अनेक क्षेत्रात पाण्याचा वापर होत असतो. यावरून असे म्हणावे लागेल की पाण्याशिवाय काही नाही. म्हणूनच म्हटल्या जाते, 'जल है तो कल है'. आपल्याला हा कल सुरक्षित ठेवायचा असेल तर 'जल' सुरक्षीत वापरावा लागेल. आपल्या भारत देशात पाऊस पडण्याचे प्रमाण फार आहे. वर्षाकाठी बऱ्याच प्रमाणात पाऊस पडतो. परंतु उन्हाळा आला की पाणी पाणी असा हाहाकार माजतो, असे का? याचे उत्तर शोधणे गरजेचे आहे. त्याशिवाय पाणी भविष्यातसाठी टिकणार नाही. आपल्या देशात पावसाचे प्रमाण अधिक असले तरी नियोजनाच्या अभावाने पाणी टंचाई भासते. ही भासणारी पाणी टंचाई नष्ट करण्यासाठीच पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

## जलसंवर्धनाचे उपाय :

'जलसंवर्धन काळाची गरज' हे करणे अगत्याचे आहे. आजच्या काळात जलसंवर्धनाशिवाय तरणोपाय नाही. 'जल संवर्धन नाही तर भविष्यात जीवन नाही' करिता अगदी वेळीच सावध होणे आवश्यक आहे. आपल्याला आठवत असेल महाराष्ट्रातील एका भागात रेल्वेने पाणी पुरवठा करण्याची पाळी आली होती. यावरून भविष्याचा वेध घेऊन पाण्याचा सुयोग्यपणे नियोजन होणे गरजेचे आहे. तेपुढील प्रमाणे सांगता येतील.

## जलशिक्षण :

- सर्वप्रथम पाण्याचे महत्व सर्वांना पटवून सांगणे.
- पाण्याची उपयोगीता कशाप्रकारे करावी याची माहीती सर्वांना देणे.
- शालेय जीवनापासून पाण्याचे नियोजन कसे करावे या बद्दलचे शिक्षण म्हणजेच 'जलशिक्षण' अभ्यासक्रमात समाविष्ट करावे.
- जलसंवर्धन मोहीम राबवावी जेणे करून पाणी वापराचे तंत्र सर्वांना माहीत होईल.

- 'पाणी' ही राष्ट्रीय संपत्ती आहे. त्याचा दुरूपयोग टाळावा. याकरीता कायदा अंमलात आणावा. त्याची सखोल माहीती सर्व सामान्यांपर्यंत पोहचवावी, जेणे करून पाण्याचा अपव्यय टळेल.
- जलप्रदुषण थांबवावे. आपल्या देशात अनेकदा कायदयाची पायमल्ली होत असते. पाण्याच्या संदर्भात तसेच घडून येते. पाण्याचा अपव्यय किंवा दुषीत करण्याचे प्रमाण घरगुती किंवा शेती या शिवाय अधिक प्रमाणात होतो, तो औद्योगिकीकरणामुळे, कारण या ठिकाणी एकाच वेळी लाखो लिटर पाण्याचा वापर होत असतो. पाण्याचा वापर तर होतोच उलट वापरण्यात आलेले दुषित पाणी सरसकट सागर, नदी, नाले, तलावात सोडले जाते, आणि त्यामुळे तिथे असलेले शुध्द स्वच्छ पाणी दुषित, विषारी होते. करीता सरकारने या बाबतीत कायदयाअंतर्गत निष्पक्ष अंमलबजावणी करायला पाहिजेत. वापरात आणलेला पाणी पुन्हा वापरात यावा या करीता पुनर्वापर उपाय योजना अमलात आणावी. तसे अद्यावत तंत्रज्ञान शोधून काढावे.
- 'पाण्याचा योग्य वापर : पाण्याचा योग्य वापराबद्दल जनजागृतीची गरज आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरीभागात पाण्याचा वापर अधिक प्रमाणात होतो. वापरात आणलेले पाणी नालीवाटे बाहेर फेकल्या जाते. उलट ग्रामीण भागात ते जमिनीत मुरते.
- सांडपाण्याचा योग्य नियोजन करणे. नागरी भागातील सांडपाणी नाल्याद्वारे नदीपात्रात किंवा सागरात टाकण्यात येतो. नागरी सांडपाणी आज मोठी समस्या ठरलेली आहे. त्यावर शक्य तितक्या लवकर व प्रभावी, योग्य ती उपाय योजना व्हायला पाहीजेत. याकरीता जलसुध्दीकरण आवश्यक आहे. हा पाणी वृक्ष लागवड, रस्ते बांधणी, घर बांधणी आणि शेती उपयोगासाठी वापरता येईल.

यांप्रमाणे जलसंवर्धन करीता उपाय योजना राबविल्यास भविष्यात पाणी समस्या उद्‌भवणार नाही. आपल्या भारत देशाने नवनवीन तंत्रज्ञान अनेक क्षेत्रात स्वीकारलेले आहे. तसेच नवीन तंत्रज्ञान पाणी संवर्धनाकरीता स्वीकारावे. तशी मोहीमच राबवावी. त्याकरीता गरज भासल्यास इस्त्राईल, जापान यासारख्या देशांनी जलसंवर्धनाचे चांगले प्रभावी तंत्र अंगिकारलेले आहेत. आपणही त्याप्रमाणे आपली पुढची वाटचाल सुरू ठेवली तर नक्कीच भविष्य बिकट जाणार नाही.

चला तर मग........

## संदर्भ :

१. डॉ सुरेखा पंडीत बापट, पर्यावरणशास्त्र, श्री साईनाम प्रकाशन, नागपूर. प्रथमावृत्ती जानेवारी २००१ पृ१

२. घारपुरे डॉ. विठ्ठल, पर्यावरण भूगोल शास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, तिसरी आवृत्ती जून २०१३, पृ. १७४

३. तत्रैव

४. त्रैमासिक, महाराष्ट्र सिंचन, विकास सिंचन, संशोधन व विकासासंबंधी माहीती देणारे त्रैमासिक, वर्ष ३१ वे, अंक २ रा, जानेवारी फेब्रुवारी मार्च २०१७.

❖❖❖

# 'धग' : कौतिकच्या संघर्षाची जीवनगाथा

डॉ. अविनाश श. धोबे
सहयोगी प्राध्यापक,
डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय, शेंदुरजनाघाट
ता. वरुड, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
इ मेल avinashdhobe@gmail.com भ्रमणध्वनी ९४२०१९००४०

## सारांश

वैदर्भीय लोकजीवनाचे वास्तव चित्रण वऱ्हाडी बोलीतून करणारे उध्दव शेळके हे मराठीतील सुप्रसिद्ध कादंबरीकार आहेत. उद्धव शेळके यांची 'नांदत घर' ही पहिली कादंबरी १९५९ मध्ये प्रकाशित झाली. शेळकेंची दुसरी कादंबरी 'धग' ही १९६० मध्ये प्रकाशित झाली आणि या एकाच कादंबरीचे त्यांना समर्थ कादंबरीकार म्हणून स्थान प्राप्त झाले. ''धग ही कठोर वास्तवाचे कलात्मक रुप आविष्कृत करणारी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी आहे.'' असे मराठीतील सुप्रसिध्द समीक्षक म.सु. पाटील म्हणतात. कौतिक या शिंपी कुटुंबातल्या एका सामान्य स्त्रीने जगण्यासाठी केलेल्या संघर्षाची ही प्रातिनिधीक कथा आहे. 'धग' या कादंबरीत शेळके यांनी शिंप्याच्या जीवनाचा वेध घेतला असून खेडयातील पारंपरिक अशा शिंप्याचा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाची ही हृदयस्पर्शी कथा आहे, व्यक्ती आणि परिस्थिती यांच्यातील संघर्षाचे हृदयस्पर्शी चित्रण लेखकाने या कादंबरीतून केले आहे. वऱ्हाडी भाषेचे, वैदर्भीय लोकजीवनाचे व वऱ्हाडी लोकांच्या आचार विचारांचे दर्शन या कादंबरीतून घडते.

बीजशब्द – जीवन संघर्ष, ग्रामीण, कौतिक, धग, साहित्य, वऱ्हाड, संस्कृती, कष्ट.

## प्रस्तावना

'धग' या कादंबरीने मराठी कादंबरीला महत्वपूर्ण योगदान दिले आहे. मराठी कादंबरीच्या इतिहासातील 'मैलाचा दगड' अशा गौरवपूर्ण शब्दात समीक्षकांनी या कादंबरीची नोंद घेतलेली आहे. कौतिकचा जीवनसंघर्ष हा या कादंबरीच्या मुख्य केंद्रस्थानी आहे. आळशी व कर्तृत्वशुन्य असलेला तिचा नवरा महादेव याच्या दैववादी व 'मन लागन तई' काम करण्याच्या प्रवृत्तीने तिच्या जीवनाची परवड होते. एका सामान्य ग्रामीण स्त्रीने आपले कुटुंब उभे करण्यासाठी केलेल्या डोंगरभर संघर्षाची ही करुण कहाणी आहे. धग या कादंबरीतील कौतिकची व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे मांडता येईल.

❑ कष्टाळू – कौतिक ही कष्टाळू स्त्री आहे. कष्ट करुन ती आपल्या जीवनाला उभारी देण्याचा प्रयत्न करते. कादंबरीच्या सुरवातीपासून तर शेवटपर्यंत ती कष्ट उपसतांना कादंबरीच्या पानोपानी दिसून येते. कौतिक ही धग या कादंबरीची नायिका आहे. तिचा जीवनसंघर्ष हाच खरा कादंबरीचा विषय आहे. जीवनाविषयीची तिची आसक्ती अत्यंत मोठी आहे. त्याचाच परिणाम म्हणून की काय आयुष्याचा प्रारंभापासून तिच्या एकटीच्या मानेवरचं संसार गाडयाचं ओझं आहे. कर्तव्यशुन्य असलेला तिचा नवरा महादेव हा फक्त कुंकवाचा धनी आहे.

कौतिक ही श्रमाचं महत्व जाणणारी एक ग्रामीण कष्टकरी स्त्री आहे. हिंगणघाट सोडून तळेगावला सासऱ्याच्या घरी गेल्यावर सुध्दा महादेव कामाला हात लावत नव्हता. काही दिवस निघून गेल्यावर ती महादेवला म्हणाली की ''का ओ काई कामधंद्याच्या फिकरीत आहा का बस?'' तेव्हा महादेव उत्तर देतो की, बुढा आल्यावर त्याले मशिनच विचारुन पाहतो. पाटलाच्या वावरात होका घेण्याच काम तिच करते आणि उदासपणे महादेव कौतिकला घेऊन कामाला जातो. कौतिक आपल्या मुलांनाही कामाला लावते. कौतिक कुटुंबासाठी तळीमळीने वागते. दिवाळीपर्यंत तिने शुन्यातून समृद्धी मिळविलेली असते. तिने घरी दाणागोटा जमा केला. कष्ट करण्यामध्ये कोणतीही लाज नाही अशी तिची विचार सरणी आहे. किसना ज्यावेळी ढोरांच्या मागे यशवंता ऐवजी भीमाला पाठविण्यासंबंधी महादेवला विचारतो. त्यावेळी आपली जात श्रेष्ठ असल्याने गरीब आहे, म्हणून कोणतेही

काम करणार नाही असे सांगून किसनाला परत करण्याचा महादेव प्रयत्न करतो पण कौतिक नवऱ्याची बाजू सांभाळून भीमाला तीन आणे दिल्यास पाठवायला तयार होते. यावरुन तिचा व्यावहारिकपणाा दिसून येतो. तिच्या मते कोणत्याही कामाची शरम बाळगायचे कामच काय, ''लाज वाटायचीच झाली तर चोरी आणि छिणालीची लाज बाळगावी. पोटासाठी शरम बाळगायचे कारणच काय?'' अशी तिची विचारसरणी आहे. कौतिक राबराब कष्ट करुन आपला संसार व्यवस्थित चालवण्याचा प्रयत्न करते.

❐ जिद्दीने काम करणारी – नागदिवाळीच्या हंगामात तर तिनं काम करण्याची पराकाष्टा केली. नागदिवाळीच्या हंगामात कौतिकचं कुटुंब दोन – दोन दिवस शेतात सतत काम करत होत. नामा झोपला तेव्हा तिने स्वत: भीमा व महादेवला उडवण्याच्या पाटया दिल्या. तिने कधीच आळस दाखविला नाही, जिद्दीने काम करण्याची तिची वृत्ती या ठिकाणी दिसून येते. एवढी रात्र काम करुन सुद्धा ती सीताम्हालीनचं बाळंतपण करते यावरुन महादेव जेव्हा तिला बोलतो तेव्हा ती म्हणते, ''आज तिच्यावर वेळ आहे. उद्या आपल्यावर येईल'' ही जाणीव तिला असते. तिची जिद्द आणि उत्साह लक्षात घेण्यासारखा आहे. उन्हाळयात ती महादेवला रिकामी बसू देत नाही. त्याप्रमाणे ती स्वत: कधीच रिकामी राहत नाही. ती दिवस भरत आले तरी इंधन गोळा करीत हिंडते.

❐ श्रद्धाळू – कौतिककडे शादुलबुवाचे ठाणं असते, तिची शादुल बुवावर अतिशय श्रद्धा आहे. यशोदीच्या जन्मानंतर कौतिकला काही दिवस कामावर जाणे जमत नाही तेव्हा कामावर जाता यावं म्हणून ती यशोदीला अफू देते, अफूच्या प्रभावाने तिला गुंगी येते, ती उतरत नाही तेव्हा कौतिक घाबरुन जाते तेव्हा ती पाच बस्तरवार शादुलबुवाच्या नावाने करण्याचे कबुल करते. नामा चौथीच्या परीक्षेच्या निकालापुर्वी जेव्हा कौतिकला नमस्कार करण्यास जातो तेव्हा ती ''माये नाही सुजले पाय'' म्हणून त्याला प्रथम महादेवच्या व नंतर शादुलबुवाच्या पाया पडायला लावते. तो त्यांना नमस्कार करुन परततो. तेव्हाही ती म्हणते नमस्कार करुन मायावर फालतुचा भार कशाला टाकते कारण जो – तो आपला तकदीरान खातो. मोहरमच्या दिवशी ती नामाला फकीर बनवून पाच घरी भिक्षा मागायला लावते या सर्व प्रसंगातून तिचा श्रद्धाळूपणा आपल्याला दिसून येतो.

❐ प्रेमळ पण निश्चयी – कौतिक तशी स्वभावाने फार प्रेमळ होती, तिचा मोठा मुलगा भीमा हा फार बिघडलेला असतो. तो चोरी करुन अनेकदा घर सोडून जातो. भिमाच्या वाईट वर्तनाची जाणीव असुनही कौतिकला मोहरमच्या सणाच्या दिवशी तो असता तर बरं झालं असतं असे तिला वाटते. पुढे शेंदुरजनाच्या बाजारात भीमान केलेल्या पराक्रम ऐकून तिने आपला वैताग व्यक्त केला. ''नाही तरी असे ऊसाच्या पोटी काऊस जन्मुन काय फायदा, त्यापरीस देवान लेकरं नाही दिले ते पुरते. पण असे सुडदायक देऊ नये'' असे ती म्हणाली, मात्र रात्र होताच भीमाविषयी तिच्या अंत:करणातल्या प्रेमानं उचल खाल्ली. तिने भीमाची समजुत घातली. पुढे काही दिवस मायबापाच्या जीवनाशी समरस झाला असे वाटणारा भीमा सर्कसचा तंबु पाहून सर्कस बरोबर निघून गेला पण त्याच्या बद्दलची चौकशी कौतिक अधुन मधून करत होतीच. कासमकडे राहायला आल्यानंतर भीमा पुन्हा आला पण तो जास्त बिघडला होता. आपलं पोर जवळ आलं या भावनेने तिला बरं वाटलं. त्याची महादेवकडे शिफारस करुन शेषरावच्या मशीनवर कापडे शिवण्याची सोय तिने करुन दिली. पोळा सणाच्या दिवशी महादेव नको म्हणत असतांना तिने त्याला जुवा खेळायला पैसे दिले. रघुनाथ शिंपी मेल्यावर महादेव बेजबाबदारपणे वागतो. ''मरु दे मेलातं माहया दैवाचं कातोड घेऊन जाईन. असे तो म्हणतो. तेव्हा कौतिक आपली जबाबदारी ओळखून रघुनाथ शिंप्याच्या अंत्यक्रिया व तेरवीची व्यवस्था करते. अशाप्रकारे धग कादंबरीतून तिची जबाबदारी जाणीव आपल्याला दिसून येते. शेवटी बानोची छेड काढेपर्यंत भीमाची मजल गेली. तेव्हा मात्र कौतिकचा संताप अनावर झाला. ज्या घरचं खावं त्या घरचे बासे मोजणारी ती स्त्री नव्हती. तीन भीमाचं तोंड पुन्हा न पाहण्याच ठरवल पण कोणीही त्याच नाव तिच्यासमोर काढले तर ती म्हणे मरो मुडदा, आजपासून मायाजवळ त्याच नाव काढलं तर खबरदार? अशी ती बजावत असे. अशाप्रकारे भीमावर ती प्रेम करत होती. त्याचप्रमाणे त्याच्यावर कठोर होत असे. अशा प्रकारे ती प्रेमळ स्त्री पण निश्चयी आहे

❐ संघर्षशील – 'धग' ही कादंबरी म्हणजे कौतिकचा जीवन संघर्ष आहे. कादंबरीच्या सुरवातीपासून तर शेवटपर्यंत कौतिकचा जीवन जगण्याचा संघर्ष सतत सुरु दिसतो. या जीवन संघर्षामध्ये कधी – कधी ती एकाकी पडते. या जीवन संघर्षाचा भार शेवटी तिला असहय होतो आणि ती वेडी होते. जीवनातील संघर्षांना यशस्वीपणे तोंड देणारी कौतिक महादेवच्या निघून जाण्यामुळे अस्वस्थ होते. अविरत संघर्षशील असणारी कौतिक या प्रसंगामुळे परिस्थितीला शरण जाते. पूर्वी सारखे काबाडकष्ट आता तिच्याने होत नाही. संसाराला

पेलता पेलता जीवनसंघर्षात अनेक चटके तिला सहन करावे लागतात. कर्तव्यशुन्य नवरा आणि उनाड भीमा यामुळे कौतिकचे मन आणि शरीर अक्षरशः तुडविल्या जात होते.

❒ धाडसी – धग कादंबरीमधून कौतिकची धाडसीवृत्ती आपल्याला अनेक प्रसंगातून प्रत्ययास येते. रघुनाथ शिंपी तिचा सासरा मृत्यु पावताच ती स्वतः तिथे जाते. त्याच्या अंत्यक्रियेची व्यवस्था तिचं करते आणि आगटं धरायला महादेवही येत नाही आणि भीतीमुळे नामाही पळून जातो तेव्हा ती पुढे होऊन आगटं धरते. या प्रसंगातून तिची धाडसी वृत्ती आपणास पुरेपुर प्रत्ययास येते. बाखडयाच्या जवायाने घर बळकावल्यामुळे ती त्याला जाब विचारते, त्याच्या घरी जाऊन न्यायनिवाडा करते.

❒ समायोजनशील – कौतिकचा नवरा महादेव हा कर्तव्य शुन्य व जबाबदारी शुन्य आहे. संपन्न कुटुंबात जन्मास आलेली कौतिक नवऱ्याच्या घरी अठरा विश्व दारीद्रयामध्येही सुखचा संसार करते. कौतिकच सर्व जीवन कष्टमय, वेदनामय आहे. नवऱ्याच्या आळशीपणामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी तिच्यावर येते तरी याबद्दल ती कधीच तक्रार करत नाही. जशी परिस्थिती आहे, ती परिस्थिती निमुटपणे स्वीकारते. कर्तव्यशुन्य महादेवला समजुतीच्या गोष्टी सांगुन सावरण्याचा प्रयत्न करते. उनाड व दिशाहीन भीमाला समजुतीच्या चार गोष्टी सांगते. नामाची शिक्षणाविषयीची आंतरिक ओढ तिला अस्वस्थ करते. नामा शिकुन मोठा सायब होईल आणि आपले पांग फेडेल अशी तिची आशा असते. म्हणून ती प्रतिकुल परिस्थितीमध्येही नामाला शिक्षण देते. महादेवला रेडीमेड कपडयाचे दुकान लावून देते. भीमाच्याही जीवनाला एक दिशा मिळावी म्हणून कपडे शिवण्यासाठी त्याला शेषराव शिंप्याकडे पाठवते. प्राप्त परिस्थितीशी तोंड देवून ती जीवनक्रमन करते.

❒ परोपकारी – कौतिक ही वेळप्रसंगी दुसऱ्याच्या मदतीला धावून येणारी सहकार्याची भावना जपणारी परोपकारी स्त्री आहे. सुगीच्या हंगामात कौतिकचं कुटुंब दोन दोन दिवस शेतात राबून घरी परततं. तेव्हा सुखदेव कौतिकला बोलवायला येतो. तेव्हा महादेवचा नकार असतांना सुद्धा ती सीता म्हालीनच्या घरी जाऊन तिचे बाळंतपण करते. यामागे 'आज तिच्यावर वेळ आहे, उदया आपल्यावर येईल' ही जाणीव तिला असते. आपल्या जीवाची पर्वा न करता ती इतरांना मदत करते. यावरुनच कौतिक ही परोपकारी स्वभावाची आहे हे दिसून येते.

❒ आशावादी – कौतिकचा जीवनविषयीचा दृष्टीकोन सकारात्मक स्वरुपाचा आहे. जीवनाविषयी तिला फार मोठी आसक्ती आहे. आशावादी असणारी कौतिक जीवनासक्त, श्रमाला महत्व देणारी धाडसी, संघर्षशील, परोपकारी, हिंमत न हारणारी, जीवनाच्या संघर्षात एकटीने संसाराचा गाडा ओढणारी प्रेमळ पण निश्चयी स्त्री आहे. नवऱ्यावर प्रेम करणारी कौतिक तो घरातून गेल्यामुळे अक्षरशः वेडी होते. नवऱ्याच्या शोधात गावभर फिरते. महादेवच्या निघून जाण्याचा जबरदस्त मानसिक धक्का कौतिकला बसतो आणि ती ठार वेडी होते. जीवनाच्या प्रवासात समर्थपणे डोंगरभर कष्ट उपसणारी संघर्षशील कौतिक नवऱ्याच्या प्रेमापोटी परिस्थितीसमोर हतबल होते. शिक्षणाची आंतरिक तळमळ असलेल्या लहानग्या नामावर आपल्या वेडया आईला व लहान बहिण यशोदाला सांभाळण्याची वेळ येते. नामाचे शिक्षणाचे स्वप्न उद्ध्वस्त होते. शिक्षण सोडून नागोच्या हॉटेलात त्याला चाकरी करावी लागते. ''धग' च्या शोकांतिकेचे सामर्थ्य वाचकाला हादरवून टाकते नि अस्वस्थ करते याचे कारण तो जीवनानुभवच तेवढा वजनदार आहे.'' धग ही कादंबरी म्हणजे कौतिकच्या संघर्षाची शोकांतिका आहे, संघर्षाची जीवनगाथा आहे.

## निष्कर्ष

१. ग्रामीण भागातील पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या शिंपी कुटुंबाची ही प्रातिनिधीक कथा आहे. आधुनिकीकरण व शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील कष्टकरी जनतेवर झालेल्या शोकात्म परिणामाचे चित्रण या कादंबरीतून पुढे येते.

२. कौतिकचा जीवनसंघर्ष हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. एका सामान्य ग्रामीण कष्टकरी स्त्रीने आपल्या कुटुंबासाठी केलेल्या जीवनसंघर्षाची ही करुण कहाणी आहे. ही करुण कहाणी वाचकांना खरोखरच अस्वस्थ व अंतर्मुख करते.

३. 'धग' या कादंबरीच्या माध्यमातून ग्रामीण स्त्रीची प्रातिनिधीक वेदना व्यक्त झालेली आहेत. कर्तव्यशून्य, आळशी व दैववादी प्रवृत्ती असलेल्या नवऱ्यामुळे कौतिक सारख्या अशा असंख्य व नामासारख्या होतकरु व हुशार मुलांच्या जीवनाची अक्षरशः परवड होते, याचे दुःख या कादंबरीतून प्रातिनिधीकपणे व्यक्त झालेले आहेत.

४. 'धग' या कादंबरीमधून वऱ्हाडी समाजजीवनाचे चित्रण आलेले आहे. वैदर्भीय लोकजीवनातील प्रथा, परंपरा, सण, उत्सव, श्रध्दा, अंधश्रध्दा, भाषाशैली,कृषीजीवन याचे यथार्थ चित्रण या कादंबरीतून साकारले आहे. या कादंबरीतील वऱ्हाडी बोली, म्हणी, वाक्यप्रचार, संवाद, शब्दकळा व वातावरण यामुळे अमरावती जिल्हयातील वऱ्हाड प्रांत वाचकांसमोर साक्षात उभा राहतो, हे या कादंबरीचे फार मोठे बलस्थान आहे.

## संदर्भग्रंथ सूची

१. धग – उद्धव शेळके, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – २००७
२. मराठी ग्रामीण कादंबरी – डॉ. रविंद्र ठाकूर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – २००९
३. ग्रामीण साहित्य : स्वरुप व दिशा – डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद – २००८

❖❖❖

# झुंज आत्मकथनातील व्यक्तिरेखा : एक अभ्यास

प्रा. लालबा चां. दुमटकर
मराठी विभाग
गो. सी. टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
इ मेल lalbadumatkar123@gmail.com भ्रमणध्वनी ९८३४१४३७५१

## प्रस्तावना :

रामराव झुंजारे हे मराठी दलित साहित्यातील एक महत्वाचे लेखक म्हणून ओळखले जातात. त्यांचे झुंज हे आत्मकथन इ.स.1998 साली प्रकाशित झाले आणि काही वर्षातच त्याचा दुसरा भाग बोंबदवंडी या नावाने इ.स. 2002 साली प्रकाशित झाला. या दोन्ही आत्मकथनाने मराठी दलित साहित्यात वाङ्मयीनदृष्टया अनन्यसाधारण भर पाडली. कोणताही लेखक मूळात एक माणूस असतो. त्यालाही कुटुंब असते. तो इतरांसारखाच समाजात जीवन जगत असतो. त्याच्या अवती भोवती व्यक्ती, समाज असतो आणि या सर्वातून त्याचं एक व्यक्तिमत्व घडत असते; म्हणजेच आजुबाजूच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीचा परिणाम त्याच्यावर होत असतो. साहजिकच हे अनुभव प्रकट करीत असतांना तो केवळ स्वतःच्या जीवनाविषयी न लिहता इतरांविषयीही लिहत असतो. एखाद्या साहित्यकृतीची निर्मिती करीत असतांना त्यात कथानकाबरोबरच वातावरण, व्यक्तिरेखा, घटना प्रसंग, भाषा या सर्वांचा योग्य वापर करावा लागतो. तेव्हा त्या साहित्यकृतीतून त्या त्या पात्रांचं एक व्यक्तिमत्व तयार होत असते. ते चांगलं असू शकते किंवा वाईटही असू शकते. लेखक रामराव झुंजारे आपल्या आत्मकथनात स्वतःविषयी सांगत असले तरी त्यांच एक व्यक्तिमत्व प्रत्ययास येते. त्याबरोबरच त्यांच्या आयुष्यात येणा—या विविध व्यक्ती यांचही व्यक्तिमत्व प्रत्ययास येते म्हणून त्या त्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करणे, ते व्यक्तिमत्व समजून घेणे अतिशय आवश्यक असते. त्याशिवाय त्या साहित्यकृतीचे मोल ठरवणे त्या साहित्यकृतीवर अन्याय केल्यासारखे ठरेल.

'झुंज' आणि 'बोंबदवंडी' हे मूळात दोन आत्मकथन आहेत. या आत्मकथनात आत्मकथनाचा कर्ताच जीवन जगत असतांना आपल्या वाटयाला कोणत्या प्रकारचे जीवघेणे अनुभव आले, आपण त्यांना कशाप्रकारे सामोरे गेलो आणि त्यातून कसे घडत गेलो याचे तपशिलवार निवेदन करत असतो; तेव्हा त्या कलाकृतीच्या आधारे त्या लेखकाचे व्यक्तिमत्व समजून घ्यावे लागते. रामराव झुंजारे हे मुळात मराठवाडयातील नांदेड जिल्हयातील 'शेलगाव' या गावचे. दलितातील 'मांग' या कनिष्ठ जातीत जन्माला आल्यामूळे त्यांना लहानपणापासूनच अस्पृश्यतेला सामोरे जावे लागले. घरी अठराविश्व दारिद्रय असल्यामूळे रोजच अन्नासाठी त्यांना वणवण फिरावे लागत असे. त्यात त्यांचा समाज हा मूळात देवभोळा असल्यामुळे अनेक अंधश्रध्दा समाजात पसरलेल्या होत्या. आई वडील अशिक्षित. या सर्वातून जीवनाची वाटचाल करतांना त्याचं एक खास व्यक्तिमत्व दिसून येते.

लेखकाचे वडील अनिरूध्द झुंजारे अशिक्षित असतात पण अशिक्षित असूनही त्यांच्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे, त्यांच्या प्रभावी विचारामुळे त्यांच्यात शिक्षणाची जाण निर्माण होते. या जाणिवेतूनच आपल्या वाटयाला आलेले हजारो वर्षापासूनचे हे दारिद्रय नष्ट करायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणून आपल्या मुलांना म्हणजेच लेखक रामराव व त्यांच्या भावंडाना स्वतः इतरांची चाकरी करत त्यांना शिक्षण देतात. मुलांना वेळोवेळी आपल्या अल्प ज्ञानाने का होईना पण ज्ञानाचे डोस पाजतात. या आपल्या बापूच्या उपजत ज्ञानामुळेच रामराव पुढे विचाराने, ज्ञानाने प्रगल्भ होत जातो. संकट तर प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात येतच असतात पण त्या संकटावर मात करण्याची जिद्द मनात असावी लागते. ती जिद्दच लेखकामध्ये त्यांच्या वडिलांमुळे आली होती म्हणून तर लेखक या अठराविश्व दारिद्रय असलेल्या घरात, समाजात जन्माला येऊनही त्या काळात एम. ए. बी. एड्. इंग्रजी पर्यंतचे शिक्षण घेऊन एका नामांकित महाविद्यालयात प्राध्यापक होईपर्यंतची मजल मारतो. आपल्या जीवनात कित्येक वेळ केवळ दलित असल्यामुळे अन्याय, अपमान आपली चूक नसतांना सुध्दा सहन करतात. त्या अन्याय, अपमानाविरूध्द बंड करून उठत नाहीत तर घडलेल्या गोष्टीवर आपल्या मनातल्या मनात चीड व्यक्त करतात, शिव्या देतात पण विद्रोह करून उठत नाहीत. उलट आपल्या

दरिद्री अवस्थेला आपल्या नशिबाची जोड देऊन गप्प बसतात. त्यांना माहीत असते की, ही जातीयवादी व्यवस्था आपण बदलू शकत नाही. त्यामुळे स्वतःच्या हूशारीने या दलदलितून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात.

दुसरी ठळक व्यक्तिरेखा म्हणजे लेखक रामराव झुंजारे यांचे वडील अनिरूध्द झुंजारे. अनिरूध्द उर्फ बापू हे पात्रसुध्दा तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे शोषित आहे. पण डॉ. बाबासाहेबांच्या विचारामुळे प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द आपली चीड व्यक्त करते. ती बदलून त्या ठिकाणी नवी माणसाला माणूस म्हणून वागवणारी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे; याची कास धरते. बापू अशिक्षित आहे पण अज्ञानी नाही. त्याला शिक्षणाची जाण आहे. सबंध आत्मकथेतून बापूचे विचार हे विज्ञानवादी वाटतात. तो समाजातील इतर लोकांसारखी लाचारी पत्करत नाही. कष्ट करून इमानदारीची भाजी भाकरी स्वाभिमानाने खावी यावर त्यांचा पूर्णतः विश्वास आहे. उदा. मांग समाजाचे व्यवसाय म्हणजे बाज विणणे, लग्न प्रसंगी वाजंत्री वाजवणे, मांगकी करणे अशा जीवघेण्या व लाचारी स्वीकारायला लावणा—या कामाचा त्यांना तिटकारा आलेला होता. या कामामुळे कितीतरी मांग जातीतील लोकांचे जीवन उध्दवस्त झालेले होते. बापू हे ओळखलेला असतो आणि म्हणून तर आपल्या मुलांना ही नामुष्कीची कामे करू न देता शिक्षण देतो. उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी पाठवतो. या संदर्भातील त्यांचे म्हणणे इथे व्यक्त करणे महत्वाचे वाटते ते म्हणतात,"रामराव आपले वाडवडील मूठी बांधून आले अन रावांची चाकरी करून मूठी सोडून वरती गेले, तसा मी जाणार नाही. तुला अन तुझ्या भावांना ज्ञानाचा तिसरा डोळा देवून मी माझे डोळे झाकीन हे माझं कैक दिवसापासूनचं सपन हाय".1 यावरून बापूची गावकीच्या कामाविषयीची चीड आणि मुलांच्या शिक्षणाविषयीची तळमळ लक्षात येते. जातीयतेची चीड मनात धगधगत ठेवलेला बापू वेळप्रसंगी देवालाही शिव्या देतो. रामरावला सांगतो, "रामराव, याच्यापुढं पारावर जावू नको, ढुंकुन बी बघू नको त्या वानेराकडं."2 तर कधी गावातून मागून आणलेले शिळं पातळ अन्न खाण्यास विरोध करतो. माणसानं भिक मागून खाऊ नये तर कष्टानं, इज्जतीनं दोन घास मिळवून खावावं यावर बापूचा विश्वास होता. याला लेखकाची आई केवळाबाईची खंबीर साथ होती. केवळाबाई कष्ट करून स्वाभिमानाने जगणारी आणि इज्जतीने खाणारी बाई. गावात बाळांतपणात प्रत्येक बाईची दाई म्हणून काळजी घेणारी लेखकाची आई वेळप्रसंगी जिथे अन्याय, अपमान करून बोलले जाते तिथे तोंडावरच खडा बोल सुनावणारी आहे, जीवापेक्षा म्हशीवर प्रेम करणारी, मुक्या जीवाचा आशिर्वाद घेणारी लेखकाची आजी पुरभाबाई, शिक्षणाचे महत्व सांगणारे मैंद गुरूजी, बी. ए. ला कमी टक्केवारी असूनही बी. एड.ला नंबर लावून देणारे भोपाळचे प्राचार्य राजपूत सर, स्वतः च्या मुलासारखे प्रेम करणा—या त्यांच्या पत्नी सौ. राजपूत मॅडम, नोकरी मिळाल्यानंतर राहण्यासाठी अस्पृश्य म्हणून खोली मिळत नव्हती; तेव्हा खोली मिळवून देणारे व वेळप्रसंगी मदत करणारे डॉ. टिकार सर, अरेरावीची भाषा बोलणारे गावातील श्रीमंत राव या सर्वांचे अतिशय मोहक व्यक्तिरेखा लेखकाने अनेक प्रसंगातून, प्रसंगाला अनुरूप साकारलेल्या आहेत. त्यामुळे या सर्व व्यक्तिरेखा सबंध आत्मकथनातून उठावदार दिसतात. यामुळे आत्मकथनाला जीवंतपणा आलेला आहे.

सारांश या आत्मकथेमध्ये आलेल्या सर्व व्यक्तिरेखा या अतिशय जीवंतपणे लेखकाने साकारलेल्या आहेत. या सर्व व्यक्तिरेखा त्यांना प्रत्यक्ष भेटलेल्या आहेत. त्यांना विद्रुप न करता माणसातील प्रवृत्तीचे हूबेहूब चित्रण केलेले आहे. व्यक्तिरेखाटन करतांना कुठेही लेखकाने स्त्रीच्या शीलाला तडा जाऊ दिलेला नाही तर उलट स्त्रीयांचा स्वाभिमान वाढवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या आत्मकथेत मराठवाडयातील बोलीभाषेचा वापर केल्यामूळे तेथील निसर्ग, व्यवसाय, शेती, सामाजिक रूढी, परंपरा, गावाची रचना, राहणीमान या सर्वांचे अस्सल दर्शन घडते. एवढेच नाही तर त्यांच्या बोलीतील म्हणी, वाक्प्रचार, उपमा आणि प्रतिमा प्रतीकांच्या योग्य वापरामुळे सदर साहित्यकृती अतिशय वाचनीय बनली आहे. असे असले तरी तोचतोपणा, कल्पनांचा हव्यास असे काही क्वचित दोष सोडल्यास त्यांचे हे आत्मकथन वाङ्मयीन गुणांनी परिपूर्ण असेच आहे.

## संदर्भसूची :

1) रामराव झुंजारे — झुंज— डिंपल प्रकाशन, ठाणे, 1998 पृष्ठ क्र. 19

2) तत्रैव — पृष्ठ क्र. 11

❖❖❖

# वसंत आबाजी डहाके ह्यांच्या ललित साहित्यातील विचार: एक आकलन

डॉ. राजेंद्र ठाकरे, सहयोगी प्राध्यापक श्री. शिंदे सदाशिव, संशोधक विद्यार्थी
मु.पो. शिंदे, ता. कर्जत, जि. अहमदनगर ४१४४०२, महाराष्ट्र (India)
इ मेल shinde.sadashiv123@gmail.com भ्रमणध्वनी ९६२३३६५७४५

## गोषवारा (Abstract)

वसंत आबाजी डहाके यांच्या 'यात्रा: अंतर्यात्रा' 'मालेटेकडीवरून' आणि 'गोष्ट:न सांगता येण्याविषयी' या ललित साहित्यातून वैचारिक विचार हे आलेले आहेत. त्यांच्या या ललित लेखनातून सामाजिक, राजकीय, धार्मिक अंगाने विचार त्यांनी मांडलेले आहेत. विसाव्या शतकातील सामान्य माणसाच्या जीवनातील गंभीर विचार मांडले आहेत. त्यांनी यातून त्यांच्या जीवनातील दु:ख, वेदना, अस्वस्थता, दु:ख व्यक्त केले आहे. त्यांच्या या लेखनातून माणसाच्या जीवनातील समस्यांचे विचार व्यक्त होताना दिसून येतात.

त्यांनी सामाजिक विचारातून माणसांच्या जीवनातील येणाऱ्या समस्या दु:ख, अन्याय, अत्याचार, यांचे चित्रण केले आहे. राजकीय विचारातून त्यांनी राजकीय, लोकांच्या डावपेचाचे चित्रण केले आहे. तसेच त्यांनी धार्मिक विचारातून जातीभेद, उच्चनीच, श्रेष्ठ कनिष्ठ यांच सखोलपणे चित्रण केले आहे.

## बीजशब्द

ललित, सामाजिक, राजकीय, धार्मिक

## प्रास्ताविक

वसंत आबाजी डहाके यांच्या 'यात्रा: अंतर्यात्रा' 'मालेटेकडीवरून' आणि 'गोष्ट: न सांगता येण्याविषयीची' या ललित साहित्यातून प्रामुख्याने वैचारिक विचार हे आलेले दिसून येतात. या लेखनातून सामाजिक, राजकीय, धार्मिक विचार व्यक्त होतात. त्यांनी विसाव्या शतकातील सामान्य माणसाच्या जीवनातील गंभीर विचार मांडले आहेत. या शतकातील माणसांना, हिंसेला, वेदनेला, दु:खाला सामोरे जावे लागत आहे. सामान्य माणसांच्या जीवनातील व्यथा, वेदना, दु:ख आणि अस्वस्थता ही सूक्ष्मपणे दिसून येते. त्यांच्या लेखनातून सखोल, अस्वस्थ करणारे विचार येतात.

## १) सामाजिक विचार:

"या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील क्रौर्य, हिंसा, आक्रोश, आणि वेदना यांचा आलेख काढला पाहिजे. स्वातंत्र्यात त्या पिढ्यांचं महानगरातल जगणं आणि मरण पाहिले पाहिजे."[१] ते म्हणतात की, विसाव्या शतकातील उत्तरार्धातील भयंकर अशी हिंसा, आक्रोश, वेदनांनी सामान्य माणसाचे जीवन भरलेले आहे. त्यामुळे त्यांना आपले जीवन जगताना सतत येणाऱ्या परिस्थितीला तोंड देत जगावे लागत आहे. महानगरातल्या सामान्य माणसाला दोन वेळेच्या जेवणासाठी सुध्दा खूप धडपड करावी लागते. त्यांचा शहरात कोंडमारा होत आहे. मुंबईतल्या सर्वसामान्य लोक आपल्या दैनंदिन जीवनात खूप कष्ट करतात. त्यांना प्रत्येक गोष्टीसाठी धावपळही करावी लागत आहे. त्यामुळे ते दुसऱ्याचा विचार करत नाही, असे म्हटले जाते. परंतु या स्थितीमागे एक व्यवस्था आहे. त्यामुळे दिवसभर कष्ट करुन संध्याकाळी घरी जायचे असते. त्यामुळे महानगरातील लोक लोकल गाडीत झुंडीच्या झुंडीने शिरतात.

त्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनात दुसऱ्यांचा विचार करण्याची शक्ती नाहीशी करते. सर्वसामान्य लोक दुसऱ्याचा विचार करतात. परंतू त्यांना या व्यवस्थेने आपल्यामध्ये वेढलेले आहे. त्यामुळे त्यांना एक प्रकारचे साचेबंद जीवन जगावे लागत आहे. महानगरातील लोकाचे जीवन हे खूप विविध समस्यांनी भरलेले आहे.

''मुंबईला मध्यमवर्ग, कनिष्ठ मध्यमवर्ग, कनिष्ठ श्रमजीवी वर्ग नाहीसा होईल का अशी चिंता मला भेडसावते आहे.''[२] ते म्हणतात की मुंबईतल्या मध्यमवर्ग व कनिष्ठ मध्यमवर्ग श्रमजीवी वर्ग हा खूप अस्वस्थ, कोंदट वातावरण, झोपडपट्टीत जीवन जगत आहे. त्यांना विविध समस्यांनी वेढलेले आहे. त्यांना सहजपणे संघर्ष हा करावा लागत आहे. ही सामान्य माणसे बिचारी फार साधी आणि शांत स्वभावाचे आहेत. या महानगरात महाराष्टातील नव्हे तर संपूर्ण भारतातील विविध भाषा बोलणारी माणसे आहेत. ही सामान्य माणसे या अस्वस्थ शतकात राजकीय आणि आर्थिक सत्तांनी दाबलेली आहेत. त्यांच्या भोवतीचा पांढरा अफाट अवकाश उजाडपणे दिसून येतो. अशा या महानगरात त्यांना एकाकीपणाची जीवन जगावे लागत आहे. त्यांना जीवन जगताना संघर्ष करावा लागत आहे. दु:ख, अन्याय, अत्याचार यांनी ते वेढलेले आहेत. त्यामुळे मुंबई महानगरातील हा वर्ग नाहीसा होईल का अशी चिंता व्यक्त होताना दिसून येते.

'' या कवितेतून आपला काळ आपल्या काळातील उच्चाराची दडपणूक अतिप्रयासाने उच्चराची चाललेली धडपड या गोष्टी जाणवतात.''[३] ते म्हणतात की समाजव्यवस्थेत माणसाला दडपून टाकले आहे. त्याला स्वत:चे विचार, भावभावना, समस्या व्यक्त करता येत नाही. तो या व्यवस्थेच्या दबावाखाली दाबला गेला आहे. त्यामुळे तो त्यांच्याविरुध्द काहीही बोलू शकत नाही 'नटासाठी पार्श्वसूचना' या कवितेतून सामान्य माणसाची होणारी दडपणूक आणि व्यक्त होता न येण ही एक भयंकर व्यवस्थेचे, स्थितीचे विचार दिसून येतात. सामान्य माणसाच्या जीवनातील घालमेल, दु:ख आक्रोश दाबून राहिलेला दिसून येतो.

''एक खूपच मोठा समुदाय आहे किंवा खूप मोठे अनेक समुदाय आहेत. त्यांना तर कधीच काही बोलताना मी पाहिलेला नाही त्यांना भाषांभ्रश जडलेला नाही ते जन्मताच बहिरे असतील आणि नंतर मुकेपण आलं असेल.''[४] ते म्हणतात. की सामान्य लोकांना वाचा असून सुध्दा बोलता येत नाही. ऐकता येत असताना सुध्दा ऐकता येत नाही. या व्यवस्थेद्वारे सामान्य लोकांची दयनीय स्थिती दिसून येते. सामान्य लोकांना या व्यवस्थेमध्ये आपली व्यथा, वेदना ही मांडता येत नाही. ते शारीरिक दृष्ट्या चांगले आहेत परंतु ते या व्यवस्थेच्या दबावाखाली दडलेले आहेत. त्यामुळे सामान्य माणसांच्या जीवनातील विदारक परिस्थिती या विचारातून दिसून येते.,

आपली कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, व्यक्तीचे इतरांची समाजाशी असलेले संबंध याविषयी प्रश्न निर्माण होताना दिसून येतात. कर्जबाजारीपणा, नापिकी, व्यसन ही बाह्य लक्षणे आहेत. तसेच व्यक्ती ही आतून मोडकळीस आलेली आहे. त्यांना कोणाच्या मदतीचा आश्वसक असा आधार नसतो. त्यामुळे त्यांना जन्मताच मुकेपण आणि बहिरेपण आलेले दिसते. तो विविध समस्यांनी, वेदनांनी, ग्रस्त झालेला दिसून येतो.

''त्याबद्दल आस्था असूनही जिवंत आहे. हेही त्यांच्या लेखनामधून उमटून जात असत.''[५] ते म्हणतात या विसाव्या शतकात सामान्य माणसांच्या जीवनातील हिंसा, आक्रोश, वेदना हे माणसाला अस्वस्थ करतात. या शतकात सामान्या माणसाच्या जीवनातील दु:ख, अगतिकता, वेदना, गरिबी, लाचारी, भय हे भयानक स्वरुपाचे दिसून येतात. या परिस्थितीचे चित्रण सूक्ष्मपणे त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. सामान्य माणसाच्या बद्दल असणारी आपुलकी, स्नेह, आस्था त्यांच्या लेखांमधून व्यक्त होते.

''जे वाचवायच आहे ते वाचवता येत नाही या प्रश्नांन खरं तर सगळ्यांनीच अस्वस्थ होवून जायला हवं होतं. म्हणजे काहीतरी वाचवता आलं असतं''[६] ते म्हणतात की, विसाव्या शतकात घडणाऱ्या घडामोडींमुळे सामान्य माणसाची मुले ही शाळेच्या बाहेर होती. पिढ्यानपिढ्या ही मुले बाहेर असल्यामुळे त्यांच्यात अज्ञान, गरिबी, दु:ख, समस्या यांनी वेढलेले आहेत. त्यामुळे हा समाज घसरणीचे दिशेनेच जाताना दिसून येतो. या सामान्य लोकांच्या जीवनातील वास्तविकता सूक्ष्मपणे व्यक्त केलेली आहे.

''आता बदलाच्या पार्श्वभूमीवर नित्याच्या गरजांसाठी, पाण्यासाठी युध्द करावी लागतात. सरकारी विकासाच्या तंत्रज्ञानाच्या गंगा दुथडी भरुन वाहताना पाण्यासाठी रस्त्यावर येणारे लोक ह्या साध्या न्यूनतेसाठी आपले प्राण गमावतात.''[७] ते म्हणतात की, आजच्या विसाव्या शतकात सर्वत्र विकास झाला आहे. तरीपण सामान्य माणूस आज सुध्दा पाण्यासाठी संघर्ष करत आहे. युध्दात मरण पावलेल्याचे पुतळे/स्मारके उभारली आहेत. परंतु आता पाण्यासाठी शहीद झाला म्हणून स्मारक उभारावे लागतील. सामान्य माणसाला विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांनी आपल्या लेखनातून सामान्य माणसाच्या जीवनातील वास्तव परिस्थितीचे विचार व्यक्त केले आहेत.

या शतकात आपले असण हे दु:खाचा, चिंतेचा विषय आहे. तरी आपण या शतकात असण थांबवता येत नाही. आपण यामध्ये असतो. सामान्य माणसाच्या अस्तित्वाचे विचार सखोलपणे येतात.

## २) राजकीय विचार:

वसंत आबाजी डहाके यांच्या लेखातून अतिशय सखोल आणि अस्वस्थ करणारे राजकीय विचार व्यक्त झालेले आहेत. त्यांच्या या लेखातून राजकीय नेते आणि त्यांचे स्वार्थीपणाची वृत्ती दिसून येते. सामान्य माणसांची झालेली अवहेलना, दुःख, संघर्ष, पराभूतपणा, अत्याचार, हत्या या लेखातून सूक्ष्मपणे व्यक्त होताना दिसून येतात.

''देशाच्या आत अशी काही व्यवस्था केली जात असताना भिन्न भिन्न प्रदेशातल्या राजकारणातल्या लोकांची समीकरणे बदलू लागली. देश स्वतंत्र होणे म्हणजे सत्ता आपल्या हातात येण असा अर्थ लावला गेला.''[८] ते म्हणतात की भारताला स्वतंत्र्य मिळाल्यानंतर अनेक राजकीय नेत्यांनी आपल्या स्वार्थासाठी भाषेनुसार, प्रदेशानुसार विभागणी करू लागले. त्यामुळे या राजकीय नेत्यांनी आपल्या हातात सत्ता कशी येईल आणि ती कशी टिकून राहील यासाठी प्रयत्न केल्यानंतर या नेत्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे राजकीय डावपेच आखले. यानंतर मध्यमवर्ग व कनिष्ठ वर्गतला सामान्य माणूस भरडला जात होता. त्याला आपले विचार व्यक्त करता येत नव्हते. यातून राजकीय नेत्यांनी आपल्या सत्तेसाठी वेगवेगळे प्रयत्न केल्याचे दिसून येते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या राजकीय लोकांना चांगले राज्य करता आले नाही. त्यांनी कोणतेही धोरण नीट आखले नव्हते. या राजकीय लोकांनी फक्त जे काणी चांगले काम, चांगले विचार मांडले अशा शहाण्या माणसांना विरोध केला. सर्व राजकीय लोक एकत्र येऊन अशा शहाण्या माणसांना सत्तेच्या बाहेर कायमचे घालवण्याचे कट–कारस्थान करत राहिली.

राजकीय स्वातंत्र्याप्रमाणेच सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक समानतेची आवश्यकता, गरज असते. परंतु स्वातंत्र्यानंतर विविध पातळयामध्ये विषमता ही वाढत गेली होती. त्यामुळे देशातील ही विषमता पुढेपुढे उघड होत गेली. यामधून राजकीय लोकांची सत्तेची लालसा, सामान्य माणसाची होणारी घालमेल दिसून येते. सर्व सामान्य माणसाची होणारी घुसमट, दुःख, गरिबी, अवहेलना ही वाढत गेली. हा वर्ग एका खालच्या भागात विभागला गेला. तो सदैव विविध समस्यांनी व्यापला गेलेला दिसून येतो. यातून सामान्य माणसाच्या जीवनातील वाढत जाणारी व्यथा, वेदना हे सूक्ष्मपणे व्यक्त होताना दिसून येते.

''त्यांच्या मते राजकारणी लोकांना सत्यात नव्हे तर सत्तेत स्वारस्य असत. सत्ता मिळविण्यासाठी आणि ती टिकवून ठेवण्यासाठी ते असत्याची सत्य स्थापन करतात''[९] ते म्हणतात की, राजकारणी माणसे असत्याची सत्य म्हणून स्थापना करतात. सत्य असत, परंतु असत्याची शब्दांनी निर्मिती केली जाते. सत्य हे सर्वसामान्य लोकांना कळत नाही. कधी कधी तर ते कधीच समजत नाही. त्यामुळे असत्याला ते सत्य म्हणून स्वीकारतात. 'हेराल्ड पिंटर' यांच्या 'कला, सत्य, राजकारणं, या भाषणातून अतिशय सूक्ष्मपणे विचार व्यक्त होताना दिसून येतात. यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हे इराकवर लादलेल्या युध्दाचे समर्थन करतात. त्याचे कारण सांगताना ते असत्य हे लोकांपुढे सत्य म्हणून सांगतात. राजकीय लोकांना सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यात काही तळमळ नाही. त्यांना फक्त सत्ता हवी आहे. यातून राजकीय विचार सखोलपणे व्यक्त होतात.

## ३) धार्मिक विचार:

वसंत आबाजी डहाके यांच्या लेखांमधून धार्मिक विचार हे व्यक्त झाले आहेत. या विचारातून श्रीमंत–गरीब, उच्च–नीच, कनिष्ठ–श्रेष्ठ, जाती–उपजाती यांचे विचार आले आहेत. त्यांच्या लेखामधून वेगवेगळया धर्माचे विचार व्यक्त होताना दिसतात. यामधून सामान्य माणसाच्या जीवनातील वेदना, दुःख, समस्या, अवहेलना, भयंकर स्वरूपात येताना दिसतात.

''मात्र कुठल्याच धर्माची चव लागत नाही. सगळयाच धर्माकडे सारख्या दृष्टीने पहावसं वाटतं. धर्माधर्मामध्ये भेदभाव करु नये असे वाटते''[१०] ते म्हणतात की, धर्म मानवी मनाची अभिव्यक्ती आहे. सर्वच धर्माकडे आदराने पाहावे. उच्च नीच असा भेदभाव करु नये. धर्मातील सामान्य लोकांकरीता सहानुभूती श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव करू नये. 'व्हायरस' या लेखांतून त्यांनी माणसाकडे एक व्यक्ती म्हणून पाहिले. धर्मभेद करु नये. लेखकांनी सर्वच धर्माकडे पाहून वेगवेगळया प्रकारचे लेखन करावे. तसेच वाचकांना सुध्दा कबीरा व्हायरसचं इन्फेक्शन होऊन वाचकांची संख्या वाढली. यातून धर्माकडे समानतेने पाहण्याच्या विचार होताना दिसून येतो.

''हिंदू धर्माचा त्याग केल्याशिवाय अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजीची मुक्ती नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकराच म्हणणं होतं. त्यांच्या आधी लोकहितवादी, महात्मा फुले यांनी ब्राम्हणांच्या वर्णश्रेष्ठत्ववार

प्रहार केले होते.''[११] ते म्हणतात की, अस्पृश्य समजलेल्या वर्गाचा विकास, वाढ ही हिंदू धर्माचा त्याग केल्याशिवाय होऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, हिंदू धर्मात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, अस्पृश्य अशी वर्ण व्यवस्था निर्माण केलेली आहे. हिंदू धर्मावर मनुस्मृती या ग्रंथाचा प्रभाव आहे. त्यामुळे हिंदू धर्मात अस्पृश्य लोकांवर अत्याचार, अन्याय, भेदभाव हे मोठया प्रमाणात पाळलेले दिसतात. त्यामुळे अस्पृश्य, दलित समाजाचा विकास हा हिंदूधर्म सोडल्याशिवाय होवू शकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आधी लोकहितवादी महात्मा फुले यांनी ब्राम्हणांच्या या वर्णव्यवस्थेवर कठोर शब्दात प्रहार केले आहेत. महात्मा फुले हे एक थोर विचारवंत होते. त्यांनी मानवता हाच एक धर्म आहे आणि त्यांनी जातिभेदाच्या विरोधात आवाज उठवला. त्यांचे विचार हे सडेतोड आणि स्पष्ट होते. त्यांनी उच्च—नीच श्रेष्ठ—कनिष्ठ असा भेदभाव केला नाही. महात्मा फुले यांचे विचार अतिशय सखोलपणे व्यक्त होताना दिसून येतात.

''पुष्कळांना माणसं दिसतच नाहीत, धर्म दिसतात, जाती दिसतात''[१२] ते म्हणतात की आपल्या देशात विविध जातीचे आणि विविध भाषा बोलणारे लोक राहतात. त्यामुळे त्यांच्यात गरीब—श्रीमंत, उच्च—नीच, श्रेष्ठ—कनिष्ठ असा भेदभाव केलेला दिसून येतो. 'सुटलेली शाळा, फुटलेली पाटी' या लेखातून विविध धर्मातील राजकीय लोकांचे विचार व्यक्त होत आहेत. गरीब मुलांची शाळा, श्रीमंत मुलांची शाळा, असा शाळेत सुध्दा भेदभाव केला जातो. शाळेत असलेले चांगले धान्य गायब होते, जुने धान्य तेथेच राहते. त्यामुळे सामान्य माणसाची मुलेही कुपोषित राहतात. जातिभेदांमुळे सामान्य माणसाचा विकास हा खूंटलेला आहे. ते पूर्वी जसे जीवन जगत होते तसेच आज सुध्दा जीवन जगावे लागत आहे.

राजकीय लोक आपल्या स्वार्थासाठी जाती—जातीत भेदभाव करतात. सामान्य माणसात ते फुट पाडण्याचे काम करतात. यातूनच सामान्य माणसाचे जीवन हे कायमस्वरूपी खालच्या पातळीवर दिसून येते. त्यांनी राजकीय लोकांच्या वर्तमान परिस्थितीचे सूक्ष्मपणे वर्णन केलेले आहे.

धर्म व्यवस्थेमुळे सामान्य माणूस हा या व्यवस्थेमध्ये एकदम खालच्या पातळीवर आहे. त्याने फक्त आपल्यावरील तिन्ही वर्गाची सेवा करायची, त्याला या वरिष्ठ वर्गाने शिक्षणापासून दूर ठेवले आहे. त्यामुळे त्याची प्रगती होत नाही. अस्पृश्य हा सततपणे दाबला गेलेला दिसून येतो. परंतु महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांनी या वर्णव्यवस्थेला विरोध केला. जातीभेदावर कठोर शब्दात हल्ला केला. अस्पृश्य वर्गाला शिक्षणाची दारे खुली केली. या लेखांमधून सूक्ष्मपणे धार्मिक विचार व्यक्त होताना दिसून येतात.

## निष्कर्ष :

१) 'यात्रा: अंतर्यात्रा' यातून त्यांनी सभोवतालचे बदलत असलेले जग, विविध सामाजिक, सांस्कृतिक व्यवहारातील परिवर्तन, आशयसूत्रामधून मांडलेले आहे.

२) त्यांनी ललित लेखांमधून भोवतालच्या परिस्थितीचे स्वरुप जाणून घेण्याची आणि त्यावरती भाष्य करण्याची त्यांची इच्छा दिसून येते.

३) त्यांच्या ललित लेखातून समाजातील अन्याय आणि दारिद्रय नष्ट झाले पाहिजे तसेच त्यांच्या जीवनातील येणाऱ्या परिस्थितीमध्ये बदल घडून आला पाहिजे असे त्यांना वाटते.

४) लेखकांच्या नव्हे तर प्रत्येकाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला जपणे, हे कुठल्याही काळातल्या नियतकालिकांचे, विचारवंताचे आणि लिखणावर प्रेम करणाऱ्या नागरिकांचे कर्तव्य असले पाहिजे.

५) त्यांच्या ललित लेखांमधून व्यक्तीच्या, मनातील गोष्टी या दडपून आणि माना मोडून पडलेल्या आहेत. सामान्य माणसांना आपले विचार, दु:ख, भावना या व्यक्त करता येत नाहीत. त्यांची वरिष्ठांकडून दडपणूक केलेली आहे. त्यामुळे त्यांची अस्वस्थता, कोंडलेलेपण दिसून येते.

६) त्यांच्या ललित लेखातून आपण एका काळाची मानसिकता, त्यात झालेल्या बदलांचा लेखाजोखा अनुभवत आहोत असे दिसून येते.

## समारोप:

वसंत आबाजी डहाके यांनी त्यांच्या लेखनातून विसाव्या शतकातील सामान्य माणसाच्या जीवनातील विविध प्रकारच्या समस्यांचे, प्रश्नांचे विचार व्यक्त केलेले आहेत. त्यांच्या या लेखनातील सामाजिक, राजकीय, धार्मिक विचार हे गंभीर आणि अस्वस्थ करणारे आहेत.

अशाप्रकारे त्यांच्या ललित साहित्यातील विचार हे सखोलपणे व्यक्त झालेले दिसून येतात.

## संदर्भ आणि टिपा

१) डहाके वसंत, 'यात्रा अंतर्यात्रा', लोकवाड्:मयगृह, प्रकाशन मुंबई द्वितीय आवृत्ती, डिसेंबर २०११ पृ.९१
२) डहाके वसंत, 'मालटेकडीवरुन', लोकवाड्:मयगृह, प्रकाशन मुंबई तृतीय आवृत्ती, जानेवारी २०१२ पृ.७८
३) उनि., 'यात्रा अंतर्यात्रा', पृ.७८
४) उनि., 'मालटेकडीवरुन', पृ.८
५) कोठावळे अशोक, (संपा), 'ललित', फेब्रुवारी २०१२ पृ.६०
६) उनि., 'गोष्टः न सांगता येण्याविषयीची', पृ.१३४
७) उनि., 'ललित' पृ.५८
८) उनि., 'यात्रा अंतर्यात्रा', पृ.८३
९) उनि., 'मालटेकडीवरुन', पृ.२३
१०) तत्रैव, पृ.१
११) तत्रैव, पृ.९
१२) तत्रैव, पृ.११२

❖❖❖

# मराठीतील प्रवासवर्णनपर लेखनात स्त्रियांचे योगदान

मनिषा दादाभाऊ औटी
पीएच.डी. संशोधन छात्रा
चां. ता. बोरा महाविद्यालय, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे, महाराष्ट्र (India)
इ मेल manisha.kawade21@gmail.com भ्रमणध्वनी ९९२१२३२२८५

## गोषवारा (Abstract)

अर्वाचीन मारठी वाङ्मयात प्रवासवर्णनांची निर्मिती झालेली आढळते. प्रवासवर्णन हा आत्मविष्कारी साहित्याचा म्हणजेच ललित गद्याचा उपघटक मानला गेल्याने त्यात 'मी' व्यक्त होत गेला. प्रवासवर्णन कथात्मक असते विसाव्या शतकात हा वाङ्मय प्रकार मराठीत अधिक समृध्द पद्धतीने लिहिला गेला पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही प्रवास वर्णनवर लेखन केलेले आहे. स्त्रियांच्या प्रवासवर्णनाला जेथून प्रारंभ झाला त्या १९ व्या शतकापासून ते २१ व्या शतकापर्यंत स्त्रियांनी लिहिलेल्या प्रत्येक प्रवासवर्णनाला सर्जनशील दृष्टिने महत्व दिले गेले आहे. त्याचा परामर्श घेताना परिमाणांचा मुल्यतत्वाचा विचार येथे केलेला आहे. १८५० ते १९५० या कालखंडात स्त्रियांच्या ललित लेखनाचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे या कालखंडात स्त्रियांनी लिहिलेली प्रवासवर्णने फारशी आढळत नाहीत. १९५१—१९९० या कालखंडात बदलत्या सामाजिक स्थितीचा विचार काही प्रवासलेखनात झालेला दिसतो. १९९० नंतर साहित्य प्रवाहात मोठे बदल घडून आले मोठे स्थित्यंतर घडले त्याचा परिणाम साहित्य निर्मितीवर झाला. आधुनिकतेच्या या कालखंडात लेखिकांनी प्रवासवर्णनाकडे सर्जनशील दृष्टीने पाहिले. स्त्रियांनी लिहीलेली प्रवासवर्णने वाचताना 'प्रयोगशीलतेच्या खुणा प्रत्येक दशकात दिसतात.

## बीजशब्द

स्त्रियांचे प्रवासवर्णनपर लेखन, अर्वाचीन, सर्जनशील, प्रयोगशीलता, मुल्यतत्व.

## प्रस्तावना

ललितगद्याचा एक उपप्रकार म्हणजे प्रवासवर्णन होय. प्रवासवर्णनकाराने आपल्या स्वत:च्या शरीराने आणि मनाने केलेला प्रवासाचा; प्रवासात घेतलेल्या व आलेल्या अनुभवाचा आणि मनावर स्थळांदी गोष्टींचा झालेल्या संस्कारांचा स्मृतीरूपाने घेतलेला पुन:शोध शब्दरूपात सजीव करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजेच प्रवासवर्णन होय. असे अभ्यासक म्हणतात.

प्रवासवर्णन हे कथनात्मक असते. ते सर्वार्थाने आत्मानिष्ठ असते असेही म्हटले जाते. आत्मचरित्र लेखनात ज्याप्रमाणे मी सर्वत्र असतो तसाच 'मी' प्रवासवर्णनात येत असतो. जे पहिले, जे अनुभवले ते सांगताना वस्तुस्थितीजन्य असणे आवश्यक असते. प्रवासवर्णन लिहीणारी व्यक्ती प्रथम प्रवास करते व नंतर लिहिताना मनाने पुन्हा एकदा सारा प्रवास करते. त्यामुळे त्यात थोडे फार काल्पनिक वर्णन येऊ शकते प्रवासात लिहिलेली टिपणे नोंदी प्रसंगावेळची भावस्थिती वर्णन करताना त्या वेळच्या कल्पनांची नोंद ठेवावी लागते.

हा वाङ्मय प्रकार इंग्रजीतुन आपल्याकडे आला. प्रथम काही स्थळवर्णनपर पुस्तके लिहिली गेली. उदा. 'कोलंबसचा वृत्तांत' महादेवशास्त्री कोल्हटकर (१८४९), मुंबईचे वर्णन. गो.ना.मांडगांवकर (१८६३), १८८७ साली गोडसे भटजींनी लिहिलेले प्रवासवर्णन 'माझा प्रवास' (१९०७), साली प्रसिद्ध झाले. विसाव्या शतकात हा वाङमय प्रकार मराठीत अधिक समृद्ध पद्धतीने लिहिला गेला. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनीही प्रवासवर्णनपर लेखन केले आहे.

## मराठीतील स्त्रियांची प्रवासवर्णने

स्त्रियांच्या प्रवासवर्णनाला जेथून प्रारंभ झाला त्या १९ व्या शतकापासून ते २१ व्या शतकापर्यंत स्त्रियांनी लिहीलेल्या प्रत्येक प्रवासवर्णनाला सर्जनशील दृष्टीने महत्व दिले गेले आहे. त्याचा परामर्श घेताना परिणामांचा मूलतत्वाचा विचार करणे महत्वाचे आहे. मराठीतील स्त्रियांच्या प्रवासवर्णनांचा आढावा घेत असताना प्रवासवर्णनकार स्त्रियांच्या मागील प्रेरणा व प्रवृत्ती यांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. लेखिकांची जीवन दृष्टी, अनुभवविश्व

त्यांच्या जीवनात त्यांना मिळालेली प्रवासांची संधी या गोष्टीसुद्धा तितक्याच महत्वाच्या आहे. प्रवासवर्णनात स्त्रिने स्वत:च्या अनुभवविश्वातून हे चित्रण प्रत्यक्षरुपाने उभे केलेले असते यात थोड्याफार प्रमाणात मर्यादा येत असल्या तरी वास्तव व अनुभव यांचा आदर्शवाद यामध्ये येत असतो. स्त्रियांच्या अनुभव विश्वातून निर्माण झालेले हे साहित्य खूपच मौलिक आहे.

मराठीतील स्त्रियांच्या प्रवासवर्णनांचा आढावा घेत असताना मुख्यता एकोणिसाव्या, विसाव्या आणि एकविसाव्या शतकात कशा प्रकारे प्रवासवर्णने लिहीली गेली? या लेखनाची सुरुवात कोणत्या काळापासून सुरूझाली ? या लेखनाला गती कोणत्या काळात मिळाली ? याचा आढावा घेणे महत्वाचे आहे. या साहित्याची निर्मिती करताना स्त्रियांना अनेक प्रकारच्या परिस्थितीचा सामना करावा लागला. तसेच त्यांच्या अनुभवांचे चित्रण कसे झाले आहे. याचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

१८०० ते २०१५ या काळातील प्रवासवर्णनांचा आढावा घेत असता स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचा विचार करणे महत्वाचे आहे. कारण चूल आणि मूल सांभाळणारी स्त्री घराबाहेर पडणे ज्या काळात अशक्य होते त्या काळात स्त्रियांनी प्रवास करुन प्रवासवर्णनांचे लेखन करणे हे अशक्य प्राय गोष्ट होती. घराबाहेर पडणे ज्या समाजात स्त्रिला बंधनकारक होते तेथे प्रवास ही तर खूपच दुर्मिळ गोष्ट ''अर्वाचीन काळाच्या प्रारंभीच्या टप्प्यात लिहीणाऱ्या स्त्रियांच्या जीवनाची गाथा ही प्रतिकूल परिस्थितीने झाकोळलेली आघातांनी विवर्ण झालेली पण जिद्दीने आणि परिणामाने प्रकाशमान झालेली आहे. या स्त्रिया केवळ लिहिणाऱ्या नव्हत्या तर लिहिण्यासाठी जगणाऱ्या आणि जगण्यामुळे लिहिणाऱ्या होत्या त्यांनी लिहीलेल्या साहित्यात सहाजिक स्त्रीच्या जीवनगाथेचे संघर्षमय व यातनामाय चित्रण उमटलेले आहे.''१स्त्री स्वातंत्र्याचा विचार करता वरील विधान महत्वाचे आहे.

१८०० ते १८७४ या कालखंडात स्त्रियांनी लिहिलेले प्रवासवर्णन आढळून येत नाही. किंवा या वाङमयप्रकाराची उत्पत्ती वेगळ्या प्रकारात असावी. स्त्रियांसाठी या काळात लेखनाला सामाजिक परिस्थीती अनुकूल नसावी १८७५ ते १९१५ या कालखंडात पहिले प्रवासवर्णन लिहिणाऱ्या पंडिता रमाबाई यांचे 'इंग्लडचा प्रवास' भाग पहिला (१८८३) व 'युनायटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त भाग १. (१८८९) ही प्रवासवर्णने इतिहासाची साक्ष देतात. प्रवासवर्णनाची सुरुवात करणाऱ्या पंडिता रमाबाई यांच्या या प्रवासवर्णनाचे मोल अनन्य साधारण आहे.''ज्या काळात परदेशागमन म्हणजे पाप समजण्यात येत होते आणि त्यासाठी मोठे खर्चाचे प्रायश्चित्त घ्यावे लागत असे अशा काळात परदेशागमन आणि ते एका स्त्रीने हे तर केवढे क्रांतिकारक होते ! पंडिता रमाबाईचा दुर्दम्य ध्येयवाद आणि आशावाद त्यातून व्यक्त होतो.''२ पंडिता रमाबाई या प्रवासवर्णन लिहिणाऱ्या पहिल्या स्त्री लेखिका होत्या असा इतिहास सांगतो. स्त्रियांच्या प्रवासवर्णनाची मुहर्तमेड त्यांनीच रोवली असे म्हणता येईल.

१९०१ ते १९२० या कालखंडात स्त्रियांची तीन प्रवासवर्णने सापडतात सौ.'पार्वतीबाई चिटनवीस' यांचे 'आमचा जगाचा प्रवास' हे प्रवासर्वन आहे. हे प्रवास वर्णन महत्वाचे आहे. कारण जग फिरणारी पहिली मराठी स्त्री व प्रवासलेखिका म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. ''सौ.चिटनवीस यांचा प्रवास त्यांचे यजमान श्री. माधव चिटनवीस यांच्याबरोबर झाला आहे. २६ फेब्रुवारी १९११ रोजी सुरु केलेला हा जगाचा प्रवास २२ सप्टेंबर १९११ रोजी संपला आहे असे पहिल्या आवृत्तीच्या शेवटच्या पानावरुन कळते हा प्रवास बोटीने केला आहे.३ हे प्रवासवर्णन ३१६ पानांचे आहे. याच कालखंडात माईसाहेब घोरपडे यांचे 'आमचा विलायतचा प्रवास' व साळूबाई कलभंडे यांचे 'काशी यात्रा' हे प्रवासवर्णन याच कालखंडातील आहे.

१९२१ ते १९५० या कालखंडात स्त्रियांच्या प्रवास वर्णन लेखनात अल्पशी वाढझालेली आहे. ''काही लेखिकाही मराठीतील प्रवासवर्णनपर वाङमयाची अभिवृध्दी करण्यात सहभागी झालेल्या आहेत.''४असे मत अच्युत देशपांडे, मांडतात. याच कालखंडात अन्नपूर्णा सुगवेकर, कमला फडके यांची प्रवासवर्णने आहेत.

१९५१ ते १९९० या कालखंडातील स्त्रियांच्या प्रवासवर्णनांची संख्या वाढलेली आहे. स्वातंत्र्यानंतर काळात ही संख्या वाढलेली दिसते. सामाजिकतेचा परिणाम कदाचित झालेला असावा. स्त्री स्वातंत्र्य, सामाजिक स्थिती स्त्रियांची मानसिकता हे घटक कारणीभूत झाले असावेत यामध्ये सौ. अनुसयाबाई कामत, चारुशीला गुप्ते, विजया जोशी, शांता धांदरफळे, मृणालीनी देसाई, कमला फडके, मेधा काळे, नयना आचार्य, वसुधा गोखले, साधना कामत, उषा देशपांडे, गिरीजा किर, प्रतिभा रानडे, कुसूम नारगोळकर, सुषमा हर्लेकर, मुक्ता केणेकर इ. लेखिकांची जवळजवळ एकवीस प्रवासवर्णने आहेत. या कालखंडातील स्त्रियांची प्रवासवर्णने पहाता काहीसे भरघोस प्रयत्न झालेले दिसतात. परदेशातझालेला प्रवास व त्या प्रवासात आलेला अनुभव लेखिका प्रवास वर्णनात करतात

सामाजिक स्थित्यंतराचा प्रभाव नक्कीच स्त्रियांच्या मानसिकतेवर झालेला दिसून येतो. परदेशातील प्रवास व त्या अनुषंगाने प्रवासवर्णने पहायला मिळतात.

१९९० ते २०१५ या कालखंडातील प्रवासवर्णनांची संख्या जास्त आहे. जवळजवळ चाळीस पेक्षा जास्त प्रवासवर्णने या कालखंडात लिहीली आहे. सामाजिक घडामोडी, स्त्रियांचे शिक्षण, आधुनिकीकरण, स्त्रियांची मानसिकता आर्थिक स्वातंत्र्य, वैचारिक प्रगल्भता, धाडसीवृत्ती, माहिला सबलिकरण सामाजिक दृष्टिकोन नविन तंत्रज्ञान या सर्वाचा परिणाम झालेला दिसतो. १९९० नंतर साहित्य प्रवाहातही मोठे बदल घडून आले. मोठे स्थित्यंतर घडले आणि त्याचा परिणाम साहित्य निर्मितीवर झाला आधुनिकतेच्या या कालखंडात प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार वाचक वर्ग वेगळ्या दृष्टिकोनातून पाहू लागला या प्रवासवर्णनातस्त्रियांनी केलेल्या परदेशातील प्रवासाचे अनुभव मांडले बरीच प्रवासवर्णने ही परदेशातील स्थळांची अनुभवांची साक्ष देतात.

एक महत्वाचा प्रवासवर्णकार म्हणून मीना प्रभू या कालखंडातील आघाडीच्या लेखिका आहे. त्यांचे 'माझं लंडन' (१९९१) मध्ये प्रकाशित झाले त्यानंतर मीना प्रभू यांनी मराठीमध्ये सातत्याने प्रवासवर्णन लेखन केले त्यांची बारा प्रवासवर्णने प्रसिद्ध आहेत. ''अत्यंत उत्कट, भावस्वर्शो आणि तितक्याच रोमहर्षक प्रवासानुभवाचे वाचकांना मीना प्रभू आपल्या सोबत निरनिराळ्या देशांची भटकंती घडवून आणतात त्यांनी प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे प्रवासानुभवात रुपांतर करीत तब्बल बारा पुस्तके लिहून मराठी साहित्यात आपल्या वेगळा ठसा उमटवला आहे.५ स्त्रियांच्या प्रवासवर्णन लेखनात मिना प्रभुची प्रवासवर्णन आहे. या पुस्तकाला भरघोस प्रतिसाद मिळाला तसेच या पुस्तकाचे ब्रेल लिप्यांतर झाले या पुस्तकाला मा.शरद पवार यांच्या हस्ते 'कुकरी' हे मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले तसेच त्यांच्या मोक्सिकोपर्व व 'इजिप्तायन या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचा राज्यपुरस्कार तर दक्षिणरंग' या पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले मीना प्रभू यांनी एकटीने केलेला प्रवासाची प्रेरणा देणारी आहेत. एक महिला इजिप्त, इस्त्राएल, जॉर्डन, या सारख्या देशात एकटी प्रवास करते ही खरोखरच अभिमानास्पदबाब आहे. सर्वसामान्य मराठी वाचकाला साहित्याच्या माध्यमातून मीना प्रभू यांनी अनेक देशांचा प्रवास घडवून आणला हे एकप्रकारे मराठी वाचकाला प्रगल्भ बनविण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे हे योगदान आदरपूर्वक उल्लेख करण्यासारखे आहे.

१९९० नंतर मीना प्रभू प्रमानेच अनेक लेखिकांची प्रवासवर्णने प्रसिद्ध झाली आहेत. यातील बरीच प्रवासवर्णने ही परदेशातील अनुभवांवर अधारीत आहे. स्त्रियांनी केलेला परदेशातील प्रवास हा मोठ्या प्रमाणात आहे. या कालखंडात स्त्रियांची परदेशात जाण्याची संख्या एवढ्या प्रमाणात वाढली याची कारणे देताना प्रामुख्याने जाणवते ते म्हणजे स्त्रियांची उच्चशिक्षण घेण्याची मानसिकता, आर्थिक स्वातंत्र्य, उच्चशिक्षण व परदेशात स्थायिक झालेली त्यांची कुटूंब व त्यानिमित्त घडलेला प्रवास तसेच पतीच्या व्यवसायामुळे परदेशात ज्याण्याची संधी अशी बरीच कारणे देता येतील पर्यटनासाठी केलेला प्रवास व त्यातून लिहिलेले अनुभव मोठ्या प्रमाणात आहेत. भावनाशुन्य, चकोरीबद्ध जीवनाच्या रहाटगाड्यातून आत्माविश्वासाने पुढच पाऊल टाकत महिला आपला वेगळा ठसा उमटवत आहे. व त्याचे प्रतिबिंब या स्त्रियांच्या प्रवासवर्णनातून वाचकांच्या समोर येत आहे. स्त्री जीवनात विसाव्या शतकात मोठ्या प्रमाणात बदल झाले आहे. सर्वसामान्य स्त्री सुध्दा प्रवास करत आहेत. व आपले अनुभव शब्दबद्ध करत आहे. जुन्या परंपरा आणि विचारातून स्त्री मुक्त झाली आहे. त्यामुळे आत्मप्रकटीकरणाचा जोमदार प्रवाह ज्या वाङमय प्रकारात सहजपणाने उमटतो त्या साहित्य प्रकारात तिचे लेखन अत्यंत सरस झाले आहे. अत्यंत धीटपणाने आपले अनुभव ती या प्रवासवर्णनात मांडत आहे.

१९९० नंतरच्या प्रवासवर्णनामध्ये खालील स्त्रियांनी आपल्या लेखनातुन आपले आनुभव मांडले आहेत. त्यातील काही निवडक प्रवासवर्णने आहेत. त्यामध्ये 'पश्चिमगंध' धोंगडे आश्विनी 'गोठलेल्या वाटा' शोभाचित्रे, 'देशांतरीच्या गोष्टी सांगता' अजिता काळे, 'लेगॉसचे दिवस' शोभा बेंद्रे, 'सलाम बहारीन' हेमा लेले, पाहिलेला देश भेटलेली माणसे' मंगला नारळीकर, 'आनंद यात्रा'शुभांगी भडभडे,'अमेरिका आणि अमेरिकन्स' उषा प्रभुणे 'अफलातून ऑस्ट्रेलिया' जयश्री कुलकर्णी, 'अविस्मरणीय प्रवास' वैशाली पांढरीपांडे 'उर्मी प्रवासाची उदय अनुभवांचा निवर्गी उर्मी' 'मी अनुभवलेली अमेरिका निलीमा' पोतनीस, इ. लेखिकांची प्रवासवर्णने प्रसिद्ध आहे.

या प्रवासवर्णनामधून प्रवासात आलेले अनुभव लेखिकांनी शब्दबध्द केले आहे. प्रवासी या घटकतत्वानुसार प्रदेश हा सुद्धा महत्वाचे घटकतत्व आहे. त्या अनुषंगाने विचार करता स्त्रियांनी परदेशात प्रवास केलेला आहे. त्यामुळे वेगळा प्रदेश वेगळी माणसे त्यांनी पाहिली आहेत. त्या दृष्टिने आपल्या प्रवासवर्णनात त्यांनी आलेले अनुभव अगदी निर्भिडपणे शब्दबद्ध केलेले आहेत. व ते अनुभव वाचकांपर्यत प्रवासवर्णनाच्या माध्यमातून पोहचवले आहेत.

स्त्रियांच्या प्रवासवर्णनांचा आढावा घेत असताना लेखिकांनी केलेले प्रवासवर्णन त्यांच्या अनुभव विश्वातून साकार झालेले आहे. शिक्षणासाठी केलेला प्रवास, पर्यटनासाठी केलेला प्रवास, लेखिकांनी शब्दरुपात प्रवासवर्णनात शब्दबद्ध केलेला आहे. परंतु या प्रवासादरम्यान सर्व गोष्टींकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रत्येक लेखिकेचा वेगळा आहे. लेखिकेच्या विचारशक्तीनुसार, प्रतिभेनुसार आकलनानुसार त्यांनी आपले विचार प्रवासवर्णनात मांडले आहेत. प्रवासी प्रवास प्रदेश ही प्रवासवर्णनातील तीन घटकतत्वे आहेत. या घटकतत्वानुसार प्रत्येक स्त्रीचा प्रवासातील अनुभव व प्रदेशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे.

मराठीतील स्त्रियांच्या प्रवासवर्णनांच्या निर्मितीमागील प्रमुख प्रेरणांचे व प्रयोजनांचे धावते दर्शन घेतल्यावर आपल्याला असे लक्षात येते की या प्रेरणा विविध प्रकारच्या आहे. आणि त्या प्रेरणांमध्ये वेगळेपणा आहे. प्रवास करण्यामागे प्रत्येक स्त्रीची प्रेरणा वेगळी आहे. आणि तिच्या प्रगल्भ विचारातून प्रवासवर्णनांची निर्मिती झाली आहे.

## निष्कर्ष

- स्त्रियांच्या प्रवासवर्णंनात निसर्ग, अपरिचित देश पाहण्याची उर्मी, माणसांबद्दलचे प्रचंड कुतूहल, वैशिष्ट्यपुर्ण निवेदन पद्धतीचा अनुभव लिखित केला आहे.
- मराठी लेखिकांनी आपल्या प्रवासवर्णनातून वाङ्मय प्रकाराची चर्चा करुन त्याला आत्मकथनाची जोड दिली आहे.
- स्त्रियांनी केलेला प्रवास, त्यांची जिद्द, चिकाटी, सामर्थ्य इ. वैशिष्ट्ये प्रवासवर्णन वाचताना लक्षात येतात.
- सौदर्यात्मक अनुभव, सत्यकथांचाच आग्रह, मनाने घेतलेल्या प्रवासाचा अनुभव इ.चा अवलंब प्रवासवर्णनात केला आहे.
- प्रवासकथनात स्त्री विषयी जिद्द संस्मरणीय व्यक्तिरेखांचे रेखाटन, भाष्य वा मुक्त चिंतनाचा सहजस्कुर्त अवलंब केला आहे.
- स्त्रियांची ही प्रवासवर्णने नक्कीच प्रेरणादायी व विचारांना चालना देणारी आहेत.
- १९५० नंतर झालेली सामाजिक स्थित्यंतरे यामुळे परदेशप्रवास घडत गेला आणि त्यातून प्रवासवर्णनाची निर्मीती झाली.
- जगातील सातही खंडातील अनेक देशात प्रवास करणारी स्त्रीपण आहे हे नक्कीच अभिमानास्पद आहे.
- लेखिकेंच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू त्या प्रवासवर्णनपर लेखनात पहायला मिळतात.
- मुक्तचिंतनाचा सहजस्फूर्त अवलंब बहुतेक स्त्री लेखिकांनी प्रवासवर्णनात केला आहे.
- मनाला भावलेलं सौंदर्य सौदर्यसंक्त मनाने शब्दसौंदर्याने शब्दबद्ध केले आहे.

## संदर्भ


- खांडगे मंदा, भारतीय भाषातील स्त्री साहित्याच्या मागोवा खंड १ साहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुणे २००७ पृ.२८
- सावंत वसंत, प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मंत्रालय मुंबई १९८७ पृ.१९०
- तत्रैव पृ.२२४
- देशपांडे अच्युत नारायण, आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास भाग २ व्हीनस प्रकाशन पुणे १९५८ पृ.६०१
- डॉ भेण्डे सुभाष, साहित्य आधुनिक महाराष्ट्राची जडणवडण शिल्पकार चित्रकोश, हिंदूस्थान प्रकाशन संस्था मुंबई २००९ पृ.४१४


❖❖❖

# आदिवासी कवितेतील लोकजीवन

प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे
फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email: wawre123_66@rediffmail.com भ्रमणध्वनी ९४२१७७१७३३

1960 नंतर सर्व स्तरावरज्या सामाजिक, सांस्कृतिक उलथापालथी झाल्या, त्यातूनही आदिवासी साहित्याच्या संदर्भात अनेक नव्या समस्या व जाणीवा पुढे आल्या. 1960 नंतर दळणावळणाच्या साधनांमध्ये मोठी क्रांती झाली. त्यामुळे आदिवासींचा नागर जीवनात प्रवेश झाला. आदिवासीबहूल प्रदेशात लोकशाही व्यवस्थेतील राजकारणांमुळे आदिवासींच्या अस्तित्वाची प्राधान्याने दखल घेणे भाग पडले. आदिवासींबद्दल शासनाचे निश्चित धोरण ठरले. शासकीय यंत्रणा आदिवासीं पर्यंत पोहोचली. स्थानिक व्यापाऱ्यांकडून आदिवासींचे होणारे आर्थिक व मानसिक शोषण हे डाव्या विचारसरणीच्या चळवळकर्त्यांचा कार्याचा मुख्य विषय बनत गेला आदिवासी समुहातील नैतिक व लैंगिक स्वातंत्र्य, त्यांचे निसर्गनिष्ठ जीवन, आदिम कलाप्रकार, गूढ व रहस्यमय परंपरा, यावर चिंतनशील मानव्यशास्त्रातील संशोधकांचा अभ्यास सुरू झाला. आदिवासी अन्यायाच्या निमित्ताने दुर्गम प्रदेशात नक्षलवादी चळवळी सक्रीय झाल्या. मोठया धरणांच्या प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील आदिवासींचे स्थलांतर होत असल्याने त्याच्या विस्थापनातून निर्माण झालेल्या प्रश्नांची मानवाधिकाराच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर चर्चा सुरू झाली.आदिवासींचे त्यांच्या जन्म भूमित रूतलेली मुळे, विस्थापनामुळे येणारी सांस्कृतिक उपरेपणाची भावना, नागर जीवनाशी विविध पातळ्यांवरील संघर्ष, बदललेल्या जीवनशैलीत अस्तित्वाचा प्रश्न अशा अनेक वर्तमान जाणीवांनी मराठी साहित्य प्रभावित झाल्याचे लक्षात येते. अशा प्रकारे समकालीन जीवनाला वास्तवाच्या कठोर भूमिकेतून भिडणे हे साठोत्तरी साहित्याचे महत्वाचे लक्षण आदिवासी मराठी साहित्याचेही वैशिष्ट्य आहे.

आदिवासींचे असे कलात्मक जीवन दारिद्रयाने वेढलेल असले तरी आनंदाची त्यांना वान नाही. ईर्षा, कपट व छल याचा स्पर्श त्यांच्या जाणीवांना नाही. ही मनमौजी माणसे धुंद जगतात. व धरित्रीच्या पाठीवर सारे काही विसरून नाचतात, गातात, डॉ. सरोजिनी बाबर त्यांच्या विषयी लिहितात—"...रंगीबेरंगी पानाफुलांच्या नेत्र दिपक झुपक्यांची मनोहारी नि देखणी सजावट अंगाखांद्यावर धारण करणाऱ्या महावस्त्रीना राजीखुशीने पेटलेल्या दऱ्याखोऱ्यातील दुनिया म्हणजे आदिवासींची दुनिया शहरांपासून लांब, दूरवर असलेल्या खा दुनियेतील माणसं होसीमजेने ऐसपेस मैदानात येवून नाचायला व गायला लागली म्हणजे धरित्रिच्या अंगावर समाधानाचे रोमांच फुलू लागते. अशावेळी पहाडी मुलूखातील मंद शितल वारा शिळ घालीत धावून येतो. पानांफुलांमधील सळसळ पार्श्वसंगीत उभे करते...मग निजायला धरित्री उशीला धोंडा अन् पाघरायला आभाळ घेत मगनिसर्गाच्या कुशीत वावरतांना ही मंडळी एवढी आनंदी कशी...याचं कोडं काही केल्या सुटता सुटत नाही...

अशी आदिवासींची ही निगर्वी दुनिया अद्‌भूताचे पंख ल्यालेली गर्धवकन्या, ती देखनी तसेच मोहमयी आहे" वरील सर्व आदिवासी जीवनाचा आढावा घेतांना त्यांच्या जीवनावरील काव्यमयतेचा विचार करणे सुद्धा अगत्याचे आहे. मराठी आदिवासी कवितेचे जवळजवळ चार दशकाची वाटचाल आहे. ती एवढी पण तरूण नाही पोक्त होत आहे...समंजस होत आहे...आता तरूणाईतली आक्रमकता जरी राहिली नसली तरी तिच्यातला जोम, उत्साह, असला तरी तिच्यातील आक्रमकता आपणसामाजिक दृष्टीने पाहणे अगत्याचे आहे तरच तिचे मूल्यांकन करणे शक्य होईल.आज आदिवासी कविंच्या शब्दात एक निर्णायक विश्वास दिसतो आहे, हजारो वर्षाच्या गिरीकुहरात वास्तव्याचा तो प्रतिध्वनी असावा आजच्या या समाज व्यवस्थेच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतीक, शैक्षणिक व्यस्थेने आदिमांच्या उत्थानांची सारी दारे बंद केली आहेत. जंगल म्हणजे जणूकाही गावकुस करून टाकले आहे. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे.त्यांचा

वापर फक्त आणि फक्त राजकारणांसाठी केला आहे. आज आपण आदिवासींच्या सामाजिकतेचा जेव्हा विचार करतो तेव्हा सामाजिकता त्यांच्या कवितेचा आत्मा आहे असे जाणवते.द्रोणाचार्याने एकलव्याचे गुरूत्व नाकारले म्हणून तो थांबला का नाही तर त्याने द्रोनाचार्याचा निष्ठापूर्वक मातीचा पुतळा उभारला आणि आपली निष्ठा पूर्वक आपले लक्ष्य काबीज करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि त्यात तो यशस्वी पण झाला...पुढे ही बाब सनातन व्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या द्रोनाचार्यास खटकली त्यामुळे त्याने त्याला आपला अंगठा मागितला...एकलव्याने पण आपला अंगठा गुरूदक्षणा म्हणून मोठया मनाने देवून दिला हे औदार्य फक्त आदिवासींमध्येच असू शकते हे लक्षात घ्यावे लागेल. या घटनेमुळे मात्र प्रस्थापितांचा कावा ओळखण्याची एक दिशा एकलव्याने आदिवासी समुहाला दिली या संदर्भात आपल्या काव्यामधून आदिवासी कवी तुमराम आपली भावना व्यक्त करतात—

"वनजीवनाच्या पोटी
तुझ्या धनुर्धारी आयुष्याचा,
क्रूर तेजोमय तू ठरला आहेस माझ्यासाठी
विद्रोहाचा कुळारंभ..."

आणि हो यापुढे कुठलाही एकलव्य आपला अंगठा देणार नाही असा मूल्यगर्भित इशारा कवी या कवितेतून देतो आहे. या देशातील शेवटच्या माणसाचा भूकेचा प्रश्न भीषण आहे. कारण ही नागरी व्यवस्था दिवसेदिवस जंगलतोड करतांना दिसते आहे कडेकपारात राहणारा आदिवासी बांधव आपल्या कुटूंबाचे पालनपोषणाचे सूत्र जंगलाला माणते. त्याची अशी धारणा आहे पण आज या जंगल वस्तीत निसर्ग बाद झाला आहे, प्रचंड जंगलतोडीचा भीषण परिणाम आता आदिवासींवर होतो आहे. निसर्गाला आपले अस्तित्व टिकून ठेवायला कठीण जात आहे. अशा या भीषण परिस्थितीचा परिणाम किती गंभीर आहे याचे अतीव दुःख वाहरू सोनवने आपल्या काव्यात व्यक्त करतात—

"...कंद नाहीत मूळं नाहीत
ती केव्हाच संपून गेलीत,
अफाट भूकेच्या खपाट पोटात...."

आज आदिवासी विस्थापित झाला आहे त्यासाठी येथील व्यवस्था जबाबदार आहे असा आरोप होतो आहे आणि तो खरा पण आहे. आदिवासींचे पोट पाठीला टेकले आहे तरी त्याची भूक मात्र युगायुगाची आहे असा सजग आशय कवी अभिव्यक्त करतो आहे. स्वातंत्र्याच्या रणसंग्रामात देशातील सर्वच भागातल्या आदिवासी समाजबांधवांनी आपल्या प्राणांची आहूती दिली तसेच सक्रीय योगदान पण दिले. ज्यांनी आपले संबंध आयुष्य इंग्रजसत्तेचे जोडे चाटण्यात घालविले तशांच्या तसबिरी इथल्या चार भिंतीच्या छाताडावर गोचिडाप्रमाणे चिकटविलेल्या दिसतात तेव्हा अतिव दुःख होते आणि ज्यांनी आपले आयुष्य देशाच्या स्वातंत्र्या करीता घालविले, जे बर्बाद झाले, शहीद झाले त्यांना इथली व्यवस्था देशद्रोही म्हणून नाकारते, त्यांच्या कर्तृत्वाची काळी नोंद करते मात्र आज भूजंग मेश्राम सारखा कवी या शूर विरांना आपल्या काव्यातून मांडतो ते वास्तव बघा—

"....थडग्यावरच्या दगडांना वाचा आली तर
तुमची किती होईल पंचाईत,
अजूनही घ्या ओळखून
स्वातंत्र्याच्या रक्त नदीला सराईत..."

यावरून असे दिसते की, इतिहास लिहिनारे हात देखील शोषकांचे प्रतिनिधित्व करणारे होते. म्हणूनच हा खेळखंडोबा झाला आहे. असा दावा सुद्धा हा कवी करतो. भूजंग मेश्राम हे आदिवासी कवितेतलं फार सकस असा आविष्कार असणारं नाव आहे. नव्या युगाचा दमदार युगसाक्षी म्हणून भूजंगाची कविता महत्वाची आहे. या समाजातील अरिष्ट प्रथांवर प्रहार करतांना हा कवी लिहितो—

"विवाह संस्थेवरच टाका अनुबांब
बडव्यांचे मट्ठ अड्डे उध्वस्त करून टाका,

अन्न गोळा कराया शिका
अस्मितेच्या निरागसतेला मार हाका...."

आमची चळवळ ही पुरोगामीत्व जपणारी आहे, तसाही तिला वैश्विक अर्थ आहे. विचार आहे मात्र प्रस्थापित व्यवस्था ही पिढयापिढया सुशिक्षित असूनही सुसंस्कृत नाही याची खंत व्यक्त करतांना कवी म्हणतो—

"...आमच्या फाद्यांनी ग्लोबल गाणी म्हटलीत
घट्ट रूतलेल्या मुळांना केव्हाच पाय फुटतील..."

आदिवासी कवितेतलं मोठ नाव वाहरू सोनवने दमदार कवितेतू व्यकत होतोत— आपल्या आदिवासी अचाट शक्तीची त्याला जाणीव आहे. तसा आत्मविश्वासही त्याच्या जवळ आहे.मात्र आज या शक्तीला योग्य दिशा दिली तर...आज क्रांती प्रवण विचारांना स्विकारल्याशिवाय मन्वंतर अशक्य आहे.याबाबचे विचार अत्यंत प्रभावी पणे कवी मांडतो—

"....कंटाळवाण्या जीवनाला कापण्याची
शक्ती तुझ्यात आहे,
शक्तीला धार नसेल तर
उपयोग काय...?"

आदिमांना साऱ्याच बाजूने कोंडीत पकडून नाचविण्याचा एकसूत्री उद्योग इथल्या प्रस्थापितांनी सुरू केलेला आहे त्यवर उपरोक्त प्रतिक्रिया आपल्या काव्यातून आपली भूमिका वाहरू सोनवने मांडतात. पुरोगामी क्रांतीबळ आत्मसात करून आपल्या लेखणाची वहिवाट चोखाळणाऱ्या कृष्णकुमार चांदेकर यांची कविता थेट पणे आपलं प्रखर असं वास्तव वेदना कवितेतून मांडतांना दिसतात. त्यंची कविता सामाजिक समस्येवर प्रहार करतांना दिसते. त्यांची कविता चिंतनशील आहे तशीच समाजाचं भीषण वास्तव मांडतात. प्रतिगामी चष्मा लावलेले प्रतिगामी लोक कशी बेगडी आहेत याचाही ते समाचार घेतांना दिसतात. प्रतिगामी विरूद्ध पुरोगामी असा सरळ संघर्ष त्यांच्या कवितेत दिसतो.

"...माझ्या माय बहिणी संस्कृतीचीच्या नावावर
दिडफेंडी नेसतात, तेव्हा काही संधीसाधू
कलात्मकतेच्या नावावर कॅमेरे ऑन करतात..."

या अत्यंत भेदक अशा ओळींमधून व्यवस्था दोन वर्गातील स्त्रियांमध्ये कसा भेद करते. 'आपले ठेवावे झाकून, दुसऱ्याचे पहावे वाकून' ही प्रवृत्ती ते आपल्या काव्यातून दाखवितात. जर आपल्या कलाकारांना कलेचा एवढा सोस आहे तर त्यांनी जंगलात न जाता आपल्याच माय—बहिनींना अशा रूपात पहावे असा सवाल ही कवी करतो.ही व्यवस्था विध्वंसाची भाषा शोषण मूल्यांच्या विरोधात चांदेकर समर्थपणे व्यक्त करतात—

"...अरे बायकोला खाटेवर घेणं
म्हणजे विज्ञानवाद,
आणि बायकोला बुवाकडे
नेणं म्हणजे देववाद...'

या कवितेतून ढोंगी सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणविणाऱ्या देववादी समाजाला दुटप्पी वागणाऱ्याचा बुरखा चांदेकर फाडतात. विज्ञान आणि अध्यात्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचाकांगावा काही मंडळी करतांना दिसतातइतकेच नव्हे तर अध्यात्मात विज्ञान शोधणाऱ्या महाभागांना ते दोन्ही मधला फरक आपल्या जळज़ळीत विद्रोही कवितेतून मांडतांना दिसतात.

आज आदिम समुहावर कुठल्या एका समाज समुहाने अन्याय, अत्याचार, शोषण केले नाही तर गावकुसाच्या आतील समुहाने सर्वच जाती समुहांनी आम्हाला बहिष्कृत केले, समजून घेतले नाही ही खंत कविला आहे.

"राकुसाच्या आसऱ्यात पोटासाठी भक्ष्य शोधणारी
आम्ही धरतीची लेकरं, हाकच दिली नाही कधी आम्हाला
गावकुसाच्या आतील निष्ठूर सावल्यांनी...."

आजही गिरीकुहरात, पाडे–पाळ्य राहणाऱ्या आदिवासींना नवनव्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या शोधांमुळे मिळत असणाऱ्या कुठल्याही सुविधा मिळत नाहीत. दुर्गम भागात शाळा दवाखाने नाहीत अन् अशात नक्षलवाद्यांची चळवळ दुर्गम परिसरात फोफावलेली आहे. तिथे वास्तव्यास असलेल्या आदिवासींना नक्षलवादी असल्याचा ठपका ठेवून पोलीसांचा ससेमिरा त्यांच्या पाठीमागे असतो. प्रसंगी खोट्या चकमकी दाखवून पोलीसी चौकशी अशा भयावह वातावरणात जीव मुठीत ठेवून त्यांनाजगावे लागते–

'मरणाच्या धाकाने किती दिवस लपत फिरू
जीव असेपर्यंत माणुसकीची लढाई लढाविच लागेल...'

अनाठायी छळणाऱ्या व्यवस्थेविरूद्ध बंड करण्याची भाषासदर कविता करते. पुढच्या पिढ्यांचे आयुष्य भविष्य सुकर करण्यासाठी स्वतःच्या पिढयांचे बलिदान देण्याचा संदेश ही कविता देवून जाते. धर्ननिपून एकलव्याचा अंगठा मागणाऱ्यांचे  विरुद्ध एल्गार अनेक आदिवासी कविंनी आपापल्या कवितांमध्ये पुकारले आहे. त्यातीलच एक कवी पुरूषोत्तम शेडमाके म्हणतात–

"तिर धनुष्यास लावून
भुंकत येणाऱ्याचे तोंड बंद करू
हे युद्ध समजून...."

या देशाचे मालक असलेल्या आदिमांवर इथली व्यवस्था अन्याय काते त्यांचे शोषण करू पाहणाऱ्या मतलबी व्यवस्थेचे गणिमी कावे ओळखून त्यांना सावधानतेचा इशारा सेडमाकेंची कविता देते, वनसूर्य या काव्यसंग्रहात सामाजिक क्रांतीप्रवण विचारांची पखरण असणाऱ्या विद्रोही कविता मोठ्या प्रमाणात आहेत–

भूमिगत  होतील तुमचे स्वप्न संकल्प
अन् महाल फक्त,
विझलेल्या डोळ्यांनी इथं
सत्तेचा नवा जन्म नवा शुभारंभ..."

'एडका आत्राम' नावाचा कार्यकर्ता नक्षलवाद्यांचा हस्तक समजून, नव्हे नक्षलवादी कार्यकर्ता समजून पोलीसांनी ठार केले. त्याच्या मरणावर अनेकांनी निषेध नोंदविला अेड. एकनाथ साळवेंनी बिजू एडका आश्राम नायक दाखवून जिवंत चित्रण असणारी 'एनकाउंटर' नामक कादंबरी लिहिली त्या एडका आत्रामला संबोधून आपले हृदयस्थ मनोगत मांडतांना कुसुम अलाम ही कवयित्री म्हणते–

'कोणते स्वप्न मागत होतास उसणे
इथल्या उन्मत्त नितीला,
तू का भूईला भार झाला होतास...'

अशा कितीतरी कविंनी आदिवासी लोकजीवनातील व्यथा आणि वेदनाांचा प्रखर आणि जीवंत आलेख मांडलेला आहे.

माणसाला त्याच्या जगण्याचा दर्जा मिळावा ही भूमिका माधव सरकुंडे यांनी मांडली असून प्रचलित समाजव्यवस्थेत जर आमच्या भूमिकेला समजून घेतले नाही तर'एल्गार' करण्याची भाषा त्यांची कविता करतांना दिसते. आदिवासींबद्दल कळवळा दाखविणारी काही तथाकथीत मंडळी या देशात खूप आहेत. आदिवासीं च्या यातना व वेदनांवर खोटी फुंकर घालणारे व त्यांच्या नावावर फक्त देखावा करणारी मंडळी या देशात खूप आहेत त्याबद्दल सुनिल कुमरे लिहितात–

'वाटेल तसे गोंजारणे आता टाळले पाहिजे
तुमच्या मतलबी अश्रूंची दूनिया जाळली पाहिजे...'

'तिरकमठा' नामक काव्यसंग्रहाच्या निमित्ताने कवितेच्या क्षेत्रात कुमरे यांचे पदार्पण झाले. व्यवसायाने शिक्षक असलेल्या सुनिल कुमरे आपल्या स्पष्ट भूमिकेतून वरील विचार अभिव्यक्त करतात.

महानगरीय पर्यावरणात वाढलेली आदिम कविता असे ज्यांच्या कवितेसंदर्भात म्हणता येईल त्या संघजा मेश्राम यांच्या कवितेची उंची निश्चितच मोठी आहे. आदिवासी दीन, दलितांच्या

उत्थानासाठी शासकीय अनुदानावर चालणाऱ्या पुरोगामी चळवळीचा बुरखा फाडतांना त्या म्हणतात–

“कुठल्याही डोहाजवळ लावावी विटांची भट्टी
तसं हे महानगर आणि मुक्तीच्या गोष्टी...”

आदिवासी स्त्रीला क्रांतीकारी विचारांचा स्वीकार करणे अत्यावश्यक आहे.तेव्हाच तिच्या जिण्यात मन्वंतर शक्य आहे. चळवळीत तिनं उपाशीपोटी राहून कसं काम करावं? म्हणून तिंनं स्वतःच एक चळवळ आत्मपातळीवर उभारली, क्रांतीगर्भ धारण करावेत म्हणून उषाकिरण आत्राम आपल्या कवितेत म्हणतात–

“होयाचं असल तू पयसाची लाल आग हो
गुलला–गुल्याच्या डोक्यात,
फडकवलं कोया अंगार, थोच तुझा सिंगार...”

बाह्यसौंदर्यापेक्षा विचारसौंदर्य जीवन सुंदर बनविण्याकरिता महत्वाचे आहे. असा अत्यंत मोलाचा विचार उषाकिरण आत्राम आपल्या काव्यातून देतात. मराठी आदिवासी कवितागेल्या तीन दशकापासून मराठी कवितेच्या क्षेत्रात वेगवेगळ्या आयडिंटीटीने मान्यता पावली आहे. मात्र सातत्याने लिहिण्याची वानवा या क्षेत्रात आहे. तद्वतच अनेक नवीमंडळी निष्ठेने लिहित असली तरी प्रकाशक मिळणे कठीण म्हणजे ‘उंबराचे फूल’ शोधण्यातला प्रकार आहे. आर्थिक विवंचना आणि बेकारीतल्या आयुष्यामुळे अनेक कविंची पुस्तके बाजारात येत नाहीत तरीही बाबाराव मडावी, सुरेश गेडाम, वसंत कनाके, विजय मडावी, सुरेश धनवे, राजगडकर यांचे लेखन भविष्यात पुस्तक रूपाने येणार असून ते वेगवेगळ्या आशाआकांक्षा, नवे प्रश्न नव्या जाणीवा समृद्ध करून वनवी काव्यकळा दैनिक व नियतकालिकांच्या माध्यमा तून मांडताहेत ही निश्चितच आदिवासी कवितेच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे.

❖❖❖

# भटक्या विमुक्तांचे साहित्य स्वरूप व भूमिका

प्रा. मिथुन सदाशिव शेळके
कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, वाकड, पुणे, महाराष्ट्र (India)
निवास: व्यंकटेश मेडिकल, महात्मा फुले नगर, भोसरी, पुणे ४११०३९
Email: mithunshelke@ccspune.in भ्रमणध्वनी ८८०६९२१६४९

## सारांश –

१९६० नंतर उदयास आलेल्या भटक्या–विमुक्तांच्या साहित्यामधून आपणाला भटक्या–विमुक्त समाजातील व्यथा–वेदनांचे, भटक्या–विमुक्त समाजातील अडचणींचे,समस्यांचे चित्रण झालेले दिसून येते.तसेच भटक्या–विमुक्त समाजातील आचार–विचार,संस्कृती,जीवनपद्धती, श्रद्धा, अंधश्रद्धा, चालीरीती, परंपरा, राजकीय परिस्थिती, शिक्षण, व भटक्या समाजाला पोट भरण्यासाठी सहन करावा लागणारा अन्याय, अपमान व फसवणूक याचे चित्रण झालेले दिसते. भटक्या विमुक्त साहित्य लेखनामागची महत्त्वाची भूमिका म्हणजे भटक्या विमुक्त समाजाला प्रस्थापित समाज व्यवस्थेमध्ये माणूस म्हणून जीवन जगता आले पाहिजे. भटक्या समाजाला स्वत:च्या हक्काचे घर व जमीन मिळाली पाहिजे.भटक्या समाजाला कायमस्वरूपी एका ठिकाणी स्थिर होऊन जीवन जगता आले पाहिजे .भटक्या समाजावर होणारा अन्याय व अत्याचार थांबला पाहिजे. प्रस्थापित समाजाचा भटक्या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक स्वरूपाचा असला पाहिजे. भटक्या समाजावर होणाऱ्या अन्यायाची प्रस्थापित समाजाला जाणीव करून देणे व यातून भटक्या समाजाला न्याय मिळवून देणे ही भूमिका असलेली दिसून येते.

## बीजशब्द –

भटक्या विमुक्त साहित्याचे वेगळपण– त्यात येणाऱ्या बोलीभाषेत आहे.
भटक्या समाजाच्या मुख्य ४२जाती–जमाती आहेत.
भटका – पोटासाठी गावोगावी भटकणारा समाज.
भटक्या साहित्याचे उद्दिष्ट– भटक्या समाजाला न्याय मिळवून देणे.
भटक्या–विमुक्त जाती– ब्रिटिशांनी ठरविलेल्या गुन्हेगारीतून भारत सरकारने मुक्त केलेल्या जाती.
भटक्या जमाती– पोट भरण्यासाठी गावोगाव भटकणाऱ्या जमाती.
भटक्या–विमुक्तांचे साहित्य– भटक्या समाजाच्या व्यथा–वेदना व जीवनशैली स्पष्ट करते.

## विषय विवेचन –

मानवी जीवनात साहित्याला खूप महत्त्वाचे स्थान आहे. कारण समाजात घडत असलेल्या विविध बदलांचे चित्रण साहित्यामधून आपणाला अनुभवयास मिळत असते. त्यामुळेच साहित्याला समाजाचा आरसा असे म्हटले जाते.मराठीतील विविध साहित्य प्रकारांतून आपणाला समाजात घडत असलेल्या विविध बदलांचे चित्रण स्पष्ट झालेले दिसते.१९६० नंतर मराठीमध्ये अनेक साहित्यप्रवाह उदयास आले. यामध्ये प्रामुख्याने दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, यासारख्या विविध साहित्य प्रवाहांची मराठीमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा झालेली दिसते. या साहित्य प्रवाहांनी आपले स्वरूप, आपली उद्दिष्टे, आपली भूमिका, आपली प्रयोजने स्पष्ट केलेली दिसतात. याच कालखंडात मराठी साहित्यात भटक्या विमुक्तांचे साहित्य देखील उदयास आले. सर्वसाधारणपणे १९८०दशकात भटक्या–विमुक्त समाजातील तरुण शिक्षित वर्गाने प्रस्थापित समाजात जीवन जगत असताना आलेल्या विविध अनुभवांचे चित्रण भटक्या–विमुक्त साहित्यातून मांडण्यास सुरुवात केली. तसेच भटक्या– विमुक्त समाजातील कार्यकर्ते यांनी देखील भटक्या समाजातील विविध प्रश्न,भटक्या समाजातील अडचणी समस्या व्यथा–वेदना सरकार पुढे मांडण्यास सुरुवात केली. याचाही मराठी साहित्यावर परिणाम झाला. अशा वेळी समाजातील वाचक, अभ्यासक, विचारवंत, लेखक पूर्णपणे गोंधळून गेला. कारण भटक्या समाजातील तरुण वर्ग आपले अनुभव साहित्य लेखनातून मांडू लागल्यामुळे एका अनोख्या समाजाची,त्या समाजातील व्यथा–वेदनांची, प्रश्नांची, अडचणी व समस्यांची ओळख त्यांना होऊ लागली.मराठी साहित्यात भटक्या

समाजातील तरुण शिक्षित वर्ग स्पष्टपणे आपले मत मांडू लागल्यामुळे मराठी साहित्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील घेण्यात आली. एक प्रकारे मराठी साहित्याला समृद्ध करण्यासाठी किंवा मराठी भाषेचे ज्ञान भंडार विकसित करण्यासाठी भटक्या विमुक्तांचे साहित्य महत्त्वपूर्ण ठरलेले आहे.

भटक्या–विमुक्तांच्या जाती–जमाती विषयी विचार करताना असे स्पष्ट होते की, ज्या भटक्या जातींना गुन्हेगार जमात म्हणून ब्रिटिशांनी घोषित केले होते. आणि भारत सरकारने यातून १९५२ साली ज्यांची यातून सुटका केली ते पुढे विमुक्त जाती या नावाने ओळखले जाऊ लागले. यात महाराष्ट्रातील प्रामुख्याने बेरड, रामोशी, कैकाडी, भामटा, कंजारभाट, बंजारा, राजपारधी, रामोशी, वडार, वाघरी, फासेपारधी, यासारख्या जातींचा समावेश करण्यात आला आहे. तसेच या विमुक्त जाती शिवाय पोट भरण्यासाठी गावोगाव भटकून पोट भरत असलेल्या जमातींना भटक्या जमाती म्हणून ओळखण्यात येऊ लागले. यामध्ये प्रामुख्याने बेलदार, गोसावी, भुते, गारुडी, घिसाडी, गोंधळी, जोशी, गोपाळ, कोल्हाटी, मसनजोगी, पांगुळ, रावळ, नंदीवाले, ठाकर, वैदू, वासुदेव, भोई, बहुरूपी, ओतारी, घ्यारेकंजर, यासारख्या भटक्या जमातींचा समावेश करण्यात आला. महाराष्ट्रात भटक्या समाजाच्या एकूण ४२ मुख्य जाती–जमाती मानल्या जातात. यात १४ विमुक्त जाती व २८ जमाती आहेत. या सर्व जाती–जमातींचे व्यवसाय, संस्कृती, कला, बोलीभाषा, देव–देवता, सणवार, उपासना, उत्सव, उपजीविकेचे मार्ग, उपजीविकेची साधने वेगवेगळी आहेत.या सर्वांचे चित्रण भटक्या–विमुक्त साहित्यातून अनेक लेखकांनी परखडपणे मांडलेले आहे. यामधून आपणाला भटक्या–विमुक्त समाजातील विविध जाती–जमातीतील जीवन पद्धतीचे चित्रण घडते.

भटका समाज म्हणजे पोटासाठी गावोगाव भटकणारा समाज होय असे सर्वसाधारण पणे भटक्या समाजाविषयी म्हटले जाते. भटक्या समाजाविषयी बोलताना शंकरराव खरात म्हणतात "ज्यांना स्वत:चे गाव नाही, राहायला घर नाही, कसण्यासाठी शेती नाही, कायम उत्पन्नाची साधने नाहीत, पोट भरण्यासाठी सतत गावोगाव भटकणाऱ्या, भिक्षेवर जगणाऱ्या, विविध जातीच्या नावाने जीवन जगणाऱ्या लोक समूहाला भटके असे म्हणतात". १त्याचप्रमाणे प्रभाकर मांडे म्हणतात "चित्र विचित्र वेशभूषा करणाऱ्या जमाती, तोंडावर भडक रंग लावणाऱ्या व बैल (नंदी) सोबत घेऊन भीक मागणाऱ्या जमाती, तसेच जंगली जडी–बुटी, औषधे देऊन पोट भरणाऱ्या जमाती, जादूटोणा करणाऱ्या जमाती, भविष्य पाहणाऱ्या जमाती, कसरती करून पोट भरणाऱ्या जमाती इत्यादी जमातींना भटक्या–विमुक्त जमाती असे म्हटले आहे."[२] तसेच दौलतराव भोसले भटक्या समाजाविषयी म्हणतात "उदरनिर्वाहकरिता निवडलेल्या अगर वाट्यास आलेल्या व्यवसायानिमित्त, अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणाऱ्या लोकांना भटके म्हणतात."[३] एकूणच अनेक साहित्यिकांनी भटक्या समाजाविषयी आपली वेगवेगळी मते मांडणी आहेत यातून आपणाला भटका समाज म्हणजे नेमके कोण हे समजण्यास मदत होते.

फार पूर्वीपासूनच समाजात भटक्या समाजाचे अस्तित्व असलेले दिसून येते, परंतु आज देखील भटक्या समाजाचा म्हणावा तसा विकास झालेला नाही.भटक्या समाजाच्या व्यथा–वेदना, प्रश्न संपलेले नाहीत. त्यांना प्रस्थापित समाजात चांगलेपणाची वागणूक मिळत नाही. त्यांना नेहमी अपमान अन्याय व पोट भरण्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो. भटक्या समाजाच्या प्रगतीसाठी अनेक महापुरुषांनी सतत प्रयत्न केले.भटक्या समाजाच्या विकासासाठी अनेक कायदे केले मात्र याची योग्य ती अंमलबजावणी होत नसल्यामुळे भटक्या समाजाची आजही वाताहत होत आहे. याचेही चित्रण भटक्या–विमुक्त साहित्यातून स्पष्ट झालेले दिसते. यासंदर्भात भटक्या विमुक्त समाजातील लेखक रामचंद्र नलावडे म्हणतात "महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज यांनी तळागाळातील समाजासाठी आपलं आयुष्य वेचलं. भागीरथ प्रयत्न करून अनेक कायदे उपेक्षित समाजाच्या उन्नतीसाठी पास करून घेतले. दुर्दैवाने त्या कायद्यांची अंमलबजावणी आजपावेतो योग्य प्रकारे होऊ शकली नाही. जाचक क्लेशदायक अटींमुळे त्याचा दलित समाजाला, विशेष भटक्या विमुक्त जमातींना उपयोग झाला नाही."[४]

प्रस्थापित समाजातील दलितांपेक्षाही दु:खाची तीव्रता टोकदार व व्यापक असणाऱ्या भटक्या लोकांचे जीवन भटक्या–विमुक्त साहित्यातून व्यक्त झालेले दिसते. लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, भीमराव जाधव, रावजी राठोड, भीमराव गस्ती, विमल मोरे, संतोष पवार, अशोक पवार, मातेराव जाधव, रामचंद्र नलावडे, रामनाथ चव्हाण, विभावरी शिरूरकर, त्रिंबक नारायण आत्रे,अशा अनेकांनी भटक्या समाजाचे जीवन भटक्या–विमुक्त साहित्यातून स्पष्ट केले आहे. भटक्या विमुक्त जाती–जमातीतील अनेक लेखकांनी आपल्या लेखनाची सुरुवात आत्मकथन या साहित्य प्रकारातून केलेली दिसते. आत्मकथन या साहित्य प्रकाराप्रमाणेच कथा, कादंबरी, कविता, नाटक, ललित

गद्य, वैचारिक लेखन, अनुभव कथन, व्यक्तिचित्र, संशोधनपरग्रंथ या सारख्या साहित्य प्रकारातून देखील भटक्या विमुक्त समाजातील लेखकांनी भटक्या समाजाच्या जीवनशैलीचा परिचय करून दिला आहे. एकूणच भटक्या–विमुक्त साहित्यातील आत्मकथन, कथा, कविता, कादंबरी, नाटक, ललित गद्य, वैचारिक लेखन, अनुभव कथन, व्यक्तिचित्र, संशोधनपर ग्रंथ, साहित्यप्रकारातून भटक्या समाजाचे जीवन त्यांच्या व्यथा–वेदना ,त्यांचे आचार विचार, त्यांची बोलीभाषा समजण्यास मदत होते.

भटक्या–विमुक्त साहित्यातून मानवी भावभावनांचे चित्रण करण्यापेक्षा प्रस्थापित समाज व्यवस्थेत भटक्या समाजाला भोगावे लागणारे दु:ख, वेदना, आपमान, अन्याय, होणारी फसवणूक याचे चित्रण झालेले दिसते. त्यामुळे भटक्या–विमुक्त साहित्याच्या निर्मितीमागची भूमिका ही समाजाचे केवळ मनोरंजन करणे नसून प्रस्थापित समाजाने भटक्या समाजावर केलेल्या अन्यायाविरुद्ध वाचा फोडणे, भटक्या–विमुक्त समाजाला जागृत करणे, प्रस्थापित समाज व्यवस्थेला विचार करण्यास भाग पाडणे,भटक्या विमुक्त समाजाला प्रस्थापित समाजव्यवस्थेमध्ये माणूस म्हणून जीवन जगता आले पाहिजे, प्रस्थापित समाजात असलेली जातीयता नष्ट करणे, भटक्या समाजाला कायमस्वरूपी एका ठिकाणी स्थिर जीवन जगता आले पाहिजे, भटक्या समाजाला स्वत:च्या हक्काचे घर,जमीन मिळाली पाहिजे, या समाजाला दोन वेळचे पोटभर जेवण मिळाले पाहिजे, भटक्या समाजाला कामाची शाश्वती मिळाली पाहिजे, शासन पातळीवर ज्या योजना राबवल्या जातात त्याचा प्रत्यक्ष फायदा भटक्या समाजाला मिळाला पाहिजे. यासारख्या विविध भूमिका भटक्या–विमुक्तांच्या साहित्यनिर्मिती मागे असलेल्या दिसून येतात.

भटक्या–विमुक्त साहित्यातून भटक्या–विमुक्त समाजातील रूढी, परंपरा, चालीरीती, अंधश्रद्धा, दारिद्रय, हालअपेष्टा, आधुनिक तंत्रज्ञानाचा भटक्या समाजावर झालेला परिणाम, पोट भरण्यासाठी भटक्या समाजाला करावा लागणार संघर्ष, भ्रष्ट व्यवस्थेत भटक्या समाजाची होणारी ससेहोलपट, प्रस्थापित समाजातील जातीयतेचा भटक्या समाजाला सहन करावा लागणारा परिणाम, भटक्या समाजातील व्यसनाधीनता, भटक्या समाजातील स्त्री जीवन याचे चित्रण घडते. तसेच भटके–विमुक्त साहित्यात येणारी बोलीभाषा ही या साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करते. त्यामुळे मराठी भाषेचे ज्ञान भांडार समृद्ध होण्यासाठी भटक्या –विमुक्तांचे साहित्य महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसत आहे. अलीकडील काळात मात्र भटक्या समाजातील बोलीभाषा लोप पावत चाललेल्या आहेत. हा दृष्टीकोण देखील भटक्या विमुक्त समाजातील रामचंद्र नलावडे यांच्या प्रमाणेच अनेक लेखकांनी आपल्या साहित्यमध्ये व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे भटक्या–विमुक्तांच्या साहित्य निर्मिती मधून फुले, आंबेडकर, शाहू त्यांचे विचार स्पष्ट झालेले दिसतात. आणि भटक्या विमुक्त साहित्याने स्वातंर्त्य, समता, बंधुत्व, सामाजिक न्याय या घटकांचा स्वीकार केलेला दिसतो.

भटक्या–विमुक्त समाजात सुरुवातीच्या काळात आरोग्य विषयक सुविधा न पोहोचल्यामुळे या समाजाला सहन करावा लागणारा परिणाम आणि अलीकडील काळात या समाजात आरोग्यविषयक सुविधा पोहोचल्यामुळे या समाजात झालेले बदल, पूर्वीच्या काळी भटक्या समाजात असलेली जातपंचायत सारखी वाईट प्रथा व त्यात स्त्रियांना असलेली कमीपणाची वागणूक आणि अलीकडील काळात भटक्या समाजातील नष्ट होत असलेली जातपंचायत सारखी वाईट प्रथा,पूर्वी भटक्या समाजात शिक्षणाचे असलेले कमी प्रमाण व या समाजातील मुलांना शिक्षण घेताना करावा लागणारा संघर्ष आणि अलीकडील काळात भटक्या समाजात वाढलेले शिक्षणाचे प्रमाण मात्र शिक्षण घेऊनही या समाजातील मुलांना नोकरी मिळण्याची शाश्वती नसल्यामुळे त्यांच्या नशिबी येणारी निराशा, भटक्या समाजातील काही लोक सोडले तर या समाजातील लोकांचा राजकारणात राजकीय लोकांकडून स्वत:च्या स्वार्थासाठी केला जाणारा वापर, भटक्या–विमुक्त समाजातील कौटुंबिक आणि नातेसंबंधातील चित्रण देखील भटक्या–विमुक्तांच्या साहित्यातून स्पष्ट होते.

## निष्कर्ष –

१) भटक्या–विमुक्तांचे साहित्य शैली, आशय, अभिव्यक्ती या दृष्टीने प्रभावी ठरलेले आहे.

२) भटक्या–विमुक्त साहित्याची भूमिका भटक्या समाजाला प्रस्तावित समाजव्यवस्थेत माणूस म्हणून जगता आले पाहिजे,भटक्या समाजाला स्वत:च्या हक्काचे घर व जमीन मिळाली पाहिजे,भटक्या समाजावर होणारा अन्याय,अत्याचार थांबला पाहिजे, भटक्या समाजाची पावलोपावली होणारी फसवणूक थांबली पाहिजे,भटक्या समाजाला कायमस्वरूपी एका ठिकाणी स्थायिक होऊन जीवन जगता आले पाहिजे ही असलेली दिसून येते.

३) भटक्या–विमुक्त साहित्यातून भटक्या समाजातील शिक्षण, जातपंचायत, राजकीय परिस्थिती, स्री जीवन, आरोग्यस्थिती, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा चालीरीती, रूढी ,परंपरा, संस्कृती,नातेसंबंधातील व कौटुंबिक संबंधाचे चित्रण घडते.

४) भटक्या–विमुक्त साहित्यातून भटक्या समाजातील व्यथा–वेदना स्पष्ट होतात.

५) भटक्या–विमुक्त साहित्यातून भटक्या समाजाला पोट भरण्यासाठी सहन करावा लागणारा अन्याय, अपमान फसवणूक स्पष्ट होते.

६) भटक्या–विमुक्त साहित्यातून भटक्या समाजाची आजपर्यंत म्हणावी तशी प्रगती झाली नाही हा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

७) भटक्या–विमुक्त साहित्य लेखनामागे फुले–शाहू–आंबेडकर यांचा विचार असलेला दिसून येतो.

आहे. आणि भटक्या–विमुक्त साहित्याचे वेगळेपण हे त्यातील बोलीभाषेत आहे.

८) भटक्या–विमुक्त समाजातील बहुतेक लेखकांनी आपल्या साहित्य लेखनाची सुरुवात आत्मकथन या साहित्य प्रकारातून केलेली आहे.

## संदर्भ

१) खरात शंकर, 'भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न', सुगावा प्रकाशन, २००३ पुणे पृ. क्र.२२

२) मांडे प्रभाकर, 'गावकुसाबाहेर' परिमल प्रकाशन', औरंगाबाद, १९८३पृ. क्र–८,९

३ )मराठी विश्वकोश खंड– १२, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ, मुंबई १९८५, पृ. क्र –१९

४) नलावडे रामचंद्र, ' दगडफोड्या', देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. ली पुणे–२०००, पृ. क्र–८,९

❖❖❖

# आदिवासी गोंडी बोलीतील नामविचार (कोया लम्‌जाता परोय)

डॉ. हरिचंद नांगसू नरेटी
सहायक प्राध्यापक
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, महाराष्ट्र (India)
Email: harichandnnareti@gmail.com भ्रमणध्वनी ७०५७५३४२८७

## सारांश :

आदिवासी गोंडी बोली ही एक प्राचीनतम व समृध्द अशी बोली भाषा आहे. या बोली भाषेत विपूल प्रमाणात पारंपरिक लोकसाहित्य दडलेले आहे. भौगोलिक परिस्थिती, प्रगत भाषांचा संपर्क प्रभाव आणि संस्कृती भिन्नता यामुळे गोंडी बोलीमध्ये थोडक्यात फरक जाणवतो. गोंडी बोलीमधील काही शब्दातील मुळ रूप 'संमिश्र' दिसून येते. सिमांत प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या गोंड लोकांच्या गोंडी बोलीत, अन्य प्रांतांच्या संपर्कामुळे त्या त्या प्रदेशातील विकसित भाषांचे शब्द कळत न कळत येऊन मिसळलेले आहेत.

गोंडी बोलीतील नामविचार या अंतर्गत नामांचे अनेकवचन व सामान्यरूप यांचा उहापोह करण्यात आला आहे. गोंडी बोलीत 'आ' कारान्त स्त्रीलिंगी शब्दाचे सामान्यरूप 'इ' कारान्त होताना दिसतो, तर कधी 'ए' कारान्त होत असतो.नामाचे कार्य करणाऱ्या सर्वनामाला उत्तरयोगी लागतो. नामाच्या सामान्यस्वरूपाला विभक्ति प्रत्ययाऐवजी परसर्ग लावण्याची पध्दती गोंडी बोलीत आढळते. दोन भिन्न सर्वनामे एकत्र येऊन संयुक्त सर्वनामाची साधना होत असते. पुल्लिंगी 'आ' कारांत, 'उ' कारांत नामांचे अनेकवचन होताना अंती 'आ', 'इ', 'उ' या स्वरांचा लोप होऊन त्या जागी 'अ', 'ओ', 'आ' चा आदेश होतो. तसेच स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन होताना अंत्यस्थानी 'इङ्ग्', 'अक्', 'अङ्ग्', 'एङ्ग्' प्रत्यय लागताना दिसून येतात.

गोंडी बोली भाषेचे अस्सल रूप शोधणे व त्याचा स्वतंत्र अभ्यास करणे आजच्या जागतिकीकरणात फार मोठे आव्हान ठरलेले आहे. सुशिक्षित तरूण आणि अधिकार पदावर कार्यरत असलेले गोंडी भाषिक यांच्यामुळेच आज गोंडी बोलीला एक मृतावस्था प्राप्त होत आहे, ही फार काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. परंतु आजही ग्रामीण भागात निसर्गाच्या सान्निध्यात, जंगला पहाडाच्या आश्रयाने राहणाऱ्या गोंड लोकांनी आपल्या भाषेला जिवंत आणि समृध्द ठेवलेले आहेत.

## प्रस्तावना :

भारतातील आदिवासी जमातींपैकी संख्येने सर्वात मोठया जमातींपैकी 'गोंड' ही जमात आहे. ओरिसापासून मध्यप्रदेश, छत्तिसगड, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशपर्यंत ती पसरलेली आहे. गोंड लोक ज्या भुभागात राहतात त्या प्रदेशाला 'गोंडवाना' हे नाव प्रचलित आहे. महाराष्ट्रात विशेषत: विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ आणि काही प्रमाणात नांदेड, वर्धा आणि अमरावती या जिल्हयांमध्ये गोड समुदायाची वस्ती आहे. मानववंशशास्त्र आणि वंशशास्त्रीय दृष्टीकोणातून गोंड हे द्रविडवंशीय असून विदर्भात बोलल्या जाणाऱ्या गोंडीचे साधर्म्य तामिळ व तेलुगु भाषेशी आढळते. कर्नल हिस्लॉप यांनी गोंड आणि खोंड हे एकाच वंशातले असावेत व 'क' चा उच्चार 'ग' झाला असे म्हटले असून खोंड स्वत:ला 'कु' व 'गोंड' 'कोया' किंवा 'कोयतुर' म्हणतात असे स्पष्टीकरण दिले आहे.

बोलीभाषा ही संस्कृतीचे दर्शन घडविणारे एक माध्यम आहे. या अभिजात संस्कृतीची जोपासना केलेले गोंड हे स्वत:ला 'कोया' किंवा 'कोयतुर' म्हणतात. गोंड हे त्यांना दुसऱ्यांनी दिलेले नाव आहे. गोंडांची बोलीभाषा ही गोंडी असून ती द्रविड भाषा परिवारातली आहे. विभागानुसार गोंडीच्या प्रकारात, उच्चारण व्यवस्थेत फरक पडतो. माडिया–गोंडांची गोंडी किंवा माडिया भाषा हे तिचे पुरातन आणि अभिजात स्वरूप असून त्यात भरपूर लोकसाहित्य आहे. यवतमाळ, अमरावतीतल्या गोंडीवर मराठीचा तर नागपूर–गोंदियातल्या गोंडीवर प्रामुख्याने झाडीबोली मराठीचा आणि हिंदीचा प्रभाव जाणवतो. चंद्रपूर, अहेरी, सिरोंचा कडील गोंडीवर तेलुगुचे संस्करण मोठया प्रमाणात दिसते. व्याकरण आणि भाषाशास्त्र या दृष्टीने गोंडी ही प्रगत भाषा आहे.

## संशोधनाचा उद्‌देश :

आदिवासींची बोलीभाषा आत्मसात केल्याने त्यांच्या अडीअडचणी सोडविणे, त्यांच्यात समाजपरिवर्तन घडविणे व त्यांचे समृध्द जीवन समजून घेण्यास मदत होते. शिवाय आदिवासी संस्कृतीशी एकरूप होण्यासाठी व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आदिवासी भागात काम करणाऱ्या शिक्षक, पोलीस आणि इतर विभागातील अधिकारी इत्यादींनी आदिवासी बोलीभाषा शिकणे आवश्यक आहे, आणि हाच या संशोधनामागचा उद्‌देश आहे.

## संशोधन विषय : गोंडी बोलीतील नामविचार

५.१ नामे (परोय) :–

गोंडी बोलीतील शब्दांची तीन प्रमुख प्रकारांमध्ये विभागणी करता येते –

१. संज्ञा (फोरोल) २. क्रियापदे (किरयाबेत) ३. अव्यये (पदेम)

संज्ञा या प्रकारात लिंग, सामान्यरूप, वचन व पुरूष यांना तो विनियोगक्षम असतो. क्रियापदावर काळ, क्रियाव्याप्ती, अर्थ, पुरूष, लिंग व वचन यांचा प्रभाव पडत असतो. अव्यये ही बहुसंख्य अविकारी असतात. तथापि, अपवादात्मक स्थितीत काही विकारीसुध्दा आढळतात.

१) संज्ञा (फोरोल):

संज्ञाचे पुन्हा तीन प्रकारांमध्ये विभाजन करण्यात येते –

१) नामे (परोय) २) सर्वनामे (सबेपरोय) ३) विशेषणे (परोयगण)

नामाला स्वत:चे लिंग असते आणि नामाला वचन व सामान्यरूप यांचे विकार होतात. सर्वनामांनाही विकार होतात. पण ते अनेकदा लिंगाच्या संदर्भात अविकारी असतात. अनेक विशेषणांवर वचन, सामान्यरूप व लिंग यांचे विकार संबंधित विशेष्याला अनुसरून होत असतात. काही विशेषणांना केवळ सामान्यरूपाचाच विकार होतो.

संख्या व वृध्दी यांच्या आधारावर गोंडी बोलीमधील शब्दांचे दोन वर्णांमध्ये विभाजन करता येते.

१) मुक्तद्वारीय वर्ग (मुक्ताळि वरगाङ्ग्) २) बध्दद्वारीय वर्ग (दोहताळि वरगाङ्ग्)

१) मुक्तद्वारीय वर्ग (मुक्ताळि वरगाङ्ग्)

या वर्गामधील शब्दांची संख्या असीमित असते. विभिन्न साधानांद्वारे त्यांच्या संख्येत उत्तरोत्तर भर पडत असते.

नाम हा सर्वात मोठा मुक्तद्वारीय वर्ग असून त्यानंतर क्रियापद, विशेषण आणि क्रियाविशेषण यांचा अनुक्रम लागतो.

२) बध्दद्वारीय वर्ग (दोहताळि वरगाङ्ग्) :

या वर्गामधील शब्दांची संख्या सीमित असते. तसेच त्यांच्या वृध्दीची शक्यतासुध्दा कमी असते.

सर्वनाम हा सर्वात लहान बध्दद्वारीय वर्ग असून त्यानंतर उभयान्वयी अव्यये (सन्धवाही पदेम), केवलप्रयोगी अव्यये (परचुकी पदेम) आणि परसर्ग (रेहइटुक) यांचा अनुक्रम लागतो.

नामांची लिंगव्यवस्था (परोयक्‌ना लयना पदेत) गोंडी बोलीत केवळ दोन लिंग आहेत.

१) पुल्लिंग (मानलयना) २) स्त्रीलिंग (माइलयना)

गोंडी बोलीमध्ये नामांना लिंगविकार होताना पुढील वैशिष्टये आढळून येतात.

१) लघुत्व दर्शविण्याकरीता काही पुल्लिंगी नामांना 'आ' ऐवजी 'इ' या स्वराचा आदेश होऊन स्त्रीलिंगी नामे तयार होतात.

उदा. कोडा (शेंडा) कोडि, चितरा (चरित्र) चितरि, झोला (पाळणा) झोलि, पाळा (कुळप्रमुख) पाळि.

२) विशालत्व दर्शविण्याकरीता काही स्त्रीलिंगी नामांना 'इ' ऐवजी 'आ' या स्वराचा आदेश होऊन पुल्लिंगी नामे तयार होतात.

उदा. ओदि (शेजारी) ओदा, होङ्गि (रागीट) होङ्गा

३) गोंडी बोलीत पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी नाम तयार होताना काही शब्दात 'इ' या प्रत्ययाप्रमाणे लघुत्वदर्शक 'उलि' प्रत्यय येताना दिसतो. उदा –

गन्ज (पातेले) गन्जुलि, घिरा (चाक) घिरूलि,
झारा (झाकण) झारूलि, मोरा (इरले) मोरूलि,

## नामाची वचनव्यवस्था (परोयक्ना बचेनपदेत) :

गोंडी बोलीत नामांची दोन वचने आहेत. १) एकवचन (उन्दीबचेन) २) अनेकवचन (वल्लेबचेन).

नामाचे मूळ हेच त्याचे एकवचन असते. नामांची अनेकवचनाची रूपे तयार होताना त्यांच्या अंत्याक्षरावरून विशिष्ट नियम ठरविता येतात. नामांच्या वचनव्यवस्थेत संपूर्ण नामांचा अंतर्भाव होत असून प्रत्येक नाम दोनपैकी एक वचनात समाविष्ट असतेच.

नामांची वचनव्यवस्था ही लिंग व नामाचे अंत्याक्षर याच्यावर अवलंबून असते. पुल्लिंगी 'इ' कारांत व 'ओ' कारांत नामांच्या बाबतीत आणि स्त्रीलिंगी 'आ' कारांत नामांच्या बाबतीत तसेच काही पुल्लिंगी व्यंजनांत नामांच्या बाबतीत अनेकवचन होताना शून्य रूपिकांतर आढळते. इतर नामांच्या संदर्भात अनेकवचन होत असताना त्या नामांच्या अंत्याक्षरात विकार घडून भिन्न रूपिकांतरे निर्माण होत असतात.

## पुल्लिंगी नामांचे अनेकवचन (लयना परोयक्ना वल्लेबचेन)

खालील कोष्टकावरून गोंडी बोलीमधील पुल्लिंगी नामांची वचनव्यवस्था स्पष्ट होईल.

### कोष्टक (कन्सा सुळा)

### पुल्लिंगी नामांची वचनव्यवस्था (लयना परोय वन्कपदेत)

| क्र. | एकवचनातील अंत्य स्वनिम (उन्दि बचेनता सेला सुरनिम्क) | अनेकवचनाचा आदेश / आगम (वल्लेबचनता कुम) |
|---|---|---|
| पु १ | व्यंजनांत (वजेङ्ग्सिम) | इङ्ग, अङ्ग, अक् |
| पु २ | व्यंजनांत (वजेङ्ग्सिम) | ० |
| पु ३ | आ | अ |
| पु ४ | इ | लोर |
| पु ५ | उ | आ |
| पु ६ | उ | आ |
| पु ७ | ओ | ० |

पु १ पुल्लिंगी व्यंजनांत नामे – १ (मानलयना वन्जेङ्गना परोयक्–१)

काही पुल्लिंगी व्यंजनांत नामांचे अनेकवचन होताना अंती 'इङ्ग्', 'अङ्ग्' आणि 'अक्' या प्रत्ययांचा आगम होतो.

अ) चुटि (केस) चुटिङ्ग, कालाल (विद्यार्थी) कालाह्क्,
ब) फाकि (फोड) फाकिह्क्, कोयतोर (गोंड अथवा मनुष्य) कोयतोरक्

पु २ पुल्लिंगी व्यंजनांत नामे–२ (मानलयना वन्जेङ्गना परोयक्–२)

काही व्यंजनांत पुल्लिंगी नामांचे अनेकवचन होताना शून्य रूपिकांतर असते.

उदा. कटुल (खाट) कटुल
चिपुर (चिकटणारा पदार्थ) चिपुर

पु ३ पुल्लिंगी 'आ' कारांत नामे (मानलयना 'आ' इटुकता परोयक्)

पुल्लिंगी आकारांत नामांचे अनेकवचन होताना 'आ' लोप पावून 'अ' आणि 'ए' चा आदेश होतो.

उदा. वळका (बोलणे) वळ्क, लन्दळा (खोटारडा) लन्दळे

पु ४ पुल्लिंगी 'आ' कारांत नामे (मानलयना 'आ' इटुकता परोयक्)

पुल्लिंगी आकारांत नामांचे अनेकवचन होताना 'लोर' या प्रत्ययाचा आदेश होतो.

उदा. बल्कि (गुराखी) बल्किलोर, सङ्गि (मेहुणा) सङ्गिलोर

पु ५ पुल्लिंगी 'उ' कारांत नामे–१ (मानलयना 'उ' इटुकता परोयक्–१)

पुल्लिंगी आकारांत नामांचे अनेकवचन होताना 'उ' स्वराला 'आ' चा आदेश होतो.

उदा. पनडु (पिकणे) पन्डा, फरू (अवाजवी बोलणारा) फरा

पु ६ पुल्लिंगी 'उ' कारांत नामे–२ (मानलयना 'उ' इटुकता परोयक्–२)

पुल्लिंगी 'उ' कारांत नामांचे अनेकवचन होताना अंत्य 'उ' या स्वराचा लोप होऊन त्याला 'आ' चा आदेश होतो.

उदा. भरमु (संशय) भरमा, हेकु (हट्टी) हेका

पु ७ पुल्लिंगी 'ओ' कारांत नामे (मानलयना 'ओ' इटुकता परोयक्)

पुल्लिंगी 'ओ' कारांत नामांचे अनेकवचन होताना शून्य रूपिकांतर घडते.

कुडो (कुड्व) कुडो, गाटो (भात) गाटो, डाळङ्गो (दारू) डाळङ्गो.

## स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन (माइलयना परोयता वल्लेबचन)

खालील कोष्टकावरून गोंडी बोलीमधील स्त्रीलिंगी नामांची वचनव्यवस्था स्पष्ट होईल.

### कोष्टक (कन्सा सुळा)

### स्त्रीलिंगी नामांची वचनव्यवस्था (माइलयना परोयक्ना वन्कपदेत)

| क्र. | एकवचनातील अंत्य स्वनिम (उन्दि बचेनता सेला सुरनिम्क) | अनेकवचनाचा आदेश / आगम (वल्लेबचनता कुम) |
|---|---|---|
| स्त्री १ | व्यंजनांत (वजेङ्ग्सिम) | इङ्ग् |
| स्त्री २ | व्यंजनांत (वजेङ्ग्सिम) | अक् |
| स्त्री ३ | आ | अङ्ग् |
| स्त्री ४ | इ | अङ्ग् |
| स्त्री ५ | उ | एङ्ग् |
| स्त्री ६ | ओ | इअ |
| स्त्री ७ | ओ | अक् |

स्त्री १ स्त्रीलिंगी व्यंजनांत नामे – १ (माइलयना वजेङ्गिम परोयक्–१)

स्त्रीलिंगी व्यंजनांत नामांचे अनेकवचन होताना अंती 'इङ्ग्' हा प्रत्यय लागतो.

अ) करक् (कोंब) कर्किङ्ग्, डुवार (आंगण) डुवारिङ्ग्,

फाक (फोड) फाकिङ्ग्, वन्ज (धान्य) वन्जिङ्ग्,

ब) कटर (फणस) कटेरिङ्ग्, झिल्य (झालर) झिलइङ्ग्.

क) ताळ (ताड) ताळिङ्ग् गङ्गार (घंघाळ) गंङ्गारिङ्ग्

हनय (चवळी) हन्इङ्ग्, हवोर (मीठ) हवोरिङ्ग्.

स्त्री २ स्त्रीलिंगी व्यंजनांत नामे – २ (माइलयना वजेङ्गिम परोयक् – २)

स्त्रीलिंगी व्यंजनांत नामांचे अनेकवचन होताना अंत्यस्थानी 'अक्' हा प्रत्यय लागतो.

पल (दात) पल्क, खस (वाळलेला गवत) खस्क,

नस (शिर) नस्क, वळ्स (बोट) वळसक.

स्त्री ३ स्त्रीलिंगी 'आ' कारांत नामे (माइलयना 'आ' इटुकता परोयक्)

स्त्रीलिंगी आकारांत नामांचे अनेकवचन होत असताना अंत्यस्थानी 'अङ्ग' प्रत्यय लागतो.

उदा. कला (गोंगाट) कलाङ्ग्, गारा (मोहफुलाचे बी) गाराङ्ग.

स्त्री ४ स्त्रीलिंगी 'इ' कारांत नामे (माइलयना 'इ' इटुकता परोयक)

स्त्रीलिंगी 'इ' कारांत नामांचे अनेकवचन होताना अंत्य 'अङ्ग' चा प्रत्यय होतो.

उदा. हेति (सूप) हेतिङ्ग्, नेन्डि (जांभूळ) नेन्डिङ्ग

स्त्री ५ स्त्रीलिंगी 'उ' कारांत नामे (माइलयना 'उ' इटुकता परोयक्)

स्त्रीलिंगी 'उ' कारांत नामांचे अनेकवचन होताना अंत्य 'उ' लोप पावून 'एङ्ग' प्रत्यय लागतो.

उदा. गरसु (स्पर्धा) गरसेङ्ग, हड्प (दडपणे) हड्पेङ्ग

## निष्कर्ष :

१) नामाला स्वत:चे लिंग असते आणि नामाला वचन व सामान्यरूप यांचे विकार होतात.

२) सर्वनाम हा सर्वात लहान बध्दद्वरीय वर्ग आहे.

३) नामाचे मूळ हे त्याचे एकवचन असते आणि त्यांची वचनव्यवस्था ही लिंग व नामाचे अंत्याक्षर याच्यावर अवलंबून असते.

४) स्त्रीलिंगी व्यंजनांत नामांचे अनेकवचन होताना अंती 'इङ्ग' हा प्रत्यय लागतो.

५) नामाला विभक्तिप्रत्यय लागताना नामाच्या अंत्याक्षरात बदल होतो.

## समारोप :

आदिवासी गोंडी बोलीतील नामविचार या अंतर्गत लिंगव्यवस्थेचे स्वरूप पुल्लिंग आणि स्त्रीलिंग या दोन लिंगानी भाषेची व्यवस्था दिसून येते. नाम या अंतर्गत पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी नामांचे वचनव्यवस्था स्पष्ट केले. नामावर कार्य करणारी विकारप्रक्रिया तसेच नामाचे सामान्यरूपाची प्रक्रिया दर्शविली गेली. गोंडी बोलीत 'आ' कारान्त स्त्रीलिंगी शब्दाचे सामान्यरूप 'इ' कारान्त होताना दिसतो, तर कधी 'ए' कारान्त होत असतो. प्रस्तुत शोधनिबंधात आदिवासी गोंडी बोलीतील नामविचार यानुषंगाने अभ्यास करणे पुढच्या पिढीला प्रेरणादायी ठरू शकते.

## संदर्भ ग्रंथसूची :

१. अग्रवाल रामभरोस – 'गढा–मण्डला के गोंड राजा' (उत्तरप्रदेश शासन द्वारा पुरस्कृत) प्रका. गोंडी पब्लिक ट्रस्ट, मण्डला प्र.आ. २ सप्टेंबर, २००२.

२. कंगाली मोतीरावण – 'गोंडी व्याकरण तथा भाषारचना' प्रकाशक गोंडवाना आदिम भाषा साहित्य संशोधन मंडल नागपूर, आगस्ट २०१२

३. कंगाली मोतीरावण – 'सैंधवी लिपी का गोंडी मे उद्‌वाचन' प्रकाशक गोंडवाना आदिम भाषा साहित्य संशोधन मंडल नागपूर, आगस्ट २०१२

४. गावीत पुष्पा – 'आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य ' अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्र.आ. २०१४

❖❖❖

# मराठी भाषेची कवितेतून मांडलेली थोरवी

डॉ. अर्चना काटकर – सोनवणे
(मराठी विभागप्रमुख)
ए.शि.प्र.म. कला महाविद्यालय,
बिडकीन, ता.पैठण, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९४२१३०५९११

## सारांश :

मराठी ही इंडो-युरोपीय गोकुळातील एक भाषा आहे. भारतातील प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक प्रमुख भाषा असून तिला पंधराशे वर्षाचा प्रचलित इतिहास आहे. बडोदा, सुरत , दक्षिण गुजरात, अहमदाबाद, बेळगाव, हुबळी, धारवाड, गुलबर्गा, उत्तर कर्नाटक, हैदराबाद ,इंदूर, तंजावर व गोवा, दीव दमण इत्यादी राज्यांमध्ये मराठी भाषिक लोक मोठ्या प्रमाणात आहेत. मराठी भाषेच्या साहित्याला चार ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले असून अनेक मराठी कलाकार या भाषेला खुलवून रसिकांचे मनोरंजन करतात. तरीही आजच्या खासगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण व संगणकीय काळात मराठी भाषेच्या अस्तित्वावर गदा येत असल्याचे जाणवत आहे. मराठी भाषेला अनेक वेळा संघर्ष करुन, तोंड देऊन आपले अस्तित्व सिद्ध करावे लागलेले आहे. मी माझ्या संशोधनात अनेक कवितांच्या आधारे मराठी भाषेची थोरवी शोधून ती जाणून घेतली व मराठी भाषा रुजविण्याच्या दृष्टीने मराठी माणसाने कार्य करण्याचे गरजेचे आहे ;असे मांडले आहे.

**बीजशब्द :** मराठीची थोरवी, मायबोली, राजभाषा, दैदिप्यमान, कणखर ,जीवनभाषा, माझी मराठी, भगवतगीता

## प्रास्ताविक :

मराठी भाषा ही प्राचीन, समृध्द आणि गौरवशाली परंपरा असलेली भाषा आहे. सातवाहन, राष्ट्रकुट आणि अनेक मराठी राजांनी मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा दिलेला आहे. इतिहासकारांनी केलेल्या संशोधन आणि अभ्यासानुसार दोन ते अडीच हजार वर्षापूर्वी पासून मराठी भाषेच्या अस्तित्वाच्या अनेक खुणा आढळतात. आदिकालापासून मराठीचे स्वरुप शिलालेख, ताम्रपट यांतील गद्य मजकुर, मुकुंदराजांचा ''विवेकसिधू'', महानुभावीय गद्य–पद्य ग्रंथ लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, ज्ञानेश्वर नामदेवादिकांच्या अभंगात्मक स्फुटरचना आणि ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरांचे ओविबध्द ग्रंथ इत्यादी मधून पहायला मिळतात. मराठी भाषेच्या वाटचालीत अनेक संतांनी साहित्यिकांनी, कलावंतांनी, संशोधाकांनी आणि दैनंदिन व्यवहारात मराठी बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या व वाचनाऱ्या सर्व सामान्य माणसांनी मराठी भाषा समृध्द करण्यात मोलाचे योगदान दिलेले आहे. आपल्या नैसर्गिक भावनेचे प्रगटीकरण करतांना बहुजन लोक आपल्या बोलीतच प्रकट होतात. समाजाचे त्या विशिष्ट बोलीवरील आपले प्रेम व्यक्त होत असते. साहित्य निर्मिती क्षमता ही एकाएकी येत नसते, त्यापूर्वी ती भाषा त्या समाजाच्या जीवन जाणीवांशी एकरुप व्हावी लागते.

## उद्दिष्टे :

१. मराठी कवितेतून मराठी भाषेच्या थोरवीचा अभ्यास करणे.
२. मराठी भाषेच्या वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

## विषय विवेचन :

शके १११० च्या सुमारास समाजात संस्कृत, प्राकृत अपभ्रंश भाषेची समाजात सरमिसळीची स्थिती होती. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तींची भाषा मुकुंदराजांना महत्वाची वाटली. शंकराचार्य प्रणीत अद्वैत तत्वज्ञानाचे,

उपनिषदातील विचारांचे दर्शन सामान्य जनांना व्हावे या उद्देशाने त्यांनी 'विवेकसिंधू' हा ग्रंथ मराठीमध्ये लिहिला. त्यात सर्वसामान्यांची भाषा म्हणून मराठी भाषेचे कौतुक ही त्यांनी केले. ते म्हणतात.

''धुळी आंतिलरत्न । जरि भेटे न करिता येत्न ।
तरी चतुरि येत्न। कां न करावा ।।
ऊस किरु दिसे काळा । परि घेपे रसाचा गळाळा ।
तैसे आरुष बोल परि झळाळा । दिसे विवेकाचा ।।

जसे सहज उपलब्ध होणाऱ्या गोष्टीचे कौतुक, महत्व नसते. तसेच रुईच्या झाडाचेही आहे. ते सहज उपलब्ध होते. त्याच्या फुलांमध्येही मधाचा गोडवा असतो. हे चतुर व्यक्तीने जाणून घेतले पाहिजे. त्या गोष्टी लक्षात घेऊनच प्रत्येक सर्वसामान्य माणसाला परमार्थाविषयीचे ज्ञान होणे आवश्यक मानूनच त्यांनी मराठी भाषेतूनच हे तत्वज्ञान सांगितल्याचे स्पष्ट केले आहे.

शके १२१२ ते १२९० या काळात संत ज्ञानेश्वरांनी ही हाच उद्देश समोरे ठेवून ''भगवद्गीता" ग्रंथाचे रुपांतर सर्व सामान्यांच्या भाषेत केले. जी आज ही ''ज्ञानेश्वरी", ''भावार्थदीपिका" म्हणून आपण भागवत संप्रदायाचा महत्वपूर्ण ग्रंथ मानतो. या ग्रंथाच्या तोडीचा दुसराग्रंथ आज पर्यंत झालेला नाही. त्यात ही ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेची गुणवत्ता सांगतांना म्हटले आहे.

''माझाा मराठीची बोलू कौतुके ।
परि अमृता ते ही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।।

भगवद्गीता सर्वसामान्यांना समजेल अशा मराठी भाषेत लिहितांना संत ज्ञानेश्वरांनी ही मराठी अमृताहून श्रेष्ठ आहे असा गौरव केलेला आहे. संत एकनाथांनीही भागवत ग्रंथामधील अकराव्या स्कंदाचे संस्कृतातून मराठीत रुपांतर केलेले आहे.त्याकाळी पारंपारिक कर्मठांनी संस्कृत भाषा ही देववाणी आहे. तिचे रुपांतर का करता असे म्हणत त्यांच्या रुपांतरावर आक्षेप घेतला त्यावेळी एकनाथ म्हणतात.

''संस्कृत भाषा देवे केली ।
प्राकृत काय चोरापासून झाली"।

संस्कृत ही तत्काळात महत्वपूर्ण भाषा असली तरीही, मराठी ही सर्व सामान्य माणसांची तितकीच महत्वाची भाषा आहे. त्यामुळे तीही तितकीच श्रेष्ठ असल्याचे त्यांनी परखड शब्दात पटवून दिलेले दिसते.

खिश्चन धर्मगुरु फादर स्टिफन यांना खिस्तीपुराणरचनेचे अग्रदूत मानले जाते ते धर्मप्रचारार्थ गोव्यात आले, तेव्हा त्यांनी तेथिल भाषा अभ्यासली त्यांच्यावर मराठीतील पुराणग्रंथांचा प्रभाव पडला. त्यांना कोकणी, मराठी भाषेबद्दल गोडी निर्माण झाली. त्यातूनच त्यांनी इ.स.१६१६ ला 'खिस्तपुराण' या ग्रंथाची मराठी भाषेतूनच निर्मिती केली. त्यांनी मराठी भाषेचा आणि बोलीभाषेचा महिमा ही विशद केला आहे.

''परमशास्त्र जागी प्रगटावेया ।
बहुता जनां फळसिध्दी होवावे या ।।
भाषा बांधोनि मराठिया ।
कथा निरोपिळी ।।१।।
जैसा हरळामाजी रत्नकिळा ।
कि रत्नामाजी हिरा निळा ।।
तैसा भासामाजि चोखाळा ।
भासा मराठी ।।२।।

एका परकिय धर्मगुरुंनाही मराठी भाषेत महत्व कळाले होते. तेच त्यांनी आपल्या काव्यातून मांडलेले आहे.

डॉ.ना.गो.नांदापूरकर यांनी मराठी भाषेचे व वाङ्मयाचे मानबिंदू मानले जाते. त्यांनी हैद्राबाद संस्थानात मराठी भाषेची चळवळ राबविली होती.ते मराठीतील पहिले डॉक्टरेट (विद्यावाचस्पती) आहेत. त्यांनीही 'माझी मराठी' या कवितेतून मराठी विषयीची महती गायलेली आहे.

'माझी मराठी असे मायभाषा हिच्या कीर्तिचे तेज लोकीचढे गोडी
न राहे सुधेमाजि आता पळाली सुधा स्वर्ग लोकांकडे

आजन्म युध्दे तरी संगरी जी कधी भागली नाही एकक्षण
द्या आश्रया वा न द्या या सतीला असे लाधले एक साद्विक्षण'

मराठी भाषेची गुणवत्ता त्यांनी वर्णन करतांना तिच्या किर्तीचे तेज हे वेगवेगळया प्रकारे पटवून दिलेले आहे. या भाषेवर वेळोवेळी अनेक भाषिक आक्रमणे झाली तरीही तिने ठामपणे त्यांना तोंड देत स्वत:ला तेजाळून घेत, पुनर्जन्म घेऊन त्याच तेजाने झळाळत, चमकतच राहिलेली आहे.

कुसुमाग्रजांनीही त्यांच्या साहित्यातून सकस आणि प्रासादिक मराठीने तीन पिढयासमृध्द केलेल्या आहेत. आपल्या साहित्यातून सामाजिक बांधिलकी मानली आहे. त्यांची 'कणा' ही कविता युवकांना सदैव स्फुर्ती देणारी आहे. त्यांचे विपूल असे लेखन हे वैध्यिपूर्ण आणि प्रसन्न रुपात प्रतिबिंबीत झालेले आहे.

मराठी आपली जीवनभाषा आहे. मराठी आपण बोलतो ऐकतो, वाचतो लिहितो. अशा आपल्या मराठीचा उत्सव साजरा व्हावा या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. कुसुमाग्रजांनीही ''माझया मराठी मातीचा'' या कवितेत गौरव केला आहे.

''माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा ।। १।।
माझा मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगे जागतील
मायदेशांतील शिळा ।।२।।

माझी मराठी ही किती संपन्न भाषा आहे.तिच्यामुळेच महाराष्ट्र हा कसा कणखर,धिरोदात्त आहे. हे पटवून देतांना तिचे श्रेष्ठत्व त्यांनी सांगितले आहे. म्हणून तिच्या विषयीचा गर्व बाळगून आपल्या ललाटास टिळा लावण्या विषयीचा अभिमान दाखविण्या विषयी कुसुमाग्रहांनी सांगितले.

मराठी भाषेचा हजारो वर्षांचा दैदिप्यमान इतिहास असल्याने तिचा गुण गौरव अनेक कवींनी केलेला आहे. मधुकर अरकड यांनी ही आपल्या कवितेतून ती शब्दबध्द केला आहे.

''फुलाफुलात ज्यापरी सुगंध नांदतो
घरोघरी तसे आम्ही मराठी बोलतो ।ध्रृ।।
उषा निशा दहा दिशा तिलाच प्रार्थीतो
मनामनात चालते तिचीच आरती
मराठी माय माऊली सदैव वंदितो
घरोघरी तसे आम्ही मराठी बोलतो ।।१।।

असा आपल्या भाषेचा सुगंधीत दरवळ कवीने आपल्या शब्दात मांडला आहे. पुढच्या कवितेत ही आपल्या दैनंदिन जीवनात मराठी जगतांना तिचे गोडवे गायीलेले आहेत.

''मायमराठी! तुझीया पायी तन मन धन वाहियले।
तुझीया नामी, तुझीया धामी अखंड होऊनी राहीले ।ध्रृ।।
कष्टा मधली तुझीच गोडी चाखायची मज आई
मला आवडे तुझा विसावा, तुझीच निर्भर अंगाई
माय मराठी ! तुझीया पायी तनम न धन मी वाहियले
तुझीया नामी, तुझीया धामी अखंड होऊनी राहीले ।ध्रृ।।

अशा जिव्हाळयाच्या शब्दात आपल्या मातृभाषेचे प्रेम कवीने येथे मांडून आपल्या आईचा गोडवा गायीला आहे.

सुरेश भट हे मराठीतील सुप्रसिध्द कवी, त्यांनी मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार पहिल्यांदा रुजवला त्यांना गझल सम्राट ही म्हंटले जाते. त्यांनी आपल्या मराठीच्या वैभवाचा अभिमान बाळगून 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या कवितेतून थोरवी गायली आहे.

'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी

जाहलो खरेच धण्य एकतो मराठी
धर्म,पंथ,जात एक जागणतो मराठी
एवढया जगात माय मानतो मराठी ।।१।।
पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी
आपुल्या घरात हाल सोसते मराठी
हे असे कितीक खेळ पाहते मराठी
शेवटी मदाधं तख्त फोडते मराठी ।।४।।

या कवितेतून सुरेश भटांनी मराठी भाषेबद्दल सार्थ अभिमान ठासून मांडला आहे. मराठी भाषेला जरी अनेकवेळा परकीय आक्रमणाला तोंड द्यावे लागले तरी तिच्यातील क्षमता (ताकद) ही कमी झालेली नाही हेच त्यांनी मांडले आहे. म्हणूनच मराठी माणसाला अनेक अडचणी आल्यातरीही तो त्यांना तोंड देण्यास समर्थ आहे. हे यातून मांडले आहे. मराठी कोमल असली तरी प्रसंगी वज्रासही भेदण्याची क्षमता तिच्यात आहे म्हणूनच शूरविर मराठे पुत्र म्हणतात.

'आम्ही मराठे हिचे पुत्र लोकी, कधी भ्यावयाचे मुळी ना कुणाा
आकंठ प्यालो हिचे दुग्ध अंगी, पाहा रोमरोमांतुनी खुणा'

मराठी भाषेला आणि साहित्याला अनेक साहित्यीकांनी मोठया प्रमाणात साहित्य निर्मिती करुन प्रगल्भ केलेले आहे. मराठी साहित्याला चार ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले आहे. गोविंदा विनायक करंदिकर ''अष्टदर्शन", विष्णू सखाराम खांडेकर ''ययाति", विष्णू वामन शिरवाडकर 'विशाखा' भालचंद्र नेमाडे 'हिंदू जगण्याची समृध्द अडगळ' या साहित्यकृतींनी ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले आहे.

ऐकेकाळी राजभाषा असलेल्या मराठी भाषेची स्थिती ही अलीकडे चिंताजनक असल्याचे म्हटले जाते. कारण मराठी भाषेतून शिक्षण घेणऱ्यांची संख्या कमी होत असली तरी ही मराठी भाषेला चित्रपटातून, वेगवेगळया मराठी वाहिण्यांवरील विनोदी कार्यक्रम, आकाशवाणी वरील सदर होणारे कार्यक्रम अधिकाधिक उत्तम व सरस असल्याचे दिसते आहे. इंग्रजी बरोबरच मराठीचे शिक्षण हे सक्तिचे करण्या विषयीचा कायदा लवकरात लवकर होण्यासाठी मोठया प्रमाणावर साहित्य परिषदेकडून कार्य केले जात आहे., आणि याला थोडयाच दिवसात यश येईल असे दिसते. म्हणूनच येथे माधव ज्युलियनांच्या काव्य पंक्ति महत्वूपर्ण वाटतात.

'मराठी असे आमुची मायबोली, जरी आजही राजभाषा नसे
नसो आज ऐश्वर्य या माऊलीला, यशाची पुढे दिव्य अशा असे
हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडु, वसे आमुच्या हन्मंदिरी
जगन्मान्यता हीच अर्पूप्रतापे, हिला बैसवू वैभवाच्या शिरी'

आज मराठीची स्थिती म्हणावी तशी भरभराटीची नसली तरीही मराठी ही राहणारच असा ठाम आत्मविश्वास पहिल्या ओळी पासून कवीचा दिसून येतो. आणि तो सार्थ ठरविण्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने कार्य करणे गरजेचे आहे. तेव्हाच हा विश्वास सार्थ ठरणार आहे. मराठी भाषा वैभवसंपन्न असल्याचे अनेक उदाहरणे आपण पाहिले. म्हणूनच मराठी भाषाही संपन्न भाषा असून ती कणखरपणे प्रत्येक सत्तेत आपले स्थान अढळ ठेवून आहे, मराठी भाषेला हजारो वर्षांचा वैदिव्यमान इतिहास आहे, मराठी भाषा ही कोमल असली तरी प्रसंगी ती वज्रासारखी कठोर ही आहे. या वैशिष्टयासह प्रत्येकाने मराठीचा अभिमान बाळगून आपले व्यवहार, लेखन, वाचन मराठीतून करावे. मराठी भाषा ही केवळ भाषाच नसून ती आपली संस्कृती, संस्कार आणि समृध्द जीवनाचे दर्शन घडवते.

❖❖❖

# दलित नाटक आणि सद्य:स्थिती

प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ.सौ.इं.भा.पाठक महिला महाविद्यालय
औरंगाबाद, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९९७५६३४९४४

## सारांश (Abstract) :

हजारो वर्षांपासून सवर्णांकडून होत असलेल्या अन्याय अत्याचाराची चीड सुशिक्षित दलितांच्या मनात निर्माण झाली, त्यातच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना अन्याय अत्याचाराची जाणीव करून दिल्यामुळे दलितांमध्ये नवे आत्मभान निर्माण झाले .मानवमुक्तीच्या सुरू झालेल्या निरनिराळ्या चळवळीमुळे दलित लेखक विविध साहित्य प्रकारातून व्यक्त होऊ लागले .1960 नंतर दलित नाटककारांनी अतिशय सजगतेने नाटके लिहायला सुरुवात केली .ही नाटके प्रबोधनाची, चळवळीची असल्यामुळे ती अधिक वैशिष्ट्यपूर्ण, वैविध्यपूर्ण, सूक्ष्म व प्रभावी असावी यासाठी प्रयत्न सुरू झाले. सामाजिक बांधिलकी आणि मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार करणारी सशक्त नाटकं दलित रंगभूमीने मराठी रंगभूमीला दिले. मराठी रंगभूमी पेक्षा विषय आणि अभिव्यक्ती पूर्णपणे वेगळी असलेल्या या दलित नाटकांच्या स्वरूपाचे आणि सद्य:स्थितीचे संशोधन या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

**बीजशब्द :** दलित रंगभूमी, वर्णव्यवस्था, आंबेडकरी जलसे, सत्यशोधक जलसे, प्रहसने, वगनाट्य, तमाशा

## प्रास्ताविक :

१९६० नंतर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल झाले. त्या बदलाची नोंद साहित्यानेही घेतली. याच काळात विविध वाङ्मय प्रवाह निर्माण झाले. त्यात दलित साहित्य प्रवाह अधिक समृध्द व वैशिष्टयपूर्ण असलेला दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेली दलित चळवळ हीच दलित साहित्याच्या निर्मितीस प्रामुख्याने कारणीभूत ठरली आहे. शिक्षणाचा वाढता प्रसार, स्वतंत्र भारताने स्वीकारलेली लोकशाही शासनपध्दती इ. कारणामुळे दलित चळवळ आणि दलित साहित्यात दिवसें दिवस वाढ झाल्याचे दिसते.

दलित साहित्याची निर्मिती लेखक सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेने करतो. बुध्द,कबीर, फुले व आंबेडकर यांच्यासारख्यांच्या विचारांशी जशी ही बांधिलकी आहे तशीच ती स्वातंन्र्य, समता, बंधुता व न्याय या चतु:सुत्रीवरही आधारलेली आहे. पर्यायाने ही बांधिलकी दलित चळवळीशी व दलित समाजाशीही आहे. म्हणूनच दलित साहित्यातून प्रकट होणारे दु:ख, वेदना या केवळ वैयक्तीक स्वरुपाच्या व कोण्या एकटया व्यक्तीच्या न राहता त्या साऱ्या समाजाच्या, मानव जातीच्या होताना दिसतात. ही भूमीका घेऊन आजपर्यंत दलित साहित्यामध्ये सर्वच वाङ्मय प्रकारांतून मोठया प्रमाणात लेखन झालेले आहे. यात कविता, कथा, आत्मकथन, कादंबरी याबरोबरच नाटयलेखन झालेले आहे. इतर वाङ्मयप्रकारांच्या मानाने नाटयलेखन काहीसे कमी प्रमाणात झालेले असले, तरी दलित नाटकांची गुणवत्ता मोलाची आहे. दलित नाटकांची केवळ दलित साहित्यातच नव्हे तर एकंदर मराठी नाटयवाङ्मयातही अनेक दृष्टिने लक्षणीय भर टाकली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारांचे बळ लाभलेली दलित रंगभूमी प्रस्थापित व्यवस्थेची मानसिकता बदलण्यास फार महत्वाची ठरली आहे.

## उद्दिष्टे :

१. दलित नाटकाची सुरुवात अभ्यासणे
२. दलित नाटकांचे स्वरुप जाणून घेणे
३. दलित नाटकांची सद्य:स्थिती समजून घेणे.

## विषय विवेचन :

दलित रंगभूमीने समाज प्रबोधनाची चळवळ आपल्या खांद्यावर घेऊन अस्सल जीवनानुभव रेखाटला या देशातील वर्णव्यवस्था उद्ध्वस्त करुन विषमतेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विश्वात्मक दृष्टिकोन दलित रंगभूमीने अंगीकारला. अर्थात सनातन संस्कृतीचे वस्त्रहरण करुन तिचा मुखवटा, बुरखा फाडून समाजासमोर आणला. त्यासाठी दलित रंगभूमीला प्रचंड संघर्ष करावा लागला. देशाची एकात्मता अखंडित रहावी, स्वातंत्र्य, समता, बंधुता येथे नांदावी म्हणून संघर्ष हाच दलित रंगभूमीचा प्राण ठरला.

दलित नाटकांच्या प्रारंभावस्थेचे मूळ हे तमाशा, वगनाटय, फार्स, दंढारी, सत्यशोध जलसे, आंबेडकरी जलसे, प्रहसने इ. मध्ये दडलेले आहे. कमी अधिक प्रमाणात हे सर्व नाटयप्रकार त्या काळात खालच्या वर्गातील समाजात चालत आलेले आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात म.फुले यांनी तळागाळातल्या लोकांमध्ये स्वहक्काची व स्वाभिमानाची जाणीव निर्माण व्हावी म्हणून तमाशा या लोककलेच्या आधारे जलशांची रचना केली. म.फुले यांच्या विचारकार्याने भारावून जाऊन अनेक दलित शाहिरांनी जलशांचे लेखन केले. त्यांनी दलित जीवनातील प्रचलित आणि ज्वलंत समस्या नाटयरुपाने मांडल्या. रामचंद्र बाबा घाडगे हे पहिले जलसाकार होत. दलित नाटयाचे प्रवर्तक शाहीर किसन फागोजी बनसोड, शाहीर गोपाळ बाबावलंगकर, यांच्यानंतर सत्यशोधक समाजातील अनेक शाहिरांनी जलशांच्या माध्यमातून दलित जागृतीचा नवा विचार पसरविला. सत्यशोधकी जलशांमधून होणारे प्रबोधन दलित जाणिवांची खरी गंगोत्री आहे, असे म्हणता येईल. पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्व शाहिरांनी आपल्या जलशांमधून कथन केले. त्यातूनच आंबेडकरी जलशाची निर्मिती झाली. आंबेडकरी जलशाचे संस्थापक भीमराव कर्डक यांनी दलितांमध्ये नवी जाणीव व अस्मिता निर्माण केली. शाहीर हरिभाऊ वडगावकर, शाहीर केरुबुवा गायकवाड, शाहीर केशव सखा आहेर तसेच आंबेडकरी शाहिरी परंपरेतील दुसऱ्या पिढीतील पहिले शाहीर वामनदादा कर्डक यांचे कार्य अतिशय महत्वाचे आहे.

बहुजन समाजाच्या प्रबोधनाचे एक लोकप्रिय साधन म्हणून सत्यशोधक जलसे आणि आंबेडकरी जलसे यांचे कार्य मोठे आहे. दलित नाटकांची इमारत जशी फुले—आंबेकडरांच्या विचारांवर आधारलेली आहे. तशीच तिला फुले—आंबेडकरी जलशांचीही प्रेरणा लाभलेली आहे. जलसेवकारांच्या संदर्भात दत्ता भगत म्हणतात, 'आंबेडकरी काळात पायाला चाके बांधून भटकंती करणाऱ्या कित्येक दलित शाहिरांच्या जलसेकारांच्या लोककवींच्या खांद्यावरच आजची दलित रंगभूमी उभी आहे.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांचे 'तृतीय रत्न' आणि प्राचार्य म.भि.चिटणीस यांच्या 'युगयात्रा' पासून खऱ्या अर्थाने दलित नाटकाला सुरुवात झाली असे म्हणता येईल. महात्मा फुले यांचे 'तृतीय रत्न' हे नाटक १८५५ मध्ये प्रसिध्द झाले. या नाटकातून दलित समाज हिंदू धर्माच्या अनिष्ट रुढी—प्रथा व परंपरेत कसा रुतून बसलेला आहे. येथील ब्राम्हण देवधर्माचे स्तोम माजवून शुद्रातिशूद्रांना कसे फसवत आहेत. दलितांना शिक्षण व ज्ञानापासून वंचित ठेवण्यासाठी पुराणातल्या भ्रामक कल्पना त्यांच्या गळी उतरविण्याचे कार्य कसे केले जाते हे महात्मा फुलेंनी अतिशय तळमळीने सांगितले आहे.

१९५५ ला.म.भि.चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे नाटक रंगभूमीवर आले. या नाटकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराकार्याच्या चळवळीला नाटयबध्द करण्याचे ऐतिहासिक कार्य चिटणीसांनी केले. युगायुगांपासून वर्णव्यवस्थेच्या अंधारयात्रेत वावरणाऱ्या जनतेचे चित्रण यात केले आहे. अनेक ऐतिहासिक प्रसंगाद्वारे शतकानुशतके दलितांवर कसा अन्याय झाला आहे ते दृश्यरुपाने उभे केले. या नाटकाचा पहिला प्रयोग १४ एप्रिल १९५५ रोजी डॉ.बाबासाहेबांच्या वाढदिवशी त्यांच्या उपस्थितीत सादर केला गेला. नंतर या नाटकाचा प्रयोग दीक्षाविधीनंतर त्याच रात्री सहा लाखांच्या उपस्थितीत करण्यात आला. एका मराठी नाटकाला एवढया प्रेक्षकांच्या उपस्थितीचे भाग्य हा एक सुवर्णयोग म्हणावा लागेल.

१९५५ ते १९७५ या काळात वगनाटयांची संख्या १५०० पर्यंत गेलेली होती परंतु दलित नाटकांची संख्या अतिशय मर्यादित होती. १९५५ ला 'यगयात्रा' रंगभूमीवर यशस्वी झाले. तर १९७६ ला 'सूर्यास्त' हे नाटक रंगभूमीवर आले. त्याला कारणेही अनेक आहेत. नाटक हा रंगभूमीच्या मर्यादेत सादर होणारा कला अविष्कार असल्यामुळे कलावंत, प्रेक्षक, भांडवल आणि तंत्र या सर्वांची जुळवाजुळव करणे सोपे नव्हते. अशावेळी दलित रंगकर्मींनी इंटिमेट थियटर, लोकरंगभूमी, निग्रो रंगभूमी या धर्तीवर कमी खर्चात सादर होणारी नाटके लिहायला सुरुवात केली. यातूनच १९७७ मध्ये मुंबई मध्ये येथे भरलेल्या अखिल भारतीय दलित नाटय संमेलनात अविनाश

डोळस यांचे 'गाव नसलेला गाव' तर प्रभाकर दुपारे यांचे 'अदृश्य नाटक' ही नाटके सादर झाली, आणि १९७८ पासून खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आणि दलित रंगभूमीच्या संकल्पनेत बसणारी नाटके व्हायला लागली.

प्राचार्य चिटणीसांनी खंडित झालेले प्रयोग नव्याने सुरु करण्याचा प्रयत्न केला. यातूनच मिलिंद कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये अनेक एकांकिका सादर केल्या जावू लागल्या. लिहिल्या जावू लागल्या. यात अविनाश डोळस यांची 'आहुती', 'काळोखाचे कैदी', अशोक अहिरे यांचे 'समतेचा विजय' इ.१९७२ मध्ये दत्ता भगत यांची 'एकटी' ही एकांकीका आकाशवाणी औरंगाबाद केंद्रावरुन सादर झाली. ती अस्मितादर्शच्या दिवाळी अंकात प्रकाशित झाली. १९७६ च्या अस्मितादर्शच्या दिवाळी अंकात दत्ता भगत यांची 'पराभव' ही एकांकिका प्रकाशित झाली.१९७६ च्या अस्मितादर्शच्या दिवाळी अंकात दत्ता भगत यांची 'पराभव' ही एकांकिका प्रकाशित झाली.भि.शि.शिंदे यांचे 'वैरी झाला कैवारी' हे नाटक १४ एप्रिल १९७५ रोजी नाटय प्रबोधन, पुणे या संस्थेने रंगभूमीवर आणले. बौध्द धर्मातील जीवनमूल्यावर प्रकाश टाकणारे हे नाटक होते. ११ नोव्हेंबर १९७९ रोजी त्यांचेच 'काळोखाच्या गर्भात' हे नाटक रंगभूमीवर आणले. बौध्द धर्मातील जीवनमूल्यावर प्रकाश टाकणारे हे नाटक होते. ११ नोव्हेंबर १९७९ रोजी त्यांचेच 'काळोखाच्या गर्भात' हे नाटक रंगभूमीवर आले. स्वातंत्र्यानंतरही सामान्य दलित माणसाचे पारतंत्र्य कसे आहे यावर या नाटकातून प्रकाश टाकलेला आहे. दलितांनी गावकीची व प्रस्थापितांची कामे करण्याचे नाकारताच त्यांना अन्याय–अत्याचाराला सामोरे जावे लागले. या नाटकातून हजारो वर्षाचा अन्याय काळोख गर्भात असणाऱ्या दलितांना त्यांनी क्रांतीसूर्याच्या दिशेने चालण्याचा सल्ला दिलेला आहे.

१५ ऑगस्ट १९७८ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर कमलाकर रहाट यांचे 'मृत्यूदिन वा मुक्तीदिन' हे नाटक रंगभूमीवर आले. स्वातंत्र्यानंतरही सामान्य दलित माणसाचे पारतंत्र्य कसे आहे यावर या नाटकातून प्रकाा टाकलेला आहे. त्यांच्याच 'हत्याकांड' नावाच्या नाटकातून दलित समाजाची पिळवणूक, शोषण, अत्याचार व खून याचे भीषण वास्तव मांडलेले आहे.

प्रेमानंद गज्वी यांचे 'देवनवरी' (१९८०) हे देवदासी प्रथेवर प्रकाश टाकणारे हे नाटक. या नाटकातून देवदासींच्या जीवनाची भयावहता दर्शविली आहे. 'बेरीज वजाबाकी' (१९८२) मधून दलितांनी जेव्हा जेव्हा स्वतःचा उत्कर्ष करुन घेतला. तेंव्हा तेंव्हा सवर्ण समाजाने अडथळे निर्माण करुन त्यांना नेस्तनाबूत केले. हे अत्यंत समर्पक शब्दातून प्रतिकात्मक पध्दतीने मांडलेले आहे. यात दलितांना धोत्र्याची, तर सवर्णांना केळीच्या बागेची उपमा दिली आहे. दलित पुरुषावर सवर्णांची मुलगी प्रेम करते, ही बेरीज तर दलिताची वस्ती सवर्ण जाळून टाकतात ही वजाबाकी अशा तऱ्हेने या नाटकाची मांडणी केलेली आहे. 'तनमाजोरी' (१९८५) या सामाजिक नाटकातून मालक आणि मजूर यांच्यातील संघर्षाचे चित्रण आलेले आहे. 'किरवंत' (१९९१) स्मशानभूमीत अंतेष्टीचे कार्य करणाऱ्या ब्राम्हणांची व्यथा प्रेमानंद गज्वीयांनी किरवंत मधून मांडली आहे.

१९८० मध्ये प्रभाकर दुपारे यांच्या 'उत्सव' या नाटकातून गावातल्या जत्रेत, उत्सवात हरवलेले माणसांचे माणूसपण आणि त्यामुळे दलितांची होणारी पिळवणूक, छळ याचे दर्शन होते. दलितांचे शोषण, त्यांची दुःख, प्रस्थापितांच्या धर्मपरंपरेचा पोकळपणा, अंधविश्वासू, साहित्यचौर्य, देवभोळेपणा, स्वार्थी बाबालोक यांच्यावर प्रकाश टाकलेला आहे. त्यांच्या झुंबर, स्मशान, गॅगमॅन या एकांकिकाही अंतर्मुख करणाऱ्या आहेत. १६ डिसेंबर १९८० रोजी प्रकाश त्रिभुवन यांचे 'थांबा रामराज्य येतंय' हे नाटक रंगभूमीवर आले. या नाटकातून खेडयातील दलित–दलितेतर यांच्या अस्तित्वाचा संघर्ष उभा केला. पिढयानपिढया दलितांचे शोषण होत आहे. हे दाखवितांना दशावतारी खेळातून कण, बळी, परशुराम,लंकादहन, कालिया मर्दन अशा प्रसंगाशी या नाटकाचा नायक आनंद यांच्या जीवनाचा समन्वय दाखविलेला आहे. आनंद हा सुवर्णांशी, पाटलाशी संघर्ष करतो. नोकरी न करता गावातील पोलीस पाटलाच्या जागेसाठी अर्ज करतो. पाटलाशी झालेल्या संघर्षात मरण पावतो. त्याचे हे आत्मबलिदान दलित चळवळीला एक प्रेरक खतपाणी बनले असून, त्यातूनच रामराज्य येण्याची चिन्ह दिसू लागली आहेत असे लेखकाल सूचवायचे आहे.

१९८१ ते ९० हे दशक दलित रंगभूमीसाठी महत्वपूर्ण ठरले आहे. रामनाथ चव्हाण यांच्या 'साक्षीपुरम' यानाटकातून मुस्लिम धर्मात प्रवेश करणा–या दलितांची वास्तव स्थिती मांडलेली आहे. तर 'आधारस्तंभ' या नाटकातून दलितांच्या वेदना व त्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा विद्रोह आलेला आहे. बाजीराव रामटेके यांचे 'इथे माणसाला स्थान नाही' या नाटकातून धर्मांतर प्रश्नांची चिकित्सा केलेली आहे. रुस्तुम अचलखांब यांचे 'कैफियत'

हे नाटक २० नोव्हेंबर १९८१ ला रंगभूमीवर आले. दलित कलावंताच्या व्यथा, वेदनांना वाचा फोडणारे हे नाटक आहे.

टेक्सास गायकवाड यांचे २२ नोव्हेंबर १९८२ रोजी 'आम्ही या देशाचे मारेकरी' हे नाटक रंगभूमीवर आले हे नाटक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपध्दतीवर टीका करणारे आहे. त्यांच्या 'जळवा' (१९८४) मधून मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहातील कलह दाखविलेला आहे. अनिल सोनार यांच्या 'गोठवलेले ज्वालामुखी' या एकांकिकेतून एकेकाळी विद्यार्थ्यांची संघटन चालविणारा, अन्यायाविरुध्द आवाज उठविणारा प्राध्यापक संस्थाचालक व प्राचार्यांच्या कारस्थानामुळे कसा लाचार, अगातिक होतो याचे चित्रण आलेले आहे.

संपत जाधव यांचे 'पोतराज' (१९८३) मधून पोतराज ही दुष्ट रुढीप्रथा बंद व्हावी असा संदेश दिलेला आहे. शिल्पा मुंब्रीस्कर यांचे 'झाडाझडती' (१९८४) मधून स्त्रियांच्या दुहेरी गुलामगिरी चित्र आलेले आहे. कमलाकर डहाट यांचे 'मसन्याऊद' (१९८४), वि.रु.गोडबोले यांचे 'रक्त उसळतंय माझं' (१९८४), चंद्रकांत देवकर 'वादळातील नौका' (१९८४), अरुणकुमार इंगळे यांचे 'कायर' (१९८४), जॉनी मेश्राम यांचे 'बुध्दम शरणम गच्छामी' (१९८५), 'बेंडवा' (१९८७), प्रेमानंद गौरव यांचे 'मशाल' (१९८६), प्रेमानंद गज्वी यांचे 'जय जय रघुवीर समर्थ' (१९८६) 'पक्षी' (१९९०), दत्ता भगत यांचे 'खेळिया' (१९८६), वाटापळवाटा (१९८७), संजय डहाळे यांचे 'मरान' (१९८७), जगन्नाथ हिंगे यांची एकांकिका 'हक्कांच पाणी' (१९८८), कमलाकर डहाट यांचे 'बाजार' (१९८८), रघुनाथ आंबेडकर यांचे 'युध्द' (१९८९), बलभीम तरकसे यांचे 'स्वातंत्र्य मिळालय म्हणे', अच्युतराव सुरडकर यांचे 'वणवा' (१९८९), चारुदत्ता चौगुले यांचे 'कफन' (१९८९), रामनाथ चव्हाण यांचे 'महात्मा ज्योतिबा फुले' (१९९०) इ.अनेक नाटकातून, एकांकिकेतून देशातला भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, अनाचार, दलितांचे दारिद्रय, अज्ञान, अस्पृश्यता, जातीयता, अंधश्रध्दा, लोकांचा देवभोळेपणा, नामांतराचा प्रश्न, गावकीचा प्रश्न, स्मशानाचा प्रश्न, गायरान जमिनीचा प्रश्न, हिंदुधर्मातील असत्यता, हिंदू संस्कृती इ.अनेक ज्वलंत विषय हाताळतांना दिसतात.

## समारोप :

मराठी रंगभूमीपेक्षा दलित रंगभूमी पूर्णपणे वेगळी आहे. यात समाज बदलासाठी झपाटलेला नायक, माणूसपण जपणारा आहे. दलित नाटयलेखकांनी दलित रंगभूमीसाठी महानायकाची महत्वपूर्ण मांडणी केलेली आहे. त्यासाठी त्याचे जगणे जीवनातील व्यथा–वेदना चित्रित करतांना अनेकदा दलित लेखकांनी नाटयतंत्राची तोडफेडही केलेली आहे. एकूणच दलित जाणिवा व्यक्त करणारी, दलित दु:खाला आपल्या कवेत पकडून वेदना आणि विद्रोह एकाच वेळी प्रगट करणारी ही नाटकं आहेत. दलित रंगभूमीच्या सीमारेषेत बसणारी आणि तरीही वास्तव रुपाने दलित दु:ख साकारणारी ही नाटकं आहेत. आजही जागतिकीकरणात दलितांचे प्रश्न संपलेले नाहीत ते वेगळया प्रकारे आजही उभे आहेत. ते प्रश्न त्या समस्या घेऊन आजची, मराठी दलित नाटकं समर्थपणे उभी असल्याचे दिसत नाहीत. तरुणांनी नव्या दमाने नवे प्रश्न, नव्या समस्या घेऊन नाटयलेखन करण्याची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ :

१. फडके भालचंद्र – दलित साहित्य :वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
२. राऊत यशवंत – दलित नाटय वाङ्मय,गोदा प्रकाशन,औरंगाबाद.
३. भाग्यवंत बबन – दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय,प्रकाशन,औरंगाबाद.

❖❖❖

# ग्रामीण काव्यातील शब्दछटा

प्रा. रविंद्र डाखोरे
मराठी विभाग प्रमुख
गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
चांदूर बाजार, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९४२१०००५५०

## गोषवारा (Abstract)

ग्रामीण काव्यातील शब्द हे ग्रामजीवनाशी एकरूप झालेले असतात. त्यात कृत्रिम असा भाव नसतो. या काव्यातील प्रतिमा, प्रतिकं हे ग्राम जीवनात सहज दिसत असलेल्या किंवा जाणवत असलेल्या बाबी असतात. ग्राम लोकमानसाशी त्याचे नाते असते. ही ग्राम कविता समजून घ्यायची असेल तर ग्राम संस्कृती, बोली माहीत असणे गरजेचे ठरते नाहीतर काव्य आशय समजण्यात अडचन येऊ शकते. ग्रामीण कविता निसर्गाशी जास्त जवळची असते कारण ग्रामीण जीवनच मुळात निसर्गावर आधारित असते. अशा जीवनात निसर्गाच्या बाबींचा वारंवार उल्लेख येणे अपरिहार्यच ठरते. अशा जीवनावर आधारित कविता या निसर्गबाबींना काव्यातून आणते. त्याशिवाय ती कविता व्यक्तच होत नाही. ग्रामीण कविता निसर्ग वर्णन, साध्यासरळ जीवनाचं चित्रण करत असली तरी ती ग्राम व्यथा वेदना साकार करते. त्यांचं अंतरंग यातून उलगडते. या कविता ग्रामीण बोलीचा संग्रह आहे. ग्रामीण भागात शहरीकरण, आधुनिकीकरण यांचा प्रवेश झाला, याचा परिणाम ग्रामीण जीवनशैली व भाषेवरही झाला. ग्रामीण बोली लुप्त व्हायला लागली आहे. त्यातील शब्द,सौदर्य दिसेनासे होत आहे. ग्रामीण कवितेने अशा पारंपरिक लोकजीवनास, बोलीतील शब्द जतन केले आहे. अशा ग्रामीण शब्दांचा अभ्यास त्यातील संदर्भ, संस्कृती दर्शविते.

## विषय विवेचन

ग्रामीण कविता अवतरते ती स्थानिक बोलीसह. ग्रामकाव्यातील जीवनानुभव व्यक्त होताना त्या जीवनाला व्यक्त करण्याचे सगळ्यात जवळचे माध्यम म्हणजे बोली होय. ग्रामीण जीवन हे शेतीनिष्ठ. निसर्गाचे विविध वैशिष्ट्य त्यांच्या जीवनात सामावलेले असतात. अशा जीवनातील बदलते सामाजिक,सांस्कृतिक विश्व कवींनी आपल्या काव्यातून रेखाटले. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून लिखित ग्रामकाव्याला आरंभ झाला असे मानले जाते. त्याच्यापूर्वीचेही पुरावे गाथासप्तशतीमध्ये आढळते. बोलीतील या काव्याने ग्रामजीवनाचा आलेख मांडताना विविध अंगांनी विचार केलेला आहे. पूर्वी 'जसं दिसलं तसं मांडलं' ही भूमिका भा. रा. तांबे यांच्या काळातील तर ग्रामजीवनातील आंतरिक घुसमट विदारकपणे मांडणारा काळ कवी विट्ठल वाघ यांचा. एवढ्या दीर्घ प्रवासात ग्राम काव्यातून बदलते खेडे, बदलती मानवी वृत्ती आपल्यापुढे साकार होते. वास्तवाला, अनुभवाला शब्दरूप देताना कवींनी प्रतिमा, प्रतिकं यांचा चपखलपणे वापर केलेला दिसतो. बोली मुळातच वाक्प्रचार, म्हणींनी समृद्ध असलेली, त्यातच कमीतकमी शब्दात अधिकाधिक आशय व्यक्त करताना अनेक प्रतिमा, प्रतिकं बोलण्यात वापरतात. तसाच अनुभव गीत, काव्य यात सुद्धा येतो. अर्थातच हे प्रतिमा, प्रतिकं अस्सल ग्रामीण असतात, नागर जीवनाच्या भाषेपेक्षा ते वेगळेच असतात. म्हणूनच बोलीचा परिचय नसलेल्या नागरांना कधी कधी ग्रामजीवनाच्या शब्दरूप अनुभवाची अनुभूती घेता येत नाही. उदा. दाखल बालकवींच्या या काव्यातील पुढील ओळी

'श्रावणमासी हर्षमानसी
हिरवळ दाटे चोहीकडे'[१]

या ओळीतील असलेल्या अनुभवाची अनुभूती प्रमाणभाषेशी परिचित असणाऱ्या वाचकांना त्वरित येईल. यातील प्रतिमा त्यांना लवकर कळू शकेल. मानसी आणि माणसी या दोहोतील फरक त्यांना कळत असल्यामुळे काव्यानंदात विघ्न येणार नाही. ग्रामीण माणसांचा संबंध हा बोलीशी जास्त असतो. त्यामुळे प्रमाण भाषेतील हा सूक्ष्म भेद जर कळला नाही तर त्याला तो काव्यानंद मिळू शकणार नाही. त्यापेक्षा कवी ग.ल. ठोकळ यांच्या पुढील ओळीतून तो काव्यानंद त्यांना मिळू शकेल

'हंतरली भूईवर जशी हरळ लसलशी'[२]

दोन्ही काव्यपंक्तीतील अनुभव सारखाच परंतु बालकवींनी आपला अनुभव व्यक्त करण्याकरिता प्रमाण मराठीचे माध्यम वापरले तर कवी ग.ल. ठोकळ यांनी बोलीचे माध्यम स्वीकारले.

ग्रामीण काव्यातून येणारे प्रतिकं, प्रतिमा या ग्रामजीवनाशी निगडित असून त्या ग्रामीण जीवनशैलीतून आलेल्या आहेत. ग्रामीण माणसाने आपले जीवन निसर्गाच्या समवेत संपन्न केले आहे. त्या निसर्गाच्या शक्तीची जाणीव त्याला आहे. म्हणूनच आपल्या जीवनाची तुलना तो निसर्गशक्तीशी, निसर्गातील वैशिष्ट्यांशी करताना आढळतो. कवी विट्ठल वाघ यांच्या पुढील काव्यपंक्तीतून याचा परिचय होतो

कसा झाला रे माणूस कळू निबांचा रे पाला
येल काकळीचा होता बार कारल्याचा आला [३]

ग्रामीण बोलीमध्ये सर्वसामान्यत: प्रतिकं,प्रतिमा या दृश्य सृष्टीतील असतात. काल्पनिक प्रतिमा या अगदी क्वचितच ग्रामकाव्यात आढळतात. आपल्या शब्दातील मतितार्थ रसिकाला व्यवस्थित समजावा अशी प्रतिमा,प्रतिकांची योजना असते. या प्रतिमा किंवा प्रतिकं दैनदिन जीवनातील असतात म्हणूनच ग्रामीण कविता ही थेट मनाला भिडते असे म्हटले जाते. पुढील काव्यओळीतून हे स्पष्ट होईल.

राया तुझा रंग जवसाच्या फुलावाणी
——— राया तुझे दात जसे धुतले तांदूळ [४]

पती वर्णन करताना आलेल्या या प्रतिमा ग्रामीण जीवनात आढळणाऱ्या आहेत. जवस, तांदूळ हे सर्व परिचित परंतु जेव्हा प्रमाण भाषेतील एखाद्या काव्यातील 'दंत मोती' अशी प्रतिमा जेव्हा येते तेव्हा ग्रामीण भागात राहणाऱ्या, पितळ, तांब्याच्या पुढे न गेलेल्या माणसाला ती प्रतिमा समजू शकणार नाही. त्यापेक्षा 'धुतले तांदूळ' यातून त्याला अर्थ बोध होण्यास अडचन येत नाही. या प्रतिमा, प्रतिकं फक्त एखाद्या सुखद वर्णनाकरिताच जन्म घेत असतात असे नाही तर ग्रामीण माणसांच्या जीवनातील दु:ख, दारिद्रय व्यक्त करण्यासाठीसुद्धा या प्रतिमा येत असतात. विवंचनेतील ग्राममानसाच्या मानसिकतेचा परिचय पुढील प्रतिमांद्वारा कवी विट्ठल वाघ यांनी रेखाटला आहे.

'ढगा मचूक अभाय, कुकू पुसलं कपाय
सुतक पळेल डोये, निऱ्हानाम तरसले' [५]

या प्रतिक, प्रतिमामधील साधर्म्य शोधणारी प्रतिभा कवीच्या ठिकाणी असते आणि या प्रतिभाशक्तीमुळेच आशयसंपन्न प्रतिमांचा जन्म होतो. कवीची निरीक्षण क्षमता, चिंतनशिलवृत्ती आलेल्या अनुभवाची घुसळण करून प्रतिभा, प्रतिमांचा आविष्कार करते. ग्रामीण कवितेतील प्रतिकं, प्रतिमा यांचा विचार करताना निसर्ग आणि मानवी जीवन यातील साधर्म्य विलक्षण आत्मियतेने टिपले असल्याचे जाणवते. आशयसंपन्न प्रतिमांची निर्मिती पारंपरिक लोकसंस्कृती, निसर्ग या माध्यमातून कवी करतो. त्याच्या अनुभवसंपन्नतेला, प्रतिभाशक्तीला ओळखणारी नजर जर रसिकाजवळ नसेल तर तो रसिक अनुभूती प्राप्त करू शकत नाही. बोलीतील कवितेत प्रतिमा उलगडताना दैनदिन जीवनातील आसपासच्या परिसरातील निसर्ग, लोकपरंपरा यातील प्रतिमा वापरतो. वाचकाच्या जीवनातील घटकच प्रतिमारूपाने समोर आल्यामुळे त्या अनाकलनीय ठरत नाही. उदा.

काल टोंग्या टोंग्या होती, आज छात्यामांड्या झाली
परकरातली पऱ्हाटी, जशी लुगड्यात आली [६]

बालपण संपून तारुण्यात प्रवेश करणारी तरुणी आणि डौलात वाढलेली पऱ्हाटी याचे चित्रण कवी विट्ठल वाघ यांनी केले आहे. विदर्भ – शेतकरी – पऱ्हाटी असा एक पारंपरिक अतूट संबंध पिढ्यानुपिढ्या चालत आलेला आहे.त्यातून निर्माण होणाऱ्या प्रतिमा या बुद्धीला आव्हान न करता थेट कळतात. अशाच आशयाची कवी बा.सी. मर्ढेकर यांची कविता –

पोरसवदा होतीस
कालपरवा पावेतो
होता पायातही वारा
कालपरवापावेतो [७]

मुलीचा जीवनविकास याही काव्यात आहे, परंतु या काव्यातील प्रतिमा रसिकाच्या बुद्धीला आव्हान करणारी आहे. येथे काव्य तुलनेचे धाडस नाही तर एकाच आशयाच्या प्रमाणभाषेतील आणि बोलीतील प्रतिमांचे रसिकदृष्ट्या केलेले विवेचन आहे. ग्रामीण कवितेतील प्रतिमा, प्रतिकं हे ग्रामजीवनाशी निगडित असून त्यात कोणत्याही प्रकारचे पांडित्य नाही. 'जसं भावलं तसं ग्रामीण लोकमानसाद्वारे मांडलं' असं ग्रामीण काव्यातील

प्रतिकं, प्रतिमांबाबत म्हणावे लागेल.यातील काल्पनिकताही वास्तवाचा धागा कधी सोडत नाही, निसर्ग वैशिष्ट्य जसे ग्रामीण माणसाने आपल्या जीवनात जतन केले तसे बोलीतही कायम ठेवले. काळानुरूप परंपरागत ग्रामीण जीवनशैली बदलत आहे, त्याप्रमाणे ग्रामीण जीवनाचे नागरीकरण होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ग्रामीण काव्यातील प्रतिकं, प्रतिमा बदलत गेले आहेत. निसर्गातील गीत जाऊन बदलत्या गावाचे वर्णन पुढीलप्रकारे येत गेले

तेथे आता शेड करवती
यंत्र आंतुनी गाते गाणी
निळ्या ढगाच्या तोंडावरती
धूर सोडिते जस्ती चिमणी ८

ग्रामीण काव्याच्या प्रवासात विषय बदलत गेले त्याबरोबरच त्यातील प्रतिमाही बदलत गेल्या, बदलता आशय, बदल्यात्या प्रतिमा वास्तवाचे यथासांग चित्रण करू लागल्या. ग्रामीण जीवनाच्या अंतर्मनाचा शोध घेण्यास मराठी काव्याने प्रारंभ केल्यानंतर प्रतिमातील फरक ठळकपणे जाणवू लागले. ग्रामकाव्यातील प्रतिमा या ग्रामविश्वातील निसर्ग, लोकप्रथा, लोकमानस याच्यासोबत समन्वय साधणाऱ्या आहेत. बोलीभाषेतील सौदर्य काव्यात आणणाऱ्या या प्रतिमा, प्रतिकं काव्याच्या आशयाला अधिक खुलविते. कमीत कमी शब्दांतून जास्तीत जास्त आशय साकार करणाऱ्या या प्रतिमा कवींच्या प्रतिभेची साक्ष तर आहेच त्याबरोबर ग्राममानसातील शब्दवैभवाचा गौरव आहे.

## निष्कर्ष

१. ग्रामीण बोलीतील शब्द हे विविध भाव घेत व्यक्त होतात. या शब्दांचे माधुर्य त्या शब्दांचा वापर जेव्हा होतो तेव्हा साहाजिकच कवितेत गेयता निर्माण होते आणि चपखलपणे ते आशय व्यक्त करतात.

२. ग्रामीण कवितेत येत असलेल्या विषयाशी संबंधीत हे शब्द असतात. शब्द हे त्या समुहाची संस्कृती व्यक्त करतात.

३. ग्रामीण कविता हे ग्रमीण जीवन त्याच्या संस्कृतीसह व्यक्त करते. ग्रामीण काव्यातून प्रथा, परापरांचा मागोवा घेता होतो. यातून दिसणारी जीवणशैली ग्रामसंस्कृतीची ओळख करून देते . यादृष्टीने विचार करता लोकसाहित्याच्या अभ्यासकास ग्रामीण कविता उपयुक्त संदर्भ ठरू शकते.

४. ग्रामीण काव्यात येणारे शब्द हे परंपरेने चालत आलेले आहेत. काळानुरूप शहरीकरण, आधुनिकीकरण यांच्या प्रभावामुळे हे शब्द लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. ग्रामीण कवितेने अशा शब्दांना जतन करून ठेवले आहे. बोलीच्या अभ्यासकांना ग्रामीण कविता उपयुक्त ठरू शकतात.

## संदर्भ

१. काव्यधारा– संपादन डॉ. केशव फाले, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०१०, पृष्ठ क्र. ५६
२. जित्राब, संपादक– भैरव कुंभार, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ क्र.४१
३. जित्राब, संपादक– भैरव कुंभार, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ क्र.४१
४. जित्राब, संपादक– भैरव कुंभार, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ क्र.४२
५. जित्राब, संपादक– भैरव कुंभार, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ क्र.७६
६. जित्राब, संपादक– भैरव कुंभार, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ क्र.७८
७. द्विदल, मर्ढेकर काव्य विचार,द.भि. कुलकर्णी, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, १९९३ पृष्ठ क्र.३३
८. जित्राब, संपादक– भैरव कुंभार, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ क्र.९०

❖❖❖

# पर्यावरणीय जीवन जाणीवा व्यक्त करणारी चाळेगत

प्रोफेसर डॉ. रमेश पां. पोळ
प्रमुख मराठी विभाग,
पदवी, पदव्युत्तर अध्यापन व संशोधन केंद्र,
सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड, महाराष्ट्र (India)
Email: polramesh1966@gmail.com भ्रमणध्वनी ९८५०८५६३३०

## गोषवारा (Abstract)

'चाळेगत' ही कादंबरी कोकणी पारंपरिक जीवन आणि आजचे आधुनिक कोकणी जीवन यांच्या संघर्षमय जीवनाचे चित्रण करते. आधुनिक, औद्योगिकतेच्या नावाखाली बदललेली मानवी जीवनशैली, बदललेली व्यवस्था, व्यवसाय, मूल्य, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सांस्कृतिकीकरण इ. अनेक घटकांना ही कादंबरी आपल्यात समावून घेते. या संदर्भात 'मराठी सृष्टी' या लेखात असे म्हटले आहे की, "गेल्या वीस पंचवीस वर्षातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय बदलांचा आडवा उभा छेद घेणारी प्रवीण बांदेकरांची 'चाळेगत' ही कादंबरी कोकणातील सद्यस्थितीची हुबेहुब सावली ठरली आहे.

**बीजशब्द** : पर्यावरणीय जीवन, चाळेगत, मच्छिमारी, नैसर्गिक, ट्रॉलर्समुळे

## विषय विवेचन

पर्यावरण हा शब्द सर्वपरिचित असा आहे. मानवी जीवनाचा पर्यावरण हा एक अविभाज्य भाग आहे. पर्यावरण हा शब्द धार्मिक पर्यावरण, सामाजिक पर्यावरण, आर्थिक पर्यावरण, राजकीय पर्यावरण, सांस्कृतिक पर्यावरण व साहित्यिक पर्यावरण या वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. याशिवाय याही आधी पर्यावरण हा शब्द सृष्टीतील सजीव घटकांना उद्देशून वापरला गेला.

मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचा साहित्य हा एक अपरिहार्य घटक आहे. मानवाने आपले जीवन अधिकाधिक संपन्न करण्यासाठी सांस्कृतिक पर्यावरणाची निर्मिती केली.साहित्यातून तो आनंद प्राप्त करत असतो. मराठी साहित्यात पर्यावरणीय मराठी साहित्य व निसर्गविषयक मराठी साहित्य असे दोन समांतर जाणारे परंतु तरीही विभिन्न असणारे साहित्य प्रवाह आहेत. निसर्गविषयक साहित्य म्हणजे ज्यात नैसर्गिक घटकांचे चित्रण केलेले असते. तसेच मानवी भावभावनांचे आरोपण करुन निसर्गाला जगण्याचा घाट प्राप्त करुन दिलेला असतो. पर्यावरणीय साहित्यात पर्यावरणांच्या जीवन जाणीवांचा विचार प्रामुख्याने अलिकडच्या कालखंडात केला गेला आहे. या संदर्भात प्रा रा. ग. जाधव लिहतात,"भाषा ही साहित्यकृती या सजीवातील पेशी स्वरुप ऊतकीय देहरुप होय. या पेशीतील मूलद्रव्ये किंवा जीवनद्रव्ये म्हणजे भावना विचार कल्पना किंवा मन बुध्दी अहंकार किंवा भाषा संकेतातील विविध जीवनार्थ व जीवनवस्तू होत. जैविक दृष्टिने भाषाही साहित्यकृतीच्या सजीवात बीजभूत असते."

मराठी कादंबरीत इ.स. १९८० नंतर पर्यावरणीय साहित्याचा विचार अनेक कादंबरीकारांनी केला. राजन खान, राजन गवस, भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठार, प्रवीण बांदेकर यासारख्या अनेक लेखकांनी पर्यावरणीय जाणीवा शब्दबध्द केल्या. अलिकडच्या काळातील प्रवीण बांदेकर यांची चाळेगत ही कादंबरी यासंदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण आहे. इ.स. १९९०नंतरच्या कोकणच्या बदलत्या जीवनशैलीचा वेध घेणारी कादंबरी मराठी साहित्यात अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रयोगशील कादंबरीकार म्हणून प्रवीण बसंदेकर आपणाला परिचित आहेत. कोकणी जीवनाचाच एक भाग असणारे हे लेखक त्यामुळे कोकणी जीवन जाणीवा त्यांनी अधिक सक्षमपणे यात मांडल्या आहेत. चाळेगत ही प्रवीण बांदेकर यांची कादंबरी २००९साली प्रकाशित झाली. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत तिने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

चाळेगत ही कादंबरी कोकणी पारंपरिक जीवन आणि आजचे आधुनिक कोकणी जीवन यांच्या संघर्षमय जीवनाचे चित्रण करते.आधुनिक, औद्योगिकतेच्या नावाखाली बदललेली मानवी जीवनशैली, बदललेली व्यवस्था, व्यवसाय, मूल्य, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सांस्कृतिकीकरण इ.अनेक घटकांना ही कादंबरी आपल्यात

समावून घेते. या संदर्भात 'मराठी सृष्टी' या लेखात असे म्हटले आहे की, "गेल्या वीस पंचवीस वर्षातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय बदलांचा आडवा उभा छेद घेणारी प्रवीण बांदेकरांची 'चाळेगत' ही कादंबरी कोकणातील सद्यस्थितीची हुबेहुब सावली ठरली आहे. आधि 'विभावरी पाटील' आणि आता सोलापूरचा मानाचा 'भैरुरतन दमाणी' पुरस्कार मिळवून बांदेकरांच्या या कादंबरीने समकालातील आपलं वेगळेपण अधोरेखित केले आहे." यावरुन या कादंबरीच्या स्वरुपावर प्रकाश पडतो.

चाळेगत या कादंबरीची अभिव्यक्ती ही महत्त्वपूर्ण आहे. तमाशा, दशावतार इ. पारंपरिक लोककलेच्या आधारे सद्यस्थितीवर अतिशय बोलके भाष्य ही कादंबरी करते. शंकासूर या पात्राच्या माध्यमातून सद्यकालीन कोकणी जीवनाचे एक भयावह चित्र या कादंबरीने शब्दबध्द केले आहे. यासंदर्भात रंगनाथ पाठारे यांनी अतिशय मार्मिक अभिप्राय नोंदविला आहे. ते सांगतात,"कोकणातील सर्वसामान्य कष्टकऱ्यांचे शेतकरी, मच्छिमार अशाचं जगणं या पध्दतीने केंद्रस्थानी आणून त्याला शंकासुराच्या प्रारुपाप्रमाणे उभं करणं, हे मोठे काम प्रवीणने या कादंबरीमध्ये केलेले आहे. दशावतारी खेळाचा फॉर्म वापरला गेल्यामुळे त्या कथन परंपरेतील लवचिकताही आपोआप प्राप्त झालेली दिसते."

कादंबरीला एकूणच निश्चित असे कथानक नाही. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' प्रमाणे यात अनेक घटना सांगितलेल्या आहेत. आणि या प्रत्येक घटना एकमेकीत सामाजिक,सांस्कृतिक, औद्योगिक, राजकीय कारणांनी संबंधित आहेत. या प्रत्येक घटनांना अंतरिक यहसंबंध हा बदलत्या जीवनशैलीशी, बदलत्या मानवी जीवनाशी आहे. कोकणी लोकांचा पारंपरिक व्यवसाय म्हणजे मासेमारी. पारंपरिक पध्दतीने मच्छिमारी करून आपले जीवन जगणारे हे कोळी. समुद्र हा त्यांचं सर्वस्व. औद्योगिकीकरणामुळे यंत्रसंस्कृती आली. आणि या यंत्रसंस्कृजीने मानवी जीवनाला जखडून टाकले. पारंपरिक मच्छिव्यवसायावर या यंत्रसंस्कृतीचा फार मोठा परिणाम कसा झाला आणि कोकणातील पारंपरिक व्यापार, उद्योग ऱ्हास पावले. भांडवलदार, राजकारणीयांनी आपल्या सत्तेच्या व पैशाच्या जोरावर इथल्या पर्यावरणाचा ऱ्हास केला. प्रचंड नफा मिळवण्याच्या उद्देशाने समुद्रामध्ये ट्रॉलर्सव्दारे बेसुमार, बेलगाम अशी मासेमारी करण्यास सुरुवात केली. यात निसर्गाची आपण बेमालुमपणे हत्या करत आहोत याची पुसटशी ही जाणीव नाही. या ट्रॉलर्समुळे पारंपरिक मच्छिमारी बंद झाली. पर्यावरणाची प्रचंड हानी, समुद्रतील जीवजंतू, साधनसंपत्ती यांचा ऱ्हास, त्यातूनच नैसर्गिक प्रदुषण इ. अनेक घटना लेखकाने अत्यंत समर्पक व वेधक पध्दतीने वर्णन केल्या आहेत.

समुद्र हा निसर्गाचा मुलभूत घटक. याच समुद्रातून मानवाने अफाट अशी साधन संपत्ती मिळविली. कोकणी जीवनाचा अविभाज्य भाग असणारा हा समुद्र तिथल्या पारंपरिक श्रमजीवी वर्गाचे उपजीविकेचे साधन आहे. पण या भांडवलदारांमुळे ट्रॉलर्समुळे हा श्रमजीवी वर्ग संपुष्टात आला. बेकारी, बेरोजगारी त्यांच्या वाट्याला आली. भांडवलदार, राजकारणी यांनी आपल्या हव्यासापायी केलेली ही दुर्दशा अतिशय प्रखरपणे प्रत्ययाला येते. यासंदर्भात हरिश्चंद्र थोरात लिहतात, "शांत निसर्गाला अनुसरणारा, विकृत उपभोगापासून दूर असलेला आक्रमणाची सवय नसलेला आणि प्रतिकाराची आसुध हरवून बसलेला हतबल समाज चाळेगतच्या केंद्रस्थानी आहे. चाळेगत म्हणून एक सुविहित कथानक साकार होत नाही, तर अस्वस्थ करणारी अनेक दिशांनी जाऊ पाहणारी, अनियंत्रीत आणि अंतर्विरोधांनी भरलेली एक ऐतिहासिक समग्रता आपल्या समोर साकार होत आहे, असे वाचकांना वाटू लागते."

कादंबरीतील पर्यावरण, निसर्ग हा कादंबरीतील पात्रे म्हणून येतो. इथल्या नद्या, समुद्र, डोंगर, जंगले, वाड्या, पशुपक्षी हे सर्वजण या लेखन कृतीत सजग झालेले आहेत. या साऱ्यांच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवेदना, जाणीवा, मानवाने त्याचा केलेला ऱ्हास हे सारेच उलगडत जाते. ही कादंबरी वाचताना एक प्रकारची अस्वस्थता सतत जाणवत रहाते. केवळ हव्यासापायी, पैसा मिळवण्यासाठी कोकणचा पोशिंदा असणाऱ्या समुद्राची होणारी कत्तल, जंगलांची होणार कत्तल, तिथे होणारी सिमेंटची जंगले, नैसर्गिक पशुपक्षी यांचा विकृत मार्गासाठी केला जाणारा वापर, विकृत लैंगिक हव्यासापायी नष्ट होणारी ही साधन संपत्ती, मानव व निसर्ग यांचा एक असणारा पारंपरिक सहसंबंध या वसाहतवादी भांडवलदारांनी नष्ट केला. आणि तिला विकृत रुप दिले. हेच ही कादंबरी अतिशय समर्पक शब्दात सांगते.

राजकारण, शिक्षण्व्यवस्था, समाजकारण, साहित्य या प्रत्येक क्षेत्रात आजच्या काळात असणारा भ्रष्टाचार, त्यातील शोषण मूल्यव्यवस्थेला गेलेला तडा, मूठभर लोकांच्या हाती असलेली सत्ता, शिक्षणात असणारी तफावत या साऱ्याच घटना आपणाला आधुनिक जीवनाची भयावह स्थिती सांगतात. मानवी जगण्याला आलेला बेछूटपणा

आणि याला जबाबदार असणारा मानव यात आलेला आहे. पर्यावरणीय लीवन जाणीवा व्यक्त करताना लेखकाने वापरलेली शैली अतिशय महत्त्वपूर्ण आहे. या कादंबरीची भाषा ही त्या त्या घटनेला, प्रसंगाला, निवेदनाला अनुसरुन आलेली आहे. कोकणी भाषेचा, त्यातील म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर कोकणी पारंपरिक जीवन दर्शन घडवते. आशयाप्रमाणे निवेदनाच्या तंत्रामध्ये झालेला बदल हा या कादंबरीत महत्त्वपूर्ण ठरला आहे.

कोकणच्या भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांना आपल्या रंगरुपासह दृश्यमान करणारी 'चाळेगत' ही कादंबरी एका बाजूला झालेला भौतिक विकास उलगडते तर त्याचवेळी दुसऱ्या बाजूला त्या विकासाचे मानवी जीवनावर व पर्यावरणावर झालेले बेछूट परिणाम स्पष्ट करत नष्ट हांत जाणारे पर्यावरणीय जीवन ही मांडते. आण म्हणूनच प्रयोगशील कादंबरीत पर्यावरणीय जीवन जाणीवांचा अतिशय प्रत्ययकारी वेध घेणारी ही कादंबरी आहे.

## संदर्भ सूची

१. पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य – प्रा. रा.ग.जाधव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे १९९६.
२. महाराष्ट्र टाईम्स – मराठी सृष्टी लेख –आशुतोष गोडबोले, २५/७/२०१०.
३. आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे –रंगनाथ पाठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २०१४.
४. कथात्मक साहत्य आणि समीक्षा – हरिश्चंद्र थोरात, शब्द पब्लिकेशन, मुंबई २०११.

❖❖❖

## Form IV
(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका (MPSP)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre**, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual (January)** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**

Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401





☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

e mail: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For RJI: researchjournalofindia@gmail.com

For MPSP: marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983

| | | | |
|---|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** | **₹ 500/-** |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** | |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** | |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** | |
| **MICR coe** | - | **445014001** | |
| **A/c No.** | - | **60175373000** | |
| **A/C Name** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** | |

**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**

p-ISSN 2454-7409

9 772454 740009

e-ISSN 2582-5305

9 772582 530008